प्राचीन मराठी वाङ्मयाचें स्वरूप

प्रा. ह. श्री. शेणोलीकर.

प्रकाशक :
मा. बा. धोपेश्वरकर
१५०६ मारुतीगल्ली,
बेळगांव.

★

मुद्रक :
जी. के. कुट्रे,
राजकमल प्रिंटिंग प्रेस,
बेळगांव.

प्रथमावृत्ति : १९५६
सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन.

★

मूल्य अडीच रुपये.

क०८।६८

तीर्थरूप
श्रीधर वासुदेव शेणोलीकर
यांना सादर—

हे वाक्सृष्टि एके वेळे।
देखतु माझे बुद्धीचे डोळे॥
तैसा उदेजो जी निर्मळें। कारुण्य–बिंबें॥

(ज्ञानेश्वरी अ. १४–२०)

निवेदन

'प्रसाद–प्रकाशन' तर्फे १९५४ सालीं प्रसिद्ध झालेल्या 'महाराष्ट्र-परिचय' नांवाच्या संदर्भ ग्रंथाकरितां, त्या ग्रंथाचे एक संपादक कोशकार श्री. चिं. ग. कर्वे यांच्या विनंतीवरून वाङ्मयेतिहासासंबंधीं मी एक प्रबंध लिहिला होता. तो 'महाराष्ट्र-परिचया' च्या अठराव्या प्रकरणांत (पानें ३२९-३८६) समाविष्ट करण्यांत आला आहे. आंग्लपूर्व मराठी वाङ्मयाचें विहंगमावलोकन करण्याच्या दृष्टीनें त्या प्रबंधाचा कोणालाहि चांगला उपयोग होईल, असा अभिप्राय जाणत्या मंडळींनीं दिल्या-वरून तो प्रबंधच थोडी पुस्ती-दुरुस्ती जोडून पुस्तक रूपानें प्रसिद्ध करावा, असें मी ठरविलें. प्रत्येक ठिकाणीं माहितीच्या तपशीलाची भर घालून चांगला चारशें पांचशें पानांचा 'ग्रंथराज' तयार करण्याचा पहिल्यांदा माझा बेत होता. पण वाङ्मयेतिहासविषयक तशी पुस्तकें यापूर्वीं झालेली आहेत; हें एक. शिवाय तसे जाडजूड ग्रंथ नुसती कपाटांची शोभा वाढवितात, हा अनुभव ध्यानीं येतांच मी तो बेत सोडून दिला. बिरला नगरच्या एका वाचकानें त्या प्रबंधाचें 'गागर में सागर' असें जें वर्णन केलंय, तेंच त्याचें रूप कायम ठेवणें सध्यां इष्ट होईल, असें वाटून तोच प्रबंध थोड्या पुस्ती-दुरुस्तीसह आज पुस्तक रूपानें वाचकांना मी सादर करीत आहे.

वास्तविक भावे-पांगारकर यांच्या प्रचंड ग्रंथांपासून तों निरंतर-दांडेकरांच्या संक्षिप्त इतिहासांपर्यंत वाङ्मयेतिहासविषयक अनेक पुस्तकें मराठींत आहेत. मराठीच्या अभ्यासकांना त्या ग्रंथांनीं आपापल्या परीनें आजवर पुष्कळच सहाय्य केलें आहे. तरी सुद्धां एका टीकाकार मित्रानें म्हटल्याप्रमाणें 'हरिदासी पद्धतीचे पाल्हाळिक नि अवजड इतिहास ग्रंथ, अन् शालेय पद्धतीनें टिपणें काढलेली त्रुटित स्वरूपाचीं इतिहास-पुस्तकें ' या दोहोंशीं परिचय असणाराला समाधान देणारें असें बरेंच कांहींतरी या पुस्तकांत आढळेल, असें नम्रपणानें मी सांगू इच्छितो.

आंग्लपूर्व वाङ्मयाचें हें विहंगमावलोकन असलें तरी, मराठी भाषेच्या जन्मापासून तों पेशवाई अखेरपर्यंतच्या मराठी वाङ्मयाचें, वाङ्मयपरंपरांचें, वर्णन, विवेचन व मूल्यमापन यामध्यें केलें आहे. ग्रंथ व ग्रंथकार, त्यांचे पंथ नि परंपरा, त्यांच्या वेळची सामाजिक परिस्थिति नि त्या काळांतील महत्वाच्या ऐतिहासिक घडामोडी या सर्वांचे परस्पर संबंध लक्षांत घेऊन त्यामध्यें असलेली ऐतिहासिक संगति स्पष्ट करून दाखविण्याचा या पुस्तकांत मी प्रयत्न केला आहे. अर्थात् ग्रंथकाराच्या स्थलकालनिश्चितीच्या प्रश्नापासून तों त्याच्या सामाजिक-राजकीय कामगिरीच्या प्रश्नांपर्यंत अनेक वाद विद्वानांत नि संशोधकांत चालू आहेत; त्यामुळें मतभेद निर्माण होण्याला या सारख्या पुस्तकांबाबत पुष्कळच वाव असतो, ही गोष्ट लक्षांत घेऊन जाणत्यांनीं या प्रयत्नाकडे पहावें, अशी विनंति आहे.

मुंबईच्या एका विद्वान् टीकाकार-प्राध्यापकांनीं मुद्दाम पत्र लिहून मला कळविल्याप्रमाणें या प्रबंधा सारख्या 'एकसूत्र नि सुटसुटित इतिहास-पुस्तकाच्या अभावीं ' उच्च शिक्षण घेणाऱ्या मराठीच्या अभ्यासकांना प्रस्तुतचा प्रबंध सहाय्यक होईल, यांत शंका नाहीं. परंतु केवळ विद्यार्थ्यांची गरज लक्षांत घेऊनच तो प्रबंध लिहिला नसल्यानें सामान्य वाचकाच्या दृष्टीनेंसुद्धां हें पुस्तक उपयुक्त नि उद्‍बोधक ठरेल, अशी आशा वाटते. कोणाहि वाचकाला प्राचीन मराठी वाङ्मयाचें सम्यद्दर्शन व्हावें आणि आपल्या गतेतिहासाचें वाङ्मयीन चित्र सुसंबद्ध रीतीनें व स्पष्टपणें त्याच्या मनःपटलावर दृढ संस्कारांच्या रूपानें उमटावें, एवढाच हेतू हें पुस्तक वाचकांपुढें ठेवण्यांत लेखकाचा आहे. हें प्राचीन मराठी वाङ्मयेतिहासाचें स्वरूप-दर्शन वाचकांना आवडलें तर, याच पद्धतीनें अर्वाचीन वाङ्मयेतिहासाचेंहि स्वरूप-दर्शन त्यांना घडवावें अशी लेखकाची उमेद आहे.

वाङ्मयेतिहासाच्या लेखनांत दर्दी असलेल्या पूर्वसूरींचा 'मागोवा' घेतच मी निघालों आहे. परंतु मुळांत हा प्रबंध तयार करतांना माझे स्नेही प्रा० गं. बा. सरदार यांच्या मार्गदर्शनाचा व विचारविनिमयाचा मला पुष्कळच उपयोग झाला. त्यांच्या प्रोत्साहनामुळेंच मी तो प्रबंध त्यावेळीं पुरा करूं शकलों. तसेंच, मूळ हस्तलिखिताची मुद्रण-प्रत तयार करतांना आणि आतां त्याला पुस्तकाचें रंगरूप देतांना माझे मित्र व सहकारी प्रा० कृ. ब. निकुम्ब यांच्या मार्मिक सूचनांचा व सल्लामसलतीचा खूपच उपयोग मी

करून घेतला आहे. या पुस्तकाची मलावण करण्यासाठीं आचार्य भागवतांसारखी अधिकारी व्यक्ति लाभली, हें एक भाग्यच म्हणायाचें आणि या पुस्तकाचें प्रकाशन प्रा. डॉ. के. ना. वाटवे यांच्यासारख्या विद्वानाच्या हस्तें होत आहे, हाहि एक सुयोगच होय. या सर्व मंडळींनीं वेगवेगळ्या प्रकारें मला जें सहाय्य केलें, त्याबद्दल त्यांचा मी ऋणी आहे.

'महाराष्ट्र परिचया' साठीं हा प्रबंध माझ्याकडून लिहवून घेतला आणि आतां तो पुस्तक रूपानें प्रसिद्ध करण्याला अनुमतिहि दिली याबद्दल त्या ग्रंथाचे संपादकद्वय श्री. स. वा. जोगळेकर व श्री. चिं. ग. कर्वे आणि 'प्रसाद प्रकाशन' चे चालक श्री. य. गो. जोशी या सर्वांचा मी कृतज्ञ आहे.

तसेंच, मुखपृष्ठावरील ब्लॉकसाठीं सजावट करून दिल्याबद्दल चित्रमंदिरचे श्री. के. बी. कुलकर्णी आणि पुस्तकाची छपाई तत्परतेनें व सुंदर प्रकारें करून दिल्याबद्दल राजकमलचे मालक श्री. कुट्रे आणि त्यांचे कामगार या सर्वांचा मी मनःपूर्वक आभारी आहे.

३४०८ कमलनिवास,
गोंधळीगल्ली, बेळगांव
माघ कृ. ५, १८७७.

हरि श्रीधर शेणोलीकर.

प्रस्तावना –

प्रा० ह. श्री. शेणोलीकर यांनीं आंग्लपूर्व मराठी वाङ्मयाचें विहंगमावलोकन पुस्तकरूपानें सादर करून महाराष्ट्राची, विशेषतः सामान्य वाचकाची चांगली सेवा केली आहे. ह्या पुस्तकाच्या वाचनानें '**प्राचीन मराठी वाङ्मयाचें स्वरूप**' सामान्य वाचकाच्याहि चांगलें ध्यानीं येईल आणि त्याला विशेष अध्ययनासाठीं मोठमोठ्या इतर ग्रंथांकडे व मूळ वाङ्मयाकडे वळण्याची प्रेरणा होऊं शकेल. प्रस्तावना आणि प्ररोचना या दोन गुणांनीं प्रा० शेणोलीकरांचें हें 'अवलोकन' परिपूर्ण असल्यामुळें प्रारंभींचें वाचन म्हणून याचा उत्तम उपयोग होत राहील. या प्रबंधाची भलावण करितांना प्राचीन मराठी वाङ्मयासंबंधीं कांहीं विचार मांडण्याचें मीं ठरविलें आहे.

आंग्लपूर्व मराठी साहित्य म्हणजे मराठी भाषेच्या जन्मापासून सुमारें हजार वर्षांच्या कालखंडांतील मराठी मनाचें आविष्करण होय. या हजार वर्षांत महाराष्ट्राच्या जीवनांत जी अनेक स्थित्यंतरें झालीं, त्या सर्वांचा सुव्यवस्थित अितिहास अद्यापि तयार झालेला नाहीं. या सहस्रकांत राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक क्षेत्रांत ज्या हालचाली झाल्या त्या सर्वांची तपशीलवार माहिती फारशी उपलब्ध नाहीं. कांहीं स्थूल घडामोडींचा राजकीय अितिहास अभ्यासकांनीं तयार केला आहे; पण सामाजिक जीवनांतील विविध हालचालींचें आपणांस तपशीलवार ज्ञान मिळण्याची

साधनें विशेष उपलब्ध नाहींत. या दृष्टीनें मराठी वाङ्मय हेंच अेक सांस्कृतिक जीवनाचें दर्शन घडविणारें प्रमुख साधन बनलें आहे. दुर्दैवानें प्राचीन मराठी वाङ्मय लोकजीवनाचें संपूर्ण प्रतिबिंब देण्याअितकें व्यापक नाहीं. त्यामुळें आधुनिक दृष्टीच्या अभ्यासकाला पुरेसें समाधान लाभत नाहीं. तथापि कांहीं स्थूल गोष्टी निश्चित होण्याची सोय मराठींतील प्राचीन वाङ्मयांत सांपडते.

राजकीय दृष्ट्या या सहस्रकांत महाराष्ट्रावर बाहेरून दोन आक्रमणें झालीं; आणि त्यांत महाराष्ट्राचा दोन वेळां मोठा पराभव झाला. यादवांच्या सत्तेचा अस्त आणि मराठी वाङ्मयाचा उदय सामान्यतः अेकाच वेळीं झालेला आहे. मुसलमानी सत्तेखालून शहाजी-शिवाजींनीं महाराष्ट्रीयांची केलेली सुटका, ही या कालांतील अत्यंत उज्वल घटना मानली पाहिजे. पण पुढें पेशव्यांच्या काळांत महाराष्ट्रीयांना आपलें स्थान टिकविणें जड गेलें आणि अिंग्रेजांपुढें हार खावी लागली. सांस्कृतिक दृष्ट्याहि या कालांत असेच चढउतार झाले. भारतांत वैदिक संस्कृतीविरुद्ध जी अवैदिक विचारांची आन्दोलनें उसळलीं, त्यांत जुनी चातुर्वर्ण्याची व्यवस्था खिळखिळी झाली आणि नवी जातिभेदाची संकुचित कल्पना रूढ झाली. मराठी भाषेच्या जन्माआधींच महाराष्ट्रांत अवैदिकांचें आन्दोलन संपलेलें दिसतें. बौद्ध आणि जैन यांच्या विचारसंप्रदायांनीं महाराष्ट्रांत काय कार्य केलें, तें मराठी भाषेला माहित नाहीं. चक्रधर हा अवैदिक जैन परंपरेंत वाढलेला असल्यामुळें त्याच्या विचारांवर आणि आचारांवर अवैदिक छाप पुष्कळच आहे. तरी देखील त्याच्या शिष्यांनीं हें अवैदिक वळण बरेंचसें सोडून दिलेलें दिसतें.

गोमटेश्वराच्या पुतळ्याच्या खालीं लिहिलेला मराठीचा पहिला वाक्यरूप आविष्कार जैन वातावरणांतच निर्माण झालेला दिसतो; पण हे अपवाद वगळले तर महाराष्ट्राचें प्राचीन वाङ्मय प्रामुख्यानें वैदिक परंपरेचाच पुरस्कार करणारें आहे. महाराष्ट्रीय ब्राम्हण पंडितांनीं संस्कृतांतून देखील अनेक विषयांवर ग्रंथरचना केलेली आढळते. ती तर कट्टर सनातनी दृष्टीचीच आहे. यामुळें महाराष्ट्रांतील समाजावर प्राचीन काळापासून वैदिक पंथाचे संस्कारच दृढ झालेले आढळतात. वैदिक पंथांत ब्राम्हण आणि क्षत्रिय या दोनच वर्णांना विशेष प्रकारचें श्रेष्ठत्व प्राप्त झालेलें आहे. याहि वर्णांतला स्त्रीसमाज आणि वैश्य, शूद्र, अंत्यज इत्यादि वर्णांतील सारे स्त्री-पुरुष यांच्या नैतिक विकासाची जबाबदारी महाराष्ट्रांतील संतमंडळींनीं स्वीकारली आणि त्या दिशेनें फार नेटाचे प्रयत्न केले; हें संतवाङ्मयावरून स्पष्ट दिसून येतें. वैदिक पंथांत आढळणारी विषमतेची तीव्रता संतांनीं कमी करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला. सामाजिकदृष्ट्या जातिभेद अथवा वर्गभेद पायापासून उखडून काढण्याचा विचार महाराष्ट्रीय संतांना आकलन झालेला दिसत नाहीं. त्यांचा सर्व भर चित्तशुद्धीवर आहे. चित्ताचा क्षोभ करणाऱ्या सामाजिक संस्थांची वा परंपरांची पुनर्घटना केली पाहिजे; हा विचार संतवाङ्मयांत आढळत नाहीं. महाराष्ट्रांतील संतवाङ्मय इस्लामी आक्रमणाखालीं सांपडलेल्या महाराष्ट्रसमाजांत प्रामुख्यानें प्रादुर्भूत झालें. त्यामुळें चातुर्वर्ण्याची चौकट कायम ठेवून संतांनीं आपल्या विचारांची मांडणी केली असतांहि नैतिक समानतेचा त्यांनीं केलेला प्रचार विशेष प्रभावी झाला. परंतु समाजधारणेसाठीं

स्वधर्मी राजसत्तेची वा राज्यसंस्थेची अत्यंत आवश्यकता असतें या चातुर्वर्ण्य विचारांतील महत्वाच्या अंगाकडे पुरेसें लक्ष संत-साहित्यांत पुरविलेलें आढळत नाहीं. यामुळें संतसाहित्य अेकांगी झालें आहे. वस्तुतः हा कांहीं संतांचा दोष नाहीं. राज्यसंस्था टिकविण्याचें काम क्षत्रियांचें मानलें गेलें होते. संतांच्या काळांत क्षत्रियवर्ग महाराष्ट्रांत अत्यंत निष्प्रभ झालेला होता. अिस्लामी आक्रमणाखालीं कोलमडून पडलेली महाराष्ट्रांतील क्षात्रवृत्ति पुनः उभी राहण्यास तीनशें वर्षें लागली. शहाजी-शिवाजीच्या काळीं महाराष्ट्रानें आपला क्षात्रधर्म पुनः प्रस्थापित केला. त्याचें प्रतिबिंब रामदासांच्या साहित्यांत उत्कटतेनें पहावयास मिळतें. रामदास नुसते संत नव्हते. ते चातुर्वर्ण्य संस्थेचे निःसीम पुरस्कर्ते होते. ब्राम्हण आणि क्षात्रिय या वर्णांचीं कर्तव्यें रामदासांनीं खणखणीत-पणें उपदेशिलीं आहेत. रामदासांमुळें शहाजी-शिवाजी निर्माण झाले असें म्हणण्यांत अर्थ नाहीं. उदयोन्मुख क्षात्रशक्तीला रामदासांनीं वैचारिक साथ दिली; हेंच एक दासांचें मुख्य सामाजिक कार्य होय. त्यांचा परमार्थ सामान्यतः इतर संतांसारखाच आहे. रामदासांचें वैशिष्ट्य त्यांच्या महाराष्ट्रधर्माच्या पुरस्कारांत आहे. महाराष्ट्रधर्म म्हणजे केवळ भागवतधर्म नव्हे. तो संपूर्णसमाजधर्म आहे, असें म्हणतां येईल. दुर्दैवाची गोष्ट इतकीच का, रामदासांनीं पुरस्कारिलेला चातुर्वर्ण्यधर्म व्याहारिकदृष्ट्या परिणामकारक होईल अशी सामा-जिक परिस्थिति उरलेली नव्हती. चातुर्वर्ण्याची विकृति होऊन संकुचित जातिभेदाचें क्षुद्र स्वरूप निर्माण झालें होतें. रामदासांना ही विकृति समजली होती असें दिसत नाहीं. यामुळें रामदासानंतर

महाराष्ट्रांत महाराष्ट्रधर्माचा विचार वाढीस लागूं शकला नाहीं. केवळ सत्तालोलुपता वाढीस लागली आणि जातीजातींत मत्सर व हेवेदावे निर्माण झाले. याचें पर्यवसान पुनः पारतंत्र्यांत झालें. संतांच्या व रामदासांच्या महाराष्ट्रांतील कार्याविषयींचें हें विवेचन हळूहळू मान्य होत चाललें आहे असें वाटतें. संतांच्या चळवळीनें सामाजिक समतेकडे वाहूं लागलेला ओघ रामदासांच्या शिकवणुकीमुळें थोडा थबकला हेंहि कबूल केलें पाहिजे. तथापि या सर्व परिस्थितीचें मूळ कारण त्यावेळच्या सामाजिक विचारपद्धतींतच सांठविलेलें आहे. त्यावेळच्या महाराष्ट्राला समाजसंघटनेचें शास्त्र म्हणून चातुर्वर्ण्य विचाराखेरीज अन्य पर्याय ज्ञात नव्हता; आणि चातुर्वर्ण्याची तर विकृति झालेली होती. सामाजिक समानतेच्या पायावर समाज-संस्थापना कशी करावी याचा विचार महाराष्ट्रांतील विचारवंतांना, वीरांना आणि मुत्सद्यांना शोधून काढतां आला नाहीं. यामुळें महा-राष्ट्राचा कायमचा उदय साधला नाहीं. गतअितिहासाचा हा निष्कर्ष महाराष्ट्रानें सदैव ध्यानीं बाळगण्यासारखा आहे.

प्राचीन मराठी वाङ्मय मुख्यतः संस्कृतांतील विचारांच्या आश्रयानेंच वाढलेलें आहे. उपनिषदें, गीता, महाभारत, रामायण, भागवत, योगवासिष्ठ हे संस्कृतांतील मुख्य ग्रंथ मराठी लोकांसमोर आदर्श म्हणून होते. आणि या ग्रंथांतील विचारधन मराठींत आण-ण्याचा अत्यंत यशस्वी प्रयत्न मराठींत झालेला आहे. तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनें प्राचीन मराठी वाङ्मयांतील अमृतानुभव, ज्ञानेश्वरी, अेकनाथी भागवत, दासबोध, यथार्थदीपिका अित्यादि ग्रंथ अमर स्वरूपाचे झालेले आहेत. हे ग्रंथ केवळ भाषांतररूप नाहींत. यांत पांडित्य

आहे, अनुभूति आहे आणि नवनिर्मिति देखील आहे. या ग्रंथांच्या तोडीचे ग्रंथ भारतीय प्रादेशिक वाङ्मयांत सांपडणें कठिण आहे. महाराष्ट्रीयांनीं या ग्रंथांचा सदैव अभिमान बाळगावा अशा दर्जाचे हे ग्रंथ आहेत. या ग्रंथांचें अध्ययन महाराष्ट्रीयांनीं नेहमीं चालू ठेविलें पाहिजे. नव्या काळालाहि उपयोगी पडेल असा फार मोठा अंश या ग्रंथांत सामावलेला आहे.

भक्तितत्त्वाच्या दृष्टीनें महाराष्ट्रांतील भक्तलोकांनीं निर्माण केलेलें वाङ्मय अत्यंत कसदार आहे. साहित्याची प्राचीन, अर्वाचीन कोणतीहि कसोटी लावली तरी नामदेव–तुकारामादिकांचें साहित्य यत्किंचित्हि कमी पडणार नाहीं. काव्यदृष्ट्या संस्कृत साहित्याच्या धर्तीवर मराठींत झालेली विपुल रचना मराठीचा अभिमान बाळगण्यासारखीच आहे. मराठी भाषेच्या समृद्धीला या सर्व प्रकारच्या वाङ्मयानें फार मोठा हातभार लाविला आहे.

कित्येक आधुनिक टीकाकारांच्या अवकृपेस पात्र झालेल्या मोरोपंतांनीं आपल्या विपुल रचनेनें मराठी भाषेचें आविष्करण-सामर्थ्य वाढविण्यास फार मोठें साह्य केलें आहे. लावण्या आणि पोवाडे रचणाऱ्या शाहिरांनीं लोकजीवनांतील नाना रंगढंग मराठीला मिळवून दिले आहेत. या दृष्टीनें पाहिल्यास प्राचीन मराठी वाङ्मय बहुविध-प्रकारें नटलेलें आहे,असें आढळून येईल. फादर स्टीफन्सचें ख्रिस्तपुराण लौकरच संपूर्णपणें प्रकाशित होईल असें दिसतें. तें व त्याप्रकारचें अितर वाङ्मय देवनागरींत प्रकाशित झाल्यास प्राचीन मराठीच्या विविधतेंत फारच मोलाची भर पडणार आहे.

प्राचीन मराठी वाङ्मयाचें, विशेषतः संत वाङ्मयाचें प्रयोजन लोकमानसाला सुसंस्कृत करण्याचें असल्यामुळें देव, धर्म, अध्यात्म यांवर फार भर दिलेला आढळतो हें खरें पण त्या काळच्या विचार पद्धतीचें तें अेक वैशिष्ट्य असल्यामुळें मराठी वाङ्मय लेखकानां खास दोष देण्याचें कारण नाहीं. तथापि प्राचीन संकृत वाङ्मयाची व्यापकता आणि विपुलता पाहिली म्हणजे मराठी वाङ्मयाच्या कांहीं मर्यादा सहज ध्यानांत येतात. वेदांत आणि भक्ति यांतील तत्त्वविचार वगळला तर मराठी—वाङ्मयांत संस्कृतांतील दर्शन—शास्त्रांचा ऊहापोह करणारें वाङ्मय निर्माण झालें नाहीं. म्हणजे बौद्धिक पांडित्याचा विलास मराठी मनाला पेलण्याचें सामर्थ्य आलेलें नव्हतें हें उघड आहे. स्वराज्य निर्माण झाल्यानंतर देखील राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, अित्यादि सामाजिक शास्त्रांचा विचार करणारे लेखक निर्माण झाले नाहींत. मराठी भाषेच्या दृष्टीनें देखील व्याकरण, कोश व्युत्पत्ति, छंद, अित्यादि भाषाशास्त्रीय विभागांचा मराठींत प्रपंच करणारें वाङ्मय निर्माण होऊं शकलें नाहीं. संस्कृत काव्याचें मराठींत अनुकरण थोडें फार झालें. पण संस्कृत काव्यांतील श्रेष्ठ भागाचें—नाटकांचें अनुकरण करण्याची इच्छा मराठी कवींना झाली नाहीं. अितिहास, भूगोल, शेजारचीं राष्ट्रें व तेथील लोक यांच्या संबंधीं विशेष जिज्ञासा महाराष्ट्रांतील विद्वानांना वाटलेली दिसत नाहीं. याचा अर्थ सुसंघटित राष्ट्र बनण्याला ज्या विद्यांचा अभ्यास लागतो त्या अभ्यासाकडे महाराष्ट्रीय पंडितांचें लक्ष गेल्याचें दिसत नाहीं. चित्र, शिल्प, संगीत, नृत्य, नाट्य अित्यादि कलांच्या समीक्षणाचें वाङ्मय प्राचीन मराठींत सुरू झालेंलेंहि दिसत नाहीं. गणित, ज्योतिष,

रसायन, आयुर्वेद इत्यादि शास्त्रांचे प्राचीन मराठीला विशेष भान नाहीं. मग स्वतंत्र चिन्तन आणि संशोधन कोठून आढळणार ? अशा स्थितींत आधुनिक युरोपीय आक्रमणापुढें मराठ्यांचा पराभव झाला यांत आश्चर्य वा दुःख मानण्याचें कारण नाहीं. घडलें तें स्वाभाविकच झालें, असें ह्मणावें लागेल. तथापि मराठी लोकांनीं मुसलमानांच्या आक्रमणांतून आपलें डोकें वर काढलें होतें व ते हिन्दुस्थानांत सर्व ठिकाणीं राजकारण करण्याची हिंमत बाळगूं लागले होते. ही गोष्ट देखील कमी महत्वाची नाहीं. म्हणूनच अव्वल अिंग्रजींतच पुढें महाराष्ट्रांत नवे नवे आधुनिक विचार आकलन करणारे मोठे पुरुष उदयास येऊं शकले. त्याची पूर्व-तयारी बऱ्याच प्रमाणांत प्राचीन महाराष्ट्रांत झालेली होती. संतांची मानवतावादी जीवनदृष्टि आणि वीरांची स्वातंत्र्यप्रियता या प्राचीन महाराष्ट्राच्या अर्वाचीन महाराष्ट्राला दोन मोठ्या देणग्या मिळालेल्या आहेत विद्येची निरपेक्ष उपासना करण्याचें व्रतहि प्राचीन परंपरेंतून महाराष्ट्राला लाभलेलें आहे. या सर्व सांस्कृतिक शिदोरीचा नव्या महाराष्ट्राच्या निर्मितीला निश्चित उपयोग होईल. सामाजिक समतेचा आधुनिक आदर्श स्वीकारून महाराष्ट्राला आधुनिक काळांत आपलें जीवन पुनः समृद्ध करितां येईल. प्राचीन मराठी वाङ्मयाच्या अभ्यासकानें अशी ऐतिहासिक चिकित्सक दृष्टि बाळगून अभ्यास केल्यास तो अभ्यास सार्थकीं लागल्याशिवाय राहाणार नाहीं. अशा प्रकारची चिकित्सकदृष्टि प्रा० शेणोलीकरांच्या लेखनांत आढळत असल्यानें मराठी वाङ्मयाच्या अभ्यासकांपुढें त्यांच्या या पुस्तकाची भलावण करण्यांत मला आनंदच होत आहे.

पुणें,
२६ फेब्रुआरी १९५६.

—स. ज. भागवत.

प्राचीन मराठी वाङ्मयाचें स्वरूप : : १

मराठी वाङमयाचा इतिहास हा महाराष्ट्राच्या सर्वांगीण इतिहासाचें एक प्रमुख अंग आहे. हा इतिहास महाराष्ट्राच्या मध्ययुगीन विचार-विकासावर प्रकाश टाकणारा असून अर्वाचीन कालांतील मराठी भाषिकांच्या आशा-आकांक्षाचा तर तो मूळ पायाच आहे. मराठी भाषेच्या जन्मानंतरचीं दोनतीनशें वर्षें भाषेच्या घडणींत गेलीं असावींत. त्यानंतर म्हणजे सुमारें तेराव्या शतकापासून सातत्यानें ग्रंथनिर्मिति होत जाऊन मराठी साहित्याची परंपरा निर्माण झाली. त्या कालापासून अर्वाचीन कालापर्यंत निर्माण होत गेलेल्या वाङमयाचें, वाङमय-परंपरांचें स्वरूप काय होतें आणि कोणकोणत्या ऐतिहासिक घटनांनीं व सामाजिक प्रवृत्तींनीं तें तें विशिष्ट स्वरूप त्या त्या काळीं त्याला प्राप्त झालें; या साऱ्यांची संगति लावणें मराठी वाङमयेतिहासाच्या दृष्टीनें आवश्यक आहे.

प्रास्ताविक

गेल्या सातआठशें वर्षांतील अर्वाचीन व मध्ययुगीन परंपरांच्या पाठीमागेंहि महाराष्ट्राला अनेक शतकांचा इतिहास आहे. मराठी भाषिकांची भौतिक परिस्थिति व सांस्कृतिक परंपरा म्हणजे [1]यादवकालापूर्वीच्या

---

१ यादवांचें साम्राज्य इ. स. ११८७-१३१८. यापूर्वी महाराष्ट्राच्या भूभागावर शिलाहार,-कदंब (इ. स. ९९०-१२००) उत्तर चालुक्य (इ. स. ९७३-११८९) राष्ट्रकूट (इ. स ७५०-९७३) बदामीचे चालुक्य (इ. स. ५००-७५०) वाकाटक-आभीर-अश्मक (इ. स. २००-५००) सातवाहन (ख्रि. पू. १५०-इ. स. १५०) पहिले राष्ट्रकूट (ख्रि. पू. २७३--२३३) यांचीं साम्राज्यें नांदली होती.

हजार-बाराशें वर्षांतील धार्मिक, सांस्कृतिक व राजकीय घडामोडींचा परिपाकच होय. त्या कालांतील संस्कृत–प्राकृत–अपभ्रंश या भाषांच्या परंपरेशींच आपली मराठी भाषा निगडित आहे. अर्थात्च मराठीची पूर्व–पीठिका शोधण्यासाठीं महाराष्ट्राचा प्राचीन इतिहास लक्षांत घेणें आवश्यक असलें तरी, वाङमयेतिहासाच्या दृष्टीनें मराठीच्या उत्पत्तिकालाचाच तेवढा विचार येथें केला म्हणजे झालें.

मराठी भाषेचा उत्पत्तिकाल

इतिहासाचार्य राजवाडे यांनीं या प्रश्नाची मीमांसा करतांना आधारभूत म्हणून मानलेले चिकुर्डे (इ. स. ७३६) व मंगळवेढें (इ. स. ११३२) येथील ताम्रपट[१] बऱ्याच पुढील काळांतील ठरल्यानें आणि नारदस्मृति, (पांचवें शतक) हर्षचरित (इ. स. ७००) यांतील 'देशभाषा' शद्ब अनिश्चितार्थी असल्यानें मराठीचा जन्मकाल त्यांच्या कल्पनेप्रमाणें पांचव्या शतकापर्यंत मागें जाऊं शकत नाहीं. तसेंच 'बौद्ध धर्माचा ऱ्हास व हिंदु धर्माचें पुनरुज्जीवन यांमुळें घडून आलेली अंत:स्थ विचारक्रांति ' हें भारताचार्य चिं. वि. वैद्य[२] यांनीं दिलेलें कारणहि भाषोत्पत्तीस 'पुरेसें नाहीं.' म्हणून या कारणाधारें त्यांनीं ठरविलेलें ७ वें शतक हा मराठीचा उत्पत्तिकाल ग्राह्य धरता येत नाहीं. शक ६०२ पर्यंतच्या ताम्रपटांतूनही सांम्राज्य, कम्वल, वइरी, पन्नास, प्रिथिवी या-सारखे मराठी वळणाचे तुरळक शद्ब आढळत असले तरी, त्यांच्या उपपत्तीच्या दृष्टीनें त्यांचा अपभ्रंश, प्राकृत या पूर्वभाषांशींच निकट संबंध जुळतो; म्हणून या पुराव्यापेक्षां श्रवणबेळगोळचाच्या शिलालेखांतील मराठीचा पहिला वाक्यरूप आविष्कार " श्री चावुण्डराजें करवियलें " हाच मराठीच्या जन्मासंबंधींचा साधारणपणें सर्वमान्य असा प्राचीन (इ. स. ९८३) पुरावा

१ राजवाडे संपादित ' ज्ञानेश्वरीची प्रस्तावना, ' पृ. १८.
२ ' मराठी भाषेचा कालनिर्णय '–(चिं. वि. वैद्य) वि. विस्तार १९२२.

ठरतो. यानंतर ज्ञानेश्वरीच्या कालापर्यंतचे असे शिलालेख–ताम्रपटांचे पुरावे पंचविसांवर[1] उपलब्ध झाले आहेत. त्यांत अधिकाधिक प्रमाणांत मराठी शब्दांची, वाक्यांची योजना होत गेल्याचें दिसून येतें. त्यावरून दहाव्या-अकराव्या शतकांतच मराठी ही लोकभाषा म्हणून महाराष्ट्रांत रूढ होत चालली होती, असा निष्कर्ष निघतो. यादवपूर्व उत्तर चालुक्यांच्या कारकीर्दींतील शिलालेख मराठींत सांपडत नाहींत. उलट संस्कृताबरोबर देशभाषा म्हणून कानडीचा अवलंब त्यांच्या शिलालेखांतून केल्याचें आढळून येतें. त्यावरूनहि हीच गोष्ट सिद्ध होतें कीं, मराठीचा जन्मकाल नवव्या–दहाव्या शतकाच्या पलीकडे नेतां येत नाहीं. मराठी संबंधींचे ग्रांथिक पुरावे तर सरळ सरळ बाराव्या शतकांतीलच आढळतात. मानसोल्लासांतील मराठी पद्यें (इ. स. ११२९), यशश्चंद्राच्या 'राजीमतिप्रबोध' (सुमारें इ. स. ११२८) या संस्कृत नाटकांतील मराठी उतारा हे पुरावे बाराव्या शतकाच्या पूर्वार्धांतील मराठीची 'अलिखित वाङमयाची' अवस्था सिद्ध करतात. उलट अगदीं अलीकडे उपलब्ध झालेल्या 'भविसयत्तकहा,' 'णायकुमारचरिउ,' 'जसहरचरिउ,' 'महापुराण,' वगैरे अपभ्रंश ग्रंथांवरून "अकराव्या शतकाच्या मध्यापर्यंत अपभ्रंश भाषा जिवंत होत्या;" असें ठरतें. तेव्हां "मराठीचा उत्पत्तिकाल दहावें-अकरावें शतक हाच असावा," हें डॉ. गुणे[2], डॉ. भांडारकर प्रभृतींचें मतच साधार व सयुक्तिक वाटतें.

या वेळच्या मराठी बोलीला ग्रांथिक भाषेचा दर्जा प्राप्त होण्याला जो दीडशें-दोनशें वर्षांचा काल लागला असेल, त्या अवधीत अलिखित स्वरूपाचें लोकवाङमय महाराष्ट्रांत निर्माण झालें असणारच. कथा, कहाण्या स्त्रीगीतें,

---

१ 'महाराष्ट्र सारस्वत पुरवणी'– पान ८४१-४२ (डॉ. शं. गो. तुळपुळे)
२ 'चिं. वि. वैद्य–गुणे वाद' –(विविधज्ञानविस्तार १९२२).

शकुनापशकुनाचे समज, भूतभविष्यासंबंधींच्या कल्पना, रोगराईवरील औषधी योजना, हिशेबठिशेबाच्या तऱ्हा, वगैरे संबधींचीं टांचणें व शेतकरी, वीणकरी, कोळी वगैरे भिन्न भिन्न पेशांतील लोकांना रिझविणारीं

मराठींतील अलिखित वाङ्मय

गीतें, याप्रकारचें कांहीं ललित व व्यावहारिक वाङमय प्रारंभींच्या या कालांत निर्माण झालें असावें. कोणत्याहि भाषेच्या विकासांत दिसून येणारा सर्वसामान्य क्रम लक्षांत घेतां ही गोष्ट तर्काला पटण्यासारखी आहे. भाषेंतील वाक्प्रचार, वाक्संप्रदाय, म्हणी, दृष्टांतकथा, इत्यादि सर्व अंगोपांगें अशा प्रकारच्या अलिखित वाङमयाकडूनच परिपुष्ट केलीं जातात. या कामीं पूर्वभाषेंतील विशेषांचें अनुकरण व प्रत्यक्ष जीवनव्यवहार यांचें साहाय्य लोक घेतात. मराठींतील अलिखित वाङमयाला मराठीपूर्व अपभ्रंश भाषेकडून मार्गदर्शन व संगोपन झालें असें दिसतें. तेराव्या शतकांतील ग्रांथिक वाङमयानें ज्या ओवी-अभंग-आरती-सारख्या छंदांचा प्रामुख्यानें उपयोग केला, ते छंद अपभ्रंशांतील [1]मात्रावृत्तांवरूनच प्रथम मराठी लोकगीतांनीं रूढ केले. म्हणून महानुभाव-ज्ञानेश्वरादि लोकाभिमुख कवींनीं त्या लोकप्रिय छंदांचा आपल्या ग्रंथांत आदर केला. जी गोष्ट छंदासारख्या बाह्य आभरणाची तीच अंतरंगाबाबतहि खरी असणार. म्हणून जसें अपभ्रंश वाङमय बहुजनसमाजाच्या जीवनांतील विविध अनुभवांनीं व रसांनीं परिपूर्ण आहे, तसेंच महानुभावपूर्वकालीन मराठी वाङमयहि लोकजीवनांतील शृंगार, वीर, करुण, हास्य आदि रसांनीं व जीवनानुभवांतील विविध कथांनीं परिपुष्ट झालेलें असणार; यांत, शंका नाहीं. अलिखित आणि अनुपलब्ध वाङमयाबद्दलचें हें अनुमान मान्य होण्यास अडचण पडूं नये, असें वाटतें.

---

१ 'अपभ्रंश आणि मराठी वृत्तें'–(प्रो. वेलणकर) सह्याद्रि, ऑगस्ट १९४०.

मात्र साहित्यनिर्मितीचा उद्देश, साहित्याचें स्वरूप व त्याची दिशा या सर्व बाबतींत मराठी साहित्याची परंपरा संस्कृत प्राकृत वाङ्मयापेक्षां अगदीं स्वतंत्र आहे. सर्वसामान्य लोकांच्या धर्मभावनेला उच्च विचारांचें अधिष्ठान मिळवून देण्याच्या प्रेरणेनेंच हें वाङ्मय त्या त्या काळीं निर्माण झालें. त्यामुळें मराठी भाषेला ललामभूत झालेलें बहुतेक साहित्य मुख्यत: आध्यात्मिक स्वरूपाचें असून तें नाथ, महानुभाव, वारकरी, दत्त, समर्थ इत्यादि धर्मपंथियांकडून लिहिलें गेलें आहे.

लिखित वाङ्मयाची प्रमुख प्रेरणा

पौराणिक धर्मांतील विषमतेला विरोध करून बहुजनसमाजाला, मानसिक गुलामगिरीविरुद्ध जागृत करण्याचें कार्य पूर्वीपासूनच अनेक संप्रदाय करीत होते. या दृष्टीनें दक्षिणेकडील सर्व भागांत आपापल्या पंथाचा प्रसार करणाऱ्या जैन, शैव, वैष्णव, लिंगायत, इत्यादि संप्रदायांनीं संस्कृत भाषेचा अडसर दूर करून तमिळ, तेलुगू, कानडी या लोकभाषांचाच अंगीकार केला होता. त्यांपैकीं जैन व लिंगायत या पंथांचा महाराष्ट्राच्या दक्षिण भागांत कांहींसा प्रभाव पडला असला तरी, त्यांचें बरेंच वाङ्मय कानडींत असल्यानें मराठी भाषिकांशीं त्यांचा प्रत्यक्ष संबंध आला नाहीं. मात्र लोकभाषेंत वाङ्मय निर्माण करण्याची जैन-लिंगायतांची परंपरा मराठीच्या बाबतींत नाथ, महानुभाव व वारकरी या पंथानींच तेराव्या शतकांत रूढ केली.

सर्व हिंदुस्थानांत पसरलेल्या पुरातन अशा नाथपंथानें बाराव्या शतकांत महाराष्ट्रांतहि आपलें धर्मजागृतीचें कार्य नेटानें व यशस्वीपणानें केलें असें दिसतें. सातारा, नगर, नाशिक या भागांतील मच्छिंद्रगड, चौरोबाचा डोंगर, गोरक्षगुहा, गोरखसमाधी, गहिनीनाथांचा मठ, इत्यादि इतिहासप्रसिद्ध स्थळांवरून महाराष्ट्रीय जीवनांतील नाथपंथाचें माहात्म्य सहज कळून येतें. सिद्धपदाला पोंचलेल्या मच्छिंद्रनाथ,

नाथपंथ

गोरक्षनाथ यांसारख्या चारित्र्यवान् व्यक्ती लोकांत मिळूनमिसळून, स्थानिक दैवतांच्या उत्सवांत सहभागी होऊन, सामान्यांच्या धर्मजीवनाला उन्नत स्वरूप देऊं लागतांच लोकांच्या आत्यंतिक प्रेमादराचें स्थान होऊन बसाव्यात यांत कांहींच नवल नाहीं.

नाथपंथ हा मूळचा शैव संप्रदायी, परंतु शिवविष्णु-ऐक्याचा प्रचारच त्यांनीं केला. त्यामुळें दक्षिणेंतील इतर प्रांतांप्रमाणें शैव–वैष्णव झगडे महाराष्ट्रांत झाले नाहींत. उलट या भागांतील भागवतधर्म हरिहरैक्याचा पुरस्कार करणाऱ्या वारकरी पंथामध्येंच विकसित झाला. नाथपंथी ज्ञानेश्वरांनींच त्या दृष्टीनें वारकरी पंथाची उभारणी केली. मुळांत नाथपंथ हा हटयोगी सिद्धांचा पंथ होय. परंतु गुरुभक्ति, ईश्वरभक्ति, त्यानंतर कृष्णभक्ति, इत्यादि उपासना–मार्गांचाहि पुढें त्यांनीं अधिकाधिक पुरस्कार केला. म्हणूनच गहिनीनाथांनीं निवृत्तिनाथांना ध्यानयोगाबरोबर बालकृष्णभक्तीचीहि दीक्षा दिली असावी. नाथमंडळी सर्वत्र भ्रमण करणारी म्हणून बहुभाषी असत. पण ते ज्या प्रांतीं जात त्या प्रांताच्या बोलीचा आदरानें अंगीकार करीत. वैदिकांच्या धर्मभाषेपेक्षां-संस्कृत देववाणीपेक्षां लोकवाणीला–प्रादेशिक भाषेलाच ते प्रोत्साहन देत, त्या भाषांत वाङ्मय निर्माण करीत. अशा रीतीनें हरिहरैक्यभाव, भक्तियोग व प्रादेशिक भाषेचें माध्यम यांसंबंधीं नाथपंथियांनीं घालून दिलेला कित्ता पुढील पंथांनीं गिरविला.

नाथपंथियांचें मराठी साहित्य फार उपलब्ध नाहीं. त्यांनीं पदें, अभंग अशी फुटकळ रचना पुष्कळच केली असण्याचा संभव आहे. पण ती काळाच्या ओघांत नष्ट झाली असावी. **गोरक्षनाथांच्या** नांवावर कांहीं पदें आणि 'अमरनाथ संवाद' व 'गोरक्षगीता' हीं दोनच ओंवीबद्ध प्रकरणें आढळतात. तीं दोन्हीं अद्वैत तत्वज्ञान सांगणारीं व योगपर आहेत. त्यांतील विचार व उपमादृष्टांतांची पद्धति ज्ञानेश्वरी वळणाची वाटते. पण तशी

काव्यमयता यांत नाहीं. तरीसुद्धां ज्ञानेश्वरांच्या शैलीची पूर्वतयारी तत्पूर्वींच्या लिखित वाङमयाकडून चालू होती, असें यावरून म्हणतां येतें. **गहिनीनाथांचा** भर कृष्णभक्तीवर आहे. पण त्यांच्या कृष्णभक्तिपर अभंगांतहि ध्यानयोगाचे गूढवादी उल्लेख येतातच. या प्रकारच्या नाथपंथीय वाङमयानें आशय व आविष्कार या दोन्ही बाबतींत पुढील ग्रंथकारांसाठीं फक्त पाऊलवाट तयार करून ठेवली इतकेंच.

नाथपंथियांच्या वाङमयीन कर्तृत्वापेक्षां यांच्याकडून इतर पंथांवर झालेल्या संस्कारांमुळेंच त्यांच्या लोकप्रियतेचा व कर्तबगारीचा अंदाज करता येतो. विवेकसिंधुकार मुकुंदराज हे नाथपंथीच होत. आदिनाथ-हरिनाथ-रघुनाथ व मुकुंदराज अशी ते आपली परंपरा सांगतात. ही नाथपंथाची वऱ्हाडकडील शाखाच म्हणावयाची. महानुभाव पंथाचाहि नाथसंप्रदायाशीं संबंध दिसतो. चक्रधरांचे गुरु गोविंदप्रभु किंवा गुंडम राऊळ हे नाथपंथी चांगदेव राउळांचेच शिष्य होत. चांगदेव राऊळ किंवा चक्रपाणि यांनींच हरपाळदेवाच्या (चक्रधराचा पूर्वावतार) शरीरांत प्रवेश करून त्याला सजीव केल्याची आख्यायिका महानुभावपंथाचा नाथपंथाशीं परंपरासंबंध दाखविणारीच आहे. तसेंच, मुकुंदराजांच्या गुरुपरंपरेंतील हरिनाथांनींच नागेंद्राला प्रथम नाथपंथाची दीक्षा दिली आणि हाच नागेंद्र पुढें चक्रधर संप्रदायाचा प्रभावी संघटक नागदेवाचार्य झाला; असा उल्लेख [१]महानुभाव वाङमयांतच मिळतो. निवृत्ति–ज्ञानेश्वरांची नाथपरंपरा तर सर्वश्रुतच आहे ज्ञानेश्वर या संप्रदायाला 'पंथराज' म्हणतात. परंपराप्राप्त ज्ञानबोधाला 'अद्वयानंदवैभव' किंवा 'एवं गुरुक्रमें लाधलें । समाधिधन ।।' या शब्दांनीं गौरवितात. ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायांतील योगानुभवाच्या विवरणांत ज्ञानेश्वरांचा-

---

१ रामासी वेदांतू नागेंद्रा सिद्धांतू । गुरु नागनाथू आम्हासये ॥

—(मेघचंद्रकृत यक्षदेव वृद्धान्वय)

नाथपंथीय[1] वारसा अगदीं स्पष्ट दिसतो. सारांश, मराठी वाङमयाच्या दृष्टीनें कार्यक्षम झालेल्या या तिन्ही परंपरांवर नाथसंप्रदायाचाच प्रभाव पडला आहे. अद्वैत तत्वज्ञान, योगमार्ग, गुरुभक्ति–कृष्णभक्ति, सामाजिक बाबतींतील उदार व समावेशक दृष्टी आणि देशी भाषेंतील वाङमयनिर्मिति या गोष्टींचें बाळकडूच नाथपंथियांकडून या संतमहंतांना मिळालें होतें. हेंच नाथपंथाचें लोकोत्तर कार्य होय.

मुकुंदराज

विवेकसिंधूकार मुकुंदराज (इ. स. ११२८–१२००) यांना आद्य-ग्रंथकार म्हणून परंपरेनें मानण्यांत येतें. पण त्यांच्या स्थलकाल निश्चिति-बद्दल संशोधकांत बरेच मतभेद आहेत. 'विवेकसिंधू' ची भाषा ज्ञानेश्वरी-पेक्षां सोपी व बरीच अर्वाचीन वाटते, या मुद्यावर ज्ञानेश्वर-पश्चात् होऊन गेलेल्या पांचसहा मुकुंदांपैकीं हे एक होत, असें कांहींजण[2] मानतात. विवेकसिंधूंतील 'अंबानगरी' चा उल्लेख मराठवाडयांतील जोगाईच्या आंब्याचा (मोमिनाबादचा) कीं नागपूरकडील वैनगंगेच्या अंभोऱ्याचा यासंबंधींहि विद्वानांत दुमत[3] आहे. या कवीच्या चरित्रपर माहितीच्या दृष्टीनें 'यक्षदेव वृद्धान्वय,' व 'अन्वयसार' या महानुभाव ग्रंथांतून एक नवा पुरावा पुढें येत आहे. त्याच्या आधारें "मुकुंदराज हे नागपूरकडील असून ते चक्रधर–नागदेवाचार्यांचे समकालीन ठरतात. परंपरा मानते त्याप्रमाणें ज्ञानेश्वरांपूर्वी

१ ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायावर पातंजल योगापेक्षां काश्मिरी शैव संप्रदायांतील योगाचीच छाप दिसते, असें अभ्यासकांचें मत आहे.

२ 'ज्ञानदेव एक कीं दोन ?' या वादाचे प्रणेते श्री. भारद्वाज यांचें असें मत होतें. तसेंच एकनाथ-मुक्तेश्वर हे या आद्य कवीचा उल्लेख करीत नाहींत; ही बाब चिन्त्य आहे.

३ 'आंबे–जोगाई आणि मुकुंदराज' (डॉ. शं. गो. तुळपुळे)
—महाराष्ट्र साहित्य पत्रिका, १९५०.

शंभर वर्षे अगोदरचा त्यांचा काल नसावा." असा पक्ष विवेकसिंधूच्या नवसंपादित प्रतीला पुरस्कार लिहिणारे श्री. मा. श्री. अणे यांनीं मांडला[1] आहे. या नव्या माहितीमुळें मुकुंदराजांच्या चरित्रांतील परंपरागत आख्यायिकेवर अधिक प्रकाश पडत आहे. राजोरारोहणें झाडीमंडळ या भागाचा ब्राम्हण राजा जयत्पाळ याचे मुकुंदराज हे चुलत भाऊ होत. राजा जयत्पाळ हा निपुत्रिक असल्यानें आपला बंधू महादेव याचा मुलगा सारंगधर याला राज्यावर बसवून मुकुंदराजांकडूनच तो उपदेश घेतो. त्यावेळीं त्याच्या निमित्तानेंच विवेकसिंधु ' लिहिला जातो. (तेणें करविला गदारोळु । हा ग्रंथरचनेचा ॥- प्र. ७-५९.) या ग्रंथांत उल्लेखिलेली नृसिंह, बल्लाळ जयंतपाळ किंवा जैत्रपाळ ही त्रयी कोण याबद्दलची शंका दूर होऊन शिवाय जैत्रपाळच्या उल्लेखाबरोबर ' राजा शारंगधरु । राज्य करी ॥' असाहि जो उल्लेख विवेकसिंधूंत आहे त्याचा आतां या माहितीमुळें नीट अन्वय लागतो. कवीच्या चरित्राचा समाधानकारक उलगडा होण्यास महानुभाव ग्रंथांतील वरील माहिती उपयुक्त वाटते.

' पवनविजय, ' ' मूळस्तंभ, ' ' पंचीकरण, ' इत्यादि वेदांती प्रकरणें व कांहीं पदें, अभंग ही रचना जरी मुकुंदराजांच्या नांवावर मोडते तरी, विवेकसिंधु (प्र. १८, ओंव्या १६७१) आणि परमामृत (प्र. १४, ओंव्या ३०३) हेच त्यांचे प्रमाणभूत व महत्त्वाचे ओंवीबद्ध ग्रंथ होत. विषयविवेचनाच्या दृष्टीनें दोन्ही ग्रंथांचें स्वरूप एकच आहे. (विवेकसिंधूचा अन्वय सारांश । येथ कथियेला ॥). दोन्ही ग्रंथांत अद्वैतबोध, योगानुभव व सगुणोपासना हींच वर्णिलीं आहेत. अद्वैत मताचा विशेषतः शांकर वेदान्ताचा सरळ, सुबोध अनुवाद करणारे असेच हे दोन्ही ग्रंथ आहेत. (शांकरोक्तिवरी । मी बोलिलों मऱ्हाठी वैखरी ॥).

---

१ विवेकसिंधु—संपादक-श्री. गोगटे, (राजवाडे संशोधन मंडळ — ग्रंथमाला, ग्रंथ २२ वा, पृ. २५).

2

वेदान्तशास्त्राबद्दल मुकुंदराजांना अलोट प्रेम व जाज्वल्य अभिमान आहे. इतर दर्शनें जंबुकासारखीं असून वेदान्तसिंहापुढें तीं सारीं घाबरून असतात; म्हणून वेदान्ताचें बोलणें खरें मानावें, 'येर तें सांडावें। पाखांड म्हणौनि ॥' असा त्यांचा आग्रह आहे. अवैदिक पंथांच्या खंडनावर त्यांचा विशेष कटाक्ष आहे तो यामुळेंच. तसेंच नाथपंथी मुकुंदराजांच्या ग्रंथांत गूढवादी परंपरेला शोभेसें योगानुभवाचें आणि गुरुभक्तीचें वर्णन यावें, हें साहजिकच होय. परंतु सांसारिकांसाठीं त्यांनीं सगुणभक्तीचा 'राजयोगच' प्रतिपादिला आहे. वेदान्त, योग यांचा पुरस्कार करणाऱ्या मुकुंदराजांचा संन्यासावर किंवा कर्मठपणावर मात्र भर नाहीं. पुढील भक्तिमार्गी परंपरेंत मुकुंदराजांना तसें स्थान नसलें तरी, आपल्या ग्रंथांत त्यांनीं ज्ञानमूलक भक्तियोगाला आणि 'प्रपंचाशीं भिन्नत्व नाहीं परब्रह्मीं' या भूमिकेलाच प्राधान्य दिलें आहे. त्या दृष्टीनें पाहतां विवेकसिंधु, ज्ञानेश्वरी, परमामृत, अमृतानुभव यामध्यें कितीतरी ओंव्या, कल्पना, शब्द यांचें साम्य दृष्टीस पडतें. तसेंच त्यांच्या विवेकसिंधूची छाप पुढील निरनिराळ्या काळांतील गुरुचरित्र, बालबोध, ग्रंथराज, दासबोध, इत्यादि ग्रंथांच्या रचनेवर पडलेली स्पष्ट दिसून येते. अद्वैती भक्तियोगाचें तत्त्वज्ञान हें अथपासून इतिपर्यंतच्या मराठी साहित्याला एकत्व आणून देणारें एक सूत्रच म्हटलें पाहिजे.

विवेकसिंधु-परमामृत या ग्रंथांकडे काव्य म्हणून मात्र पाहतां येणार नाहीं. अनुवादित स्वरूपाच्या या ग्रंथांत कवीच्या स्वतंत्र प्रतिभेचा विलास कोठेंच आढळत नाहीं. "रसिक मुद्रेनें लिहिलें तर ग्रंथविस्तार होईल, किंवा पाल्हाळ केल्यास अर्थच शब्दांतून निसटेल," या भीतीनें ग्रंथरचना केल्यामुळें यांत रसवत्ता येऊंच शकली नाहीं. 'जे नेणती तर्कमुद्रेची स्थिति।' अशा मराठी भाषिकांबद्दल अपत्यभाव बाळगून ग्रंथरचनेचा परिश्रम करण्यांत कवीचा लोकांविषयींची कळकळ व लोकाभिमुख वृत्ति स्पष्ट होते. मात्र भाषा मराठी असली तरी ग्रंथाची मांडणी बालसुबोध

वाटत नाहीं. बंदिस्त आणि तर्कबद्ध रचनेवरून विवेकसिंधुकर्त्यांवर पंडिती वळणाची छाप किती जबरदस्त होती, हें स्पष्ट होतें; आणि एवढा सुश्लिष्ट आणि कांटेकोर बांधणीचा ग्रंथ साहित्याच्या प्रारंभकालीं कसा निर्माण झाला याबद्दल शंका[1], वाटूं लागते.

गोरक्षनाथ, मुकुंदराज यांच्या रचनेनें मराठी साहित्याचा प्रारंभ झाला खरा; पण त्यांच्याकडून मराठी साहित्याची परंपरा अशी निर्माण होऊं शकली नाहीं. विपुल आणि विविध वाङ्मय निर्माण करून मराठी साहित्याची परंपरा सुरू करण्याचें श्रेय महानुभाव पंथाकडेच जातें.

महानुभाव पंथ

महानुभावपंथाचे प्रवर्तक चक्रधर म्हणजे पूर्वाश्रमीचे हरपाळदेव (जन्म इ. स. ११९४) हे भडोचच्या विशाळदेव नामक प्रधानाचे पुत्र होत. राजविलासांत दिवस घालवीत असतां ते वयाच्या २६ व्या वर्षी मरण पावले. तेव्हां फलटणचे नाथपंथी सिद्ध पुरुष चक्रपाणि राऊळ यांनीं त्यांच्या मृत देहांत प्रवेश करून त्यांना पुन्हा जिवंत केलें (इ. स. १२२०), अशी आख्यायिका आहे. द्यूतांतील द्रव्यनाश व पत्नीशीं बेबनाव यांमुळें उपरति होऊन हरपाळदेव रामटेकच्या यात्रेला गेले असतां ॠद्धिपूरचे गोविंदप्रभु (गडम राऊळ) हे सिद्ध पुरुष त्यांना भेटले. त्यांनीं मंत्रोपदेश देऊन हरपाळदेवांचें नांव चक्रधर असें ठेविलें (इ. स. १२६३). त्यानंतर कांहीं काळ तपश्चर्येंत व तीर्थाटणांत घालवून चक्रधरांनीं पैठण येथें संन्यास घेतला (इ. स. १२६८). त्यानंतर आठ वर्षें आपल्या तत्त्वज्ञानाच्या

---

१ ' भाषा, विषयप्रतिपादनपद्धति व देशस्थितीचा ग्रंथांतून झालेला उल्लेख यांवरून पाहिलें असतां ज्ञानेश्वरीनंतर बऱ्याच वर्षांनीं विवेकसिंधू झाला असावा, असें म्हणणें भाग पडतें.' (महाराष्ट्र कविचरित्र, भाग १ पान ७–श्री. आजगांवकर.)

प्रसारांत त्यांनीं घालविलीं. त्या अवधींत त्यांच्या भोंवतीं ५०० अनुयायी जमले. त्यांत १३ स्त्रिया होत्या. पुढें नागदेवाचार्यांच्या हातीं पंथाचीं सूत्रें सोंपवून चक्रधरांनीं बद्रिकाश्रमाकडे प्रयाण केलें[1] (इ. स. १२७६).

चक्रधरांचे पट्टशिष्य नागदेवाचार्य यांनीं पंथाला संघटित स्वरूप देऊन महानुभाव परंपरेचा पाया घातला. नागदेवाचार्यांच्या प्रेरणेनेंच महिंद्रभट, केशवराज, कवीश्वरभट इत्यादि महानुभाव महंतानीं पंथाच्या उभारणीला उपयुक्त होईल अशी ग्रंथरचना केली. नागदेवाचार्यांचा अनुयायीवर्ग फार मोठा होता. त्यांत राजदरबारचे अधिकारी, राजघराण्यांतील स्त्रिया, धनिक व्यापारी व शास्त्री-पंडित इत्यादि वरच्या दर्जाचे लोकहि होते. पंथाचें उद्दिष्ट शूद्रातिशूद्रांच्या उद्धाराचें होतें पण प्रारंभीं तरी, या पंथाचा प्रसार वरिष्ठ वर्णियांतच विशेष झाला नागदेवाचार्यांच्या पश्चात् बाईदेव व्यास, कवीश्वर व्यास व परशराम असे तीन आचार्य झाले. मुसलमानी आक्रमणाच्या काळांत पंथानुयायांना परागंदा व्हावें लागून पंथीय वाङ्मयाची व संघटनेची वाताहात झाली. यानंतरच्या पुनर्घटनेच्या काळांत अंतःस्थ दुहीमुळें पंथाच्या तेरा कुळया (आम्नाय) होऊन प्रत्येक आम्नायांतील पंथीय वाङ्मयाचे भिन्न भिन्न पाठभेद प्रमाण म्हणून गणले जाऊं लागले व पथीय वाङ्मयाचा प्रसार त्या त्या आम्नायापुरता मर्यादित झाला.

---

१ तत्कालीन वैदिक पंडितांचा पुढारी महदाश्रम यानें त्यावेळचा रामदेवरायाचा करणाधीप हेमाद्री किंवा हेमाडपंत याच्या करवीं पाखांडाचा प्रचार करणाऱ्या चक्रधराला देहान्त शासन करविलें; असें एक मत आहे. बेलापूरच्या तळ्याजवळ मारेकऱ्यांनीं चक्रधराला मारलें, असें म्हणतात.

[1]तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनें हा द्वैती मताचा भक्तिपंथ आहे. जीव, देवता, प्रपंच व परमेश्वर या चार वस्तू ते स्वतंत्र व नित्य मानतात. भक्तिमार्गातील गीता, भागवत या दोन्ही ग्रंथांना प्रमाण ग्रंथाचा मान या पंथांत मिळत असला तरी, त्यांचा अर्थ द्वैत मताला अनुसरूनच लाविला जातो. वैदिक धर्मातील कर्मसिद्धान्त, पुनर्जन्म व अवतारवाद या गोष्टी महानुभाव पंथांतहि आहेत. श्रीकृष्ण, दत्त, चांगदेव राऊळ, गुंडम राऊळ व चक्रधर हे पंचकृष्ण त्यांच्या दृष्टीनें परमेश्वराचे अव-तार होत. चक्रधरांच्या वचनांचा संग्रह (**सूत्रपाठ**) हा या पंथाचा प्रमाणग्रंथ होय. जीवेश्वरभेद, भक्तियोग, संन्यास व अहिंसा ही चतुःसूत्री पंथाच्या आचारधर्माची जननी आहे. अन्न, वस्त्र, अटन, (भ्रमण) निद्रा, उपासना, इत्यादि हरएक बाबतींत चक्रधरांनीं आपल्या शिष्यांना फार काटेकोर नियम घालून दिले आहेत. कर्मकांडाचें प्रस्थ या पंथांतहि बरेंच आहे या बाबतींत जैन धर्माची जबर छाप[2] त्यावर पडलेली दिसून येते.

पंथनिष्ठेच्या प्रेरणेनेंच महानुभावांचें सारें वाङमय निर्माण झालें आहे. त्यांतील विविधता विषयाची नसून वाङमय-प्रकारांची-मांडणीची आहे. पंथप्रस्थापकांचीं व पूजनीय देवतांचीं चरित्रें, पंथप्रवर्तकांच्या

महानुभावांचें वाङ्मय

उक्तींच्या संग्रहाने सिद्ध झालेलें सूत्रवाङमय, त्या सूत्रवाङमयाचे व इतर प्रमाणग्रंथांचें विवरण करणारें टीकावाङमय, त्यासाठीं उपयोगी अशी न्यायव्याकरण-कोशछंदादि शास्त्रें, पंथमान्य अशा क्षेत्रांचीं व व्यक्तींचीं माहात्म्यवर्णनें, स्तोत्रें आणि तत्संबंधींचीं काव्यें, अशा क्रमानें महानुभावांचें साहित्य

---

१ ' महानुभावाचें तत्त्वज्ञान ' व ' महानुभावांचा आचारधर्म '-(प्रा. वि. भि. कोलते)

२ ' जैन व महानुभाव '-(प्रा. गं. बा. सरदार) सह्याद्रि, नोव्हेंबर १९५०.

विस्तारलें गेलें आहे. हें वाङ्मय निर्माण करणारे ग्रंथकार प्रतिभासंपन्न कवि व व्युत्पन्न पंडित होते. संस्कृतांतील भाष्यादि टीकाग्रंथ व पंचमहाकाव्यें यांच्या वळणाचीच ग्रंथरचना त्यांनीं केली असल्यानें केवळ साहित्य-गुणांच्या दृष्टीनें पाहातां त्यांचे ग्रंथ निःसंशय श्रेष्ठ ठरतील. भाषा व साहित्य या बाबतींत महानुभाव पडितांची कामगिरी खरोखरीच प्रशंसनीय आहे.

पंथप्रस्थापक **चक्रधर** (इ. स. ११९४–१२७६) यांची स्वतःची अशी सुसंगत ग्रंथरचना नाहीं. स्वानुभवानें पटलेली नीतितत्त्वें व आचारधर्म यांसंबंधीं निरूपण करतांना चक्रधर प्रसंगानुरूप गोष्टी सांगून व्यवहारांतील दृष्टान्त देत. त्यांचें संकलन करूनच पंथीय तत्त्वज्ञानाची मांडणी झाली व पुढें त्यांतूनच सारें पंथिक वाङ्मय तयार होत गेलें. चक्रधरांचीं निरूपणें स्फुट स्वरूपाचीं व प्रासंगिक आहेत. त्यांची भाषा सरळ, सुबोध व सूत्रमय आहे. चक्रधरांच्या या उक्तींना महानुभावांच्या दृष्टीनें वेदवचनाइतकें प्रामाण्य आहे. त्यावरून चक्रधरांची वेधशक्ति, लोकसंग्रहदृष्टि व व्यवहारचातुर्य यांची नीट कल्पना येते व महंत या नात्यानें त्यांची योग्यता स्पष्ट होते. चक्रधरांप्रमाणेंच पंथसंघटक **नागदेवाचार्य** (निर्याणकाल इ. स. १३०६) यांचीहि स्वतःची अशी ग्रंथरचना कांहींहि उपलब्ध नाहीं. मात्र अनेक ग्रंथकारांना प्रेरणा देणारे व मार्गदर्शन करणारे म्हणून ते विख्यात आहेत. ‘ लीळाचरित्र ’ आणि ‘ स्मृतिस्थळ ’ असे दोन चरित्रग्रंथ अनुक्रमें या दोघांसंबंधीं पंथियांकडून लिहिले गेले आहेत. ऐतिहासिक दृष्टयाहि त्या ग्रंथांचें महत्त्व विशेष आहे.

लीळाचरित्र (इ. स. १२७८) हा महानुभाव वाङ्मयांतील आद्य ग्रंथ होय. पांडित्याच्या बाबतींत ‘ अपरसूर्य ’ म्हणून गाजलेल्या महिंद्रव्यासांनीं हा ग्रंथ तयार केला आहे. त्यांना चक्रधरांचें प्रत्यक्ष सान्निध्य लाभलें होतें.

शिवाय नागदेवाचार्य व इतर शिष्य-प्रशिष्य यांच्याकडून चक्रधरांच्या आठवणी मिळवून आणि त्या परस्परांशीं ताडून पाहून, अत्यंत साक्षेपानें व परमादरानें १५०९ लीळांमध्यें हें चक्रधरचरित्र **महिंद्रव्यासांनीं** लिहिलें आहे. तेव्हां प्रत्यक्ष प्रमाणांच्या पुराव्यावर आधारलेला पहिला चरित्रग्रंथ व मराठींतील सर्वांत प्राचीन असा गद्य ग्रंथ या दोन्ही दृष्टींनीं लीळाचरित्राचें मोल फार आहे. चक्रधरांनीं श्रीकृष्ण, दत्त, चक्रपाणी व गोविंदप्रभु यांच्याहि लीळा वेळोवेळीं ज्या सांगितल्या होत्या, त्यांच्या आधारें महिंद्रभटांनीं त्यांचींहि चरित्रें लिहिलीं आहेत. या सर्व चरित्रांतील व्यक्तिरेखाटन मात्र अगदीं स्थूल स्वरूपाचें आहे. चरित्रनायकाला सर्वगुण-संपन्न व अतिमानुषी सामर्थ्याचा बनवून त्याच्या भोंवतीं दैवी वलय निर्माण करण्याची प्रवृत्ति यांमध्यें स्पष्ट दिसते. पण धर्मबुद्धीनें तपशिलाचा कांटेकोरपणा सांभाळल्यामुळें यामध्यें तत्कालीन परिस्थितीचें चित्र अगदीं विश्वासार्ह असें उतरलें आहे. भौगोलिक स्थलवर्णनें, ऐतिहासिक घटना व राजकीय व्यक्ति यांचे निर्देश आणि तत्कालीन सामाजिक चालीरीति, आर्थिक व्यवहार, इत्यादींवर प्रकाश टाकणारे उल्लेख या सर्वांमुळें हीं चरित्रें समाजेतिहासाच्या दृष्टीनें बहुमोलाची ठरतील. या चरित्रग्रंथांची भाषा साधी व सरळ असून छोटचा छोटचा, तोकडचा पण अर्थपूर्ण वाक्यांची बनलेली आहे. भाषा सजविण्याचा किंवा पांडित्यप्रदर्शनाचा यांत बिलकूल प्रयत्न नाहीं, त्यामुळें तत्कालीन बोलीभाषेचें स्वरूप यांवरून सहज अजमावितां येते.

बाईदेवव्यासांचा (निर्याणकाल इ. स. १३०९) पूजावसर व मूर्तिज्ञान, केशवराजसूरींचा मूर्तिप्रकाश, साती ग्रंथांतील दत्तचरित्रविषयक 'सह्याद्रि-वर्णन' आणि नागदेवाचार्यांच्या मृत्यूपर्यंतची हकीकत सांगणारा 'स्मृतिस्थळ,' इत्यादि ग्रंथांचा महानुभावांच्या चरित्रवाङ्मयांतच समावेश केला पाहिजे. पूजावसर आणि मूर्तिप्रकाश (इ. स. १२८४) या ग्रंथांत

अनुक्रमें चक्रधरांची दिनचर्या व मूर्तिवर्णन हीं आलीं आहेत. पूजावसरांतील दिनचर्येच्या तपशिलावरून सहाशें वर्षांपूर्वीच्या महाराष्ट्रीय राहाणीची कल्पना येते. **केशवराजसूरीं**नीं चक्रधरांच्या मूर्तीचें व गुणांचें अत्यंत भक्तिभावानें व रसिकतेनें केलेलें ' मूर्तिप्रकाशांतील पद्यमय वर्णन ' मोठें हृदयंगम उतरलें आहे.

लीळाचरित्राच्या आधारेंच केशवराजसूरींनीं **सिद्धांतसूत्रपाठ** व **दृष्टांतपाठ** हे पंथीय तत्त्वज्ञानाचे प्रमाणग्रंथ तयार केले. चक्रधरांच्या उक्ती व दृष्टान्त निवडून त्यांचें संकलन व स्पष्टीकरण केशवराजसूरींनीं यांमध्यें केलें आहे. सिद्धान्तसूत्रपाठांत एकूण १६०९ सूत्रें असून लक्षणपाठ, आचारमालिका, विचारमालिका या तीन भागांत त्यांचें वर्गीकरण करण्यांत आलें आहे. यांतीलच ११४ दृष्टान्तांना स्पष्टीकरणार्थ दार्ष्टान्तिकाचा भाग जोडून केशवराजसूरींनीं ' दृष्टान्तपाठ ' तयार केला. या दृष्टान्तांचा परस्पर सबंध जुळवून त्या सर्वांचें मर्म ' लापनिक ' या गद्य प्रकरणांत त्यांनीं सांगितलें आहे. ' गुढे ' नामक प्रकरणांत गुरूपदेशाचें सार देण्यांत आलें आहे. या सर्वांवरून केशवराजसूरी हे पंथीय तत्त्वज्ञानाचे प्रवक्तेच होत, असें म्हणावेसें वाटतें.

हा पंथ कृष्णभक्तिपर असल्यानें सूत्रपाठाबरोबर गीता, भागवत हे ग्रंथहि या पंथानें प्रमाण मानले आहेत. त्यामुळें साहजिकच या पंथाच्या मंडळींनीं गीताभागवतावरहि लहानमोठे टीका ग्रंथ लिहिले. महिंद्रव्यास, कवीश्वरव्यास, लक्ष्मेंद्रभट देऊळवाडेकर, निवृत्तिदेव वाठोडकर ऊर्फ यक्षदेव, वगैरेंच्या पंधरांवर **गीताटीका** उपलब्ध आहेत. त्यांपैकीं पांच ज्ञानेश्वरकालीन आहेत. साती ग्रंथांपैकीं पं. विश्वनाथ बाळापूरकर यांचा ' **ज्ञानप्रबोध** ' हा गीतेंतील श्लोकाधारेंच पण स्वतंत्रपणें रचिलेला ग्रंथ आहे. त्यावर ज्ञानेश्वरांच्या शैलीची छाप सर्वत्र दिसून येते. यांतील

अविद्या खंडणाच्या भागावर अमृतानुभवाची दाट छाया पडली आहे, पण शेवटीं मात्र पंथदृष्टीनें द्वैती भूमिकाच मांडण्यांत आली आहे.

भागवताच्या आधारें लिहिलेल्या टीकांपैकीं उल्लेखनीय ग्रंथ म्हणजे भास्कर कवीश्वराचार्यांची **उद्धवगीता** (ओंव्या ८२७) होय. हीच एकादश–स्कंधावरील पहिली मराठी टीका (इ. स. १३०९). हिच्यावर केशवराजसूरींच्या ' मूर्तिप्रकाश ' ची छाप बरीच पडली आहे. प्रारंभीं कृष्ण–उद्धववियोगाचा प्रसंग साधून कवीनें करुणरसाचा उत्कृष्ट परिपोष यांत केला आहे. ग्रंथकाराचा कृष्णभक्तीचा जिव्हाळा त्यांतून व्यक्त होतो. यदु–अवधूतसंवादावरील टीकेंत पंथानुसंधानानें आचार–धर्माचें विवरण तपशिलानें केलें आहे. महानुभावी महंतांना अप्रत्यक्षपणें केलेला तो उपदेशच म्हणावयाचा. ग्रंथाच्या शेवटीं भास्करभटांनीं पंथीय तत्त्वज्ञानाचा विस्तार केला असून तेथें लीळाचरीत्र व सूत्रपाठ यांचाच आधार घेतला आहे. त्यामुळें अपेक्षेप्रमाणें हा ग्रंथ ' निवृत्तांजोगा ' झाला आहे. महानुभाव ग्रंथांत साती ग्रंथ म्हणून मान्यता पावलेल्या सात ग्रंथांत तत्त्वज्ञानावरचा महत्त्वाचा ग्रंथ काय तो हाच. बाकी बहुतेक ग्रंथ ललित स्वरूपाचेच आहेत.

महानुभावांच्या ललित वाङमयांत कृष्णकथेला प्राधान्य मिळालें आहे. त्यापैकीं **हयग्रीव व्यासांची** (इ. स. १२६५–१३२४) दशम–स्कंधावरील श्लोकबद्ध टीका विशेष प्रसिद्ध आहे. ' **गद्यराजस्तोत्र** ' हें तिचें नांव. या टीकेचें वळणहि पंडितीच आहे. दोनशें ऐशीं श्लोकांच्या या कृष्णकथेंत भावाविष्कारापेक्षां अनुप्रासादि शद्बालंकार व वृत्तबद्धरचना यांकडेच कवीचें लक्ष अधिक गुंतलें आहे. यांपैकीं कांहीं श्लोकांची निर्यमक रचना विशेष उल्लेखनीय आहे. ग्रंथरूप वाङमयापेक्षां स्तोत्ररूप वाङमयांतच महानुभावांच्या भक्तिप्रेमाचा आविष्कार विशेष उत्कटपणानें झाला आहे.

नागदेव-चिरंजीव महेश्वरपंडित यांचीं 'निर्वेद' व 'संकट' हीं दोन स्तोत्रें, भास्करभटांचें 'नरविलापस्तोत्र' केशीराजांचा 'स्तोत्रकलाप,' दामोदर पंडितांच्या 'चौपद्या,' इत्यादि रचना या स्तोत्रवाङमयांत येते. त्यांमध्यें केशीराजांच्या रचनेंत पंडिती वळण विशेष आहे, तर दामोदर पंडितांत भक्तीचा भाग अधिक आहे.

महदंबेचे 'धवळे' ही प्राचीन मराठींतील उत्कृष्ट भावकविता ठरेल. आद्य मराठी कवयित्री महदाइसा ऊर्फ महदंबा (इ. स. १२३३–१३०२) हिनें गोविंदप्रभूंकडील कृष्णविवाहोत्सवाच्या वेळीं करवली म्हणून गाइलेले 'धवळे' (यशोगीतें वा 'धवळा' वृत्तांतील गीतें) म्हणजे कृष्णरुक्मिणी विवाहावरील मराठींतील पहिलें काव्य होय (इ. स. १२८६). या काव्यांत कृष्णरूपाचें, तसेंच विवाहांतील सोहाळ्यांचें लौकिक वर्णन अगदीं तन्मयतेनें तिनें केलें आहे. रचनेंतील अव्याजमनोहर सरलता, वृत्तीची भावमधुर कोमलता आणि सहज प्रेमानें झालेला भक्तिभावाचा उद्रेक या सर्वांचें सौंदर्य महदंबेच्या धवळ्यांत अगदीं सहजतेनें एकवटलेलें दिसून येतें.

भागवतांतील दुसऱ्या एका कृष्णकथेच्या आधारें लिहिलेलें **दामोदर पंडितांचें 'वत्सहरण'** (इ. स. १२७८) हें ५०० ओव्यांचें एक सुंदर काव्य आहे. या रचनेंत स्फूर्तीचा किंवा कलेचा भाग विशेष नाहीं. मात्र महानुभाव तत्त्वज्ञानाचें सूत्र किंवा कथेचें अनुसंधान न सोडतां आपल्या भक्तिभावाचा नेटका आविष्कार दामोदर पंडितांनीं यामध्यें केला आहे. प्रतिभा किंवा पांडित्य यांचें भांडवल त्याच्याजवळ कमी असलें तरी कथानिवेदनांत दामोदर पंडितांचा हातखंडा आहे.

ज्ञानेश्वरसमकालीन **नरेंद्र अयाचित** हा तर जुन्या ललित वाङमयांतील अग्रेसर कवि होय. यादवांच्या दरबारीं असतां राजाच्या

प्रेरणेनें लिहिलें गेलेलें '**रुक्मिणीस्वयंवर**' (ओंव्या ८२९) हें त्याचें काव्य मराठींतील पहिल्या दर्जाचें आख्यानकाव्य ठरेल. दरबारी मंडळीं-साठीं लिहिलेल्या या काव्यामध्यें भक्तिभावनेपेक्षां कलाविलासाला प्राधान्य मिळणें, हें सहाजिकच होय. समाधाना बरोबर आनंद देण्याच्या हेतूनेंच (' तुम्हां दीजैल आनंद : साहानुकेसी ') नरेंद्रानें ही कृष्णकथा लिहिली आहे त्यासाठीं त्यानें आपल्यापुढें संस्कृतांतील महाकाव्यांची रचनाच आदर्श म्हणून ठेवलेली दिसतें. सर्गबद्ध रचनेचें बाह्यतंत्र त्यानें येथें पाळलें नसलें तरी, नायकनायिकेचें रूपवर्णन, स्वयंवरेच्छु राजांची नामावली नायिकेच्या विरहावस्थेंत भर घालणाऱ्या समयाची-सायंकाल, चंद्रोदय इत्यादींचीं वर्णनें, वनोपवनें-नगरप्रदेश इत्यादि स्थलवर्णनें यासारख्या महाकाव्यांतील आशयाचें अनुकरण नरेंद्रानें या काव्यांत यथेच्छ केलें आहे. नरेंद्राच्या या काव्यावर राजा आपला हक्क सांगू लागला म्हणून एका रात्रींत नकललेला जो अर्धामुर्धा भाग घेऊन नरेंद्र वऱ्हाड-प्रांतीं पळाला, तेवढ्या भागांत ' कृष्णप्रेमानें व्यथित झालेल्या रुक्मिणीचें पत्र घेऊन सुदेद ब्राह्मण द्वारके सन्निध येतो ' एवढाच वृत्तांत आला आहे. तरी त्यांत वर उल्लेखिलेल्या प्रकारचीं वर्णनें मात्र भरपूर आहेत. कथानिवेदना-पेक्षां वर्णनावरच नरेंद्राचा भर अधिक आहे आणि त्यांतच याच्या कल्पनाविलासाला चांगला अवसर मिळाला आहे. रुक्मिणीची विरहव्यथा, तीवरील उपचार, किंवा वसंताची निसर्गशोभा आणि द्वारकेची वैभवश्री इत्यादींची या काव्यांतील वर्णनें वाचूं लागतांच रसिकांचें देहभान अगदीं हरपून जातें. नरेंद्र हा सृजनशील प्रतिभेचा कवि आहे. भागवत पद्मपुराण यांमध्यें कुठेंहि नसणारें किन्नराचें उपाख्यान नरेंद्रानें स्वतःच्या कल्पनेंतून निर्माण केलें आहे. त्याच उपाख्यानांत किन्नराच्या गानकौशल्याचें पारि-भाषिक शब्दांनिशीं जें विस्तृत वर्णन आलें आहे, त्यावरून नरेंद्राच्या संगीतविषयक ज्ञानाची खात्री पटतें. तर पुढें धारादामोदराच्या वर्णनांत

कवीच्या स्थापत्यशास्त्राच्या व वास्तुकलेच्या ज्ञानाचीहि ओळख होते. पंडित कवींच्या कुळांत अग्रगण्य ठरण्याला आवश्यक तेवढी अशा प्रकारची बहुश्रुतता व व्युत्पन्नता नरेंद्राजवळ भरपूर होती यांत शंका नाहीं. मात्र कल्पनेचें अपरंपार वैभव हेंच नरेंद्राच्या काव्याचें खरेंखुरें वैशिष्टच. कथाप्रकार व शृंगारासारख्या लौकिक रस हा फरक वगळल्यास याबाबतींत नरेंद्र ज्ञानेश्वरांच्या कुळींतला कवि ठरतो. उत्तान वर्णनशैलीनें आणि अलंकारमंडित भाषेनें नटलेलें हें काव्य म्हणजे नरेंद्रासारख्या प्रतिभासंपन्न कवीनें आपल्या रसिकांपुढें खुलें केलेलें कल्पना भांडारच होय.

प्रतिभेच्या कल्पनातरल नि मादक वातावरणांत गुंगणारा सौंदर्यासक्त वृत्तीचा कलाकवि या अभिधानाला जुन्या कविमंडळांत एकटा एक नरेंद्रच अधिकारी ठरेल. त्याच्या या काव्यांत भास्कराच्या उद्धव-गीते-प्रमाणें पंथीय तत्त्वज्ञानाचा भाग विशेष[१] आढळत नाहीं. (याचें कारण काव्य लिहून झाल्यावरच तो पंथांत आला होता; हें असावें.) यांत कृष्णभक्ति असली तरी तिच्यांतहि केशिराजाची उत्कटता वा महदंबेची आर्तता नाहीं. तत्त्वज्ञान, भक्तिभाव किंवा पंथनिष्ठा या गोष्टी येथें गौण आहेत. या काव्यांतील '-आशय (भाव) कविता-कामिनीचा हात धरून डुलत डुलत रसरूपी कालव्यावरील साहित्य कुंजाकडे क्रीडेसाठीं निघाला आहे[२]' हीच नरेंद्राची काव्यदृष्टि आहे. हें लक्षांत घेऊन कवीची सौंदर्यदृष्टि, रसवृत्ति अणि त्याचा कल्पनाविलास यांचा आस्वाद घेण्याच्या हेतूनेंच नरेंद्राचें ' रुक्मिणीस्वयंवर ' (इ. स. १२९२) सहृदय रसिकांनीं वाचलें पाहिजे.

---

१ याला अपवाद अशीं एक दोन स्थळें आहेत. उदा.- यज्ञकर्माचें विडंबन (ओव्या १९९-२०१) महानुभावीय दृष्टिकोनांतून केलेलें दिसतें.

२ कविता-कामिनीचा धरुनी हातु : भावो दोन्हीं आंगीं मलपतु (डुलत) चाले साहित्य-साबरेया आंतु : रसु खेडकुळियें : (कालवा) (२६)

पंथनिष्ठा, प्रज्ञा आणि प्रतिभा या तिहींचा मिलाफ ज्यांच्या काव्यांत दिसतो असे कवि म्हणजे **भास्करभट बोरीकर** हे होत. शरीरसौष्ठव आणि असामान्य बुद्धिमत्ता, शीघ्र कवित्व आणि रसाळ वक्तृत्व, कडकडीत वैराग्य व सर्वांगीण रसिकता, वेदान्त व व्याकरण, साहित्य आणि शृंगार इत्यादि शास्त्रांच्या व्यासंगानें लाभलेलें पांडित्य आणि पंथीय वाङमयाच्या दीर्घ परिशीलनानें प्राप्त झालेलें तत्त्वज्ञानावरील प्रभुत्व, इत्यादि वैशिष्ट्यांच्या दुर्मिळ संयोगानें कवीश्वराचार्य या पदवीबरोबरच पंथाचें तृतीय आचार्यपदहि बाईदेवव्यासांच्या मृत्यूनंतर यांच्याकडेच आलें (इ. स. १३०९). शिशुपालवध, एकादशस्कंधटीका किंवा उद्धवगीता, संस्कृत पूजावसर, नरविलापस्तोत्र व चाळिसाख्यस्तोत्र इतकी ग्रंथरचना निर्विवादपणें कवीश्वराचार्य भास्करभट बोरीकरांचीच आहे.[1] तत्त्वबोधाच्या दृष्टीनें **उद्धवगीता** तर, काव्यदृष्ट्या **शिशुपालवध** (इ. स. १३०८) सरस आहे. संस्कृतमधील माघ कवीच्या शिशुपालवधाची रूपरेखा डोळ्यापुढें ठेवून हें काव्य भास्करानें लिहिलें असलें तरी, रंगभरणीमध्यें—वर्णनें, कल्पना व अलंकारयोजना या बाबतींत—कवीची स्वतंत्र कल्पनाशक्ति दिसून येतेच. माघाशिवाय इतर महाकवींचा व्यासंगहि या कवीचा असावा, असें दिसतें. नरेंद्राच्या रुक्मिणीस्वयंवराचीहि छाप मधून मधून चांगलीच जाणवते. साती ग्रंथांत मान्यता पावलेल्या या काव्याचा हेतु जरी ' आईकता तुटे **भवबंधू** ' असा आध्यात्मिक असला तरी कृष्णरुक्मिणींतील प्रेमकलह, जलक्रीडा आणि विरहावस्था, इत्यादींच्या कामोद्दीपक वर्णनांनींच सारें काव्य नटलें आहे. हीं वर्णनें लौकिक स्वरूपाचीं असून कथादृष्ट्या अस्थानीं वाटतात. या काव्यांतील शृंगाररस अतिरिक्त व कांहीं ठिकाणीं अश्लीलहि आहे. काव्याच्या नांवावरून वाटतें त्याप्रमाणें वीररसाला येथें

---

१ भास्करभट बोरीकर (प्रा. वि. भि. कोलते).

बिलकुल प्राधान्य नाहीं. एकूण १०८७ ओंव्यांपैकीं शेवटल्या फक्त २०० ओंव्यांत काय तो वीररसाचा भाग आहे. उलट सर्वत्र 'कामकटकाचा गजबजाटच' दिसतो. 'साहित्याचेनि परिमळें : शृंगाराचेनि मेळे : प्रबंध होती मातावळे : कविजनाचे' हा मुळीं भास्करभटांचा काव्यविषयक दृष्टिकोनच असून त्यामुळें 'हा शृंगारिया प्रवृत्तां जोगा जाला असे:' असाच अभिप्राय या काव्याविषयीं बाईदेवव्यासांना द्यावा लागला. म्हणून 'निवृत्तां-जोगा,' एकादशस्कंध भास्करभटांनीं पुढें लिहिला. पण शिशुपालवध हाच भास्करभटांचा मुख्य ग्रंथ होय. या काव्यांत कवीची तत्त्वदृष्टि व कृष्णभक्ति, त्याची शृंगारासक्ति आणि विनोदवृत्ति, त्याचें शास्त्रज्ञान आणि भाषापांडित्य या सर्वांचें प्रतिबिंब पडलें आहे. नरेंद्राच्या तोडीचा कलाविलास यांतहि आहे; पण त्या जोडीला प्रज्ञा आणि भावना यांचें बळ भास्कराजवळ अधिक आहे त्यामुळें 'पुन वाचा रसाळा : गर्व सांडविन कोकिळा' किंवा 'पातां प्रमेयाचा गोडी : अमृताची उपजे नावडी' अशा तऱ्हेच्या विश्वासानें कवीनें हा ग्रंथ लिहिला आहे. कथन, वर्णन, विवरण, चित्रण आणि भाषण या सर्व बाबतींत कवि अगदीं सिद्धहस्त असल्याचा साक्ष या काव्यावरून पटते.

महानुभाव कवींच्या या **ललित वाङमयांत** अंतःकरणाचा ओलावा, बुद्धीचा प्रभाव, कल्पनेच्या भराऱ्या, भावनेची उत्कटता, पांडित्याचा प्रकर्ष आणि भाषेची प्रौढता नि प्रसन्नता, इत्यादि साहित्यगुणांचा चांगलाच प्रत्यय येतो. हे सर्व पंडित कवी परस्परांचे ग्रंथ आदरभावानें वाचीत असावेत, असें त्यांच्या ग्रंथांत आढळणाऱ्या कित्येक साम्यस्थळांवरून वाटतें. मात्र संस्कृत कवींचें आदर्श डोळ्यापुढें ठेवून कल्पनाविलासाच्या दृष्टीनें अलंकारमंडित अशा नागरभाषेंत काव्यरचना केल्यानें भास्कर, दामोदर, नरेंद्र इत्यादि कवींची ग्रंथरचना सामान्यांपर्यंत जाऊंच शकली

नाहीं. धर्मप्रचार किंवा भक्तिभावना यांपेक्षां पांडित्यप्रदर्शन व कला-विलास या प्रवृत्ती वरचढ ठरल्यानें त्यांचें काव्य सामान्यांच्या बुद्धीला समजूं शकलें नाहीं. तसेंच तें सामान्य जनसमूहाच्या अंतःकरणाची पकड घेऊं शकलें नाहीं. म्हणूनच सामान्यांच्या अंत:करणाला भिडणाऱ्या भाषेंत पंथप्रचार करणाऱ्या वारकरी पंथाच्या सुबोध व सरस वाङ्मयानें महानुभाव ग्रंथकारांना व कवींना परिणामाच्या दृष्टीनें निष्प्रभ करून टाकलें.

पंढरीचा भक्तिसंप्रदाय ज्ञानेश्वर-नामदेवांच्या कितीतरी अगोदर प्रचारांत होता. पंढरपूर क्षेत्र व पांडुरंग दैवत यांच्या अस्तित्वाचे प्राचीन[1] पुरावे शिलालेख-ताम्रपटांतूनहि मिळतात. महाराष्ट्रांतील विठ्ठलोपासनेचा प्रवर्तक पुंडलीक मानला जातो. पण त्याचा काळ[2] निश्चित नाहीं.

पंढरीचा भक्तिसंप्रदाय व ज्ञानेशांचें कर्तृत्व

हेमाद्रिपंडित, रामदेवराव यादव या तेराव्या शतकांतील मंडळींनीं विठ्ठलमंदिराला देणग्या दिल्याचे उल्लेखहि उपलब्ध आहेत. (पंढरपूरचा चौऱ्यांऐंशीचा शिलालेख, इ. स १२७३) ज्ञानेश्वर-नामदेवाच्या घराण्यांत पंढरीच्या वारीचा प्रघात पूर्वापार चालू होताच. तेव्हां ' ज्ञानदेवें रचिला पाया ' याचा अर्थ हा कीं, पूर्वापार चालत आलेल्या पंढरीच्या भक्तिसंप्रदायाला विशिष्ट वळण लावून त्या पंथाला ज्ञानेश्वरांनीं सामाजिक दृष्ट्या अधिक कार्यक्षम केलें. सगुण भक्तीला अद्वैत तत्त्वज्ञानाचें अधिष्ठान देऊन डोळस बनविलें. व्यक्तिनिष्ठ परमार्थसाधनाच्या प्रवृत्तीला लोकसंग्रहाची जोड दिली. त्यामुळें वारकरी पंथांत नवचैतन्य निर्माण होऊन धर्मसुधारणेचें एक प्रचंड आंदोलन महाराष्ट्रांत सुरू झालें.

---

१ श्रीविठ्ठल आणि पंढरपूर (ग. ह. खरे).

२ इतिहासाचार्य राजवाडे यांच्या मतानें पुंडलीक हा इ. स. ११२८ (शके १०५०) च्या सुमारास होऊन गेला असावा.

ज्ञानेश्वरांच्या कालांत म्हणजे यादवांच्या राजवटींत सुखासीनतेच्या आहारीं गेलेले ब्राह्मण–क्षत्रियादि उच्चवर्णी लोक कर्तव्यपराङ्मुख झाल्यानें वैदिक धर्माची परंपरा निष्प्रभ झाली होती. राजाश्रयाच्या जोरावर हेमाद्रिबोपदेवादि पंडित यज्ञयाग, व्रतवैकल्यें, इत्यादि कर्मकांडाच्या द्वारां तिचें पुनरुज्जीवन करूं पाहात होते. पण या सनातन वैदिक परंपरेंतील विषमता व कर्मठपणा यांच्याविरुद्ध जैन, लिंगायत, नाथ, महानुभाव, इत्यादि धर्मपंथियांनीं देशी भाषांच्या द्वारां अगोदरच जोरदार आघाडी उघडली होती. जुन्या शास्त्रीपंडितांकडून उपेक्षिला गेलेला निरक्षर व असंस्कृत बहुजनसमाज स्वाभाविकपणेंच ह्या पंथियाच्या जाळ्यांत ओढला जात होता. अशा वेळीं स्त्री–शूद्रांच्या धर्मश्रद्धेला उच्च विचारांची बैठक देऊन नैतिक दृष्टया निष्कलंक आचरणाचे उदात्त आदर्श त्यांच्यापुढें ठेवले तरच वैदिक परंपरेला उजाळा मिळण्याची शक्यता होती. तें कार्य लोकांच्या धर्मजीवनाला भागवतधर्माची बैठक देऊन ज्ञानेश्वरांनीं सिद्धीस नेलें आणि महाराष्ट्रीय संस्कृतीची मुहूर्तमेढ त्यांनीं रोंविली.

ज्ञानेश्वरांचें चरित्र आणि कार्य

ज्ञानेश्वरांचें चरित्र सर्वपरिचित आहे. त्यांचा जन्म शके ११९३ किंवा ११९७ मध्यें झाला असावा अशीं दोन[१] मतें आहेत. समाधि-शका–बद्दलच्या मतांतहि असेंच तीन वर्षांचें अंतर पडलें आहे. ह्या दोहोंचा समन्वय साधल्यास ज्ञानेश्वरांची हयात २५ वर्षांची (जन्म इ. स. १२७१ व समाधि इ. स. १२९६) मानतां येऊन त्यांच्या जीवनवृत्तांतील सर्व घटनांची नीट संगति लागते. संन्यासोत्तर गृहस्थाश्रम स्वीकारल्याच्या पापाबद्दल ज्ञानेश्वरांच्या मातापित्यांनीं प्रयाग क्षेत्रीं जाऊन देहत्यागाचें

१ जन्मकालासंबंधींच्या वादाचा सारांश : महाराष्ट्र–सारस्वत पुरवणी, पानें ८८८–८८९ पहा.

प्रायश्चित्त घेतलें. ज्ञानेश्वरादि भावंडांनीं पैठणमधील पंडितांकडून शुद्धिपत्र मिळविण्याचा प्रयत्न केला. ज्ञानेशांच्या योगबलानें दिपून गेलेल्या ब्राम्हण मंडळींनीं यांच्याविषयींच्या आदरभावाचें द्योतक म्हणून त्यांना शुद्धिपत्र[1] दिलें खरें; पण मौजीबंधनाचा अधिकार त्यांना नाकारलाच. पैठणहून तिघां भावंडांसह परत येतांना वाटेंत नेवासें येथें ज्ञानेश्वरांनीं 'ज्ञानदेवो' (इ. स. १२९०) व 'अमृतानुभव' हे ग्रंथ लिहिले. चांगदेवासारख्या योग्याचा गर्व हरण केल्यानंतर नामदेवादि वारकरी संतांबरोबर ज्ञानेशांनीं उत्तरेकडची तीर्थयात्रा केली. तीर्थयात्रेच्या शेवटीं पंढरीहून परतल्यावर ज्ञानेश्वर इ. स. १२९६ मध्यें आळंदीसच समाधिस्थ झाले

एवढ्या अल्पायुष्यांत महाराष्ट्रसंस्कृतीचा पाया भरण्याचें महत्कार्य ज्ञानेशांनीं केलें. संन्याशाचीं मुलें म्हणून वर्णाश्रमव्यवस्थेच्या चौकटीबाहेर या चार भावंडांना ठेवण्याचा हटवाद पैठणच्या पंडितांनीं दाखविला. त्यामुळें जातिसंस्थेचा चिवटपणा, पढिक पांडित्याच्या मर्यादा व स्त्रीशूद्रांची बौद्धिक कुचंबणा यांची त्यांना तीव्रतेनें जाणीव झाली असणें, स्वाभाविक आहे. याचा एक दृश्य परिणाम म्हणजे त्यांनीं आपल्या सहानु-भूतीचा व प्रेमाचा ओघ बहुजनसमाजाकडे वळविला. त्यांच्या घराण्यांत पूर्वापार चालू असलेल्या विठ्ठलभक्तीमुळें त्यांच्या मनावर विश्वबंधुत्वाचा व भूतदयेचा दृढ संस्कार झाला होता. त्यामुळेंच तर, आपल्यावरील अन्यायांबद्दल उच्चवर्णीयांवर चिडून न जातां, उलट त्यांनीं आपल्या उज्वल चारित्र्याच्या रूपानें त्यांना सहिष्णुतेचा व औदार्याचा धडाच घालून दिला.

---

१ 'बोपदेवेन ग्रथितं शुद्धिपत्रं समर्पितम्।' अशा उल्लेखाचें एक शुद्धिपत्र पहावयास मिळतें. पण त्याच्या खरेपणाबद्दल शंका आहे. (भिंगारकरकृत 'ज्ञानेश्वरचरित्र' पहा).

गुरुपरंपरेनें ज्ञानेश्वर हे नाथपंथी होते. अद्वैतनिष्ठा, योगसाधना, हरिहरैक्यभाव, दलितोद्धार, आणि देशी भाषेचें माध्यम हा त्यांचा नाथ-पंथीय वारसाच होय. द्वैतमूलक भक्तीला अद्वैताची बैठक मिळवून देण्यांत, वैदिक कर्मकांडांतील विषमता व अवैदिक संन्यासवादांतील समता यांचा सुवर्णमध्य साधण्यांत, आणि भागवतधर्माच्या झेंड्याखालीं ब्राह्मणां-पासून अतिशूद्रांपर्यंत साऱ्या जातींना एकत्र आणण्यांत ज्ञानेशांनीं विलक्षण क्रांतदर्शित्व दाखविलें. कारण या धोरणानेंच धार्मिक बाबतींत महाराष्ट्राची एकजूट होत गल्यानें पुढें परधर्मीय आक्रमणाच्या पडत्या काळांतहि महाराष्ट्रानें आपली धर्मश्रद्धा व सत्वभावना हीं टिकवून धरलीं.

या कार्याला साजेसें प्रभावी व्यक्तिमत्त्व त्यांना लाभलें होतें. क्रांतदर्शी तत्त्वज्ञ, आत्मानुभवी योगी, भूतदयावादी संत आणि प्रतिभासंपन्न कवि अशा चतुर्विध भूमिकांनीं ज्ञानेश्वरांचें व्यक्तिमत्त्व संपन्न झालें

ज्ञानेश्वरांचें व्यक्तिमत्त्व

आहे. तत्त्वज्ञानाच्या बाबतींत नाथपंथी अद्वैतमत, शांकर वेदान्त व काश्मिरी शैवमत यांचा संस्कार ज्ञानेश्वरांच्या बुद्धीवर झालेला दिसतो. तरी त्यांची विचारसरणी तशी स्वतंत्र[1] आहे. औपनिषदिक तत्त्वज्ञानाच्या आधारेंच त्यांनीं आपला चिद्वि-लासवाद 'अमृतानुभव' या स्वतंत्र ग्रंथांत मांडला आहे आणि ज्ञानेश्वरींतहि विशद केला आहे. आपलें तत्त्वज्ञान मांडतांना ज्ञानेश्वरांनीं खंडन-मंडनाची पंडिती पद्धत अवलंबिली नाहीं. आत्मानुभवाचा उत्स्फूर्त आविष्कार असेंच

---

१ उदाहरणार्थ— गीता अ. २ मधील २९, ४६, ५९ श्लोकांचा अर्थ ज्ञानेशांनीं शांकरभाष्याहून भिन्न केला आहे. तसेंच गीतेच्या अठरा अध्यायांची विभागणीहि परंपरेला सोडून स्वतंत्रपणेंच त्यांनीं केली आहे. (अ. १०-२४ ते ४० व अ. १८-१४३० ते ५५ पहा.)

त्यांच्या तात्त्विक विवेचनाचें स्वरूप[1] आहे. आपल्या योगमार्गाचें रहस्य ज्ञानेशांनीं ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायांत विस्तारानें वर्णिलें आहे. नाथ-पंथाचें अद्वयानंदवैभवच काव्यमय भाषेंत त्यांनीं या अध्यायांत लोकांपुढें ठेविलें. त्यांची धर्मरक्षणाची व लोकोद्धाराची कामगिरी भूतदयावादी संत या भूमिकेनेंच झाली आहे. नामदेवादि संतांबद्दलचा त्यांचा कळवळा त्यांच्या कारुण्यपूर्ण मनोवृत्तीचाच भाग होय. विठ्ठलाच्या कणवयुक्त भक्तप्रेमाची सगुण साकार मूर्ति म्हणजे ज्ञानेश्वरच होत. या भावनेनेंच साऱ्या संतमंडळानें 'माउली' ही पदवी त्यांना दिली. ज्ञानेश्वरींत भक्त, योगी, ज्ञानी यांची सत्वगुणसंपन्न आदर्श चित्रें ज्ञानेश्वरांनीं काढलीं आहेत. तीं जणू कांहीं ज्ञानेश्वरांच्या शब्दप्रतिमाच होत. सौजन्य कारुण्य, लीनता, क्षमाशीलता, दयाळूपणा, औदार्य, सर्वत्र समदृष्टि इत्यादि गुणांनीं संपन्न असेंच ज्ञानेश्वरांचें व्यक्तित्व होतें. गुरुभक्तीचा आणि कृष्णार्जुनप्रेमाचा विस्तार त्यांनीं ज्या जिव्हाळ्यानें केला आहे, त्यावरूनही त्यांच्या संतहृदयाची साक्ष पटते. त्यांचे अध्यात्मपर ग्रंथ म्हणजे त्यांच्याच शब्दांत सांगावयाचें झाल्यास 'महाराष्ट्र शारदेचें लावण्यरत्न भांडार'च होत. त्यांतील साहित्यगुणांची विपुलता त्यांच्या अलौकिक प्रतिभेचीच निदर्शक आहे.

ज्ञानेश्वरांचें वाङ्मय

ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, चांगदेवपासष्टी, हरिपाठाचे व इतर अभंग आणि समाधीच्या वेळचें नमन प्रकरण इतकी ग्रंथरचना निर्विवादपणें ज्ञानेश्वरांची आहे. त्यांखेरीज उत्तरगीता, प्राकृत--गीता, शुकाष्टक, पंचीकरण, मुद्राप्रकाश इत्यादि पंचविसांवर प्रकरणें त्यांच्या नांवावर आढळतात. पण आशय व भाषा ह्या दोन्ही दृष्टींनीं तीं ज्ञानेश्वरांचीं नसावींत, असें वाटतें. पिढ्यान्‌पिढ्या तोंडोतोंडीं वापर झाल्यानें अभंगांची भाषा बरीच

---

१ 'ज्ञानेश्वरांची अमृतवाणी'—(संपादक—प्रा. ह. श्री. शेणोलीकर) या संपादित पुस्तकाच्या प्रस्तावनेंत ज्ञानेशांचें तत्त्वज्ञान, व्यक्तित्व व काव्य यासंबंधीं सविस्तर विचार केला आहे.

अर्वाचीन झाली असली तरी, त्यांतील विचार, कल्पना व कांहीं विशिष्ट शब्द इत्यादि बाबतींत अभंगांचें ज्ञानेश्वरीशीं असलेलें साम्य स्पष्ट दिसण्यासारखें आहे. अभंगांच्या अर्वाचीन भाषेच्या मुद्द्यावर अभंगकर्ते ज्ञानदेव व ज्ञानेश्वरीकर्ते ज्ञानेश्वर या व्यक्ती एक नसाव्यात असा एक वाद[१] मध्यंतरीं उपस्थित झाला होता. त्यांत अवांतर मुद्दे भरीला घालून आळंदीचे ज्ञानेश्वर व आपेगांवचे ज्ञानदेव या दोन व्यक्ती भिन्न काळांतील आहेत असा सिद्धान्तहि मांडण्यांत आला होता. पण ऐतिहासिक पुराव्यानें तो अद्यापहि सिद्ध झालेला नाहीं.

भगवद्गीतेवरील सर्व टीकाग्रंथांत विख्यात नि लोकप्रिय अशी टीका म्हणजे ज्ञानेशांची **ज्ञानदेवी** (इ. स. १२९०) होय. या नऊ हजार ओव्यांच्या विस्तृत व्याख्यानांत ज्ञानेश्वरांनीं गीतेच्या ७०० श्लोकांचा आशय उपमा-दृष्टांताच्या आधारें सुलभ नि सुरस करून सांगितला आहे. आध्यात्मिक विषयाचें काव्यपूर्ण विवेचन या दृष्टीनें हा ग्रंथ त्या कालांतील सर्व भाषांच्या वाङ्मयांत लोकोत्तरच म्हणावा लागेल. मौलिक स्वरूपाचें तत्त्वज्ञान आणि अव्वल दर्जाचें काव्य या दोहोंचा इतका मनोहर संगम दुसऱ्या कुठल्याहि भाषेंत आढळणार नाहीं. टीकाग्रंथांचे शांकरभाष्यासारखे आदर्श व पुराणें या दोहोंपेक्षां वेगळीच विवेचनपद्धति या ग्रंथांत ज्ञानेश्वरांनीं अनुसरली आहे. कांहीं ठिकाणीं त्यांनीं शंकराचार्य, रामानुजाचार्य यांचें अनुकरण केलें असलें तरी, कोणाहि भाष्यकारापेक्षां ज्ञानेश्वरांची टीकेची भूमिका व पद्धति अगदीं भिन्न आहे. 'भाष्यकारांतें वाट पुसतु ' हे त्यांचे उद्गार पूर्वसूरींबद्दल आदर

१ ' ज्ञानदेव व ज्ञानेश्वर, ' सुधारक पत्रांतील लेखमाला, १८९८-९९ (भारद्वाज ऊर्फ श्री. भारदे) १९३१ 'ज्ञानदेवांचा कालनिर्णय,'-केसरींतील प्रत्युत्तरात्मक लेखमाला (श्री. र. भिंगारकर) १९००.

व्यक्त करणारे आहेत इतकेंच. एरवीं त्यांची गीताटीका आशय व आविष्कार ह्या दोन्ही बाबतींत स्वतंत्र बुद्धीनेंच रचिलेली आहे. ज्ञानेश्वर हे ठराविक चाकोरींतील पढिक पंडित नाहींत. व्याकरण-न्याय-साहित्य इत्यादि शास्त्रांच्या दृष्टीनें शब्दच्छल करून मूळश्लोकाचा अर्थनिर्णय करणारें शब्दपांडित्य ज्ञानेश्वरीमध्यें दिसणार नाहीं. अशा पंडिती वळणाचें ज्ञानेश्वरांना वावडें आहे. ज्ञानेश्वर अनुभूतिवादी संत आहेत. मूळ ग्रंथांतील आशय समरसतेनें विशद करून आपल्या आध्यात्मिक अनुभवाला व्यक्त स्वरूप देण्यावर त्यांचा भर आहे. म्हणून त्यांनीं महानुभाव पंडितांप्रमाणें संस्कृत भाष्यकारांच्या तर्ककर्कश व विद्वज्जड शैलीचें अनुकरण न करतां पौराणिक शैलीचा अवलंब केला आहे.

मात्र टीकाग्रंथ लिहिण्याचें बंधन पत्करल्यामुळें गीतेच्या पावलावर पाऊल ठेऊनच तो तो विषय, तो तो विचार ज्ञानेशांना विशद करावा लागला आहे. आत्म्याचें अमरत्व व व्यापकत्व सांगणारा उपनिषदांतील अध्यात्मविचार आणि सृष्टीच्या विविधत्वाचा उलगडा करणारा सांख्यशास्त्राचा प्रकृति-पुरुष विचार; विश्वांतील नामरूपात्मक विविधतेचा परिहार करून निराकार, निर्गुण ब्रह्माची ओळख करून देणारा मायावादाचा[1] वेदान्त आणि ईश्वराच्या सगुणनिर्गुण रूपांची योग्य व्यवस्था लावणारा ज्ञानोत्तर भक्तीचा सिद्धान्त; तसेंच चित्त-शुद्धीला उपकारक ठरणारा पण खडतर असा हठयोग आणि बाह्य शुद्धीला कारक होणारा वर्णाश्रमधर्मानुसारी कर्मयोग; जीवाला बंधनकारक होणारा हा त्रिगुणात्मक संसार आणि त्यांतून मुक्त

---

१ 'तात्त्विक विचार-प्रक्रियेंत ज्ञानदेवांचा शंकराचार्यांशीं पूर्ण संवाद नाहीं. त्यांचा मायावाद किंवा विवर्तवाद ज्ञानदेवांस सर्वस्वीं संमत नाहीं.' (मराठी भाषेचा व वाङ्मयाचा इतिहास-पान ९६.)- बा. अ. भिडे.

करणारा ज्ञानकर्मभक्ति यांच्या समन्वयांतून फलित होणारा नीतिविचार हे सारे विषय गीतेच्या अनुषंगानें ज्ञानेश्वरांकडून ज्ञानेश्वरीमध्यें (अ. १८- ओंव्या ९०३२) साकल्यानें व समरसतेनें मांडले गेलें आहेत. वर्ण्य विषयाशीं पूर्णतया समरस होऊन त्याचें रहस्य विशद करणें, हें आदर्श टीकाकाराचें वैशिष्टच या ग्रंथांत पुरेपूर प्रत्ययास येतें. श्रीकृष्णाचें मनोगत हलक्या हातानें उकलून दाखविणारी ज्ञानेशांची ज्ञानेश्वरी म्हणजे रहस्योद्‌ग्राही पद्धतीच्या भावटीकेचा एक उत्कृष्ट आदर्शच ठरेल; म्हणूनच वामनाच्या यथार्थदीपिकेच्या तुलनेनें हिला '**भावार्थदीपिका**' हें सार्थ नांव पुढें प्राप्त झालें असावें.

काव्य किंवा भावाविष्कार हेंच या टीकेचें अभिनव असें माध्यम आहे. ज्ञानेश्वरांची भूमिका रेंखीव व कांटेकोर ग्रंथरचना करणाऱ्या भाष्यकाराची नसून शूद्रातिशूद्रांना गीतार्थाची सुलभतेनें मेजवानी देणाऱ्या रससिद्ध कवीश्वराची आहे. त्यामुळें या उत्स्फूर्त व्याख्यानांत तर्काचा कर्कशपणा किंवा फाजील कांटेकोरपणा कोठें आला नाहीं तरी, कोठे कोठें विषयांतर, पाल्हाळ, पुनरावृत्ति, हे मांडणीचे दोष साहाजिकपणेंच आढळतात. कारण भावार्थदीपिकेच्या संक्षेपविस्तारांत तर्कबद्धतेपेक्षां भावौघाचें प्रामाण्यच मानलेलें दिसतें. त्यामुळें व्यासांची स्तुति, गीतेचा गौरव, मराठी भाषेची थोरवी, गुरुकृपेचा महिमा, श्रोत्यांचा अनुनय, कृष्णार्जुनांचें प्रेम यांसारखे ज्ञानेश्वरांचे आवडीचे विषय आले कीं, ते त्यांत रंगून जातात. तसेंच, लोकांना नीतिबोध करण्याच्या ठिकाणींहि ज्ञानेश्वर आपलें विस्तारचातुर्य मोठया काव्यात्मक रीतीनें प्रकट करतात. प्रारंभींच्या अध्यायांपेक्षां १३, १५, १८ हें अध्याय म्हणूनच मोठे झाले आहेत. ज्ञानेशांचीं ठिकठिकाणचीं 'प्रतिज्ञोत्तरें' त्यांच्या व्यक्तित्वाच्या सर्व पैलूंवर प्रकाश टाकणारी असून शैलीच्या दृष्टीनेंहि मोठी मनोरम आहेत. या संदर्भांत १, ६, ९, १२, १३,

व १८ या अध्यायांचे प्रस्ताव व उपसंहार विशेष उल्लेखनीय ठरतील. ' माझा मराठाचि बोलु कौतुकें । परी अमृतातेंहि पैजा जिंके ॥ ' किंवा ' लोकु वाक्चातुर्यें । सुखिया होई ॥ ' यांसारखी त्यांचीं वचनें अभिनव ग्रंथकर्तृत्वाची अभिमानयुक्त जाणीव व स्वतंत्र ग्रंथरचनेचा त्यांचा आत्मविश्वास स्पष्ट करतात. पण त्यांत औद्धत्याचा व अहंकाराचा लवलेशहि नाहीं. व्याख्यानपद्धतीनें टीका लिहिणारे ज्ञानेश्वर श्रोत्यांचें मानसशास्त्र ओळखणारे व्याख्याते होते, ही गोष्ट ' वक्तृत्वा अवधानाचा होय चारा ' किंवा ' वक्ता तो वक्ताचि नोहे । श्रोतेनवीण ' या उद्गारांवरून स्पष्ट होते. ज्ञानेशांनीं अनेकदां आपल्या श्रोत्यांचा अनुनय करून ' ग्रंथ लक्षपूर्वक ऐकण्याची ' त्यांना प्रार्थना केली आहे. अशा ठिकाणीं त्यांच्या विनय भावाबरोबर त्यांची लोकाभिमुख वृत्तीहि चांगली स्पष्ट होतें.

गीतेच्या आधारें ज्ञानेश्वरीमध्यें श्रीकृष्णाचें हृद्गत विशद करून सांगितल्या नंतर ज्ञानेशांनीं **अमृतानुभव** (प्र. १०, ओंव्या ८०४) हा स्वतंत्र ग्रंथ लिहिला. फक्त स्वतःच्या अनुभूतीला प्रमाण मानून चिद्विलासाचा आपला आवडता सिद्धान्त ज्ञानेश्वरांनीं या ग्रंथामध्यें मांडला आहे, म्हणून या ग्रंथाला ते अनुभवामृत [1] म्हणत असावेत. (ज्ञानदेव म्हणे श्रीमंत । हें अनुभवामृत । सेऊनि जीवन्मुक्त । हेंचि होतु ॥ प्र. १०–१९.) ज्ञानेश्वरांचें स्वतंत्र तत्त्वज्ञान शुद्ध स्वरूपांत याच ग्रंथांत प्रकट झालें आहे. ज्ञानेश्वरीच्या मानानें रसकल्लोळाचे व कल्पनाविलासाचे प्रसंग यामध्यें कमी आहेत. अत्युच्च तत्त्वज्ञान केवळ दृष्टांतांच्या साहाय्यानें कसें मांडावें याचा आदर्श म्हणून या ग्रंथाकडे बोट दाखवितां येईल.

---

१ " अनारतगलद्रूपं नित्यंच **अनुभवामृतम्** " (योगवासिष्ठ ६–१०–७१) योगवासिष्ठांतील या वचनावरून ज्ञानेशांना या ग्रंथाचें ' अनुभवामृत ' हें नांव सुचलें असावें.

शांकर वेदांतांतील मायेच्या[१] कल्पनेचा निरास करून जीव, जगत्, परमात्मा सर्व कांहीं एकच वस्तु आहे. ती निखळ ज्ञानस्वरूप आहे. (जग असकीं वस्तुप्रभा ॥ प्र. ७–२८९) हा पूर्णाद्वैताचा सिद्धान्त ' एवं दशोपनिषदें । पुढारा न ढाळती पदें ॥ ' अशा आत्मविश्वासानें ज्ञानेश्वरांनीं या ग्रंथामध्यें सांगितला आहे. त्या दृष्टीनें यांतील सातवें ' अज्ञान खंडन ' हें प्रकरण महत्त्वाचें आहे. माया न मानतांहि मूलतत्त्व व जगत् यांचा अतूट संबंध कसा समजून घ्यावयाचा, हें ' शिवशक्ति–समावेशन ' नांवाच्या पहिल्या प्रकरणांत शिवशक्तिमधील पतिपत्नी संबंधाचें भावपूर्ण व कल्पनारम्य असें वर्णन करून ज्ञानेश्वरांनीं उत्कृष्टपणें दाखवून दिलें आहे. सांख्याचें प्रकृति-पुरुष, वेदांत्यांचें ब्रम्ह -माया यापेक्षां ज्ञानेश्वरांचें शिव-शक्ति हें जोडपें वेगळें आहे. त्या दोहोंमध्यें कनक–कांती, गूळ–गोडी, दीप–दीप्ति असें अभिन्नत्व वा एकरूपत्व राहूनहि त्या दोहोंच्या विलासाच्या (क्रीडेच्या) रूपानें जग संभवतें; असें ज्ञानेश्वर मानतात[२]. हाच निकराचा अद्वैतानुभव निरनिराळ्या प्रकारें सांगण्याचा प्रयत्न इतर प्रकरणांतहि ज्ञानेशांनीं केला आहे; या दृष्टीनें सद्गुरुस्तवन (प्र. २) व सच्चिदानंदपदत्रय–निरूपण (प्र. ५) हीं दोन प्रकरणें उल्लेखनीय आहेत. अद्वैताचा अनुभव घेणाऱ्या सिद्ध पुरुषाच्या मनोभूमिकेचें उत्कृष्ट वर्णन या ग्रंथांतील ' सिद्धरहणी–कथन ' (प्र. ९) या प्रकरणांत पहायला सांपडते. याच अद्वैतनिष्ठ भूमिकेनें ज्ञानेश्वर हा ग्रंथ लिहित आहेत, ही गोष्ट ' आम्ही बोलिलो जे काई । तें प्रकटचि असें ठायीं ।

---

१ ' ज्ञानेश्वरांचें तत्त्वज्ञान ' या ग्रंथाचे लेखक डॉ. शं. दा. पेंडसे यांचें मत ज्ञानेश्वर शांकरमताचाच अनुवाद करतात असें आहे; पण—

२ ' The Philosophy of Jnanadeva ' (श्री. भा. पं. बहिरट एम्. ए.) या ग्रंथांत अमृतानुभवांतील ज्ञानेशांच्या स्वतंत्र तत्त्वज्ञानाचें प्रतिपादन केलें आहे.

मा स्वयंप्रकाशा काई। प्रकाशावें बोले॥ प्र. १०–८.' या ओवीवरून स्पष्ट होते. याच दृष्टीनें 'सिद्धानुवाद' असेंहि नांव ते स्वतः या ग्रंथाला देतात. स्वयंसिद्ध किंवा प्रकट असलेल्या आत्मवस्तूचें दर्शन या अनुभवामृता–च्या निमित्तानें आपण जगाला घडवित आहोंत अशी त्यांची श्रद्धा आहे. म्हणून शेवटीं ते म्हणतात.... 'अनुभवामृतें येणें। सणु भोगिजे सणें। विश्वाचेनि॥ (प्र. १०–३१).

'शुद्ध रसायनाच्या स्वरूपाचा' असा हा तात्त्विक ग्रंथ असल्यानें विद्वानांनाहि अमृत नुभव प्रिय झालेला दिसतो. यावर अनेक टीका[१] लिहिल्या गेल्या आहेत. त्यामध्यें शिवकल्याणांची 'नित्यानंदैक्यदीपिका' ही टीका ज्ञानेशांचें हृदगत् उकलून दाखविणारी म्हणून विशेष प्रसिद्ध आहे. या ग्रंथाचें संस्कृतांतहि[२] समश्लोकी भाषांतर झालें आहे. तसेंच अनेकांनीं या ग्रंथाचें सटीक संपादन केलें आहे.

चांगदेवपासष्टी हें ६५ ओव्यांचें लहानसें प्रकरण म्हणजे अमृतानुभवाचें सारच होय. अमृतानुभवांतील तात्त्विक विचारच अधिक सूत्रबद्धपणें येथें मांडले आहेत. योगीराज चांगावटेश्वरांच्या कोऱ्या पत्राला उत्तर म्हणून धाडलेल्या या प्रकरणांत चिद्विलासाच्या भूमिकेनेंच अद्वैताचा बोध केला आहे. ज्ञानेश्वरांच्या सर्वच ग्रंथांत अद्वैतानुभवाचें आणि भक्तिप्रेमाचें एकच सूत्र अनुस्यूत आहे. फक्त अमृतानुभव व चांगदेवपासष्टी यांत ज्ञानेश्वरीच्या मानानें काव्याचा भाग कमी आहे.

---

१ अमृतानुभवाच्या प्रारंभीं नमनाचे पांच संस्कृत श्लोक आहेत. त्यावरील एकनाथांची टीका उपलब्ध आहे. त्यावरून नाथांनींहि यावर संपूर्ण टीका लिहिली असावी, असा तर्क आहे. पण ती आज उपलब्ध नाहीं.

२ प्रल्हाद बडवे यांनीं इ. स. १६९८ त याचें संस्कृतांत भाषांतर केलें आहे.

पण काव्यापेक्षां एका हटयोग्याला एका ज्ञानयोग्यानें धाडलें अध्यात्म–बोधपर असें पत्र, म्हणून या प्रकरणाचें महत्त्व विशेष आहे. योगविद्या व आत्मविद्या यांच्या झगडयांत ज्ञानेशांची आत्मविद्या श्रेष्ठ ठरली, असा या प्रकरणाचा निष्कर्ष होय.

ज्ञानेश्वरांची **स्फुट अभंग**–रचना पंढरीच्या संतमेळयाशीं संबंध आल्यावर व पुढें नामदेवांबरोबरच्या तीर्थयात्रेच्या काळांत झाली असावी. आज उपलब्ध असलेल्या गाथेंत ७६५ अभंग आहेत. कांहींच्या शेवटीं ज्ञानेश्वर 'बापरखुमादेवीवरु' असा आपला उल्लेख करितात. बरेच अभंग कृष्णलीला वर्णन करणारे आहेत. प्रपंचाच्या भाषेंतून परमार्थ सांगणारे वासुदेव, पाईक, कापडी, अंबुला, आंधळा यांच्यासंबंधींचे रूपकात्मक अभंग आणि विरहिणीचे अभंग हे गाथेंतील स्वतंत्र व उल्लेखनीय विभाग होत. हरिपाठाचे अभंग म्हणजे वारकऱ्यांची नित्यपाठाची संध्याच म्हटली जाते. सामान्य लोकांना ईश्वरनिष्ठेचा, नामभक्तीचा, अद्वैतबोधाचा व सदा–चरणाचा उपदेश करण्याच्या दृष्टीनेंच साऱ्या अभंगांची रचना झाली आहे.

ज्ञानेशांच्या टीकापद्धतीप्रमाणेंच त्यांची काव्यदृष्टीहि स्वतंत्र आहे. गीताटीकेंत रसनिर्मितीला विशेष वाव नसतांहि ज्ञानेशांची कविवृत्ति व भावार्थदृष्टि यांमुळें ठिकठिकाणीं रसांचे कल्लोळ अनुभवास येतात (देशियेचे सुखासनीं । मिरवले रस ॥). ज्ञानेश्वरींतील शांत, भक्ति आणि वत्सल ही रसत्रिपुटी रूढ काव्यशास्त्राच्या अष्टरसांहून वेगळी आहे. 'जे शृंगारा–चिया माथां । पाय ठेवी ॥' असा शांत रस हा ज्ञानेश्वरीचा मुख्य गाभा होय. ज्ञानेश्वरीचें अंतरंग भक्ति, शांत आणि वत्सल रसात्मक असून तिचा बाह्य साज उदात्त रसाचा आहे. 'श्रवणांमाजीं आयता मोक्ष' आणून देणारें किंवा 'बोलीं अरूपाचें रूप' दाखविणारें वाक्–

ज्ञानेश्वरींतील काव्य

चातुर्य हें ज्ञानेश्वरीचें बाह्य वैभव आहे. निसर्गातील आकाश, सागर, सूर्य यांसारख्या भव्य वस्तूंच्या उपमा-दृष्टान्तांनीं 'उदात्त' रसाची सजावट ज्ञानेश्वरीला लाभली आहे.

ज्ञानेशांनीं रेखाटलेलीं कृष्णार्जुनांचीं, देवभक्तांचीं व्यक्तिचित्रें मोठी परिणामकारक आहेत. कृष्णाच्या भूमिकेशीं समरस होऊनच ज्ञानेश्वर त्याचें हृद्गत मोठ्या आस्थेनें व तळमळीनें सांगत आहेत. 'भावार्थदीपिका' हें रूढ झालेलें नांव म्हणूनच सार्थ वाटतें. हळुवार, कोमल, धीरोदात्त व कारुण्यपूर्ण असें ज्ञानेशाचें स्वत:चें व्यक्तित्वच मुळांत काव्यमय आहे. जें चिद्विलासाचें तत्त्वज्ञान ते सांगत आहेत; तेंहि भव्य, उदात्त आणि सहानुभवी असें असल्यानें स्वत:सिद्ध काव्यच आहे. आणि ज्या शूद्रातिशूद्रांना तें सांगितलें जात आहे, त्या सामान्य लोकांबद्दल ज्ञानेशांच्या ठिकाणीं अपरंपार कळवळा आहे. या सर्व गोष्टींमुळें ज्ञानेश्वरीला काव्यत्व प्राप्त झालें आहे; आणि ज्ञानेश्वरांच्या प्रत्येक ओंवीओंवींत कवीचें व्यक्तित्व प्रकट झालें आहे.

अर्थगौरव, पदलालित्य व उपमाचातुर्य या तिहींचा मिलाफ ज्ञानेश्वरीच्या भाषेमध्यें झाला आहे. 'समुद्राहून सखोल व अर्थभरित असे हे मऱ्हाठे बोल' (अ. ४-२१३) असल्याचा दावा ज्ञानेश्वरीवाणीनें खरा करून दाखविला आहे. वेंचक शद्बांत विपुल अर्थ व्यक्त करण्याची ज्ञानेशांची हातोटी विलक्षण आहे. 'अर्थ बोलाची वाट न पाहे । तेथ अभिप्रायी अभिप्रायातेचि विये ॥' (अ. ९-२७) हेंच खरें. अर्थसंपन्नते-बरोबरच शद्बाच्या नादगुणाकडे, रंगरूपाकडे लक्ष देऊनच एकेक शद्ब ज्ञानेशांनीं निवडला आहे. लालित्याचे सर्व गुणविशेष त्यांच्या शद्बांमध्यें दृग्गोचर होतात. त्यांच्या वाणींत लोकोत्तर प्रेमळपणा व नादमाधुर्य भरलें आहे. संस्कृत शद्बांच्या यथायोग्य उपयोगामुळें ज्ञानेशांच्या भाषेला

प्रौढता व भारदस्तपणा आला आहे खरा; पण शद्बांतील विलक्षण मार्दवामुळेंच त्यांची रचना अत्यंत हृदयंगम झाली आहे. सौकुमार्य व कांतिमत्त्व या गुणांमुळें त्यांचा प्रत्येक शद्ब एखाद्या टपोऱ्या मोत्याप्रमाणें किंवा प्रफुल्ल कुसुमाप्रमाणें पाहाणाराला प्रसन्नवदन केल्याखेरीज रहात नाहीं. सरस व समर्पक उपमादृष्टान्त देण्यांत ज्ञानेशांची बरोबरी कोणीहि करूं शकणार नाहीं. तत्त्वज्ञानाच्या परिभाषेंतील किंवा काव्य-संकेतांतील ठराविक उपमानें घेऊन त्यांची अभिनव योजना करण्यांत ज्ञानेश्वर कुशल आहेत. इतकेंच नव्हे तर, स्वतःच्या नाविन्यपूर्ण उपमादृष्टान्तांनीं ते आपली कल्पकताही सिद्ध करतात. मालोपमा, उत्प्रेक्षा सांगरूपकें, दृष्टांत आणि व्यतिरेक इत्यादि ठळक अलंकारातूनच ज्ञानेशांचा कल्पनाविलास व्यक्त होतो. त्यांच्या अलंकारयोजनेंत अलंकारांचे प्रकार कमी असले तरी विषयाची विविधता पुष्कळ आहे. यच्चयावत् चराचर सृष्टि, लौकिक आचार, सामाजिक समजुती व नानाविध संकेत हीं सर्व या कामीं ज्ञानेशांनीं उपयोगिलेली दिसतात. म्हणून त्यांच्या अलंकारसृष्टीचें महत्व समाजशास्त्रदृष्टचाहि फार आहे. एका दृष्टान्तानें ज्ञानेश्वर लौकिक सृष्टींतील एखादें चित्र डोळ्यांपुढें उभें करतात. या सामर्थ्यामुळेंच त्यांची अलंकारसृष्टि तत्कालीन समाजस्थितीच्या दृष्टीनें मोठी बोलकी झाली आहे. यादवकालीन परिस्थितीचें सर्वांगीण चित्र ज्ञानेश्वरींतील अलंकारांच्या पारदर्शक आरशांतून स्पष्ट पाहातां येतें. ज्ञानेशांच्या ओंवीची घडण तर अगदीं घोटीव आणि सुटसुटीत आहे त्यांच्या बांधेसूद नि आटोपशीर ओंवीला शेवटल्या तोकड्या चरणामुळें ठसकेदारपणा आला आहे यमकानुप्रासाच्या उपयोगानें आपल्या अर्थपूर्ण ओंवीला त्यांनीं नादमधुर बनविलें आहे. त्यामुळेंच ' वोविया होती लेणें । साहित्याशीं ॥' ही ज्ञानेशांची प्रतिज्ञा सिद्धीस गेली आहे. ' महाबोधीं कोंवळिक दुणावली ।' आणि ' शद्बश्री सच्छास्त्रिक झाली ।' या शद्बांत ज्ञानेशांनीं महाभारताचा

गौरव केला आहे. तेच शब्द त्यांच्या भावार्थदीपिकेलाहि यथार्थतेनें लागू पडतात.

ज्ञानेश्वरांनीं महाराष्ट्रांत ‘ ब्रम्हविद्येचा सुकाळ ’ केला तर नामदेवांमुळें ‘ हरिनामाचा सुकाळ ’ झाला. ज्ञानेश्वरांचें अलौकिक व्यक्तित्व तत्कालीन सामान्य लोकांपुढें एखाद्या उच्च आदर्शाप्रमाणें झळाळत होतें; तर नामदेवांचें जीवन सामान्यांसारखेंच सांसारिक आपदांनीं व व्यावहारिक झगड्यांनीं भरलेलें असल्यानें त्यांनीं करून घेतलेला आध्यात्मिक विकास सामान्यांना त्यांच्या आंवाक्यांतील वाटावा, असा अनुकरणीय होता. ज्ञानेश्वर हे ध्येयस्वरूप सिद्ध पुरुष ठरले, तर नामदेव त्या ध्येय–मार्गानें जाऊं इच्छिणारांचे पहिले वाटाडे बनले. ज्ञानेश्वरांप्रमाणें असामान्यत्वाचें वा अलौकिकत्वाचें वलय नामदेवांच्या [1]चरित्राभोंवतीं किंवा व्यक्तित्वाभोंवतीं नसल्यानें त्यांच्या साहित्याभोंवतींहि तें निर्माण झालें नाहीं.

भक्तराज नामदेव

ज्ञानेश्वरांचे समकालीन नामदेव[2] (इ. १२७०–१३५०) हे दामाशेटा शिंप्याचे चिरंजीव लहानपणापासूनच पंढरीच्या विठ्ठलाचे

---

१ तरुणपणच्या दरवडेखोरीचें एक रम्याद्भुत प्रकरण नामदेवांच्या चरित्राला चिकटविलें जातें. (श्री. आजगांवकर, श्री. वि. ल भावे) पण तें नामाकृत नामदेव चरित्रांतील प्रक्षिप्त अभंगाच्या आधारें. महाराष्ट्रांत अनेक नामदेव होऊन गेले आहेत. नामसादृश्यानें एकाच्या चरित्रांतील कांहीं प्रसंग दुसऱ्याच्या नांवावर लादले जाणें अगदीं शक्य असतें; तसेंच येथें झालें असावें.

२ नामा शिंपी, विष्णुदासनामा, केशिराज नामा, नामा पाठक, मानभावी नामदेव अशी नांवें असलेले अनेक नामदेव जुन्या मराठी वाङमयांत आढळतात. त्यामुळें नामदेव चरित्र व त्यांचें कवित्व हा संशोधकांचा अभ्यास–विषयच होऊन राहिला आहे.

एकांतिक भक्त होते. ज्ञानदेवांच्या सान्निध्यांत आल्यावर (इ. स. १२९१ नंतर) मूळच्या भावभक्तीला तत्त्वजिज्ञासेची जोड लाभून आत्मोद्धाराची तळमळ त्यांच्या ठिकाणीं निर्माण झाली. संतमेळाव्यांत गोरोबाकाकांनीं केलेल्या परीक्षेंत नामदेव 'कोरे' ठरले. (बोलोनियां येणें वाढविला डांगोरा। 'अंतरीचा कोरा' गुरुवीण ॥) याचा अर्थ हाच कीं, नामदेवांच्या भक्तीला प्रथम अद्वैतबोधाचें अधिष्ठान नव्हतें. विसोबा खेचरांकडून गुरुपदेश मिळाल्यावरच त्यांच्या सगुणोपासनेला अद्वैताचा डोळसपणा आला, त्यांच्या जीवननिष्ठेला चिद्विलासवादाच्या भूमिकेनें खरें स्थैर्य प्राप्त झालें. ज्ञानेश्वरांसमवेत केलेल्या तीर्थयात्रेची हकीकत स्वत: नामदेवांनींच 'तीर्थावळी' प्रकरणांत लिहून ठेवली आहे. त्यावरून या काळांतच नामदेवांना आपल्या जीवितकार्याची ओळख झाली आणि नामदेवांसारखा वैष्णववीर आपल्या अद्वैतनिष्ठ भक्तिमार्गाचा प्रभावी प्रचारक होईल; अशी खात्री ज्ञानेश्वरांना पटली. म्हणूनच जणूं कांहीं वारकरी पंथाच्या प्रसाराचें आपलें कार्य नामदेवांवर[1] सोंपवून ज्ञानेश्वर समाधिस्थ झाले.

नामदेवांचें कर्तृत्व

भक्तीची साधना करतां करतां आत्माविष्काराचें साधन म्हणून नामदेवांनीं अभंगरचना सुरू केली. इतरांना भगवत्प्रेमाची व नामभक्तीची दीक्षा सहजपणें देतां यावी, म्हणून हरिकीर्तनाची-नामसंकीर्तनाची नवी प्रथा त्यांनीं रूढ केली. ज्ञानेशांच्या समाधीनंतर यादवांची सत्ता संपुष्टांत येऊन परधर्मियांची राजवट महाराष्ट्रांत सुरू झाली. "स्वातंत्र्य गेलें, पुरातन हिंदु राज्यें बुडालीं, धर्मावर गंडांतर आलें, संपत्ति उत्तरेकडे चालली, दैन्य, दारिद्र्य, दुष्काळ

---

१ ज्ञानदेवांच्यानंतर नामदेव ५४ वर्षे हयात होते. (इ. स. १२९६ –१३५०). त्या काळांत पंथप्रसाराची बरीच कामगिरी त्यांनीं केली.

यांनीं सारा दक्षिणदेश व्यापला[1]." नामदेवांच्या संतमंडळांतील ज्येष्ठ संत एकामागोमाग एक असे कालवश झाले. अशा परिस्थितींतहि ज्ञानेश्वरांच्या शिकवणुकीचा कीर्तनद्वारां प्रचार करण्याच्या कार्यांत नामदेवांनीं खंड पडूं दिला नाहीं. 'नाचूं कीर्तनाचे रंगीं। ज्ञानदीप लावूं जगीं॥' अशा भूमिकेनें त्यांनीं आपलें कार्य चालूच ठेविलें. इतकेंच नव्हे तर, गुजराथ[2], उत्तरप्रांत, पंजाब या भागांतहि दुसऱ्यांदां संचार करून त्यांनीं उत्तरेकडच्या लोकांना महाराष्ट्राचा भक्तिमार्ग परिचित करून दिला. त्या वेळीं त्यांनीं हिंदी व गुरुमुखी (पंजाबी) भाषांत काव्यरचना केली. 'नामदेवकी मुखबानी' म्हणून नामदेवांचीं शंभरावर पदें शीखांच्या 'नानकसाहेब' ग्रंथांत आहेत. नरसी मेहता, नाभाजी या परप्रांतीय भक्तांनीं नामदेवांचें चरित्र वर्णिलें आहे. अशा रीतीनें भागवतधर्माचा प्रसार करीत असतांच नामदेव इ स. १३५० मध्यें पंढरपूर मुक्कामीं विठ्ठलस्वरूपीं विलीन झाले[3].

एकांतिक वृत्तीचे सगुणोपासक किंवा पंढरीयाचे 'प्रेम भांडारी' म्हणून नामदेव ओळखले जातात. ज्ञानमार्ग, योगमार्ग इत्यादि साधन-संभाराच्या खटाटोपांत नामदेव पडले नाहींत. 'प्रेमसुखगोडी' चा आस्वाद घेणें व देणें हीच त्यांची वृत्ति. आपल्या साऱ्या कुटुंबाला त्यांनीं विठ्ठलभक्तीचा छंद लाविला. इतकेंच नव्हे तर परिसा भागवता-सारखा ब्राह्मण शेजारी व जनाबाईसारखी कुणबी (शूद्र) मोलकरीण यांच्यावरहि नामदेवाच्या भक्तियोगाची मोहिनी पडल्याखेरीज राहिली नाहीं.

---

१ मराठी वाङमयाचा इतिहास, खंड २, पान ६१ (ल. रा.पांगारकर)
२ पुढील शतकांतील मीराबाई (इ. स. १४०३-१४७०) व नरसी मेहता (इ. स. १४१५-१४८१) या गुर्जर भक्तकवींनीं व कबिरानेंहि नामदेवांचा आदरानें उल्लेख केलेला आढळतो.
३ पंढरींतील विठ्ठल मंदिराच्या महाद्वाराशीं नामदेवांची समाधि आहे. तिला 'नामदेवाची पायरी' असें म्हणतात.

वारकरी संप्रदायाचे आद्य व प्रभावी प्रचारक नामदेवच होत. पंढरीचें माहात्म्य व ज्ञानेश्वरादि संतमंडळी यांचें वैभव नामदेवांनींच वाढविलें. त्यांच्या अभंगवाणीनें खेड्यापाड्यांतून आत्माविष्काराची ऊर्मि निर्माण केली स्वतःच्या घरांत, स्वतःच्या प्रांतांत, इतकेंच नव्हे तर पुढें उत्तरेकडील प्रांतांत थेट पंजाबपर्यंत पंढरीच्या विठ्ठलाची कीर्ति केवळ नामसंकीर्तनाच्या बळावरच त्यांनीं दुमदुमविली. सर्वांना सुलभ असा हा नामस्मरणाचा मार्ग त्यांनीं दाखवला. प्रचाराचें हें जें नवें तंत्र त्यांनीं स्वीकारलें, त्यामुळें वारकरी पद्धतीच्या कीर्तन-संप्रदायाचे संस्थापक व अभंगवाणीचे प्रवर्तक नामदेवच ठरतात.

नामदेवांनीं ज्ञानेश्वरादि भावंडांचें चरित्र आदि, तीर्थावळि व समाधि या तीन ओंवीबद्ध प्रकरणांत ग्रथित केलें आहे. ज्ञानेश्वरांचे पहिले अधिकृत चरित्रकार नामदेवच होत. या चरित्राची धाटणी पौराणिक थाटाची असली तरी प्रत्यक्षावलोकनाचा आधार या माहितीला असल्यानें त्याचें ऐतिहासिक महत्व मोठें आहे. ज्ञानेश्वरांबद्दल नामदेवांच्या ठिकाणीं पराकाष्ठेची पूज्यबुद्धि असल्यानें हें निवेदन अत्यंत रसाळ उतरलें आहे. या प्रकरणांत व कांहीं अभंगांत नामदेवांनीं आत्मचरित्रहि निवेदन केलें आहे. तेव्हां प्राचीन मराठी वाङमयांत पहिल्या आत्मचरित्रकाराचा मान बहुधा नामदेवांनाच द्यावा लागेल.

नामदेवांचें कवित्व

नामदेवांच्या अभंगांतून त्यांच्या त्या त्या वेळच्या प्रबळ अशा मनोवृत्तींचा स्वाभाविक आविष्कार झाला आहे. या अभंगवाणींत विठ्ठलप्रीतीची आर्तता आणि उत्कटता दिसून येतें. शद्बाशद्बांत आत्म-समर्पणाची असीम ओढ व्यक्त होते. त्यांच्या करुणापर अभंगांत गतजीवनाबद्दलचा तीव्र अनुताप आणि आत्मविकासाची अनिवार उत्कंठा आढळते. भगवत्प्रेमाच्या विविध छटा निरनिराळ्या भूमिकांद्वारें सहजतेनें

साकार करण्याची त्यांची हातोटी विलक्षण आहे. त्या दृष्टीनें कारुण्य आणि वात्सल्य, औत्सुक्य आणि औदास्य, इत्यादि विविध भाव व्यक्त करणारे विठ्ठलाबरोबरच्या सुखसंवादाचे त्यांचे अभंग उत्कृष्ट आहेत. नामदेवांचे कांहीं अभंग उपदेशपरहि आहेत. भक्तिमार्गाशीं विरोधी असलेल्यांबद्दल ते तिटकारा दाखवितात. इतर सांप्रदायिकांच्या खोटेपणाचा ते धिक्काररहि करतात; पण त्यांत कोठेंहि वृत्तीचा कडवटपणा किंवा शद्बांचा तिखटपणा आढळत नाहीं. नामदेवांच्या कवितेंत कल्पनेच्या उत्तुंग भराऱ्या नाहींत; मात्र भावजीवनाच्या प्रत्येक लहरीबरोबर खालींवर हेलकावे खाण्यांत ते नेहमींच रंगून जातात.[1] त्यांच्या भावकोमल आणि भावमधुर अशा आत्मनिष्ठ काव्यामुळें मराठी साहित्यांत भावकवितेचें नवें दालन उघडलें जाऊन महाराष्ट्र शारदेला भावसंपन्नतेचें अलौकिक ऐश्वर्य लाभलें.

संतमेळयाची अभंगवाणी

नामदेवांचें उज्ज्वल उदाहरण डोळ्यांपुढें ठेवून संतमेळयांतील इतर भगवद्भक्तांनीं शेंकडों अभंगांच्या रूपानें आपल्या अन्त:करणाची तळमळ बोलून दाखविली; आपल्या नव्या आध्यात्मिक अनुभवांची परिस्फुटता केली, आणि प्रत्यहीं उचंबळून येणाऱ्या भावनांना वाट करून दिली. गोरा कुंभार, सांवता-माळी जगमित्र नागा, नरहरी सोनार, चोखामेळा व जनाबाई या साऱ्यांचे अभंग म्हणजे एकाच कल्पनेनें भारलेल्या, एकाच अनुभूतीनें हरखलेल्या भक्तांचे ते प्रेमळ सुखसंवाद[1] होत. त्यांत कल्पनेच्या भराऱ्या, रचनेची खटपट वा शब्दांची कसरत, वगैरे कांहींहि नाहीं. मात्र आत्मतृप्त झालेल्यांच्या उच्चतर अशा नव्या

---

१ 'संतवाङमयाची सामाजिक फलश्रुति'-पान ९५-९६ (प्रा. गं. बा. सरदार).

अनुभवाच्या आविष्काराचा उन्माद प्रत्येक शब्दांत भरलेला आहे. या संतमेळाव्याच्या आत्मनिष्ठ वाङमयांतहि आध्यात्मिक योग्यतेनुरूप व सामाजिक दर्जानुसार कांहीं वेगळेपणा दिसून येतोच. **निवृत्ति-नाथांच्या**[1] अभंगांत योगानुभव, अद्वैतबोध व बालकृष्णभक्ति या विषयांचें आधिक्य आहे; तर **सोपानदेवांच्या**[2] अभंगांत नामभक्तीचा उद्घोष आहे. या दोघां भावंडांच्या नांवांवर निवृत्तिदेवी, सोपानदेवी, हरिपाठ इत्यादि रचना आहेच; पण ती अनुपलब्ध आहे. या संतमंडळांत **मुक्ताईची**[3] योग्यता सर्वच दृष्टीनें मोठी आहे. ती चांगदेवासारख्या योग्याची गुरु होती. त्यावरून तिचा आध्यात्मिक अधिकार स्पष्ट होतो. तिच्या कांहीं अभंगांना योगाच्या परिभाषेमुळें गूढता आली आहे. ' ताटीच्या अभंगां ' मध्यें तिची अद्वैताची ठाम भूमिका, संतपणाबद्दलची निश्चित कल्पना, ज्ञानेश्वरांबद्दलचा प्रेमभाव आणि त्यांना कार्यरत करण्याची तिची तळमळ या गोष्टी दिसून येतात. **चांगदेवांनीं**[4] योग-रहस्य सांगणारा ' तत्त्वसार ' (इ. स. १३१२) नांवांचा ग्रंथ लिहिला आहे. त्यांच्या अभंगांतहि योगानुभवाचा भाग विशेष आहे. **विसोबा खेचर**[5] सराफ व **गोरोबा कुंभार**[6] यांच्या अभंगांत अनुभूतीचा कस असला तरी रसवत्तेचा अभाव आहे.

---

१ जन्म-इ. स. १२६८. मृत्यु-इ. स. १२९७. समाधिस्थळ-त्र्यंबकेश्वर.
२ जन्म-१२७४. मृत्यु-१२९६. समाधिस्थळ-सासवडला कऱ्हानदीकांठीं.
३ जन्म-१२७७. मृत्यु-१२९७. समाधिस्थळ-तापीकांठीं मेहुणगांव.
४ समाधिकाल-इ. स. १३२५.
५ मुंगी पैठणचे राहणारे. नामदेवांचे गुरु. बार्शी येथें समाधिस्थ १३०९
६ तेरेढोकीचा राहणार (जन्म-इ. स. १२६७. मृत्यु-१३०९).

नामदेव-कुटुंबांतील मंडळींच्या रचनेवर नामदेवांच्या अभंगवाणीचा स्पष्ट सा उमटलेला दिसतो. काव्यदृष्टया **जनाबाईचे** अभंग भावपूर्ण व सरस आहेत. तिच्या अभंगांचें वळण नामदेवांसारखें असलें तरी, आत्मनिष्ठेचा ओलावा, अद्वैतबोधाची सोज्वळता, आणि भक्तिसुखाची माधुरी हे तिच्या वाणीचे विशेष होत. पौराणिक आख्यानें हा तिच्या अभंगांचा एक भाग असून इतर अभंगांतहि पौराणिक संदर्भ वारंवार येतात. **चोखयाच्या**[1] अभंगवाणींत भक्तीच्या जिव्हाळ्याबरोबर सामाजिक अन्यायाची बोंच आहे. त्यामुळें विठ्ठलाच्या नाममाहात्म्याबरोबर सोंवळ्याओवळ्याचे उद्वेगजनक उल्लेख पुन:पुन्हां आले आहेत. **सांवतामाळयाची**[2] वाणी प्रेमळ आणि समाधानी आहे. ' कांदा मुळा भाजी । अवघी विठाई माझी ॥' अशा उद्‌गारांत त्यांच्या शेतीव्यवसायाचा ठसा स्पष्ट उमटला आहे गोरोबा कुंभार, **नरहरी सोनार**, (मृत्यु इ स. १३१३) बंका महार (मृत्यु इ. स. १३१९) **सेना न्हावी**, (मृत्यु इ. स. १४४८,-पुढील शतकांतील भक्तकवि) इत्यादि संतांनीं आपल्या अभंगांतून त्यांच्या त्यांच्या पेशाची परिभाषा वापरलेली दिसून येते. या सर्व संतमंडळींच्या अभंगांचे विषय तेच तेच-पंढरीमाहात्म्य, विठ्ठलमाहात्म्य, नाममाहात्म्य, संतमाहात्म्य-असे सांप्रदायिक स्वरूपाचे असले तरी, प्रत्येकाचें वैशिष्टय मधून मधून व्यक्त झाल्याखेरीज राहत नाहीं. 'या सर्व वैष्णववीरांनीं प्रेमभक्तिपर, वैराग्यपूर्ण परमार्थसंपन्न, तसेंच संतचरित्रात्मक अशा स्वरूपाचें साधें हृदयंगम अभंग वाङ्मय निर्माण करून सामान्य जनांची प्रवृत्ति ग्राम्य शृंगार व विषयविलास यांपासून ईश्वरविषयक भोळया भावाकडे वळविली आणि लोकप्रिय मराठी पद्यवाङ्मयालाहि एक चांगलें वळण लावून दिलें.'[3]

---

१ मंगळवेढयाचा महार. (मृत्यु-इ. स. १३३८.) समाधि पंढरपूरला-नामदेवांच्या पायरी समोर, चौऱ्यांऐंशींच्या शिलालेखाच्या तळाशीं.

२ इ. स. १२५०-१२९५. अरणगांवचा राहणार.

३ मराठी भाषेचा व वाङ्मयाचा इतिहास-पान ११५ (वा. अ. भिडे).

— प्रथम खंडाचा समारोप —

इ. स. १०५० ते १३५० हा मराठी वाङ्मयेतिहासाचा प्रारंभ-खंड होय. नाथपंथियांनीं घालून दिलेल्या मार्गानें जाणाऱ्या महानुभाव–वारकरी पंथियांच्या धार्मिक कामगिरीनें व सामुदायिक कर्तृत्वानें महाराष्ट्रीय समाजांतील सर्व थरांत जागृतीची–प्रबोधनाची एक लाट उसळली. त्या लाटेचे सादपडसाद या कालअखेरपर्यंतच्या वाङ्मयांत ऐकूं येतात. त्या त्या पंथियांच्या आचार--विचारांत व तत्त्वनिरूपणांत त्याचें प्रत्यंतर येतें. पण यानंतर बहामनी राज्यस्थापनेच्या (इ. स. १३४७) सुमारासच महाराष्ट्रांतील लोकजागृतीची ही पहिली लाट ओसरली. नागदेवाचार्य व नामदेव यांच्या मृत्यूनंतर तिची कांहींशी पिछेहाटच झाली. म्हणून लोकजागृतीच्या प्रेरणेनें निर्माण होत गेलेल्या **मराठी साहित्याचें पहिलें पर्व या ठिकाणीं संपलें**, असेंच म्हटलें पाहिजे.

अकराव्यापासून चौदाव्या शतकापर्यंतचा कालखंड हा सामान्यतः सर्वच देशी भाषांच्या उत्कर्षाचा काल होय. याच कालांत प्रथम निर-निराळ्या प्रादेशिक लोकसमूहांमध्यें एकभाषिकत्वाची जाणीव निर्माण होऊन तत्संबंधींचा अभिमान जागा झालेला दिसतो. महानुभाव–वारकरी यांच्या साहित्यांत पुनःपुन्हां येणारी देशी भाषेच्या माध्यमाची (मराठीची) तरफदारी ही या प्रादेशिक अभिमानाचीच द्योतक होय. "महंतें महाराष्ट्रीं असावें : महाराष्ट्र सात्त्विक असे :" या शब्दांत चक्रधरांनीं महाराष्ट्राबद्दलचा अभिमान व्यक्त केला आहे. "एणें माझिया स्वामीचा सामान्य परिवारू नागवैल कीं ?" हें कारण पुढें करून 'संस्कृतांत ग्रंथरचना न करतां मराठींतच कर' असा आदेश नागदेवाचार्य केशवराजसूरीला देतात. इकडे ज्ञानेश्वर तर 'माझा मराठाचि बोल निका ।' किंवा 'अमृतातेंहि चुकी ठेवी । गोडीसपणें ॥' या शब्दांत मराठीचा महिमा गातात. तेव्हां भाषिक

व प्रादेशिक अभिमानाची जाणीव करून देणारें, यांच अर्थानें चक्रधर-ज्ञानेश्वर यांना महाराष्ट्रीय संस्कृतीचा पाया घालणारे, असें म्हणावयाचें. महाराष्ट्रीय संस्कृतीची प्रादेशिकतेच्या पायावर उभारणी होऊन तिच्या भाषिक आविष्काराला मराठी साहित्यिकांकडून सुरुवात झाली, हाच या कालाचा मोठा विशेष होय.

या कालखंडांतील महानुभाव व वारकरी* या दोन पंथियांची धार्मिक जागृतीची व वाङमयनिर्मितीची प्रेरणा, दिशा आणि तळमळ एकच स्वरूपाची असूनहि महानुभाव पंथ तितका प्रभावी झाला नाहीं.

दोन संप्रदायांच्या यशापयशाची मीमांसा

तसें पाहातां महानुभाव पंथाला निष्ठावान् व ज्ञानसंपन्न असे अनुयायी प्रारंभापासूनच लाभले होते. पंथाच्या प्रस्थापकांनीं योग्य दिशेनें पाऊलहि उचललें होतें. परंतु एकांतिक निवृत्तिवाद व बिकट आचारधर्म यांमुळें या पंथाला पुढें पुढें सामान्य लोकांचा पाठिंबा मिळेनासा झाला. वैदिकांचा कर्मठपणा व भोगलोलुपता यांना विरोध करण्याच्या भरांत हा पंथ संन्यासवादाच्या व जीवनपराङमुखतेच्या दुसऱ्या टोंकाला गेला. आत्यंतिक प्रतिक्रियेचा हा धोका ज्ञानेश्वरादिकांनीं कटाक्षानें टाळला. प्रपंचांत राहून परमार्थसिद्धि कशी करतां येईल याचा मार्ग वारकरी संतांनीं स्वतःच्या आचरणानें लोकांना दाखवून दिला. (आतां गृहादिक आघवें । तें कांहीं नलगे त्यजावें ॥). तसेंच महानुभावांच्या प्रमाणें आपल्या पंथाचें प्रवक्तेपण केवळ पंडितवर्गाच्या हातीं त्यांनीं ठेविलें नाहीं. तर समाजाच्या निरनिराळ्या थरांत पंथाचे पुढारी-पंथाचें कार्यकर्ते तयार झाले. वारकरी पंथांत ब्राम्हण, शिंपी,

---

* ' वारकरी पंथ व महानुभाव पंथ ' नवभारत-नोव्हेंबर १९४८. (प्रा. गं. बा. सरदार).

सोनार, कुंभार, माळी, महार इत्यादि साऱ्या जातीचे व पेशाचे लोक सामील झाले होते. त्यापैकीं बऱ्याचजणांचें एकमेकांशीं गुरुशिष्याचेंहि नातें होतें. या मंडळींनींच पंथाचें प्रवक्तेपण आत्मीयतेनें केलें; म्हणून अल्पावकाशांत वारकरी पंथ महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांत जाऊन पसरला.

प्रचारतंत्रांतील हा फरक दोन्ही पंथांच्या वाङमयांत अधिकच उठून दिसतो. महानुभावांनीं सलग ग्रंथरचनेवर भर दिला तर, वारकरी पंथानें प्राधान्यानें अभंग, पदें असें फुटकळ स्वरूपाचेंच लेखन केलें. त्यामुळें तें असंख्यांच्या तोंडीं सारखें घोळत-खेळत राहिलें. टीकाग्रंथांबाबत तसेंच झालें. महानुभावांच्या टीकाग्रंथांत तार्किक रुक्षता व विद्वज्जडता हे दोष अगदीं ठळकपणें दिसतात; पण 'भाष्यकारांतें वाट पुसतु' असें म्हणणाऱ्या ज्ञानेश्वरांनीं आपल्या गीताटीकेला जुन्या टीकाकारांच्या विद्वज्जडतेचा संपर्कहि लागू दिलेला नाहीं. लोकांच्या मनाला रिझवील, अंतःकरणाला हालवील आणि त्यांच्या विवेकबुद्धीला चालना देईल, अशी रसाळ व उद्बोधक टीका त्यांनीं लिहिली. त्यामुळें साऱ्या वारकरी समाजानें ती मुखोद्गत करून टाकिली. काव्यरचनेच्या बाबतींत महानुभाव पंडितांवर पंचमहाकाव्याची छाप जबर पडल्यानें धर्म-प्रचारापेक्षा काव्यनिर्मितीकडेच त्यांनीं अधिक लक्ष दिलें. कलाविलासांतच महानुभाव कवी रंगून गेले. त्यामुळें त्यांच्या उद्दिष्टानुरूप त्यांच्या वाङमयाचा परिणाम होऊ शकला नाहीं. उलट वारकरी संप्रदायाची अभंगरचना अठरापगड जातींतील व्यक्तींनीं त्यांच्या पेशाच्या वातावरणाप्रमाणें त्या त्या परिभाषेंतच केल्यामुळें ती परिणामकारक व प्रातिनिधिक ठरली.

या कालखंडांत वैदिक धर्माच्या पुनरुज्जीवनासाठीं विज्ञानेश्वर, श्रीधर, हेमाद्री, प्रभृति पंडित मंडळी संस्कृत मधून श्रुतिस्मृतिपुराणोक्त अशा टीकाग्रंथांची निर्मिति करीत होती. तर शार्ङ्गधर, जल्हण, बोपदेव, श्रीपति इत्यादि विद्वान मंडळी ज्योतिष नि गणित, साहित्य नि संगीत, व्याकरण नि वैद्यक इत्यादि विद्या नि कला या संबंधींच्या वाङमयांत भर टाकीत होती. राजाश्रयानें समृद्ध होणाऱ्या या संस्कृत वाङ्यनिर्मितींत प्रतिभेपेक्षां पांडित्याचा आणि मौलिकतेपेक्षां अनुकरणाचाच भाग अधिक होता. शिवाय संस्कृत न येणाऱ्या असंख्यांच्या दृष्टीनें हे ग्रंथभांडार असून नसल्यासारखेंच होतें. म्हणून तर नाथ, महानुभाव, वारकरी या संप्रदायांच्या धुरिणांनीं लोकभाषेचा, लोकछंदांचा अंगीकार केला. मात्र अपभ्रश वाङमयाच्या धर्तीवर लोकानुरंजनासाठीं त्यांनीं शृंगारहास्यादि लौकिक रसांनीं युक्त अशी रंजनप्रधान रचना केली नाहीं. लोकाश्रयामुळें पुढारलेलें हें वाङमय सामान्यांच्या जीवनाला उन्नत करण्याच्या उदात्त ध्येयानें भारलेलें होतें; म्हणून आत्मिक उन्नतिबरोबर सामाजिक उन्नतीहि त्यानें घडवूनआणली. हें या कालांतील मराठी वाङमयाचें समान असें एक वैशिष्टच होय.

यादवकालीन वाङ्मयाचें सामान्य स्वरूप

या काळांतील सर्व प्रकारचें साहित्य म्हणजे मराठी वाङमयाची बाल्यावस्थाच होय. साहजिकच त्याचें स्वरूप उत्स्फूर्त, भावनाप्रधान व निरागस असेंच आहे. ज्ञानेश्वरी असो कीं उद्धवगीता असो, लीळाचरित्र असो कीं तीर्थावळी असो, सलग रचनेचा ग्रंथ असो कीं स्तोत्रें–अभंग अशी स्फुट रचना असो; या सर्वांमध्यें बाल्या–वस्थेतील प्रसन्नता व खेळकरपणा, नव्हाळी व उल्हास, कोमलता व माधुर्य हीं कमजास्त प्रमाणांत पण सर्रास दिसून येतात. 'गोठी सांगीजैल विनोदे' या भूमिकेला साजेशी उत्कट भावमयता आणि कल्पनाचापल्य या विशेषांबरोबर येणारे पाल्हाळ, पुनरावृत्ति विविधतेचा अभाव, इत्यादि दोष; हीच या कालखंडांतील सर्व वाङ्ययाचीं सामान्य लक्षणें होत.

प्राचीन मराठी वाङ्मयाचें स्वरूप : : २

ज्ञानेश्वरांच्या समाधीपूर्वीच इ. स. १२९४ ला उत्तरेकडील मुसलमानांची एक धाड महाराष्ट्रावर येऊन गेली होती. त्यानंतर लागोपाठ झालेल्या अल्लाउद्दिन खिलजी, मलिक काफूर, महंमद तघलख वगैरेंच्या स्वाऱ्यांमुळें देवगिरीच्या यादवांचें साम्राज्य (इ. स. १३१८) व आजूबाजूचीं खेळणें, रायरी, सोनखेड, वारंगळ इत्यादि दक्षिणेंतील बहुतेक सारीं हिंदु राज्यें नष्ट होऊन ज्ञानेश्वरांच्या पश्चात् अवघ्या पाव शतकाच्या अवधींत महाराष्ट्र मुसलमानांच्या सत्तेखालीं गेला. इ. स. १३४७ पासून बहामनी वंशाची मुसलमानी राजवट महाराष्ट्रांत सुरू झाली. याच्या अगोदरच दहा वर्षे हरिहर–बुक्क या कानडी बंधूंनीं हिंदु राज्याची स्थापना तुंगभद्रेच्या तीरीं विजयानगर येथें केली होती. विजयानगर व बहामनी या दोन राज्यांमध्यें सतत दोनशें वर्षें कटकटी सुरू होत्या. त्यांच्यांतील लढायांची धामधूम व लागोपाठ पडलेले मोठाले दुष्काळ यांमुळें महाराष्ट्रीय जीवन उध्वस्त होऊन गेलें आणि सर्वत्र तमोयुग पसरलें. अशा परिस्थितींत पुढील शें–दीडशें वर्षांच्या अवधींत राजकीय वा सांस्कृतिक क्षेत्रांत एकहि

मुसलमानी आक्रमणाचा परिणाम

कर्तबगार असा महाराष्ट्रीय पुरुष[1] निर्माण होऊं शकला नाहीं. धार्मिक क्षेत्रांतील जुने पंथ आणि परंपरा कशाबशा तग धरून राहिल्या होत्या एवढेंच.

महानुभाव पंथाची वाताहात

महानुभावपंथाचे नागदेवाचार्य (इ. स १३०६) व बाईदेवबास (इ. स. १३०९) हे दिवंगत झाल्यावर कवीश्वर भास्करभट बोरीकर हे तृतीय आचार्य झाले. मुसलमानी आक्रमणाच्या काळांत[2] ते कोंकणांत गेले असतां चोरांनीं त्यांना लुबाडलें. त्यांत लीळाचरित्र व सूत्रपाठ यांच्या अधिकृत पोथ्याच नाहींशा झाल्या. तेव्हां त्यांनीं परशरामबास व रामेश्वरबास (व्यास) यांच्या मदतीनें मुखोद्गत असलेल्या पाठांवरून त्या दोन ग्रंथांचें फिरून संकलन केलें. त्यावेळीं कांहीं पाठभेद निर्माण झालें असणें, अगदीं साहजिक आहे. पुढें भास्करभटांनंतर परशराम हे आचार्य झाले. त्या वेळीं पंथांतील अंतःस्थ दुहीमुळेंच (बहुधा परशरामांच्या संमतीनेंच) पंथाचे तेरा आम्नाय करण्यांत आले. या घटनेमुळें आम्नायपरत्वें पुन्हा मूळ ग्रंथांत अनेक पाठभेदांची भर पडली. परधर्मीयांच्या आक्रमणामुळें महाराष्ट्रांतील सांस्कृतिक जीवनाची घडी कशी पार विसकटली गेली, याचें हें एक उदाहरणच होय.

महानुभाव पंथाचे तेरा आम्नाय आपआपल्या परीनें पंथाचें कार्य स्वतंत्रपणें करूं लागले. परंतु राजकीय अराजकाच्या काळांत आणि नंतर

---

१ ' दहापांच हजार पाईक पोशील किंवा पांचचार हजार बारगीर बाळगील अशा तोलाचा मराठा क्षत्रिय शक तेराशेंपासून शक पंधराशेंपर्यंत एकहि नव्हता. ' (वि. का. राजवाडे)—राधामाधवविलासचंपू प्रस्तावना, पान ४६.

२ ' खालसेयाची धाडी ' म्हणजे खिलजीची स्वारी-इ. स. १३०८.

परधर्मीय राजसत्तेच्या अमलांत लढाया आणि दुष्काळ यांमुळें लोकांचें भौतिक जीवनच इतकें अस्थिर आणि अनिश्चित झालें होतें कीं, पंथाच्या प्रसाराऐवजीं मूठभर पंथियांना पंथाचें अधिकृत वाङमय रक्षण करण्याकडेच व पंथाचे आचार टिकवून धरण्याकडेच लक्ष द्यावें लागलें. आचारधर्मावर फाजील भर देतांच त्याविषयींचा कडवेपणा वाढत जाऊन इतर पंथियांबद्दल असहिष्णुताबुद्धि बळावली. जसजशी सांप्रदायिकता वाढत चालली तसतसा हा पंथ अप्रिय होत गेला. रूढिप्रिय सामान्य लोकांचा रोष व इतर पंथियांचा विरोध सहन करण्याची कुवत न राहिल्यानें या पंथियांनीं आपलें सारें वाङमय सांकेतिक[1] लिप्यांत कोंडून टाकिलें. त्यामुळें केवळ सांप्रदायिकांतच त्याचा प्रसार होत राहिला. तेव्हां मराठी भाषेच्या मुख्य वाङमयप्रवाहापासून फुटून महानुभाव वाङमयाचा ओघ आपल्या स्वतंत्र वळणानें वाहूं लागला. अशा रीतीनें अलग किंवा तुटक होतांच स्वतंत्र वाङमयनिर्मितींत खंड पडून महानुभाव वाङमयाचा जिवंतपणाच संपुष्टांत आला. भास्कर-दामोदरांच्या काळांतील प्रवाहीपणा नष्ट होऊन नवनिर्मितीचा उत्साहच मावळला. अशा स्थितींत पंथाच्या प्रमाणग्रंथांचें संकलन, संपादन, संस्करण, विवरण, अर्थनिर्णय व खंडन आणि मंडन यांसारख्या विद्वज्जडतेच्या चाकोरींतून भरडून निघणारें रुक्ष वाङमयच निर्माण होत राहिलें, यांत नवल नाहीं.

---

१ इ. स. १३५३ त रवळोव्यासांनीं पहिली 'सकळ' लिपी सुरू केली. न्यायव्यासांची 'सुंदरी' (इ. स. १३६३), गुर्जर शिवव्यासांची कवीश्वरी' (इ. स. १४०३) अशा सुमारे २५ लिप्या या संप्रदायांत, पुढें रूढ होत गेल्या. राजवाडे-भावे यांच्या खटपटीनें या लिप्यांचा उलगडा झाला (इ. स. १९२४) 'सकळ' लिपीची किल्ली महाराष्ट्रसारस्वतांत आहे. (पान ९०-९१)

कवीश्वरांच्या पाठांपेक्षां वेगळे पाठ पत्करून निरनिराळ्या आम्नायांनीं आपापलीं लीळाचरित्रें व सूत्रपाठ हे प्रमाणग्रंथ तयार करविले. त्यांचा अन्वय लावलेले, हेतु स्पष्ट करणारे, त्यांचें सार सांगणारे ' स्थळ ' ग्रंथ तयार झाले. (अन्वयस्थळ, हेतुस्थळ, सिद्धान्तस्थळ). त्यांत न्यायव्यास बाइंदेकर व गुर्जर शिवव्यास यांचे ' स्थळग्रंथ ' विशेष प्रसिद्ध होत. हरिव्यास सिद्धान्ते यांच्या मदतीनें **गुर्जर शिवव्यासांनीं** लक्षण, आचार व विचार या तिन्ही भागांतील सूत्रांवर भाष्य करून ' तिन्ही स्थळांची बांधणी ' केली. (इ. स. १४०३). चक्रधरांच्या गुजराथी वंशांतील हे सहावे पुरुष होत. म्हणून कदाचित् त्यांच्या तिन्ही स्थळांना सांप्रदायिक तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनें पंथियांकडून विशेष महत्त्व दिलें जात असावें. चक्रधरादि पूज्य व्यक्तींच्या लीळा जेथें जेथें घडल्या त्या त्या स्थळांची माहिती भक्तिभावानें अगदीं सपशीलवार अशी मुनिव्यासांच्या ' स्थानपोथी ' मध्यें संकलित केली आहे. (इ. स. १३५३). याच धर्तीचा दुसरा ग्रंथ म्हणजे नरसनारायणकृत श्लोकबद्ध ' तीर्थमालिका ' हा होय. ऐतिहासिक व भौगोलिक दृष्ट्या हे ग्रंथ महत्त्वाचे आहेत. साती ग्रंथांतील ' ऋद्धिपूरवर्णन ' (इ. स. १३६३) हा ग्रंथ याच काळांतील होय. **भीष्माचार्य लासूरकरांनीं** आनेराजव्यासांच्या ' सुभाषितांताक्षरी ' वर व हयग्रीव व्यासांच्या ' गद्यराज ' काव्यावर टीपग्रंथ लिहिले आहेत. प. भीष्माचार्यशिष्य ज्ञानदेवाची ' पंडुगीता, ' चाल्हणशिष्य नृसिंहाचा ' चाल्हण संकेत ' कृष्णमुनीचा ' ब्रह्मांडगोलक ' इत्यादि ओंवीबद्ध गीताटीका आणि कानउदय पंडितांचें आचारविचारलक्षणत्रयावरील अकरा प्रकरणांचें गद्य भाष्य, गोविंदमुनींचें ' लक्षणरत्नाकरभाष्य ' हे ग्रंथ या काळांतील टीकात्मक वाङ्मयप्रवृत्तीचेच द्योतक होत.

महानुभावीय टीकावाङ्मय

बोपदेव शिष्य **पं. भीष्माचार्य**[1] हे या काळांतील एक विख्यात ग्रंथकार होऊन गेले. त्यांनीं संस्कृतांत व मराठींत मिळून बत्तीस एक ग्रंथ लिहिले. त्यांतील बहुतेक शास्त्रीय व टीकास्वरूपांचेंच आहेत. 'नामविभक्ति' व 'पंचवार्तिक' ही त्यांची प्रकरणें म्हणजे मराठींतील पहिले व्याकरणग्रंथ होत. 'मार्गप्रभाकर' (ओंव्या ८१०) या ओंवीबद्ध ग्रंथाच्या शेवटीं त्यांनीं छंदःशास्त्राचीहि माहिती दिली आहे. धनंजयकोश टीका, गोपाळपंडितांच्या द्वात्रिंशत्लक्षणावरील 'लक्षणरत्नाकर' आणि गीतगोविंदावरील 'महाराष्ट्र-सुबोधिनी' या त्यांच्या विस्तृत टीका; व दिनकर-प्रबंध आणि धाराबिंब-संज्ञिक भाष्य हे त्यांचे प्रमुख संस्कृत ग्रंथ, इत्यादींवरून या महानुभाव पंडिताच्या चौरस बुद्धिमत्तेची व प्रचंड उद्योगाची कल्पना येते. अशा रीतीनें या काळांतील महानुभाव वाङमय स्वतंत्र नसून टीकापर आहे; काव्यस्वरूप नसून प्रबंधात्मक आहे. याला अपवाद केवळ नृसिंह कवीच्या 'रुक्मिणी-स्वयंवर' या कथाकाव्याचा.

इ. स. १३५० ते १४५० या वाताहतीच्या काळांत अनेक महाराष्ट्रीय लोक कर्नाटक, कोंकण, तेलंगण वगैरे भागांत जाऊन स्थायिक झाले असावेत, किंवा कांहीं काळ तेथें राहून बहामनी राजवटीच्या उत्तरार्धांत परत आले असावेत. महानुभाव आचार्य कोंकणांत गेल्याचा उल्लेख मागें आलाच आहे. तेलंगणांतील वास्तव्या-संबंधींचा या काळांतील पुरावा नव्यानेंच उपलब्ध झाला आहे.

---

१ डॉ. तुळपुळे यांच्या मतें हा ग्रंथकार तेराव्या शतकांतील आहे. पण महाराष्ट्र सारस्वतकार भावे चौदाव्या शतकांतच उल्लेखितात. (महाराष्ट्र पुरवणी, पान ९१५).

' **मल्लिकार्जुन पंडिताराध्य-चरित्र** ' या तेलुगु[1] काव्याच्या अष्टभाषाकवित्वविशारद अशा सोमनाथ कवीनें या काव्यांत बावीस ओळींचें एक मराठी कवन दिलें आहे. त्यावरील द्राविडी छाया अर्थातच अगदीं स्पष्ट आहे. महाराष्ट्रियांच्या स्थलांतराचा हा पुरावा चिन्त्य आहे. लोक देशोधडी लागत होते, अशा या काळांत महानुभावांप्रमाणेंच इतर धर्मपंथांचें कार्यहि मंदावलेलें दिसतें. म्हणून त्या पंथियांचीहि विशेष उल्लेखनीय अशी ग्रंथरचना या शतकांत दिसून येत नाहीं. तरी पण किरकोळ स्वरूपाचे कांहीं अध्यात्म ग्रंथ व कथात्मक काव्यें याहि नापिक काळांत मधून मधून आढळतातच.

नाथपंथियांची ग्रंथरचना

नाथपंथाशीं संबंध असलेल्यांची या काळांतील फारच थोडी ग्रंथरचना उपलब्ध आहे. ज्ञानेश्वरांकडून आलेली नाथपरंपरा सत्यामलनाथ (इ स. १२७८–१३५८), गैबीनाथ (१३२८–१३७८) व पुढें गुप्तनाथ अशी या कालांत चालूच होती, असें एकनाथांच्या अभंगांवरून दिसतें. सत्यामलनाथांचा **सिद्धान्तरहस्य** ऊर्फ **ललितप्रबंध** (ओंव्या १२ हजार) हा ग्रंथ प्रसिद्ध आहे. त्यांत १५२५ ते १७०० या पावणे-दोनशें ओंव्यांत ज्ञानेश्वरांचें चरित्र गोंविलें आहे. सोपानदेवांपासूनच्या नाथपरंपरेंतील कोणा मुकुंदराजाचा ' योगविवेकमार्तंड ' (इ. स. १४२८) हा ग्रंथ नव्यानेंच उपलब्ध झाला आहे. **वडवाळसिद्ध नागेशांच्या** (इ. स. १३६८-१४२८) शिष्यांनींहि याच काळांत कांहीं वाङ्मयनिर्मिति केली आहे. त्यापै अज्ञान कवीनें गुरूच्या

---

१ मराठी उताऱ्यावरील टिपणें : प्रो. द. वा. पोतदार व श्री. चिं. ग. कर्वे (भा. इ. सं. मं. त्रैमासिक, वर्ष २२ अंक २/४).

भावाचाच उपयोग करून '**वरद नागेश**[1]' नांवाचा वेदान्तपर ग्रंथ (अध्याय ११, ओंव्या १८५०) रचिला आहे. तो विवेकसिंधूच्या धर्तीवर आहे. पंचीकरणप्रमेय, कालज्ञान, इत्यादि स्फुट रचनाहि त्याच्या नांवावर मोडते. कान्हो पाठकाचें ' गीतासार ' व दगडो शिव रामाचें ' निर्वाणसार ' ही रचना याच परंपरेंतील होय. ' न हिंदुर्न यवनः ' अशी स्थिति झालेल्या **बहिरापिसा**[2] **जातवेदाला** वडवाळसिद्ध नागेशांनींच आत्मज्ञान करून दिलें अशी कथा आहे. **संकटहरणी**[3] **शिवग्रंथ** (इ. स. १३९१), संतमालिका, अभंग, पदें इत्यादि फुटकळ ग्रंथरचनेबरोबरच बहिरवी ऊर्फ भैरवी नांवाची **भागवतटीका** त्यांनीं लिहिली. दशमस्कंधावरील या विस्तृत टीकेमुळेंच बहिरापिसा जातवेदांचें नांव विख्यात झालें आहे. ही दशमावरील पहिली टीका पाऊण लाखाची असावी, असें एक मत आहे. पण उपलब्ध भागावरून (अ. ६०, ओंव्या १६२८४) सारा ग्रंथ ३६००० ओंव्यांचा असावा असें वाटतें. महानुभावांची रचना सोडल्यास कृष्णचरित्रावरील हाच पहिला मोठा व लोकप्रिय ग्रंथ होय. या रसाळ टीकेनेंच लोकांना कृष्णचरित्राची विशेष गोडी लाविली. कथात्मक रचनेमध्यें काव्यदृष्टीनें उल्लेखनीय असा ग्रंथ म्हणजे **चोंभा** कवीचें इ. स.

१ डॉ. तुळपुळे हें नांव अज्ञान कवीचें वैकल्पिक नांव समजतात. (महाराष्ट्र सारस्वत पुरवणी–पान ९२०), तर ल. रा पांगारकर हे ग्रंथाचें नांव म्हणून देतात. (म. वा. इ. खंड २, पानें २६–२९).

२ बहिरा जातवेद (द. वा. पोतदार), भा. इं. सं मं., वार्षिक इतिवृत्त शके १८३४.

३ या ग्रंथाचें कर्तृत्व कोणाकडे ? वडवाळसिद्ध नागेश (वि. ल. भावे पान ४४४) कीं बहिरा जातवेद ! (भरतखंडाचा अर्वाचीन कोश इ. स. १८८०).

१३७८ सुमारचें ' **उखाहरण**[1] ' (उपलब्ध ओंव्या ५७५–अपूर्ण). त्याखेरीज नामा पाठकाचा ' अश्वमेध, ' कान्हो[2] त्रिमलदासाचें पाताळकांड रामायण, गद्य पंचतंत्रावरून तयार केलेलें निर्मळ पाठककृत[3] पंचोपाख्यान, इत्यादि रचनाहि याच धामधुमीच्या काळांतील आहे.

वारकरी पंथीय संत

वर उल्लेखिलेलीं कांहीं आध्यात्मिक प्रकरणें व पौराणिक आख्यानें यांच्याप्रमाणेंच दामाजी, कान्होपात्रा, सेना न्हावी व भानुदास यांची भक्तिपर कविता याच काळांत मोडते. पण ती फारच थोडी असून सांप्रदायिक स्वरूपाची आहे त्यांच्या कवितेपेक्षां या चौघांचीं चरित्रेंच मोठी उद्‌बोधक आहेत. त्यांवरून वारकरी संप्रदायांतील अद्वैतबोधाचें नैतिक सामर्थ्य व लोकजीवनांतील त्याचा प्रत्यक्ष प्रभाव हीं दिसून येतात. 'वैष्णवी साधु-संतांच्या धर्मश्रद्धेच्या प्रखरतेची छाप मुस्लिम धर्मियांवर चांगलीच बसली होती, असेंच या संतांच्या आख्यायिकांवरून दिसून येतें. मुसलमानी धर्म-प्रसाराच्या तलवारीची धार भक्तिसंप्रदायाच्या लोण्याहून मऊ व वज्राहून कठोर अशा स्वधर्मश्रद्धेवरच बोथट झाली, असाच याचा अर्थ.'[4]

बहामनी राजवटीच्या उत्तरार्धांत दत्तसंप्रदाय पुढें आला. त्यानें धर्मरक्षणाच्या दृष्टीनें उच्च वर्णियांना जागृत केलें. **श्रीपाद वल्लभ** व

---

१ चोंभाकृत उषाहरण (वि. का. राजवाडे) भा. इ. सं. मं., इ. स. १९११. चोंभाकृत–उखाहरण (म. ग. फफे) भा. इ. स. मं., ऐति. संकीर्ण निबंध, खंड ३.

२ कान्हो त्रिमलदास (गो. का. चांदोरकर), भा. इ. सं. मं. १९१४.

३ पंचोपाख्यानाची महानुभावीय प्रत (ह. ना. नेने), भा. इ. सं. मं. त्रै. वर्ष २२.

४ बा. अ. भिडे– ' मराठी भाषेचा व वाङमयाचा इतिहास '

नृसिंहसरस्वती या [1]दोन कर्तबगार संन्याशांनीं दत्तोपासनेचा पंथ स्थापून वैदिक धर्माच्या सनातन परंपरेचें पुनरुज्जीवन केलें. या दोन विभूतींचीं चरित्रें या पंथाचा प्रमाणग्रंथजो 'गुरुचरित्र' त्यांत विस्तृत आलीं आहेत. नृसिंहसरस्वतींनीं योगबलानें अद्‌भुत चमत्कार दाखवून लोकांवर आपली छाप बसविली आणि त्यांच्या ठिकाणीं आचरणप्रधान धर्मपालनाची निष्ठा उत्पन्न केली

दत्तसंप्रदायाचें कार्य

नृसिंहसरस्वतींची परंपरा शंकराचार्यांपासूनची आहे. साहजिकच वैदिक धर्माच्या (म्हणजेच ब्राम्हण्याच्या) रक्षणावर त्यांचा सारा भर होता. मुसलमान रियासतीच्या ऐन भरांत ब्राम्हण-क्षत्रिय हे आपल्या वर्णोचित आचारांपासून भ्रष्ट होऊन परधर्मीय राजांची सेवा करू लागले होते. त्यांना स्वधर्माचरणाची महति पटवून देऊन वर्णाश्रम-धर्माला बळकटी आणण्याचें कार्यच दत्तसंप्रदायानें केलें. सरस्वतीगंगाधर, दासोपंत, एकनाथ, मुक्तेश्वर हे ग्रंथकार दत्तसंप्रदायांतूनच उदयास आले.

[2]सरस्वतीगंगाधरांनीं '**गुरुचरित्र**' (इ. स. १५५८) या ग्रंथांत दत्तसंप्रदायाच्या प्रवर्तकांचें लीलाचरित्र आणि निरनिराळ्या दैवतांचें व क्षेत्रांचें माहात्म्य अत्यंत भाविकतेनें वर्णिलें आहे. सिद्ध व नामधारक यांच्या संवादरूपानें लिहिलेल्या या ग्रंथांत एकूण ५३ अध्याय असून सुमारें सात हजार ओंव्या आहेत. ब्राम्हणवर्णाचा वेदोक्त आचारधर्म यांत तपशीलवार सांगितला आहे. तसेंच, निरनिराळ्या कथांच्याद्वारें स्त्रियांचीं कर्तव्यें व नीतिधर्म हीं स्पष्ट केलीं आहेत. सकाम भक्ति व चमत्कार

---

१ यांच्या कर्तृत्वाचा काळ-इ. स. १३७८-१४५८. नृसिंहसरस्वतींचा समाधिकाल इ स. १४५८.

२ हे पितृपरंपरेनें नृसिंहसरस्वतींचे पांचव्या पिढीचे शिष्य. सायंदेव-नागनाथ-देवराव-गंगाधर-सरस्वती.

यांचें प्राबल्य या ग्रंथांत आहे. कर्मठ व सनातनी मंडळींत गुरुचरित्र ग्रंथाला फार मान आहे. कडक सोंवळें संभाळून सहेतुकपणें या ग्रंथाचीं पारायणें केलीं जातात. संस्कृतांतहि या ग्रंथाचें भाषांतर झालें आहे.

या ग्रंथाची भाषा सरळ, सुबोध, पण गद्यप्राय आहे. एकहि फारसी शब्द यांत नाहीं. ग्रंथावर विवेकसिंधूची छाप आहे. "सरस्वती–गंगाधर हे कानडी असावेत," असें एक मत आहे; तसें असेल, तर पंथनिष्ठेनें प्रेरित होऊन एवढा मोठा मराठी ग्रंथ त्यांनीं लिहावा, हें खरोखर कौतुकास्पद होय.

या काळांतील विख्यात ग्रंथकार **दासो दिगंबर** (इ. स. १५५१–१६१५) हे दत्तसंप्रदायीच होत. हे जोगाईचें आंबें येथें अत्यंत विरक्त वृत्तीनें राहात असत. त्यांची समाधि व मठ (देवस्थान) येथेंच आहे.

दासोपंत

यापलीकडे त्यांच्यासंबंधीं प्रमाणभूत अशी दुसरी माहिती[१] उपलब्ध नाहीं. नोकरी चाकरी न करतां जन्मभर त्यांनीं लेखन व्यवसाय करून शंभरावर ग्रंथ लिहिले. रोज त्यांना ढब्बू पैशाची शाई लागत असे, असें म्हणतात. त्यावरून दासोपंतांच्या प्रचंड उद्योगशीलतेची खात्री पटते. त्यांचे लहानमोठे मिळून पंचेचाळिसांवर संस्कृत–मराठी पद्यग्रंथ उपलब्ध आहेत. त्यांत वाक्यवृत्ति, पंचीकरण[२],

---

१ एका दुष्काळाच्या वर्षीं रसद वेळेवर पोंचली नाहीं म्हणून नारायणपेठचे दिगंबरपंत देशपांडे यांच्या मुलाला–दासोपंताला बादशहाच्या अधिकाऱ्यांनीं ओलीस म्हणून पकडून नेले; तेव्हां दत्तकृपेनें त्यांची सुटका झाली. एवढी एक दंतकथा दासोपंतांविषयीं रूढ आहे.

२ एका अडीच हात रुंद आणि चोवीस हात लांब अशा पासोडीवर ठळक नि वळणदार अक्षरांत दासोपंतांनीं आपला ' पंचीकरण ' हा ग्रंथ समग्र लिहून काढला आहे. दासोपंतांच्या देवघरांत ही पासोडी पहायला मिळते. ह्या पासोडीचें टोक पाण्यांत भिजवून तिचें तीर्थ घेतल्यानें भूतबाधा, ताप–जाळ वगैरे रोग नाहींसे होतात; अशी भाविकांची समजूत आहे.

इत्यादि आध्यात्मिक प्रकरणें; गीताभाष्य, सार्थ गीता, अनुगीता यांसारख्या गीतेवरील टीका; शिव, गुरु, दत्त, इत्यादि दैवतांचीं स्तोत्रें-यंत्रें-कवचें -पूजा, यांचा समावेश होतो. दत्तात्रेयाचीं नामस्तोत्रेंच एकूण सहा आहेत. त्याखेरीज ' दत्तात्रयमाहात्म्य ' हा संस्कृत ग्रंथ आहे तो निराळाच. परंतु गीतार्णव (१। लाख ओंव्या-प्रकाशित फक्त १३ हजार) व ग्रंथराज (प्र. ८, ओंव्या १२००) हे दोन ग्रंथ आणि पदार्णवांतील स्फुट पदें हीच दासोपंतांची विशेष उल्लेखनीय अशी साहित्यसंपदा होय.

' **गीतार्णवा** ' इतका प्रचंड ग्रंथ मराठींत दुसरा नाहींच. तसेंच इतकी सुबोध अशी दुसरी गीताटीकाहि कोठें आढळणार नाहीं. प्रतिपाद्य विषयाचें सविस्तर नि सांगोपांग विवरण हाच दासोपंतांच्या लेखनशैलीचा प्रधान धर्म होय. दासोपंतांची गाढ विद्वत्ता व निरूपणांतील वक्तृत्वपूर्णता गीतार्णवामध्यें स्पष्ट दिसून येते. दासोपंतांचें पांडित्य किंवा भाषाप्रभुत्व या गोष्टी वादातीत असल्या तरी त्यांची वृत्ति मात्र संकुचित व अभ्यासजडच दिसते. ' न पाहे श्रोतयांचें वदन । न करि भाष्याधारें विवरण ' किंवा ' आइकेल तेणें आइकावें । मानैल तेणें घ्यावें ॥ नावडे तेणें नेघावे । दोहीं श्रवणीं ॥' असें ते म्हणतात. श्रोत्यांबद्दलची ही बेपर्वा वृत्ति व स्वतंत्र प्रज्ञेचा अहंगंड (स्वमति चालिला अर्थु । परि न चुके परमार्थु ॥) यांमुळेंच त्यांच्या ग्रंथांचा लोकांत फारसा प्रसार झाला नसावा. मात्र अहंविशिष्ट वृत्तीच्या दासोपंतांमध्यें वस्तुनिष्ठ दृष्टीचा भागहि बराच आहे. त्यांचें लोकव्यवहाराचें निरीक्षण फार सूक्ष्म दिसतें. सांसारिकांची त्यांनीं रेखाटलेलीं चित्रें वास्तव असून मोठी भेदक आहेत. गीतार्णवांतील ' चिंता पुरुषातें बंधन । चिंता जितचि मरण ' किंवा ' पुरुषार्थें जिणें गोड । पुरुषार्थेंचि मरण वाड ' अगर ' धर्मु लक्ष्मीचें कारण । धर्मु लक्ष्मीचें रक्षण ' अशा सुभाषितरूप ओंव्यांवरून दासोपंतांच्या मार्मिकतेचें आणि विवेकनिष्ठेचें दर्शन होतें.

दासोपंतांच्या ग्रंथांत मराठी भाषेचा अभिमान अगदीं ओतप्रोत भरला आहे. " संस्कृतांतील 'घट[1] पाषाण' इत्यादि शब्दांना मराठींत अनेक पर्याय आहेत, " हा भाषेच्या संपन्नतेबद्दल त्यांचा युक्तिवाद मार्मिक असला तरी अतिरंजितच होय. शिवाय इतकें असूनहि दासोपंतांनीं स्वत: दशोपनिषद्भाष्य, दत्तात्रेयमाहात्म्य व कांहीं स्तोत्रें इत्यादि ग्रंथरचना संस्कृत भाषेंत केली आहेच !

दासोपंतांचा **ग्रंथराज** हा दासबोधाचा पूर्वावतार ठरावा इतकी छाप या ग्रंथाची रामदासांवर पडलेली स्पष्ट दिसून येते. 'राजकारण व सावधपण' सोडून दासबोधांतलेच विषय त्याच पद्धतीनें या ग्रंथांत प्रतिपादले आहेत. ग्रंथराजाची ओंवीहि दासबोधाप्रमाणें सुटसुटित व ठांशीव आहे. रामदासांचे 'प्रतीति व प्रबोध' हे आवडते शब्द याच ग्रंथांत प्रथम व वारंवार आले आहेत. दोन्ही ग्रंथ गुरुशिष्यसंवादरूप आहेत. सद्गुरूची लक्षणें, चांगल्या-वाईट शिष्याचीं लक्षणें, व्यावहारिकांच्या संसाराचें चित्र, इत्यादि ग्रंथराजांतील विषयांचाच विस्तृत व उठावदार विस्तार पुढें दासबोधांत आपल्या दृष्टीस पडतो. वेदान्तशास्त्रांतील सामान्य विषयांचें विवेचन रामदासांनीं दासोपंतांच्या ग्रंथराजाला धरूनच केलेलें दिसते. तेव्हां सामान्यांकडून जरी दासोपंत विशेष वाचिला गेला नसला तरी, त्यांच्या ग्रंथांनीं रामदासांसारख्या महंताला स्फूर्ति दिली, यांत शंका नाहीं. कारण दासबोध म्हणजे ग्रंथराजाचीच सुधारून वाढविलेली आवृत्ति, असें म्हणण्याइतकें साम्य दोहोंत आहे.

---

१ 'संस्कृतें घटू म्हणती । आतां तया घटाचे भेद किती ॥ हारा, डेरा, रांजणू । मुढा, पगडा आनु । सुगड, तौली सुजाणु । कैसी बोलेल ॥ घडी, घागरी, घडौली । आळंदे, वाचिकें, बौळी । चिटकी, मोरवा, पातली । सांजवणें ते ॥

पदार्णवांतील भावपूर्ण व मधुर पद्यरचनेंत दासोपंतांच्या भक्तहृदयाचें निर्मल प्रतिबिंब पडलें आहे. त्यांच्या करुणापर अभंगांत व पदांत त्यांच्या दत्तभक्तीचा प्रेमा सांठविलेला आहे. त्यांनीं आपल्या उपदेशपर पदांतून अंत:शुद्धीवर व भक्तीवर विशेष भर दिला आहे.

बहामनी राज्याचीं पांच छकलें (इ. स. १४९३) झाल्यावर सोळाव्या शतकांत महाराष्ट्रियांची स्थिति पुष्कळच सांदरली. निजाम-शाही, आदिलशाही वगैरे मुसलमानी शाह्यांतहि मराठ्यांच्या नैसर्गिक गुणांना आणि कर्तृत्वाला अधिकाधिक वाव व मान्यता मिळूं लागली. त्यामुळें अल्पावकाशांतच घाडगे, निंबाळकर, डफळे, माने,

सोळाव्या शतकांतील परिवर्तन

सावंत, शिरके, मोरे, भोसले, इत्यादि अनेक घराणीं नव्यानेंच उदयास आलीं आणि त्यांतूनच मुत्सद्द्यांची व सेनानींची एक थोर परंपरा महाराष्ट्रांत निर्माण झाली. भौतिक जीवनांतील या प्रगतीचे पडसाद धर्म, भाषा, साहित्य, इत्यादि सांस्कृतिक क्षेत्रांतहि ऐकूं येऊं लागले आणि महाराष्ट्रांत लोकजागृतीची दुसरी प्रभावी लाट पुन्हा उसळली.

एकनाथ (इ. स १५३३-१५९९) हेच या सांस्कृतिक पुनरुज्जीवनाचे सर्वश्रेष्ठ प्रतिनिधि होत. एकनाथांच्या व्यक्तित्वांत दत्तसंप्रदाय, वारकरी पंथ व पैठणची परंपरा या तिहींचा उत्कृष्ट मिलाफ झाला आहे. त्यांचे गुरु जनार्दनस्वामी हे दत्तोपासक असल्यानें एकनाथ गुरुपरंपरेनें दत्तसंप्रदायी[१] होत; परंतु जनार्दनस्वामीं-

संत एकनाथ

कडूनच त्यांना ज्ञानेश्वरी, अमृतानुभव या ग्रंथांतील बोधाची दीक्षा

१ नाथांनीं ' दत्तमानसपूजा ' व ' दत्तनाममहिमा ' यांवर साठ एक अभंग लिहिले आहेत. त्यांचें दत्तजन्मावरही एक छोटेसें प्रकरण आहे. भागवत ग्रंथांत दत्तात्रयाला वंदन आहे. (माझे निजगुरूचा गुरू । श्रीदत्त परमगुरु ॥). तसेंच ७ ते ९ अध्यायांत यदू-अवधूत संवाद आहे.

मिळाली होती. शिवाय वर्णाभिमान, विषमता व सकाम धर्माचरण या कट्टर दत्तसांप्रदायिकांच्या गोष्टी नाथांना रुचण्यासारख्या नव्हत्या. त्यामुळें त्यांनीं आपले पणजोबा[1] **भानुदास**[2] (इ. स. १४४५–१५१३) यांच्यापासून चालत आलेल्या वंशपरंपरागत भागवत-धर्माचाच बारसा[3] पुढें चालविला. वैदिक परंपरेच्या माहेरघरीं, पैठणला एकनाथांचें वास्तव्य होतें. वैदिक परंपरेचा अभिमान, ब्राम्हण्याचा कैवार, संस्कृत विद्येबद्दलचा असीम आदर, आणि लिहिण्या-बोलण्यांत पांडित्याचा डौल या गोष्टी पैठणच्या संस्कारांनीं नाथांच्या ठिकाणीं आल्या. ज्ञानेशांचा वारकरी पंथ व पैठणची वैदिक परंपरा या दुहेरी संस्कारांमुळेंच अनेक गोष्टींचा मेळ घालणारी समन्वय बुद्धि त्यांच्या अंगीं बाणलेली दिसते. समन्वयाच्या कार्याला आवश्यक असेंच व्यक्तित्व नाथांना लाभलें होतें. "प्रेमळपणा, सौजन्य व शांति हा

---

१ भानुदास—चक्रपाणी—सूर्यनारायण (रुक्मिणी)— एकनाथ अशी नाथांची वंशपरंपरा आहे.

२ नाथांचे पणजोबा हें दामाजीचे समकालीन वारकरी संत. अना-गोंदीच्या कृष्णरायानें (इ. स. १४३०--९२) विजयानगरला नेलेली पंढरीची विठ्ठल मूर्ति भक्तीच्या बळावर भानुदासांनीं परत पंढरीस आणली, अशी आख्यायिका आहे. हंपी येथें मूर्ति नसलेलें विजयविठ्ठलाचें मंदिर आहे. तेथें अद्यापहि पूजाअर्चा चालते. शेजारतीला मराठी गाणीं-पदें म्हणतात. 'देवा तुम्ही मंदिरीं कधीं तरी याल'-हें पद त्यापैकींच एक आहे. त्यामुळें भानुदासांच्या या आख्यायिकेला ऐतिहा-सिक आधार मिळतो.

३ नाथांना भानुदासांबद्दल मोठा आदर होता. "वंदू भानुदास वैष्ण-वांचें कुळीं" "पितामहपिता भानुदास" असे आदराचे उद्गार रु. स्वयंवर शुकाष्टकटीका, भागवत या ग्रंथांच्या मंगलाचरणांत त्यांनीं काढले आहेत.

त्यांच्या व्यक्तित्वाचा गाभा आहे. " त्यांच्या स्वभावांत कटुता, क्षुद्रता किंवा संकुचितपणा कोठें तो नाहींच. उलट स्निग्धता, समता आणि उदारपणा या वृत्तिविशेषांची आदर्श मूर्ति म्हणजे एकनाथ होत. त्यांनीं आपल्या उदार चरित आणि विशुद्ध चारित्र्य यांच्या बळावर अलौकिक कर्तृत्व करून दाखविलें.[१]

सर्वांगीण आत्मविकासाच्या द्वारां लौकिक व आध्यात्मिक दोन्ही प्रकारची श्रेष्ठता एकनाथांनीं मिळविली. प्रवृत्ति आणि निवृत्ति, कर्मसंन्यास आणि कर्मठपणा, शब्दपांडित्य आणि आत्मानुभव, व्यक्तिविकास आणि समाजधारणा, वगैरेंमधील द्वैत नष्ट करण्यांत नाथांनीं अभूतपूर्व यश संपादिलें. वारकरी पंथाच्या तत्त्वज्ञानाचा प्रत्यक्ष व्यहारांतील आदर्श म्हणजेच नाथांचें चरित्र आणि चारित्र्य. प्रचंड ग्रंथलेखनाच्या व कीर्तनपुराणप्रवचनांच्या द्वारां सतत भागवतधर्माचा प्रचार करून वैदिक धर्म व लोकभाषा यांवर ओढवलेल्या संकटाचें निवारण करण्याचा मार्ग त्यांनीं दाखविला आणि आत्मोद्धाराबरोबर लोकोद्धारहि केला. त्या दृष्टीनें समन्वयबुद्धीचे आदर्श सुधारक व महाराष्ट्रांतील उदारमतवादाचे जनक हीच नाथांची वैशिष्ट्यपूर्ण भूमिका होय.

एकनाथांची वाङमयसेवा बहुविध आहे. त्यांत टीका, कथाग्रंथ, आख्यानें, आध्यात्मिक प्रकरणें, अभंग, पदें, गौळणी व भारुडें इत्यादींचा अंतर्भाव होतो. त्यांची एकूण कविता पाऊण लाख भरेल. ओंवीबद्ध ग्रंथांची ओंवीसंख्याच साठ हजारांवर आहे. चतुःश्लोकी भागवत, कांहीं आध्यात्मिक प्रकरणें व भक्तचरित्रें, एकनाथी भागवत, रुक्मिणी-स्वयंवर, भावार्थ रामायण आणि अभंगांचा गाथा ही नाथांची महत्त्वाची ग्रंथरचना होय. गुरूच्या आज्ञेवरून तीर्थयात्रेच्या काळांत त्र्यंबकेश्वरीं पूर्ण केलेलें '**चतुःश्लोकी**

एकनाथांची ग्रंथरचना

१ 'एकनाथ आणि रामदास (प्रा. गं. बा. सरदार)- रामदास आणि रामदासी, रौप्यमहोत्सव ग्रंथ, मे १९४७.

भागवत ' (ओंव्या १०३६) हा नाथांचा पहिलाच टीकाग्रंथ. पण त्यावरूनहि नाथांच्या निरूपणशैलीची, टीकापांडित्याची, रूपकयोजनेची व वक्तृत्वशक्तीची चांगली ओळख पटते. यानंतर नाथांनीं शंकराचार्यकृत हस्तामलक, शुकाष्टक टीका, स्वात्मसुख, आनंदलहरी, गीतासार, इत्यादि आठ–दहा **अध्यात्मपर प्रकरणें** लिहिलीं. त्यांची ओंवीसंख्या तीन–चार हजार इतकी भरेल. नाथांचा आध्यात्मिक अधिकार व वेदान्त तत्त्वज्ञानाचा व्यासंग यांवरून स्पष्ट होतो. मूळ श्लोकांतील युक्तिवादांना एकनाथ उपनिषदें, गीता, भागवत, योगवासिष्ठ, मीमांसा यांतील समर्पक वचनांचा आधार देतात. त्यावरून नाथांच्या बहुश्रुततेची व पांडित्याची नीट कल्पना येते. तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनें शंकराचार्यांच्या प्रकरणावर टीका लिहितांनाहि नाथांनीं ज्ञानेश्वरीय दृष्टीचा अवलंब केला आहे. कांहीं ठिकाणीं अमृतानुभवाचा ठसा स्पष्ट दिसतो. मुक्ति, समाधि या कल्पनांचा अर्थ नाथांनीं स्वतंत्रपणें केला आहे. शैलीच्या दृष्टीनें भववृक्ष, मायावन (शुकाष्टकटीका) ही रूपकें उल्लेखनीय आहेत.

एकनाथी भागवत (ओंव्या २० हजार) हा नाथांचा मुख्य ग्रंथ होय. ही भागवताच्या एकादशस्कंधावरील विस्तृत टीका विद्वत्तापूर्ण असून रसाळ व सुबोध उतरली आहे. काशी नगरीच्या वास्तव्यांतच (इ. स १५७०–७३) याची रचना झाली. तेव्हां प्रारंभीं आक्षेप घेणाऱ्या काशीच्या पंडितांनींच ग्रंथसमाप्तीनंतर एकनाथी भागवताची पालखींतून मिरवणूक काढली. नाथांच्या पांडित्याला व मराठी भाषेच्या सामर्थ्याला मिळालेलें हें एक महत्त्वाचें शिफारसपत्रच म्हणावयाचें ! ज्ञानेश्वरींतील तत्त्वज्ञानाच्या आधारानें भागवतधर्मासंबंधीं दिलेलें सोपपत्तिक व सविस्तर व्याख्यान म्हणजे हें नाथभागवत, असें या ग्रंथांतील आशया–बद्दल म्हणतां येईल. ज्ञानेशांच्या विचारसरणीची व विवेचनपद्धतीची छाप नाथभागवतावर सर्वत्र पडली आहे. दोहोंमध्यें असंख्य साम्यस्थळें आहेत.

नाथांच्या काळांत पुनरुज्जीवन प्रवृत्तिमुळें देवांचें उत्सव, यात्रा, दैनंदिन कर्में यांना महत्त्व आलें होतें. गीतेपेक्षां भागवतांतच कर्माकर्मांचा, विधिनिषेधांचा विचार जास्त आहे. मात्र या सर्व गोष्टी करण्यांत भक्तीचा जिव्हाळा पाहिजे, हा बोध पौराणिक कथांच्या द्वारां भागवतांत सांगितला गेला आहे. म्हणून नाथांनीं 'विश्वाला भक्तिसन्मुख' करण्याच्या हेतूनें उद्धवगीतेची निवड केली असावी. मूळ भागवत व त्यावरील श्रीधरी टीका यांना धरूनच नाथांनीं ही टीका लिहिली असली तरी त्यांची स्वतंत्र प्रज्ञा जागोजागीं दिसल्याखेरीज रहात नाहीं. (उदा.– कर्म, अकर्म विकर्म यांवरील त्यांचें भाष्य पहा.)

मूळ ग्रंथ कथारूप असल्यानें नाथांच्या निरूपणाला बहर आला आहे. कथारूपानें बोध करण्यांत नाथ कुशल आहेत. तसेंच प्रत्येक शद्ब, प्रत्येक स्थळ, प्रत्येक नांव इत्यादींची सविस्तर फोड करण्याकडे त्यांचें लक्ष फार आहे. त्यामुळें त्यांची साडेचार चरणी ओवी खरंच 'बालसुबोध' झाली आहे. मराठी भाषा, भागवतग्रथ, कृष्ण, गुरु यांच्या संबंधीं लिहितानां नाथांचें भक्तहृदय उचंबळून येते. मग त्यांच्या प्रासादिक वाणीला वक्तृत्वाचें तेज चढतें. त्या दृष्टीनें या टीकेचा भावसंपन्न नि वक्तृत्वपूर्ण उपसंहार उल्लेखनीय वाटतो. भागवतधर्माची परंपरा व त्याचें स्वरूप स्पष्ट करणारा मराठींतील एकच एक प्रमाण ग्रंथ म्हणून याचें महत्व फार आहे.

'**रुक्मिणी–स्वयंवर**' (ओंव्या १७११) हा नाथांचा पहिलाच (इ. स. १५७१) आख्यानपर ग्रंथ होय. काशीच्या वास्तव्यांतच या ग्रंथाची रचना नाथांनीं केली. कृष्णभक्ति, अध्यात्मबोध व समाजचित्र (स्वयंवर सोहाळ्याचीं विविध वर्णनें) या दृष्टीनें हें काव्य महत्त्वाचें आहे. मराठींत आजवर रुक्मिणी–स्वयंवरावर तीस बत्तीस आख्यान–काव्यें झाली आहेत. पण त्यापैकीं एकाचीहि बरोबरी नाथांच्या या काव्याशीं

होऊं शकत नाहीं. उलट पुढील कवींनीं अनेक बाबतींत नाथांच्या रुक्मिणी-स्वयंवराचीच उसनवारी केलेली दिसते. नाथांनीं दशमस्कंध (अ. ५२-५४) हरिवंश व विष्णुपुराण यांचा आधार-ग्रंथ म्हणून उल्लेख केला असला तरी, नाथांचें अठरा प्रसंगांत विस्तारलेलें हें आख्यान काव्य तसें स्वतंत्र आहे. पहिल्या सात प्रसंगांत रुक्मिणी-हरणापर्यंतचा मुख्य भाग आला आहे. पुढील सहा प्रसंग युद्ध वर्णनाचे असून त्यांत नाथांच्या लेखणीनें अध्यात्माच्या छायेंतच वीररसाचा उठाव करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांतील रणनदीचें वर्णन चांगलें समर्पक व सूक्ष्म उतरलें आहे. प्रासंगिक विनोदहि चांगला साधला आहे. मूळांत नसलेला विवाहसमारंभाचा अपूर्व सोहळा शेवटच्या पांच प्रसंगांत नाथांनीं वर्णिला आहे. कालविपर्यासाचा दोष नजरे आड केला तर, या विवाहसमारंभाच्या वर्णनामध्यें चालीरीती, थट्टा मस्करी यांच्या रूपांत नाथांच्या काळचें जिवंत समाजचित्र आपणास पहावयास मिळतें.

अध्यात्म व काव्य, भक्तिभाव व विनोद या सार्‍यांचा एकत्र अनुभव देणार्‍या नाथांच्या रूपकशैलीचा अप्रतीम विलास या काव्यांत पहायला मिळत असल्यानें ज्ञानी, रसिक आणि भाविक सार्‍यांनाच आवडेल असा हा परिपाक उतरला आहे. परमात्म्याचा चिच्छक्तीशीं संयोग-जीवशिवाचें ऐक्य-म्हणजे कृष्णरुक्मिणी विवाह असें नाथांचें मुख्य प्रतिपाद्य असून आध्यात्मिक रूपकांतच सारी कथा त्यांनीं गुंफली आहे. यांत नाथांच्या अध्यात्मनिष्ठेबरोबर कल्पकतेचाहि वांटा मोठा आहे. मात्र कांहीं ठिकाणीं रूपकांच्या हव्यासामुळें कुठें शाब्दिक कोटी केल्यानें तर, कुठें कल्पनांची पुनरुक्ति झाल्यानें रसभंग होतो. तर कांहीं ठिकाणीं अध्यात्मविचाराची काव्यांगावर कुरघोडी झाल्यासारखेंहि रसिकाला जाणवते. आशयाच्या बाबतींत अध्यात्मावर व आविष्काराच्या

बाबत रूपकांवर भर दिल्यानें हें काव्य भावरमणीय न होतां बुद्धिप्रधान झालें आहे. अध्यात्मबोधासाठीं मनोरंजक साधन म्हणून कथात्मक रचनेचा एकनाथांनीं उपयोग केला आहे. दशावतार, रुक्मांगद कथा, तुळसीमाहात्म्य, हळदुली कृष्णदान इत्यादि **आख्यानपर रचना** वरील हेतूनेंच झाल्यामुळें त्यांतहि अध्यात्म, भक्ति व विनोद या तिहींचा मिलाफ झालेला आढळतो. ध्रुव, प्रल्हाद, सुदाम यांसारखे भक्त व ज्ञानदेव, नामदेव, चाखा हे संत यांसंबंधीं चरित्रपर आख्यानें रचण्यांत त्यांची कीर्तनकाराची दृष्टि स्पष्ट होते. हरदासी कीर्तनाच्या प्रथेला नाथांनींच उजाळा दिला असावा, असें यावरून वाटतें.

भावार्थ रामायण (अध्याय २९७. ओंव्या ४० हजार) हा नाथांचा शेवटचा ग्रंथ अपूर्ण असतांनाच नाथ निजधामास गेले (इ. स. १५९९). युद्धकांडाच्या ४४ व्या अध्यायापुढचा जवळ जवळ १/३ ग्रंथ (अ. १२५– ओंव्या सुमारे १५ हजार) गावबा नांवाच्या त्यांच्या एका वेडसर (?) शिष्यानें गुरूच्या नांवानेंच पूर्ण[1] केला आहे. नाथांच्या रचनेशीं या रचनेचा अगदीं बेमालूम सांधा जोडला गेला आहे. नाथांनीं हें रामायण लिहितांना वाल्मिकी–रामायण, अध्यात्मरामायण, रामकथेवरील विविध नाटकें, शिवाय गीता, योगवासिष्ठ, भागवत इत्यादि अनेक ग्रंथांचा उपयोग केला असला तरी, ही सारी बहुश्रुतता त्यांनीं चांगली आत्मसात् केली होती असें दिसतें. त्यामुळेंच 'भावार्थ' हें नांव सार्थ वाटतें. तसें पहातां आशयाच्या दृष्टीनें हेंच खरेंखुरें अध्यात्म–रामायण ठरेल कारण यांतील अध्यात्म–

१ युद्धकांडाच्या अ. ४५ मधील अहिरावणाख्यानहि कोणा जयराम–सुताचें आहे. हा जयरामसुत म्हणजे गावबाच कीं आणखी कोणी तिसराच. अभ्यासकांपुढें हा प्रश्न आहेच.

विचार संस्कृतांतील ' अध्यात्म रामायणाप्रमाणें ' त्रुटित नसून सलग आहे. कथा-प्रसंग, स्वभावचित्रें, वर्णनें, संवाद अशा काव्याच्या विविध अंगांमध्यें अध्यात्माचा धागा अनुस्यूतपणें गुंफलेला येथें दिसून येतो. ' कौसल्या म्हणजे सद्विद्या तर कैकयी अविद्या नि मंथरा कुविद्या; विवेक म्हणजे विश्वामित्र, राम परमात्मा आणि सीता चिच्छक्ति,' यांसारख्या रूपकांनीं रामकथेला अध्यात्माची जोड देऊन ' जे कथा परमार्थ-ज्ञानगाभा ' हें आपलें म्हणणें नाथांनीं सिद्ध केलें आहे. रामसीतेच्या प्रीतीचें वर्णन एकनाथ ' सीता रस, श्रीराम सुस्वाद; सीता सुमन, श्रीराम सुगंध; सीता बुद्धि, श्रीराम बोध ' या शब्दांत करतात; त्यावेळीं ते सहजपणें अद्वैतसिद्धांताची आकर्षक उदाहरणेंच देऊन जातात. तसेंच ' येर येरां वेगळेपण । होऊं न सकति अर्धक्षण । अणूमाजी दोघेजण । नांदती पूर्ण पूर्णत्वें ' या ओवींतील प्रेमैक्याचें वर्णन म्हणजे ज्ञानेश्वरांनीं अमृतानुभवांत वर्णिलेल्या शिवशक्ति - संबंधांतील निकराच्या अद्वैतभावाचें सगुणात्मक अवतरणच होय. अशा पद्धतीनें नाथांनीं प्रापंचिक रामकथेला परमार्थमय केलें आहे. आणि या पौराणिक रामकथेंतून ' प्रपंच जाला ब्रम्हरूप ' हा अद्वैताचा ज्ञानेश्वरीय सिद्धांतच नाथांनीं विशद करून मांडला आहे. या अध्यात्मदृष्टीला साजेसें विचारगांभिर्य आणि भाषेची प्रौढी यांची जोडहि यांच्या इतर ग्रंथांप्रमाणेंच या ग्रंथालाहि मिळाली आहे. त्यामुळें ' ज्ञानी निवती परमार्थ बोधें । पंडित निवती पदबंधें ॥ लोक निवती कथा विनोदें । ग्रंथसंबंधें जग निवे ॥' नाथांच्या या काव्यदृष्टीप्रमाणें हा ग्रंथ सर्वांचें समाधान करणारा झाला आहे.

भावार्थ रामायणाचा दुसरा विशेष असा कीं, देशकालपरिस्थित्य-नुसार अगदीं योग्यवेळीं एका विशिष्ट सामाजिक हेतूनें ही रामकथा त्यावेळच्या लोकांपुढें नाथांनीं ठेवली असें दिसतें. तो हेतू राष्ट्रीय स्वरूपाचा आहे. त्या दृष्टीनें या रामायणांत अस्पष्ट कां होईना

पण राजकारण आहे, असें म्हणावें लागेल. रामचरित्राचें खरें रहस्य (देवांचा) बंध-मोचनांत[1] आहे ही गोष्ट पुनःपुन्हां सांगून पारतंत्र्यांत दिवस काढणाऱ्या लोकांच्या मनावर स्वातंत्र्याचें महत्त्व त्यांनीं बिंबविलें. पारतंत्र्यांत यवनसेवारत झालेल्या हिंदुबांधवांपुढें त्यागी व पराक्रमी, स्वाभिमानी व सहिष्णु अशा रामचंद्राचा धीरोदात्त आदर्श त्यांनीं ठेवला. शिवाजी महाराजांच्या कार्याला पुढें उपयोगी पडलेल्या अलौकिक गुणांची ओळख एकनाथांच्या रामानेंच प्रथम महाराष्ट्राला करून दिली. अशा दृष्टीनें, त्या काळांत रामकथेची निवड करण्यांत नाथांची समयज्ञता व समाजप्रवणताच दिसून येते.

ज्ञानदेव-नामदेवांच्या रूपकांप्रमाणेंच **भारुडें** हा नाथांचें वैशिष्ट्य दाखविणारा एक काव्यप्रकार आहे. सुमारें १२५ विषयांवर नाथांनीं लिहिलेलीं एकूण ३०० भारुडें उपलब्ध आहेत. महार, गोंधळी, गारुडी, पाईक, वासुदेव, बाळसंतोष, सौरी, कोल्हाटीण, कुंटीण, मुरळी, जागल्या, जोशी, इत्यादि लोकांच्या वेषांत, त्यांच्या भाषेंत आत्मबोध करणारीं हीं (बहुरूढ =) भारुडें समाजांतील अगदीं खालच्या थराशीं समरस होऊन नाथांनीं लिहिलीं आहेत. 'उदो बोला उदो बोला । कृष्णाबाई माउलीचा वो ॥' (गोंधळ)' 'सत्वर पाव ग मला भवानि आइ । रोडगा वाहिन तुला ॥' (भवानी) 'मी आलो रायाचा जोशी । होरा ऐका दादांनों !' (कुडमुड्या जोशी) 'आंधळयाला पैका दे भगवान्' (आंधळा)

---

१ नाथ म्हणतातः "फेडावया देवांचीं सांकडी । स्वधर्म वाढवावया गाढी ॥ सोडा देवांची बांधवडी । उभवा रामराज्याची गुढी ॥ " कशासाठीं तर 'रायें रक्षावें गोब्राम्हण । करावें दुष्टांचें निर्दाळण ॥ परिपालन साधूंचें । "संरक्षावें गोब्राम्हण । हेंचि व्रत स्वधर्माचरण ॥"

'दार उघड बया, दार उघड' (आदिमाया) यांसारखी अनेक भारुडांची ध्रुपदें लोकांच्या तोंडीं आजहि घोळत आहेत. तसेंच—' सासरा (अहंकार) माझा गांवीं गेला। तिकडंच खपवी त्याला॥ सासू (कल्पना) माझी फार गांजते। मरि आइ येऊं दे तिला॥ (सासुरवास) ' बाई मी भोळी ग॥ आठा दिसां खाते मी पुरणाची पोळी ग॥' (भोळी) किंवा 'आम्हांला दादला नलगे बाई।' (दादला) यासारखी विनोदी हास्य-चित्रें आजहि सामान्यांचें रंजन करून अध्यात्मविचार किंवा नैतिक बोध लोकांना देऊं शकत आहेत. लोकवाङमयाचा हा एक उत्कृष्ट आदर्शच म्हणावयाचा. नाथभागवतांतील बोध खेड्यापाड्यांतील जनते-पर्यंत पोंचविण्याचें लोकशिक्षणाचें कार्य या भारुडांनीं केलें आहे. तसेंच यांमधून तत्कालीन लोकस्थितीचें जें दर्शन होतें, त्यावरून नाथांच्या अवलोकनाचा व सहानुभवाचा व्याप केवढा मोठा होता, तें कळून येतें.

पदें, अभंग, गौळणी या रचनेंत उपास्यदैवतांवरील एकनिष्ठ प्रेम आणि सर्वभूतीं भगवद्भाव अशा दोन्ही प्रकारें नाथांचा भक्तिभाव व्यक्त झाला आहे. हमामा, हुंबरी, काला, लपंडाई, पिंगा, फुगडी, भोंवरा, इत्यादि गोपगोपींच्या खेळांतून नाथांनीं आध्यात्मिक बोधाची हंसत खेळत खैरात केली आहे. कृष्णाच्या बालक्रीडांवरचीं मनोहर पदें व गोपींच्या शृंगारपरिपूर्ण अशा मधुर भक्तीचा उत्कट आविष्कार करणाऱ्या नाथांच्या गौळणी यांची अवीट गोडी प्रत्यक्ष चाखल्या-खेरीज कळणार नाहीं. ही सारी रचना कीर्तनोपयोगीच आहे. नाथांच्या पदरचनेचें बाह्यांग शृंगाराचें किंवा वात्सल्याचें असलें तरी, अंतरंग भक्तीचें आहे; त्यामुळें लौकिक रसांच्या पलीकडे-प्रपंचांतून परमार्थाकडे तो श्रोत्यांना नेऊं शकते. संख्या, गुण, वैचित्र्य या दृष्टीनें मराठी कवींत नाथ सर्वश्रेष्ठ पदकार ठरतील, 'असा कसा

देवाचा देव बाई ठकडा ' ' भिगाचें भिगुलें खांद्यावरी अंगुलें ' ' मन रामीं रंगलें । अवघें मनचि राम झालें ॥ ' यासारख्या चितवेधक ध्रुपदाची पदें कीर्तनांत रंग भरण्याची कीर्तनकरांची हमखास साधनेंच होत.

या प्रकारच्या बहुविध आणि विपुल वाङ्मयरचनेचा आशय आणि उद्देश लक्षांत घेतां एकनाथांनीं ज्ञानेश्वरांची परंपरा, त्यांचें कार्य, त्यांची विचारसरणीच पुढें चालविली असें दिसतें. नाथांनीं ज्ञानेश्वरीच्या जुन्या प्रती संशोधून ज्ञानेश्वरीची एक उत्कृष्ट प्रत संपादित केली. त्याचप्रमाणें ज्ञानेश्वरांच्या समाधीचा जीर्णोद्धार करून आळंदीच्या वारीचा प्रघात सुरू केला. त्याबरोबरच आपल्या भागवत-रामायणासारख्या स्वतंत्र ग्रंथरचनेनें ज्ञानेश्वरांच्या शिकवणुकीला उजाळा दिला. ' संतकृपा झाली । इमारत फळा आली ' या अभंगांत म्हटल्याप्रमाणें खरोखरच नाथांनीं ज्ञानेशांनंतर तीनशें वर्षांनीं मोडकळीस येऊं लागलेल्या भागवत संप्रदायाला आपल्या एकनाथी भागवताचा आधार देऊन सांवरून धरले. (जनार्दनी एकनाथ । स्तंभ दिला भागवत ॥) हेंच त्यांच्या जीविताचें महत्कार्य होय. तरी पण परिस्थितिभेदानें व वृत्तिभेदानें त्यांच्या भूमिकेंत जो फरक पडला, त्यांमुळें ज्ञानेश्वर-एकनाथांच्या वाङ्मयकृतींचें स्वरूपहि कांहींसें भिन्न झालें आहे. दोघांच्या लेखनशैलींतील फरकावरून या भिन्नतेची स्पष्ट जाणीव होते.

एकनाथ संत खरे, पण ज्ञानेश्वरांप्रमाणें त्यांची भूमिका प्रेषिताची नसून प्रवक्त्याची आहे. एकनाथ अव्वल दर्जाचे ग्रंथकार आहेत, पण त्याहि बाबतींत त्यांची भूमिका ज्ञानेशांप्रमाणें कलावंताची नसून पुराणिकाची आहे. ते कवि नाहींत, पंडित आहेत. भक्तहृदयाच्या प्रेमळतेमुळें त्यांच्या पांडित्यांत रुक्षता आलेली नाहीं इतकेंच. पण ज्ञानेश्वरीइतकी रसवत्ता नाथभागवतांत नाहीं. ज्ञानेश्वर-एकनाथ दोघेहि प्रवचनकारच; पण

एकनाथ व ज्ञानेश्वर

एकाचें प्रवचन उत्स्फूर्त आणि प्रवाही आहे तर, दुसऱ्याचें अभ्यासजड म्हणूनच अनेकदां खंडित झालेलें आहे. ज्ञानेश्वर सिद्धानुभव सांगून टाकतात तर, एकनाथ त्या अनुभवाच्या सिद्धीसाठीं शास्त्रवचनांचे आधार आणि पौराणिक संदर्भ देऊं लागतात. त्यांची विवेचनपद्धति म्हणूनच पघळ आहे. ज्ञानेश्वरींतील रेखीवपणाचें सौंदर्य नाथभागवतांत नाहीं. अगर ज्ञानेश्वरी ओंवीचा सुटसुटितपणा एकनाथी ओंवींत नाहीं. अर्थगौरवापेक्षां अर्थविस्तार, सूचकतेपेक्षां स्पष्टता, चित्रणापेक्षां वर्णनपरता, यांकडे नाथांचें लक्ष अधिक आहे. त्यामुळें नाथभागवतांत पुनरुक्ति, पाल्हाळ हे रचनादोष आढळतात. नाथांच्या विचारप्रधान वाङमयांत त्यांच्या वाणीचें घनत्व, प्रौढता व गांभीर्य हे विशेष उठून दिसतात. पण चपळता, लालित्य आणि मार्दव हे ज्ञानेश्वरीवाणीचे गुण नाथांच्या भाषेंत आढळत नाहींत. ज्ञानेश्वरांच्या प्रतिभेचा कल्पनाविलास एकनाथी ग्रंथांत आढळणार नाहीं. कल्पनेपेक्षां कल्पकतेवरच त्यांची मदार अधिक; त्यामुळें पदलालित्यापेक्षां एकनाथां-मध्यें पदचमत्कृतीचा हव्यासच दांडगा दिसतो. या सर्व गुणविशेषांचा प्रत्यय नाथभागवत वाचतांना येतो.

नाथांचें भाषिक व वाङमयीन कर्तृत्व फार मोठें आहे. ज्ञानेश्वरीच्या संशोधन-संपादनानें पाठशुद्ध प्रत तयार करण्याचा आदर्शच त्यांनीं घालून दिला. शिवाय आपल्या विविध प्रकारच्या स्वतंत्र ग्रंथरचनेनें मराठी

एकनाथांचें श्रेष्ठ वाङ्मयीन व्यक्तिमत्व

साहित्याला नवें वळण घालून देऊन एका नव्या युगालाच त्यांनीं प्रारंभ केला. अध्यात्मपर ग्रंथरचनेकडून कथावाङमयाकडे मराठी साहित्याचा ओघ त्यांनीं वळविला. आतांपर्यंत केवळ टीकात्मक वा स्फुट अभंगात्मक रचनाच प्राधान्यानें होत होती. आतां स्वतंत्र व सलग अशा कथाग्रंथ-निर्मितीचा आणि पदें, गौळणी, भारुडें यांसारख्या विविध स्वरूपाच्या ललित व ग्रामीण काव्यप्रकारांचा पायंडा नाथांनीं पाडला. नाथांनीं प्रचंड ग्रंथनिर्मितीनें मराठी भाषेचा मगदूर वाढविला आणि संस्कृतज्ञ पंडितांची मान्यता मिळवून मराठी साहित्याला एक प्रकारें प्रतिष्ठितपणा आणिला.

नाथपूर्व वाङ्मयांत शांत, भक्ति आणि वत्सल हे रसच काय ते आढळतात; तर नाथांनीं शृंगार, वीर करुण, हास्य या लौकिक रसांचा आपल्या कथात्मक नि जानपद काव्यांत परिपोष करून मराठी काव्याचा त्या बाबतींतील एकांगीपणा नष्ट केला. अर्थात् या कथाग्रंथांतहि रूपकांच्या योजनेनें अध्यात्माचें अनुसंधान कायम राखण्याची समन्वयबुद्धि नाथांनीं व्यक्त केली आहेच. नाथांच्या ग्रंथांतूनच तयार झालेल्या नव्या वाङ्मय-प्रकारांच्या तंत्राचा मागोवा घेत काव्यरचना करणारे अनेक कवी पुढील शतकांत आपल्या दृष्टीस पडतात. तेव्हां आपल्या पश्चात् सतराव्या शतकांतील थोर कवींची वैभवशाली परंपरा निर्माण करणाऱ्या युगप्रवर्तक साहित्यश्रेष्ठाचा मान एकनाथांनाच द्यावयास हवा.

नाथपंचक

एकनाथ आणि त्यांचे समकालीन दासोपंत, रामाजनार्दन, जनी जनार्दन, विठा रेणुकानंदन या पांचजणांचा उल्लेख 'नाथपंचायतन' या संज्ञेनें केला जातो. "आरती ज्ञानराजा । महाकैवल्य तेजा । "ही रामा जनार्दनांची ज्ञानेश्वरांवरील आरती प्रसिद्ध आहे. त्यांमधील 'प्रगट गुह्य बोले' 'विश्व ब्रह्मचि केलें' यासारख्या चरणांवरून ज्ञानेशांच्या विचारसरणींत मुरलेला असा हा कवि असावा, असें वाटतें. दुसऱ्या अनंतभुजाच्या आरतींतील "आरती अनंतभुजा । विठो पंढरी राजा" या उद्गारांवरून तो वारकरी पंथीय विठ्ठलभक्त दिसतो. विठा रेणुकानंदन हे देवीभक्त असून त्यांची पांचसात पदेंच तेवढीं उपलब्ध आहेत. जनी[1] जनार्दनांनीं '**निर्विकल्प**' किंवा उध्दवबोध

१ दामाजीप्रमाणेंच दुष्काळांत धान्य लुटविल्यामुळें यांना बादशहानें हत्तीच्या पायीं देण्याची शिक्षा फर्मावली. पण त्या प्राण्यानें यांना कांहींहि केलें नाहीं. पण आपल्या वंशजांनींहि यवनांची सेवा करूं नये अशी शपथ घालून जनीजनार्दनांनीं मात्र पश्चात्ताप वृत्तीनें चाकरी सोडून दिली आणि ईश्वर चरणीं आपली लेखणी वाहिली.

— जनी जनार्दन (राजवाडे)–संकीर्ण लेखसंग्रह आणि भा. इ. सं. मं. इतिवृत्त शके १८३६ (शं. श्री. देव.)

(ओंव्या ७१६) नांवाचा उद्धवकृष्णसंवादरूप अध्यात्म ग्रंथ, ' महावाक्य विवरण ' हें वेदांती प्रकरण, ' सीतास्वयंवर ' हें पौराणिक आख्यान इतकी रचना केली असून त्याशिवाय त्यांचीं वेदान्तपर व रामकृष्ण-चरित्रपर मराठी--हिंदी शें-दीडशें पदेंहि आहेत. नाथांच्या गाथेंतील जनार्दनस्वामींचे अभंग या जनी जनार्दनांचेच असावेत. या पंचकांतील जनी जनार्दन हे एकच तेवढे ग्रंथरचनेचें वळण व त्यांतील बोध या दृष्टीनें नाथांच्या जवळ बसूं शकतात. बाकी गुरुपरंपरा[२], उपास्य दैवत[३], वाङ्मयनिर्मिति, या बाबतींत या पांचजणांमध्यें तसें विशेष साम्य नाहीं. तरी त्यांचा उल्लेख एकत्र करण्यांत यावा, हें एक आश्चर्यच आहे. म्हणून ' नाथपंचायतन ' या संज्ञेंत तसें विशेष स्वारस्य दिसत नाहीं.

त्र्यंबकराज

त्र्यंबकराजांचा ' बालबोध ' (ओंव्या ५२४०) हा या कालांतील (रचनाकाल इ. स. १५७३-७८) एक महत्त्वाचा ग्रंथ होय. त्र्यंबकराजांनीं स्वकष्टानें अध्ययन, तपश्चरण करून योगमार्गाचें रहस्य अवगत करून घेतलें. त्या वेळीं त्यांच्या उपास्य दैवतानें श्रीसिद्धेश्वरानें जीं पांच वचनें सांगून त्यांना उपदेश केला, त्या वचनांचा विस्तार करून औपनिषदिक अध्यात्माचेंच विवरण या ग्रंथांत त्र्यंबकराजांनीं केलें आहे. अद्वैतनिष्ठ निर्गुणोपासनेचा व योगविद्येचा हा ग्रंथ असून त्यांत प्रणवस्वरूप, पंचीकरण, सृष्टि-उत्पत्ति-प्रळय, अष्टांगयोग

---

२ रामाजनार्दन, जनी जनार्दन या नांवावरून हे दोघे एकनाथांचे गुरुबंधु असावेत असें वाटतें. पण त्यांच्या नांवांतील ' जनार्दन ' हा उल्लेख जनार्दन-स्वामींचाच याबद्दल खात्रीचा पुरावा मिळत नाहीं.

३ दासोपंत दत्तभक्त, विठा रेणुकानंदन देवीभक्त, रामाजनार्दन विठ्ठलोपासक आणि जनीजनार्दन हे गणपति उपासक; तर एकनाथ मुख्यत: कृष्णभक्त. अर्थात् उपास्य दैवतांविषयीं या कोणांतहि तसा कडवेपणा दिसत नाहीं.

हे विषय आले आहेत. मात्र शब्दपांडित्यापेक्षां स्वानुभवाचा रंग यांत अधिक आहे. निरूपणपद्धति सुसूत्र व सुगम आहे. 'बालावबोध' अशा या विवेचनाला मार्मिक दृष्टान्तांनीं सरसपणाहि आला आहे. 'श्रोतियांवांचून दीन वक्ता' ही दृष्टि ठेवून त्र्यंबकराजांनीं ग्रंथाच्या काव्यांगाकडेहि लक्ष दिलेलें दिसतें. त्र्यंबकराजांपासूनच सुरू झालेल्या सिद्धेश्वर संप्रदायाचा 'बाळबोध' हा प्रमाणग्रंथ असल्याचें त्या संप्रदायांतील निरंजनमाधवांच्या 'सांप्रदाय परिमळ' या ग्रंथांतील उल्लेखावरून स्पष्ट होतें. विवेक-सिंधूच्या धर्तीवर रचिलेल्या या 'बालबोध' ग्रंथाचीहि छाप रामदासांच्या दासबोधावर पडली आहे.

विष्णुदासनामा

महाभारतकार विष्णुदासनामा हा नाथांचा समकालीन असावा; कारण याच्या नांवावरील 'शुकाख्यानांत' इ. स. १५९५ असा काळाचा उल्लेख आहे. या विष्णुदासनाम्याच्या व्यक्तिनिश्चितीबद्दल संशोधकांत पुष्कळच वाद आहे. पण ज्ञानेश्वरकालीन शिंपी नामदेवापेक्षां विष्णुदासनामा कोणी वेगळा असावा, एवढें मात्र खरें. कामाबाईच्या आरतींत 'विप्र विष्णुदास' असा एक उल्लेख आढळतो. नामदेवांच्या गाथ्यांतील अडीच हजार अभंगां-पैकीं कित्येक अभंग विष्णुदासनामाच्या नांवाचेच आहेत. त्या अभंगांत पाल्हाळ आणि पांडित्यप्रदर्शन या गोष्टी विशेष दिसून येतात. विष्णु-दासनामाच्या नांवावर कांहीं भक्तिचरित्रें, संतचरित्रें, कपोताख्यान, बुधबावणी, इत्यादि ग्रंथरचना मोडते ती सारी एकाच व्यक्तीची कीं काय याबद्दल संशय आहे. 'बुधबावणी' प्रकरणांत "अवगुण सांडिजे, ईश्वर सेविजे, ऊधार मैत्रासि न दीजे" यांसारखा व्यावहारिक उपदेश केला आहे. शिवाय मूळाक्षर व्यवस्थेंतील प्रत्येक वर्णाच्या आधारानें ओंवीची सुरुवात करण्याची चमत्कृति साधली आहे. समंत्र काव्यरचनेचा हा आरंभच म्हटला पाहिजे. विष्णुदासनाम्याचें

महाभारत सुमारें वीसहजार ओंव्यांचें असावें. मराठींतील हें पहिलेंच महाभारत असून भारताची समग्र अठरा पर्वे लिहिणारा विष्णुदासनामा हाच मराठी भाषेंतील पहिला ग्रंथकार होय. मुक्तेश्वर प्राकृत कवींच्या रचनेचा आपल्या सभापर्वांत उल्लेख करतो, त्यावरून विष्णुदासनाम्याच्या महाभारताचा त्या काळीं बराच बोलबाला असावा असें वाटतें.

महालिंगदास नांवाच्या खानदेशी कवीनें वेताळपंचविशी सिंहासनबत्तिशी (इ. स. १५६५) या गद्य ग्रंथांवर पद्यरचना केली आहे. व्यवहारचातुर्य व राजनीति यांच्या बोधासाठीं लौकिक स्वरूपाच्या रूढ कथावाङ्मयाकडे या काळांतील कवींचें लक्ष वळत होतें, याचा हा दाखलाच होय. पंचोपाख्यान (संस्कृत पंचतंत्र), चाणक्यनीति, शालिहोत्र (अश्वशास्त्रविषयक), इत्यादि याच कवीचे ग्रंथ व्यवहारोपयोगी माहिती देणारे व नीतिबोध करणारे असेच आहेत. वेताळपंचविशींत ९६ कुळींचे रजपूत व मऱ्हाठे यांची जी नामावळी दिली आहे, ती ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाची ठरेल.

एकनाथांनंतर तुकारामांपर्यंतच्या कालखंडांत एकनाथांची टीकाग्रंथलेखनाची व कथाग्रंथांची परंपरा चालविणारी शिवकल्याण, रमावल्लभदास, शामाराध्य, कृष्णदास मुद्गल, कृष्णयाज्ञवल्की व मुक्तेश्वर अशी एकाहून एक जबरदस्त मंडळी होऊन गेली.

शिवकल्याण

त्यांपैकीं शिवकल्याण हे नाथांच्या पांडित्यपूर्ण टीकालेखनाच्या परंपरेंतील मोठे अधिकारी ग्रंथकार होत. मुक्ताबाईकडून चालत आलेल्या नाथपरंपरेंतील हे चौदावे पुरुष (इ. स. १५६८-१६३८) जोगाईचें आंबें या भागांत आत्मानुभवी योगी, वेदान्ती पंडित व परमकृष्णभक्त म्हणून हे प्रख्यात होते. भागवताच्या एका दशमस्कंधावर एक लाख ओंव्यांची प्रचंड टीका त्यांनीं लिहिली होती,

असें म्हणतात. त्यांपैं कीं बारातेरा हजार ओंव्यांचीं भागवताचीं चार प्रकरणें तेवढीं उपलब्ध आहेत. कृष्णलीलांचा अध्यात्मपर अर्थ लावण्याचें एकनाथी वळणच शिवकल्याणांच्या कृष्णजन्म, रासक्रीडा या प्रकरणांत दिसून येतें. 'शृंगाररसचि शांतिरसें मांडला' असें आपल्या रासपंचाध्यायी-विषयीं स्वतः शिवकल्याणांनीं म्हटलें आहे. त्यांची ही भागवतटीका अध्यात्म, भक्ति, शृंगार, इत्यादींमुळें सरस उतरली आहे. परंतु अमृतानुभवावरील 'नित्यानंदैक्यदीपिका' (इ. स. १६३५) या सविस्तर (ओंव्या ६३१०) व अत्युत्कृष्ट टीकेमुळें शिवकल्याण आज विशेष प्रसिद्ध आहेत. गोपाळ याज्ञवल्कींच्या प्रेरणेनें लिहिलेल्या या टीकेंत ज्ञानेश्वरांचें हृद्गत अगदीं समरसतेनें शिवकल्याणांनीं विशद केलें आहे; म्हणूनच ज्ञानेश्वरपरंपरेला उजाळा देण्याचें श्रेय एकनाथांप्रमाणेंच शिवकल्याणांकडे जातें.

कोंकण व कारवार या भागांत कृष्णभक्तीचा प्रसार करणारे रमा-वल्लभदास (इ. स. १५८८-१६४८) हे या कालांतील दुसरे मोठे टीकाकार. गीतेवरील 'चमत्कारी' टीका (इ. स. १६२८), शंकराचार्यांच्या वाक्यवृत्तीवरील मराठी टीका, कृष्णजन्मावरील 'दशक निर्धार' (इ. स. १६३३) हे तीन ग्रंथ आणि 'चिमणेसें मूल, चिमणासा पावा' किंवा 'कृष्ण आवडी देखेन केव्हां दृष्टी' यांसारखीं कृष्णभक्तीचीं मधुर पदें, इतकी रचना त्यांनीं केली आहे. वेदान्ती पांडित्य व कृष्णभक्ति यांचा समन्वय यांच्या ग्रंथांत दिसून येतो. त्यांच्या टीकाग्रंथांवर ज्ञानेश्वर-एकनाथ यांची छाप स्पष्ट आहे.

रमावल्लभदास

सलग, विस्तृत आणि ओंवीसंख्येच्या दृष्टीनें प्रचंड ग्रंथरचना करण्याची या कालांतील ग्रंथकारांची प्रवृत्तीच दिसून येते. तिचें उत्कृष्ट उदाहरण म्हणजे **श्यामाराध्य** नांवाच्या उद्योमी पुरुषाची बहुविध रचना

होय. ज्ञानेश्वरींतील कठिण शब्दांचा अर्थ सांगणारी पद्यमाला, भागवताच्या दुसऱ्या व दहाव्या स्कंधांवरील ओंवीबद्ध टीका, गीता-टीका, उपनिषदांवर मराठी भाष्य आणि नित्यानित्यविचार, ज्ञानोदयसिंधु, इत्यादि वेदान्तपर प्रकरणें, शिवाय भारत, भागवत, रामायण यांतील सर्व आख्यानें एवढी रचना शामराज आराध्ये या पंडितानें केलेली दिसते. मात्र मांडणी किंवा भाषाशैली यांबाबत कांहींहि वैशिष्टय वा गोडी त्यांत आढळत नाहीं.

कथाकाव्याच्या दृष्टीनें कृष्णदास मुद्गलाचें '**रामायण युद्धकांड**' (अ. ७८ ओंव्या ८ हजार) हा ग्रंथ ह्या कालाला भूषणभूत झाला आहे. **कृष्णदास 'मुद्गल** हे पैठणचे राहणारे असून मुक्तेश्वरांच्या अगोदर होऊन गेले असावेत. मुक्तेश्वरांप्रमाणेंच यांच्या काव्यांत अध्यात्मविवेचना-पेक्षां कथानिवेदनावर व साहित्यनिर्मितीवर जास्त भर आहे. मराठ्यांच्या स्वाभाविक युयुत्सु वृत्तीला प्रोत्साहन देणारें असें हें वीररसप्रधान काव्य असल्यानें स्वराज्यस्थापनेच्या काळांत किल्ल्याकिल्ल्यावर त्याचीं पारायणें होत असत; इतकें हें लोकप्रिय होतें, असें दिसतें.

'**कथाकल्पतरू**' कर्ते कृष्णयाज्ञवल्की व मधुकर हे याच काळांतील कथाकवी होत. 'संस्कृताचा अर्थ । प्राकृतासी नव्हे प्राप्त ।' म्हणून वेद, शास्त्रें, पुराणें, उपपुराणें, रामायण, महाभारत, भागवत या ग्रंथांत विखुरलेल्या अनेक कथा मऱ्हाटींत आणण्यासाठीं ३९ हजार ओंव्या लिहिण्याचा विक्रम ह्या दोघांनीं केला; तो कौतुकास्पद तर खराच पण त्यावरून तत्कालीन लोकांचीं अभिरुचि स्पष्ट होते. पंचरत्न टीका लिहिणारे रंगनाथ मोगरेकर आपल्या 'चित्सदानंद लहरी' या गीताटीकेंतहि प्रत्येक अध्यायाच्या शेवटीं एकेक कथा देतात; किंवा शिवकल्याणांसारखे योगी अध्यात्मपर अर्थ लावीत कां होईना. पण कृष्णचरित्रांतील रास-क्रीडेवर शृंगाररसपूर्ण अशा चार हजारांवर ओंव्या लिहितात, यावरून तशा प्रकारची लोकप्रवृत्तीच त्या काळांत होती असें दिसतें.

लौकिक स्वरूपाच्या स्त्रीपुरुष-प्रेमाचें रसभरित वर्णन स्वानुभवानें करणाऱ्या जगन्नाथ पंडिताचा महाराष्ट्रीय अवतार म्हणजे जुन्नर भागांतील कवि **लोलिंबराज** व त्यांचें प्रेमकाव्य म्हणजे '**रत्नकलाचरित्र**' (श्लोक ८५) हीं याच कालांतील होत. जुन्नरच्या यवन सुभेदाराच्या न्येवर प्रेम करणारा हा कवि स्वतःला 'कवि पातशाह' असें म्हणवून घेतो. उभयतांच्या प्रेमविलासांचीं उघड वर्णनें कवीनें यांत केली असली तरी, प्रेयसीच्या मृत्युनंतर तत्संबंधींच्या स्मृतींत कवि रंगला असल्यानें विरह-काव्याचा दर्जा या प्रेमकथेला प्राप्त झाला आहे 'वैद्यजीवन' (इ. स. १६३३) या नांवाचा वैद्यकीवरील एक व्यवहारोपयोगी संस्कृत-ग्रंथहि या कवीच्या नांवावर उल्लेखिला जातो. या वैद्यक ग्रंथाचा अनेक वृत्तात्मक श्लोकबद्ध मराठी अनुवादहि उपलब्ध आहे. याच लोलिंब-राजानें **दशमस्कंध** टीकाहि लिहिली असून जुन्या बाडांत त्याची पदेंहि पुष्कळच आढळतात.

ख्रिस्त धर्मियांचें वाङ्मय

ख्रिस्ती धर्मियांची मराठी वाङ्मय निर्मिती हा या कालांतील आणखी एक उल्लेखनीय विशेष होय. त्यामध्यें फादर टॉमस स्टीफन्स (इ. स. १५४९-१६१९) यांच्या '**ख्रिस्तपुराणाला**' (इ. स. १६१४) पहिलें स्थान दिलें पाहिजे. फादर स्टीफन्स हे हिंदुस्थानांत आलेले पहिले इंग्रज गृहस्थ. ते २४ ऑक्टो. १५७९ रोजीं गोव्यास आले. साष्टी भागांत ख्रिस्ती धर्मोपदेशक म्हणून तब्बल ४० वर्षें त्यांनीं घालविली. त्या वेळीं धर्मप्रचाराच्या प्रेरणेनें कां होईना, पण त्या भागांतील कोंकणी मराठीवर त्यांनीं चांगलें प्रभुत्व कमाविलें. कोंकणी भाषेचें एक व्याकरणहि त्यांनीं इंग्रजींत लिहिलें आहे. ज्ञानेश्वरादि संतांच्या वाङमयाचा व्यासंग, ग्रांथिक मराठीवरील प्रभुत्व व मराठी भाषेचा अभिमान या गोष्टी स्टीफन्स यांच्या ख्रिस्तपुराणावरून चांगल्या दिसून येतात. मूळ पोर्तुगीज भाषेंत लिहिलेल्या

ख्रिस्तपुराण'ला ओंवीवद्ध मराठी वेष चढविणें ही त्यांची वाङमयीन कामगिरी मोठी प्रशंसनीय आहे. ख्रिस्तपुराणाला मराठींतच एक विस्तृत प्रस्तावना त्यांनीं जोडिली आहे. तीवरून सतराव्या शतकांतील मराठी गद्याची योग्य कल्पना येते.

स्टीफन्सच्या अनुकरणानें इतरहि जेझुएट कवींनीं मराठींत त्या वेळीं ग्रंथरचना केलेली दिसते. त्यापैकीं फादर क्रुवा या फ्रेंच पाद्र्यानें **सेंट पीटरच्या** चरित्रावर रचिलेलें '**महापुराण**' विशेष उल्लेख-

फादर 'क्रुव चें महापुराण

नीय आहे. कृतघ्न विष्णु, स्त्रीघातकी राम, मातृघ्न परशुराम, गणेशभजनाचें खंडन, तुळशीच्या कुढ्या भजनाचें खंडन, इत्यादि मथळ्यांखालीं हिंदूंच्या दैवतांवर व आचारांवर या महापुराणांत कडाडून हल्ला चढविला आहे. त्यांतील आशयापेक्षां भाषाविशेषांकडे पाहूनच हें वाङमय अभ्यासिलें पाहिजे. ऐतिहासिक व भाषाशास्त्रीय अभ्यासाच्या दृष्टीनें जेझुएट[१] लोकांचे या काळचे मराठी ग्रंथ म्हणजे मराठी वाङमयाचा अमोल ठेवा आहे. धर्मप्रचारासाठीं कां होईना पण परभाषी (आणि परद्वीपस्थ) लोकांनीं मराठी भाषा शिकण्यास उद्युक्त व्हावें; इतकेंच नव्हे तर ग्रांथिक मराठीचा व्यासंग करून ग्रंथरचनेचा एवढा खटाटोप करावा, ही गोष्ट त्यांच्या बाजूनें कौतुकास्पद तर खरीच, पण मराठीच्या दृष्टीनें अभिमानास्पद वाटावी अशीच आहे. या काळांतील भाषासंवर्धनाच्या प्रवृत्तीची ही एक महत्त्वाची निशाणीच म्हणावयाची.

---

१ 'जेझुएटांचें मराठी वाङमयकार्य' (श्री. अ. का. प्रियोळकर)— यशवंत, अंक ८८, एप्रिल १९३८.

कलात्मक दृष्टीनें कथानिवेदन करणें हा या कालखंडाचा आणखी एक विशेष. ह्या प्रवृत्तीचा अग्रेसर कवि एकनाथांचा नातू मुक्तेश्वर हाच होय. भक्तिसंप्रदायांतून स्फूर्ति घेऊन केवळ काव्यानंदाच्या हेतूनें कलाविलासांत रंगून गेल्यामुळेंच मुक्तेश्वर हा महाराष्ट्र कविमालिकेंत अजरामर झाला आहे. संतपणाची वा महंतपणाची कसलीच अन्य उपाधि त्याच्या पाठीशीं नाहीं. "महाराष्ट्र कवींत कवि ही संज्ञा एका मुक्तेश्वरालाच मात्र बरोबर लागते," असें कृष्णशास्त्री चिपळूणकरांसारख्या रसिक पंडितानेंहि म्हटलें आहे.

मुक्तेश्वर

एकनाथांच्या गोदा नामक मुलीचा हा मुलगा. (जन्मकाल[1] सुमारें इ. स. १५७४). वडिलांचें नांव चितामणि, आडनांव मुद्‍गल (?) वास्तव्य बहुतेक आजोळींच; त्यामुळें प्रत्यक्ष नाथांच्या तालमींतच त्यांचें सर्व शिक्षण झालें. पुढें तीर्थयात्रेच्या निमित्तानें त्यांनीं खूप देशाटण केलें. रामायण-महाभारतावर महत्त्वाची व कलापूर्ण ग्रंथरचना केली. इ. स. १६४५ च्या सुमारास ते निधन पावले. तेरवाड गांवीं त्यांची समाधि आहे. [2]नव्या संशोधनानें त्यांच्यासंबंधींच्या या माहितीवर कांहीं अधिक प्रकाश पडत आहे. त्यावरून असें दिसतें कीं, 'लीला विश्वंभर' हा उल्लेख कोणत्याहि अर्थानें त्यांच्या मातापित्यांचा नसून त्यांच्या उपास्य दैवताचा आहे. मुक्तेश्वर हे दत्तसंप्रदायी असल्यानें 'लीला विश्वंभर' या पदानें ते दत्तात्रेयाचाच उल्लेख करतात. खुद्द मुक्तेश्वर हें नांव देखील दत्तात्रेयाचेंच आहे. त्यांनीं तें काव्यासाठीं धारण केलेलें 'मुद्रानाम' (टोपणनांव) दिसतें. "कवीचें मूळचें नांव मुद्‍गलच. तें आडनांव नाहीं," असें श्री. प्रियोळकरांनीं

१ प्राचीन मराठी कविपंचक, पृ. १८ ते २५ -(प्रो. द. सी. पंगु)
२ मुक्तेश्वराचा शोध-आदिपर्व-प्रस्तावना-(श्री. प्रियोळकर). आपल्या विराटपर्वाच्या प्रस्तावनेंत प्रो. पंगु यांनीं श्री. प्रियोळकरांच्या निष्कर्षांबाबत कांहीं शंका व आक्षेप घेतले आहेत.

सिद्ध केलें आहे. मुक्तेश्वरांच्या कालाबद्दलहि जुन्या-नव्या अभ्यासकांत मतभेद आहेत. मुक्तेश्वरांचा जन्मकाल श्री. वि. ल. भावे व श्री. दा. के. ओक हे इ. स. १६०९ धरतात. परंतु त्यांच्या ग्रंथांत स्वराज्योन्मुख महाराष्ट्रापेक्षां मुसलमानी सत्तेनें गांजलेल्या महाराष्ट्राच्या मन:स्थितीचेंच प्रतिबिंब पडलेलें आहे. शिवाय त्यांतील डच, इंग्रज या परकीय लोकांचा उल्लेख, व फ्रेंचाचा अनुल्लेख[1]; भाषेचें एकनाथी वळण आणि महाराष्ट्रांतील तत्कालीन परिस्थितीचे पडसाद या सर्वांवरून मुक्तेश्वर हे शिवपूर्वकालांतीलच म्हणावे लागतात. त्यांच्या भारताची रचना इ. स. १६१८ ते १६३८ या कालांतील असावी.

मुक्तेश्वरांची कविता

मुक्तेश्वरांची एकूण उपलब्ध कविता सरासरीनें सतरा हजार ओंव्या इतकी भरेल. त्यांचीं भारताचीं आदि, सभा, वन व विराट हीं ओळीनें चार आणि शेवटल्यापैकीं सौप्तिक अशीं पांचच पर्वें आज उपलब्ध आहेत. त्यावरून त्यांनीं समग्र महाभारत लिहिलें असावें, असें वाटतें. कदाचित् महाभारतलेखनाचा उद्योग कांहीं कारणानें त्यांनीं अर्ध्यावरच सोडून दिला असावा. त्यांच्या भागवतरचनेचाहि उल्लेख कोणी करतात, पण तें कोठें आढळत नाहीं. ओंवीबद्ध भारताचीं पांच[2] पर्वें; श्लोकबद्ध संक्षेप-रामायण; हरिश्चंद्र, शतमुखरावणवध, गजेंद्रमोक्ष, विश्वामित्रभोजन, अर्जुनकामपूर्ति, शुकरंभा-

---

१ मुक्तेश्वर, संकीर्ण लेखसंग्रह, पृ. १-१४—(वि. का. राजवाडे).

२ आदिपर्वाचें संशोधन व संपादन श्री. प्रियोळकरांचें चालू आहे. त्याचे दोन खंड प्रसिद्ध झाले आहेत. सभा, वन, विराट या पर्वांच्या संपादित प्रति प्रा. पंगु व प्रा. वि. म. कुलकर्णी यांनीं प्रस्तावना-टीपा यांसह प्रसिद्ध केल्या आहेत.

संवाद, इत्यादि आख्यानें; मूर्खांचीं लक्षणें, भगवद्‌गीता, एकनाथचरित्र अशीं कांहीं प्रकरणें; आणि दतभक्तिपर पदें, कांहीं आरत्या; एवढी मुक्तेश्वरांची ग्रंथरचना आहे.

मुक्तेश्वरांचें **वृत्तबद्ध रामायण** (श्लोक ६६१) काव्यदृष्टया सामान्य आहे. त्यावरून कवीची नवशिकेपणांतील अनुकरणाची प्रवृत्ति व बाह्य सजावटीचा हव्यास हीं स्पष्ट दिसून येतात. संस्कृत कवींच्या अनुवादपर भागावरून व रचनेच्या खडबडितपणावरून ही प्रथमावस्थेंतील काव्यरचना असल्याचें उघड होतें. तरी पण सुंदरकांड व युद्धकांड यांतील वीररस उठावदार आहे. भाषेचें वळणहि शुद्ध मराठी आहे यांतील कांहीं श्लोक तर रामदासी वाणीची आठवण करून देतात. **स्फुट प्रकरणांपैकीं** हरिश्चंद्राख्यान, मूर्खाचीं लक्षणें व शुकरंभासंवाद हीं तीनच सरस आहेत. अध्यात्मज्ञान व भक्ति यांचा उपदेश करणारी मुक्तेश्वरांची पद्यरचना त्यांचा नीतिशिक्षकाचा अधिकार स्पष्ट करण्याला समर्थ आहे. ढोंगी गुरु व नालायक शिष्य यांचा खरपूस समाचार घेण्यांत तुकारामांप्रमाणें मुक्तेश्वरांचीहि वृत्ति निर्भीड व वाणी सडेतोड असल्याचें दिसून येतें

मुक्तेश्वरांचें **भारत** म्हणजे ' महाराष्ट्र साहित्यांतील कोहिनूरच.' महाभारतावर रचना करणाऱ्या पंचविसांवर कवींत मुक्तेश्वर हे अग्रगण्य आहेत. या प्रतिभासंपन्न व कलाचतुर कवीच्या वाणीचे सारे गुण पहिल्या

मुक्तेश्वरी भारतीचे काव्यगुण

चार पर्वांत प्रकट झालें आहेत. रसोत्कर्ष, कल्पनाविलास आणि वर्णन चातुर्य यांबाबतींत मुक्तेश्वरांची प्रतिभा अगदीं सिद्धहस्त आहे. त्यांच्या ओंवीचा प्रवाहीपणा व सहजता पाहातां ' ओंविका कवीचा ईश्वरु ' हें त्र्यंबकाचे शब्द सार्थ वाटतात. मुक्तेश्वरांची वाणी खरोखरच ' नवरसांची मंदाकिनी ' आहे. ती प्रसंगानुरूप कोमल किंवा कठोर,

प्रसन्न किंवा प्रक्षुब्ध, लडिवाळ किंवा गंभीर, अशीं विविध रूपें सारख्याच समरसतेनें व कौशल्यानें धारण करते. विषयपरत्वें त्या त्या वर्णनामध्यें तो तो भाव मूर्तिमंत प्रकट करण्याचें मुक्तेश्वरी वाणीचें सामर्थ्य अगदीं अप्रतीम आहे. शृंगार, वीर, करुण, इत्यादि सारेच रस मुक्तेश्वरांपुढें हात जोडून उभे आहेत. विशेषतः उग्रभीषण रणसंग्राम वर्णन करतांना त्यांच्या भाषेंतील सारें ओज आणि ऐश्वर्य एकदम अवतीर्ण झाल्याखेरीज राहात नाहीं. हरिश्चंद्रासारख्या शोकपूर्ण आख्यानांतील करुणोदात्तता, युद्धप्रसंगांच्या भीषण वर्णनांतील रौद्ररम्यता आणि शृंगारिक कथांतील उत्तानता या सर्वांच्या आविष्कारांत मुक्तेश्वरांची सौंदर्यदृष्टी व अभिजात रसिकताच व्यक्त होते. परस्परविरोधी वृत्तींचें भावचित्रण करण्यांत जुन्या कवींत मुक्तेश्वरांचा हात कोणीहि धरूं शकत नाहीं. भीम, धर्म, अर्जुन, शकुंतला, दमयंती, द्रौपदी इत्यादींचीं यथोचित स्वभावचित्रें त्यांनीं रेखाटलीं आहेत. त्यांचीं प्रसंगचित्रेंहि रेखीव आणि ठसठशीत असतात. सृष्टिसौंदर्याच्या मुक्तेश्वरी वर्णनाला तर मराठी काव्यांत दुसरी कोठेंच तोड नाहीं. निरनिराळ्या ऋतूंचीं मनोवेधक शब्दचित्रें मुक्तेश्वरांनींच काढावीत. मराठी भाषेचा अस्सलपणा व त्यांच्या प्रतिभेचा स्वैर विलास येथेंच पहावयास मिळतो. या सर्व विशेषांमुळेंच महाभारतांतील समुद्र-मंथन, दुष्यंत-शकुंतला, नल-दमयंती, सावित्री, द्रौपदीवस्त्रहरण, विराट-नगरींतील गोग्रहण, इत्यादि आख्यानें मोठीं बहारीचीं व सरस उतरलीं आहेत.

महाराष्ट्र देश व भाषा यांबद्दलचा अभिमान हा मराठी कवींचा पारंपारिक विशेष मुक्तेश्वरांमध्यें अधिक उत्कटत्वानें दिसून येतो. विषयांतर करूनहि राष्ट्रीय भावनेचा आविष्कार करणारा असा हा महाराष्ट्रीय कवि आहे. सामाजिक अधोगतीचें वर्णन करतांना तो

मुसलमानी अंमलाच्या दुष्परिणामाचेंच चित्र रेखाटतो. मुक्तेश्वरांचे पांडव इंग्रज, फिरंगी, मुसलमान यांनाहि जिंकतात (!) असा कालविपर्यासाचा दोष पत्करूनहि मुक्तेश्वर आपल्या कालाचा ठसा उमटवितातच. कुस्त्यांचीं किंवा मल्लयुद्धांचीं त्यांचीं वर्णनें मुक्तेश्वरकालीन महाराष्ट्रीय वातावरणांत आपणाला नेऊन सोडतात. भोजनाचे पदार्थ, वस्त्रप्रावरणें, वाद्यें किंवा शस्त्रें यांच्या वर्णनांनींहि त्याच देशकालपरिस्थितीची ओळख आपणाला पटते. त्यामुळेंच 'ऐतिह्य प्रतिभेचा कवि' असें इतिहासाचार्य राजवाड्यांनीं मुक्तेश्वरांना गौरविलें आहे. या वर्णनांतील बहुविध उल्लेखांवरून देशाटन करून आलेल्या मुक्तेश्वरांच्या बहुश्रुततेचा, पांडित्याचा व समाजनिरीक्षणाचा प्रत्यय वाचकाला येतो. मुक्तेश्वरांनीं केलेल्या वृक्षांच्या, पक्वान्नांच्या वर्णनांत कोठें कोठें पाल्हाळ, अतिशयोक्ति, किंवा स्त्रीरूपवर्णनांत कांहीं ठिकाणीं उत्तानता, अश्लीलता आल्यानें रसिकाचें मन नाराज होतें; पण मुक्तेश्वरांच्या गुणवैभवांत हे किंचित् दोष पार लोपून जातात. सहजरम्य अशा लालित्यपूर्ण भाषेंतील स्वैर कल्पनाविहार हा मुक्तेश्वरी प्रतिभेचा प्रमुख धर्म आहे. मुक्तेश्वर हे रससिद्ध वाणीचे जातिवंत कवि आहेत. विशाल कल्पना, उत्कट भावना, उदात्त विचार, संपन्न चित्रण, रेखीव शब्दचित्रें, ओघवती शैली आणि जातिवंत मराठी भाषा या वैशिष्ट्यांमुळें श्रेष्ठ दर्जाचा प्रतिभासंपन्न कलावंत हें मुक्तेश्वरांचें स्थान मराठी साहित्यांत अढळ होऊन राहिलें आहे.

ज्ञानेशादिकांनीं उभारलेल्या भागवतधर्माच्या मंदिरावर कळस चढविण्याची कामगिरी याच कालखंडांत देहूच्या तुकारामबुवांनीं पार पाडली. ज्ञानेश्वरांनीं स्त्रीशूद्रादिकांच्या आध्यात्मिक उन्नतीचें जें ध्येय

संत तुकाराम

आपल्यापुढें ठेविलें होतें, तें तुकारामांच्या रूपानें जणूं कांहीं प्रत्यक्षांत अवतरलें. 'वेदांचा तो अर्थ आम्हांसीच ठावा ।' असें म्हणण्याचा अधिकार प्राप्त करून घेउन एका शूद्रानें आत्मोन्नतीचा खरोखर कळस गांठला, हाच तुकारामांच्या चरित्राचा सामाजिक अर्थ होय.

मोऱ्यांच्या कुळींतील सधन व धर्मनिष्ठ अशा आंबिले घराण्यांत तुकारामांचा जन्म झाला. (इ. स. १५९९[1] किंवा १६०८[2]). वडिलांच्या मृत्यूनंतर अंगावर पडलेला दुकानदारीचा व्यवसाय आणि दोन बायकांचा संसार ही गृहस्थाश्रमाची जबाबदारी चांगल्या रीतीनें पार पाडण्यामध्यें तुकारामांच्या वयाचीं सतरा वर्षें सुखांत व समाधानांत गेलीं; पण त्यानंतर दुष्काळामध्यें झालेले प्रियजनांचे मृत्यु, व्यापारांत आलेली बूड आणि संसाराची झालेली वाताहात या आपत्तींनीं घेरल्यावर तुकाराम वैतागून गेले. विरंगुळयासाठीं त्यांनीं भक्तिमार्गाची कांस धरली. वंशपरंपरेनें त्यांच्या घराण्यांत चालत आलेल्या विठ्ठलोपासनेच्या व संतवचनांच्या निवाऱ्याला जातांच त्यांच्या वैतागाची जागा खऱ्याखुऱ्या वैराग्यानें घेतली. संसारिकाच्या आसक्तीचें भगवद्भक्ताच्या अनासक्ति योगांत रूपांतर झालें. त्यानंतर स्वप्नांतच त्यांना केशव (बाबाजी) चैतन्यांचा गुरूपदेश झाला[3] (इ. स. १६३२) त्यापूर्वींच नामदेवांच्या दृष्टान्तानें कवित्वाची स्फूर्ति होऊन तुकोबा आत्माविष्कारपर अभंगरचना करूं लागले. अंतर्मुख दृष्टीनें जीवनाचा शोध घेऊं लागतांच त्यांच्या ठिकाणीं अद्वैतबोधाचा उदय झाला. आणि 'आम्हां हें कौतुक जगा द्यावी नीत।' किंवा 'धर्माचें पाळण। करणें पाखांड खंडण॥' या प्रकारची त्यांची ध्येयनिश्चिति होत गेली. साधकावस्थेंतच लोकांनीं त्यांची हेटाळणी, उपहास करावयास सुरुवात

---

१ महाराष्ट्र–सारस्वत-पुरवणी, पान ९६०–(डॉ. शं. गो. तुळपुळे).

२ श्रीतुकाराम–चरित्र, प्र. २ (ल. रा. पांगारकर).

३ डॉ. रा. ग. हर्षे यांच्या मतें हा सन इ. स. १६३९ आहे. श्री. पांगारकर इ. स. १६३२ मानतात. तर श्री. बेंद्रे इ. स. १६४०-४३ धरतात (मंत्रगीता, प्रास्ताविक, पृ. २३–२४).

केली होती. पण आध्यात्मिक दृष्ट्या आत्मिक समाधान लाभतांच ' आतां उरलों उपकारां पुरता ' अशा सिद्ध भावनेनें त्यांची अभंगवाणी लोकांना उपदेश करूं लागली; तेव्हां तर हितसंबंधीं लोकांकडून त्यांचा छळवादच मांडला गेला. कर्मकांडाच्या बडिवारापेक्षां भक्तीचें श्रेष्ठत्व ते सांगत होते. वर्णश्रेष्ठत्वापेक्षां सदाचारांचा महिमा तें गात होते. म्हणूनच समाजांतील वरिष्ठ वर्णियांचा व प्रतिष्ठितांचा रोष त्यांना सहन करावा लागला. सालोमालोनें त्यांच्या कवित्वाची चोरी केली. मंबाजी गोसाव्यानें त्यांना प्रत्यक्ष मारहाण केली. त्याहि पुढें जाऊन रामेश्वरभट्टांसारख्या विद्वान् धर्माधिकाऱ्याच्या आज्ञेनें तुकारामांच्या अभंग – वह्या इंद्रायणींत बुडविण्याचा घाट ब्राह्मण मंडळींनीं घातला. पण त्या वह्या अभंगच राहिल्या.[१] अठरापगड जातीच्या सामान्य लोकांनीं मुखोद्गत केलेले तुकोबांचे अभंग बुडूं शकले नाहींत. लोक-गंगनेंच ते तारले. याप्रमाणें वर्णश्रेष्ठत्व, पांडित्य व कर्मठपणा हीं मोठेपणाचीं गमकें झिडकारून व्यक्तिगत चारित्र्य, भक्तिभाव आणि प्रवृत्तिपर धर्मनिष्ठा यांची थोरवी स्वतःच्या उदाहरणानें तुकारामांनीं सिद्ध केली. म्हणून तर रामेश्वरभटांसारखे विद्वान् ब्राह्मण आणि शिवाजीराजांसारखे पराक्रमी क्षत्रिय तुकारामांच्या चरणीं लीन झाले. ब्राम्हण-क्षत्रियांनीं एका अधिकारी शूद्राला दिलेला हा करभार म्हणजे ज्ञानेश्वरादिकांनीं सुरू केलेल्या धर्मक्षेत्रांतील परिवर्तनाची यशस्वी परिणतीच म्हणावयाची. वारकरी पंथाच्या तीनशें वर्षांच्या लोकमान्यतेवर तुकारामांच्या कर्तृत्वामुळेंच अशा रीतीनें राजमान्यतेचें शिक्कामोर्तब झालें. पण या दोन्ही मान्यतांच्या बाबतींत निरिच्छ असलेल्या तुका-

१ हे सर्व प्रसंग काल्पनिक आहेत, असें श्री. वा. सो. बेंद्रे यांनीं नवीन संशोधनानें दाखवून दिलें आहे — मंत्रगीता, प्रास्ताविक पाहा.

रामांनीं शिष्यपरिवार आणि राजगुरुत्व या दोन्ही उपाधींचा व्याप टाळण्यासाठींच जणूं कांहीं 'सदेह स्वर्गगमना'चा–समाधिस्थ होण्याचा मार्ग पत्करला (इ. स. १६५०)[1]

तुकारामांच्या जीवनचरित्राला व वाङमयीन कर्तृत्वाला सामाजिक अधिष्ठानहि आहे. साधकावस्थेंतील मनाची मोहवशता व लब्धप्रतिष्ठितांचा विरोध या दोहोंशीं झगडूनच त्यांना आपली आत्मिक प्रगति करून घ्यावी लागली. 'रात्रंदिवस आम्हां युद्धाचा प्रसंग। अंतर्बाह्य जग आणि मन॥' असें या झगडयाचें दुहेरी स्वरूप ते स्वत:च वर्णन करतात. त्यांचा हा झगडा केवळ वैयक्तिक नव्हता. तत्कालीन शूद्राति–शूद्रांच्या जीवनाच्या सामाजिक पार्श्वभूमीवरच तो चालू होता. त्यामुळें त्या वर्गाचें सामुदायिक मनच तुकोबांच्या या उद्गारांत व्यक्त झालें आहे. तुकारामांच्या एकंदर अभंगवाणींतहि व्यक्तिगत आत्माविष्काराबरोबर वर्गीय सुखदु:खांचा आविष्कार झाला आहे. तुकाराम हे वैश्य व शूद्र वर्णांचे प्रतिनिधि[2] असल्यानें त्या वर्णांच्या प्रगतीला अडथळा आणणाऱ्या जन्मसिद्ध उच्चनीच भावांवर, धार्मिक–सामाजिक क्षेत्रांतील मिरासदारीवर, परंपरागत नीतिमूल्यांवर तुकारामांनीं आपल्या अभंगांत जो हल्ला चढविला आहे, तो स्वाभाविकच वाटतो. तुकोबांच्या अशा अभंगांनींच भौतिक उत्कर्षाला आवश्यक असें नैतिक बलसंवर्धनाचें कार्य केलें आहे. कर्मठांचें ढोंग,

तुकारामांचें सामाजिक कर्तृत्व

---

१ या कालाबद्दलहि मतभेद आहे. इ. स. १६४८, १६४९, कीं १६५१ (?) तिथि फाल्गुन वद्य २ नसून ५ सोमवार आहे, असेंहि संशोधित मत पुढें आलें आहे.

२ 'तुकाराम आणि रामदास'–(प्रा. गं. बा. सरदार) नवभारत, फेब्रुवारी १९५०.

शास्त्री-पंडितांची पोपटपंची, आणि महानुभाव, नाथ, शाक्त, इत्यादि धर्मपंथांतील आचारांचा फोलपणा या गोष्टी त्यांनीं चव्हाटयावर आणल्या. या विध्वंसक कार्याबरोबरच धर्माभिमान, स्वामिनिष्ठा, शरीरसुखापेक्षां धर्मनीतीचें श्रेष्ठत्व, धर्मकर्मापेक्षां चित्तशुद्धीचें व सदाचाराचें महत्त्व, इत्यादि उच्चतर जीवनमूल्यांची ओळख तुकारामांनीं सामान्य जनतेला करून दिली. त्यांच्या या विधायक कार्यानें शिवकार्याला उपयोगी असा ध्येयनिष्ठ, सुसंघटित व कार्यक्षम मराठा समाज तयार झाला. त्या मावळयांच्या बळावरच स्वराज्यसंपादनाच्या कार्यांत शिवाजीराजांना यश मिळालें. तुकारामांची ही सामाजिक व पर्यायानें राजकीय कामगिरी लोकोत्तर अशीच आहे.

'दुर्जनासी पंचानन । तुका रजरेणु संतांचा ॥' किंवा 'दया तिचें नांव भूतांचें पालन । आणिक निर्दळण कंटकांचें ॥' या तुकारामांच्या उक्तींवरून तुकारामांच्या सामाजिक कामगिरीचें स्वरूप विधायक व विध्वंसक असें दुहेरी असल्याचें स्पष्ट होतें.

तुकारामांचें दुधारी व्यक्तिमत्त्व

त्या दुहेरीक ामगिरीला साजेसें दुधारी व्यक्तिमत्त्वहि तुकारामांना लाभलें होतें; असें त्यांच्या आत्मपर व उदेशपर अशा द्विविध स्वरूपाच्या अभंगांवरून दिसून येतें. मनाच्या उदारतेबरोबर वृत्तींचा झुंजारपणा, सहृदयतेशीं संलग्न असलेली न्याय-निष्ठुरता आणि व्यक्तिविषयक निर्वैरबुद्धीबरोबर दुष्ट प्रवृत्तींवर प्रहार करण्याची कठोरता, इत्यादि विशेषांनीं तुकारामांचें व्यक्तिमत्त्व संपन्न झालें आहे. तुकारामांच्या या दुधारी व्यक्तिमत्त्वाचें स्पष्ट प्रतिबिंब त्यांच्या भिन्न भिन्न प्रकारच्या अभंगांत उमटलें आहे, करुणापर व आत्मस्थितिपर अभंगांत अन्तःकरणाचा कळवळा व भाषेचा मवाळपणा दृष्टीस पडतो; तर त्यांच्या उपदेशपर अभंगांत वृत्तीचा जहालपणा व भाषेचा तिखटपणा पाहावयास मिळतो. नतिक गुणांच्या दृष्टीनें तुकाराम

सर्व वर्णियांना आदरणीय झाले होते. त्यांच्या अभंगांतील नीतिबोधावरून व प्रत्यक्ष आचरणावरून त्यांची नैतिक पातळी किती पराकाष्ठेची उंच होती, हें दिसून येतें. हट्टाग्रही सनातनी, अहंकारी पंडित, दांभिक समाज–कंटक यांचीं बिंगें बाहेर काढून त्यांना जरब बसविणारी मर्मभेदक टीका तुकारामांनीं केली आहे. त्या अभंगांवरून लोकव्यवहारांचें बारीक निरीक्षण, मनुष्यस्वभावाचें सूक्ष्म ज्ञान, जबरदस्त आत्मविश्वास व तडफदार वृत्ति हे निष्ठावंत समाजसुधारकाचे गुणविशेष तुकारामांच्या ठिकाणीं होते, याची खात्री पटते. उपनिषदें, गीता, भागवत, ज्ञानेश्वरी, नाथभागवत या ग्रंथांतील सारें तत्त्वज्ञान त्यांच्या अभंगांत सामावलें आहे. त्यावरून तुकारामांचा आध्यात्मिक अधिकार स्पष्ट होतो. ज्ञानेशादिकांनीं स्त्री-शूद्रांच्या आवांक्यांत आणून ठेवलेलें तत्त्वज्ञान अभ्यासून, पचवून–जीवनाच्या झगड्यांत प्रत्यक्ष अनुभवून–लोकांना उपदेश करण्याची पात्रता तुकारामांनीं सिद्ध केली; यामुळेंच 'तुका झालासे कळस' हे त्यांचे धन्योद्गार[1] सार्थ ठरले आहेत.

तुकारामांची भूमिका कर्त्या सुधारकाबरोबर जातिवंत साहित्यकाचीहि आहे. 'आम्हां घरीं धन शब्दांचींच रत्नें। शब्दांचींच शस्त्रें यत्नें करूं ॥' या उद्गारांवरून त्यांची आपल्या लेखणीच्या माध्यमावरची निष्ठा स्पष्ट होते.

तुकारामांची अभंगवाणी

त्यांची वाणी स्वानुभवाच्या अनुभवांनीं रंगली आहे. त्यांत उसनेपणा किंवा कृत्रिमता नाहीं. (तुका म्हणे झरा। आहे मुळचाचि खरा॥). 'मज विश्वंभर बोलवितो।' अशा विश्वासानें त्यांनीं स्वयंस्फूर्त अशी अभंगरचना[2]

---

१ हा अभंग तुकारामांचा नसून तो त्यांची शिष्या बहिणाबाई हिचा आहे, असें कांहीं मानतात.

२ तसेंच, त्यांनीं श्रीमद्भगवद्गीतेचाहि सुबोध अभंगात्मक अनुवाद (**मंत्रगीता**) केला होता. त्याला श्री. वा. सी. बेंद्रे यांनीं स्वतंत्र पुस्तक काढून प्रथमच प्रकाशांत आणलें आहे.

केली. त्यामुळें आत्मनिष्ठ काव्याचे सारे गुण त्यांत उतरले आहेत, ही साडेचार हजार[1] अभंगाची सारी रचना स्फुट व प्रासंगिक आहे. 'अंतरीचा रंग उमटे बाहेरी ॥' या म्हणण्याप्रमाणें त्यांत तुकारामांच्या अंतर्जीवनाचें स्वच्छ प्रतिबिंब उमटलें आहे. आशा आणि निराशा, उद्वेग आणि उल्हास, वैफल्य आणि कृतार्थता, प्रयत्नशीलता आणि प्रारब्धवाद, इत्यादि परस्परविरोधी मनोवृत्तींचा उद्रेक त्यांच्या आत्मपर अभंगांत दिसून येतो. त्यावरून त्यांच्या अंतःकरणाच्या संवेदनक्षमतेची, त्यांच्या आत्मिक जीवनाच्या विकसनशीलतेची पूर्ण कल्पना येते. त्यांच्या करुणापर अभंगांत आर्तता, उत्कंठा, आग्रह, कारुण्य, वात्सल्य, इत्यादि विविध भावांचा आविष्कार झाला आहे. त्या त्या ठिकाणीं त्यांची वाणी प्रसाद व माधुर्य या गुणांनीं ओथंबलेली आहे. पण नामदेवांच्या तुलनेनें वृत्तीचें मार्दव आणि शब्दांचें माधुर्य यांबाबत तुकाराम डावेच ठरतील. नामदेवांतील भावुकता तुकारामांत नाहीं. त्यांच्या आयुष्यांतील झगडा अधिक वास्तव असल्यानें भावनेपेक्षां सडेतोड विचारांच्या द्वारांच त्यांची अभंगवाणी वाचकांच्या हृदयाला जाऊन भिडते. त्यांची भावनाहि नामदेवापेक्षां अधिक जाणती व डोळस आहे. समाजाचें निरीक्षणहि अधिक जाणतेपणानें व जवळून त्यांनीं केलें आहे. त्यामुळें एकच एक गोडवा हा त्यांच्या वृत्तीलाच काय, पण त्यांच्या वाणीलाहि मानवत नाहीं. समाजांतील दुष्टावा, दांभिकता व दौर्बल्य पाहून येथें 'पैजाराचें काम'

---

१ तुका नांवाचे पांचसात कवि महाराष्ट्रांत होऊन गेले आहेत (पांगारकर). त्यांचे कांहीं अभंग यांत मिसळले गेले असावेत. नामदेव–एकनाथादि इतर संतांच्याहि काव्यांतील उसनवारी श्री. वा. सी. बेंद्रे यांनीं दाखवून दिली आहे. शिवाय सुमारें दोन हजार आजवर प्रसिद्ध नसलेले तुकोबांचेच अभंग त्यांनीं संशोधित केले आहेत. त्यांची संशोधित गाथा–प्रत लवकर प्रसिद्ध होणें जरूर झालें आहे.

असें तुकारामांना वाटतें. आणि 'तीक्ष्ण शब्दांचीं उत्तरें। हातीं बाण घेउनि फिरे' या त्यांच्या उद्‌गारांप्रमाणें कठोर वाक्ताडनाचें शस्त्र तुकाराम उपसतात. नामदेव-तुकारामांमधील हा फरक उपदेशपर अभंगांबाबत अगदीं ठळकपणें दिसून येतो. 'तुका म्हणे फांसे, वाघुरा, कुऱ्हाडी। प्रसंगीं जो काढी, पारधी तो ॥' हा आदर्श डोळ्यांपुढें ठेवूनच मृदु-कठोर भाषेचें दुधारी हत्यार तुकारामांनीं वापरलें आहे, 'अमृत तें गोड काय आम्हांपुढें। विष तें बापुडें कडू किती॥' या वचनाप्रमाणेंच तुकारामांची वाणी द्विविध रूपानें आपला प्रभाव दाखविते. दुष्टांसंबंधीं बोलतांना किंवा तामस गुणांचें वर्णन करतांना ज्ञानेशांची शांति ढळत नाहीं; त्यांच्या वाणीची माधुरी आटत नाहीं; पण तुकारामांना विलक्षण त्वेष चढतो. अस्सल व इरसाल गांवढळ उपमादृष्टांतांकडे त्यांची कल्पना धांव घेते. शब्दांची ग्राम्यता, बीभत्सता वा अश्लीलता या दोषांची ते फिकिर बाळगीत नाहींत. तसल्याहि[1] शब्दांची योजना तुकाराम योग्य त्या ठिकाणीं करतात. त्यामुळें अशा ठिकाणीं त्यांच्या भाषेचें अस्सल मराठपण अधिक स्पष्ट होतें. त्यांची भाषा साधी, सुटसुटीत व सहजरम्य आहे. संस्कृतची

---

१ उदाहरणार्थः—

'अभक्त ब्राम्हण **जळो** त्याचें तोंड। काय त्यासी **रांड** प्रसविली॥'
'कुंकवाची ठेवाठेवी **बोडकादेवी!** काशाला॥'
'तुका म्हणे सांडा देखीचे दिमाख, मोडसीचें दुःख **गांड** फाडी॥'
'तुका म्हणे टाकीघायें देवपण, फुटलिया जन **कुला** पुसी॥'
'तुका म्हणे **रांडलेका**, अंतीं जाशील यमलोका॥'
'वांझें न होती लेंकुरें, काय कीजे त्या भ्रतारें? ॥'
'नपुंसका पुरुषासी, काय करील बाइल त्यासी? ॥'
'**गाढव** शृंगारिलें कोडें, कांहीं केल्या नव्हे घोडें॥'

छाप तिच्यावर बिलकूल नाहीं. फार्शीचा तिच्यावर परिणाम नाहीं. तिच्यांत विशेष लालित्य नसलें तरी, सफाईदारपणा आहे. कणखरपणा हा तिचा स्वभावधर्मच असला तरी, ती खडबडित नाहीं. तत्त्वज्ञान किंवा काव्य यांतील सांकेतिक कल्पनांपेक्षां शेती, व्यापार, युद्ध, कारागिरी, इत्यादि व्यावहारिक[२] क्षेत्रांतील कल्पनादृष्टांतांकडे तुकारामांची धांव अधिक आहे; तरी, त्यांच्या उपयोगानें त्यांची वाणी रुक्ष, नीरस, बनलेली नाहीं. रसाळपणा तिच्यांत भरपूर आहे. पण कल्पनेच्या बाजूनें काव्यमय असण्यापेक्षां ती विचाराच्या बाजूनें उद्बोधक अधिक आहे. जिव्हाळा, औचित्य आणि ओज यांनीं तुकारामांची शैली प्रभावी बनली आहे. साध्यासुध्या परिचित शब्दांच्या मार्मिक व परिणामकारक उपयोगाची कला

---

२ उदाहरणार्थ :—

'मिरासीचें म्हूण सेत, नाहीं देत पीक उगें ॥'
'हरिनामवेली पावली विस्तार, फळीं पुष्पीं भार वोल्हावली ॥'
'निवडावें तण, **शेती** करावीं राखण ॥'

'मुलाम्याचें नाणें, तुका म्हणे नव्हे सोनें ॥'
'दह्याचिया अंगीं निघे ताक लोणी । एका मोलें दोन्ही मागो नये ॥'
'आपणालागे काम वाण्याघरीं गूळ । त्याचें याति कूळ काय कीजे ॥'
'विकेल तेथें विका, माती नांव ठेवूनि बुका ॥'
'संतांचा **उदीम**, उपदेशाची पेठ । प्रेम सुख साटी देती घेती ॥'
'नव्हे वैद्य आम्ही अर्थाचे भुकेले । भलते द्यावे पाले भलत्यासी ॥'

'वीर विठ्ठलाचे गाढे, कळिकाळ पायां पडे ॥'
'आम्ही रामाचे राऊत, **वीर** झुंजार बहुत ॥'
'हातीं बाण हरिनामाचे, वीर गर्जती विठ्ठलाचे ॥'
'पाडावी ते बरी गांठी, धुरेसवें खरी ।
नये मरो लंडीपणें, काय यापुढें तें जिणें ॥'

तुकारामांना चांगली साधली होती, म्हणूनच 'सहज बोलणें, हित उपदेश।' असा सार्थ अभिमान ते व्यक्त करूं शकले. त्यांची 'निश्चयाचें बळ, तुका म्हणे तेचि फळ' 'आलिया भोगासी असावे सादर....' 'तुका म्हणे येथें पाहिजे जातीचे, येरां गवाळाचें काम नाहीं' यांसारखी शेंकडों अभंगवचनें आज सर्वतोमुखीं होऊन बसलीं आहेत, यांत नवल नाहीं; कारण त्यांच्या सहज उद्गारांपाठीमागें स्वानुभवाचें तेज उभें असल्यानें त्यांच्या सूत्रबद्ध वचनांना सुभाषितांचें[३] वैभव प्राप्त झालें आहे.

मात्र एवढें खरें कीं, ज्ञानेश्वर-नामदेवांच्या वाणींतील शांततेचें, सौम्यतेचें, शीतल तेज तुकारामांच्यांत नाहीं. त्यांची वाणी प्रखर, फटकळ, आणि बोलभांड आहे. भावनेच्या हळुवारपणापेक्षां विचारांचा सकसपणा तुकारामांत अधिक आहे. कल्पनेपेक्षां वास्तवाची बैठक त्यांच्या वाणीला अधिक मानवते. पांडित्यापेक्षां स्वानुभवाच्या बोलांवरच तिची सारी भिस्त आहे. म्हणूनच तत्त्वज्ञान, भक्ति, आचार यांना व्यापक नीतिमूल्यांची सामाजिक बैठक मिळवून देण्याला त्यांची अभंगवाणी समर्थ ठरली.

---

३ उदाहरणार्थ :—

'असाध्य तें साध्य करितां सायास, कारण अभ्यास तुका म्हणे'
'तुका म्हणे हरिच्या दासां, शुभकाळ अवघ्या दिशा'
'नाहीं निर्मळ जीवन, काय करील साबण ?'
'आंधळ्यासी जन अवघेची आंधळे !'
'तुका म्हणे तोचि संत, सोसी जगाचे आघात'
'मोलें घातलें रडाया, नाहीं आंसू आणि माया'
'कोणी निंदा कोणी वंदा, आम्हां स्वहिताचा धंदा'
'शुद्ध बीजा पोटीं, फळें रसाळ गोमटीं'
'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति, देह कष्टविती उपकारें'

— दुसऱ्या कालखंडाचा समारोप —

इ. स. १३५० ते १६५० हा मराठी वाङमयेतिहासाचा दुसरा कालखंड होय. एकनाथांनीं आपल्या विपुल आणि विविध ग्रंथकर्तृत्वानें टीका, कथा, आख्यानें, लोकगीतें, इत्यादि वाङमयप्रकारांचें बीज, या कालांत रुजत टाकलें. त्यामुळें विविध वाङमयगुणांचा परिपोष या कालखंडांत झाला. केवळ कलादृष्टीनें साहित्य निर्माण करणाऱ्या नव्या परंपरेचे मुक्तेश्वर हे प्रणेते ठरतील. तिचे मेरुमणीही तेच म्हणावे लागतील. पहिल्या कालखंडांतील आत्मनिष्ठ अभंगरचनेच्या जुन्या परंपरेचा परमोत्कर्ष तुकारामाच्या अभंगवाणीनें याच काळांत घडवून आणला. म्हणून एकनाथ, मुक्तेश्वर आणि तुकाराम हेच या कालखंडाचे प्रतिनिधी होत.

अभंग, पदें, अशी स्फुटरचना या काळांतहि दृष्टीस पडत असली, तरी सलग, सुसूत्र आणि विस्तृत ग्रंथनिर्मिति हें या कालाचें वैशिष्ट्य ठरेल. वीसवीस, चाळीसचाळीस हजार ओंव्यांचे ग्रंथ मागच्या कालखंडांत तितके आढळत नाहींत. उलट या कालखंडांत दासोपंतांच्या 'गीतार्णवा' सारखा सव्वा लाख ओंव्यांचाहि एक सलग ग्रंथ दृष्टीस पडतो. प्रचंड ग्रंथनिर्मितीनें स्वभाषेचा मगदुर वाढविण्याचें कार्य या काळांतील एकनाथ, दासोपंत, विष्णुदासनामा, मुक्तेश्वर, इत्यादि ग्रंथकारांनीं केलें. मात्र त्यांची ग्रंथरचना आत्मनिष्ठ व स्फूर्तिप्रधान असण्याऐवजी ती विषयनिष्ठ व व्यासंगप्रधान अशी आहे. आत्माविष्कार करण्याऐवजी विचारप्रसार करणें व आचारधर्माची शिकवण देणें याच हेतूनें हें वाङमय निर्माण झाल्यामुळें त्याचें बाह्य स्वरूपहि बरेंच पालटलें आहे. विषयाकडे लक्ष देऊन त्याची व्यवस्थित मांडणी करणें, हा रचनेचा भाग या कालांतील वाङमयांत अधिक आहे. बाह्यतः पद्यात्मक

असलेल्या या वाङमयांत साद्यंतपणा, सुस्पष्टता, साधारता तर्कनिष्ठता, इत्यादि गद्याचे गुणविशेषच जास्त आढळून येतात. भक्तिभावाबरोबर पांडित्यालाहि भक्तिपंथियांनींच मान्यता दिल्याचें दृश्य या काळांत दिसून येतें. म्हणून पंडिती परंपरेचे अध्वर्यू संत एकनाथच ठरतात. ज्ञानेश्वरींतील विस्तार आत्मनिष्ठ, उत्स्फूर्त आहे, तर एकनाथी भागवतांत विषयानुरोधानें व सहेतुकपणें विस्तार करण्यांत आला आहे. कवि आणि पंडित यांच्या रचनेंतला हा फरक आहे. **पहिल्या कालखंडांतील वाङ्मयांत काव्याचे गुणधर्म विशेष आढळतात, तर या कालखंडांतील वाङ्मय पांडित्यानें-गद्याच्या गुणधर्मांनें नटलेलें आहे.** म्हणूनच वैपुल्या-बरोबर विषय आणि रचना यांचे वैविध्यहि त्यांत आलें आहे.

या काळांतील ग्रंथकारांची दृष्टि पारलौकिकाबरोबरच लौकिकाकडे, पारमार्थिक विषयाबरोबर ऐहिक विषयाकडे वळलेली दिसून येते. म्हणूनच कल्पनेपेक्षां विचार, भावनेपेक्षां आचार-व्यवहार, यांचें साम्राज्य त्यांच्या वाङमयांत नांदत आहे. मागील कालखंडाप्रमाणें कल्पनारम्यतेच्या विरल वातावरणांत गुरफटून जाण्याची प्रवृत्ति एकनाथ-तुकारामादिकांच्या वाङमयांत दिसत नाहीं. ज्ञानेश्वर-नामदेवांपेक्षां प्रत्यक्ष लौकिक जीवनाशीं त्यांचा जास्त संबंध आल्यानें त्यांच्या दृष्टींत वास्तवता आली आहे. म्हणूनच ज्ञानेश्वरांचें पदलालित्य, नामदेवांची भावकोमलता किंवा एकनाथांचा धीरगंभीरपणा तुकोबांच्या वाणींत आढळत नसला तरी, लोकोद्धाराच्या तळमळीनें आणि अंतःकरणाच्या उमाळ्यानें बाहेर पडलेल्या त्यांच्या वाणींत हृदयस्पर्शी उत्कटता, मर्मभेदी दाहकता, प्रक्षोभक विचारप्रवर्तकता एकवटली आहे. अनुभवांतून स्फुरलेल्या विचारांची तेजस्विता आणि शब्दांचें सामर्थ्य यांमुळें मराठी साहित्यांतच नव्हे, तर महाराष्ट्रीय जीवनांतहि तुकारामाची अभंगवाणी अमरपद मिळवूं शकली.

ध्येयवाद्याप्रमाणें निर्दोष अशा ध्येयसृष्टींत रमण्याऐवजीं शबल अशा वास्तवसृष्टींत चांगल्या रीतीनें राहण्याची व इतरांना राहूं देण्याची सुधारकाची भूमिकाच या ग्रंथकारांनीं पत्करलेली दिसते. त्यामुळेंच अध्यात्मप्रधान व भक्तिपर रचनेच्या जोडीला लौकिक विषय, लौकिक रस यांनाहि साहित्यामध्यें स्थान देण्यांत आलें. एकनाथांपासूनच सुरू झालेल्या कथात्मक काव्यरचनेच्या अनुषंगानें सामान्यांच्या लौकिक भावना, सामान्यांना चटकन् आकळणारे शृंगार, वीर, करुण, हास्य हे रस, इत्यादींचा परिपोष दिवसेंदिवस अधिकाधिक प्रमाणांत मराठी साहित्यांत होऊं लागला. व्यवहारचातुर्य, राजनीति किंवा सांसारिकांचीं चित्रें, व्यक्तिजीवनांतील विनोदकथा, किंवा प्रणयप्रसंग इत्यादींचा समावेश अध्यात्मग्रंथांतहि होऊं लागला. इतकेंच काय पण महालिंगदास, लोलिंबराज यांसारख्यांनीं त्याच तऱ्हेचें वाङमय स्वतंत्रपणें निर्माण केलें. तुकारामांच्या आत्मनिष्ठ अभंग-रचनेंतहि हा लौकिक विषयाचा भाग अधिक प्रमाणांत आहे. त्यांच्या मानसिक जीवनांतील झगड्याचा काव्यात्मक आविष्कार व्यक्तिगत असला तरी त्याचा आशय सामाजिक आणि वास्तव आहे. ईश्वर आणि भक्त यांच्यांतील प्रेमसंबंधाबरोबर समाज आणि व्यक्ति यांच्यांतील भल्याबुऱ्या संबंधांचे कालसापेक्ष पडसादहि या आत्मनिष्ठ वाङमयांत स्पष्ट उमटले आहेत. आध्यात्मिक मानवतावादाचें तत्त्वज्ञान सांगणाऱ्या एकनाथ-तुका-रामांच्यांत सामाजिक नीतीचा भाग अधिक येणें साहजिकच आहे. पण मुक्तेश्वरांसारखे कलाकारहि तत्कालीन राजकीय, सामाजिक वातावरण विसरूं शकत नाहींत. मुक्तेश्वरांनींहि सामाजिक नीतिमत्तेच्या वाढीला उपयोगी पडेल, असा उपदेश कलागुणांनीं संपन्न अशा आपल्या भारत-रामायणादि ग्रंथांत मधून मधून केला आहेच.

वाङमयनिर्मितीचे ध्येय, वाङमयाचे विषय व स्वरूप यांत कांहींसा पालट झाल्याबरोबर तिच्या तंत्रांतहि बदल होणें स्वाभाविकच होतें.

त्याप्रमाणें टीका, कथाग्रंथ, आख्यानें व स्फुटरचना यांचें नवें तंत्र एकनाथांपासूनच तयार होत गेल्याचें दिसून येतें. भावार्थाऐवजीं यथार्थाच्या निश्चितीकडे लक्ष द्यावेसें वाटून मराठी टीकाकारांनीं संस्कृतांतील भाष्यकारांच्या पठडीचा अंगीकार केला. एकनाथ, दासोपंत, शिवकल्याण इत्यादींच्या टीकाग्रंथांत ज्ञानेश्वरांच्या टीकापद्धतीशीं श्रीधर बोपदेव वगैरेंच्या वेदांती टीकापद्धतीचा समन्वय साधला आहे. नाथांच्या रुक्मिणीस्वयंवरानें कथाकाव्याचें जें तंत्र घालून दिलें, त्याचेंच अनुकरण पुढें कित्येकांनीं केलें. त्या तंत्रांत अधिक ठाकठिकी व सफाईदारपणा पुढील काळांतील आख्यानकवींनीं आणला असला तरी, काव्याच्या बाह्यांगाकडे जाणीवपूर्वक लक्ष देण्यांत येऊं लागले, हें या कालखंडाचेंच वैशिष्टय होय. अर्थात् पुढील कालखंडाप्रमाणें तंत्र म्हणजे केवळ कारागिरी, असें कांहीं या काळांत झालें नाहीं. गरज उत्पन्न होतांच बदलत्या आशयाप्रमाणें निसर्गसिद्ध तंत्राचा अवलंब या काळांतील कवींनीं केला, पण आशयाकडे दुर्लक्ष होईल इतकें तंत्र डोईजड होऊं दिलें नाहीं. म्हणूनच कालविशिष्ट सारखेपणांत व्यक्तिवैशिष्टयहि ठळकपणानें ज्याच्या त्याच्या वाङमयांत दिसून येते

नुसती प्रसन्नमधुर व प्रसादपूर्ण भाषा हें पहिल्या कालखंडाचें वैशिष्टय होतें. या कालांतील साहित्यिकांच्या वृत्तीवर वास्तवाचा ठसा अधिक असल्यानें त्यांची भाषा एकीकडे आपलें प्रौढ आणि धीरगंभीर स्वरूप व्यक्त करते, तर दुसरीकडे कणखर आणि राकट स्वरूपांत प्रकट होते. "प्रसन्नता व उत्साह, कोमलता व माधुर्य, उत्कटता व चापल्य या गुणांच्याऐवजीं गांभीर्य, विशालता, वैचित्र्य, ओज, प्रगल्भता, प्रौढी यांसारखे गुण या कालांतील भाषेंत उतरले आहेत." (गं. बा. सरदार). अल्लडपणाऐवजीं पोक्तपणा, आर्ततेऐवजीं आत्मप्रत्यय, सौम्यतेऐवजीं फटकळपणा, अनुनयाऐवजीं अभिनिवेश हे या कालांतील भाषेचे सामान्य गुणविशेष होत. लेखनविषय आणि ग्रंथस्वरूप, आशय आणि दृष्टिकोन, तंत्र आणि भाषा यांबाबतींतील हेच कालविशिष्ट गुणधर्म एकनाथ, मुक्तेश्वर, तुकाराम यांच्याबरोबर या कालखंडांतील इतरहि साहित्यिकांच्या ग्रंथांत कमी-अधिक प्रमाणांत आढळून येतात.

प्राचीन मराठी वाङ्मयाचें स्वरूप : : ३

इ. स. १६५०–६० पर्यंत महाराष्ट्र मुसलमानी[1] वर्चस्वाखालींच होता. परंतु एकनाथांच्या कालापेक्षां मुक्तेश्वर–तुकारामांच्या कालांतील राजकीय परिस्थिति बरीच पालटली होती. निजामशाही–अदिलशाही, शिया–सुनी, दक्षिणी–परदेशी या भेदांपायीं मुसलमानांचें आपसांतील वैमनस्य वाढतच होतें. शिवाय दिल्लीच्या मोंगली आक्रमणाला तोंड देतां देतां दक्षिणेंतील मुसलमानी शाह्या खिळखिळ्या होऊं लागल्या होत्या. अशा परिस्थितींत या मुसलमानी शाह्यांच्या पदरीं असलेल्या जाधव–मोरे–महाडिक–भोंसले इत्यादि मराठा सरदारांच्या पराक्रमाला व मुत्सद्देगिरीला साहजिकच अधिकाधिक वाव मिळूं लागला. जबाबदारीच्या कामगिऱ्या पार पाडतां पाडतां या मराठा वर्गांत स्वकर्तृत्वाविषयींचा आत्मविश्वास आणि भौतिक उत्कर्षाची आकांक्षाहि वाढत गेली. याचें उत्कृष्ट उदाहरण म्हणजे शहाजी राजांचें चरित्र. सांस्कृतिक क्षेत्रांत

तिसरा कालखंड : राजकीय स्थित्यंतर

१ अफजुलखानाच्या वधांनंतरच (इ. स. १६५९) शिवाजीनें अदिलशाही विरुद्ध उघड बंड पुकारून महाराष्ट्राचा मध्यभाग स्वतंत्रपणें आपल्या अंमलाखालीं घेतला.

मराठी साहित्याच्या दृष्टीनें एकनाथांची जी कामगिरी, तीच राजकीय क्षेत्रांत महाराष्ट्राच्या दृष्टीनें शहाजींची कामगिरी होय. निजामशाही-अदिलशाही दरबारांत राजकीय दृष्ट्या मिळत गेलेली वाढती मानमान्यता, स्वतंत्र जाहगिरीच्या क्षेत्रांत मिळालेला लष्करी व कारभारविषयक अनुभव आणि भोंवतीं जमा झालेल्या कर्तबगार नि विश्वासू मुत्सद्यांचा मेळावा यांच्या बळावर सतराव्या शतकाच्या पूर्वार्धांत शहाजीराजांनीं शिवाजीराजांच्या स्वराज्यस्थापनेची पूर्वतयारी करून ठेवली. म्हणूनच उत्तरार्धांत मराठ्यांच्या प्रगतीचा उत्कर्षबिंदु अशा शिवशाहीचा उदय झाला. इ. स. १६४६ मध्यें शिवरायांनीं स्वराज्याचें तोरण उभारून अदिलशाही राजवटीला पहिला तडाखा दिला. त्या नंतर पुढील पंचवीस-तीस वर्षांत दक्षिणेंतील मुसलमानी सत्ता खिळखिळी करून, त्यांनीं उत्तरेकडून होणाऱ्या मोंगली आक्रमणाला चांगलाच पायबंद बसविला; आणि मराठ्यांचें स्वतंत्र राज्य शिवाजीराजांनीं स्थापन केलें (इ स. १६७४).

या कालखंडांतील वाङ्मयाचे ठळक विशेष

या शतकाच्या पूर्वार्धांत महाराष्ट्रियांच्या मनांत ज्या नव्या आशा-आकांक्षा, स्वराज्योन्मुख वृत्तीचा जो नवा आत्मप्रत्यय, जें नवचैतन्य खेळूं लागलें होतें; त्याचें प्रतिबिंब गेल्या कालखंडांतील एकनाथ, मुक्तेश्वर, कृष्णदास मुद्गल, इत्यादींच्या वाङ्मयांत जसें पडलें आहे, त्याप्रमाणेंच स्वराज्याच्या कालखंडांतील भौतिक उत्कर्षाच्या कालाचें प्रतिबिंबहि रामदास, वामन, आख्यान-कवी आणि शाहीर यांच्या वाङ्मयांत पडलें आहे. या कालांतील वाङ्मय एकांगी किंवा निष्प्रभ न राहतां सर्व बाजूंनीं संपन्न आणि समर्थ झालें आहे. एकीकडे स्वतंत्रतेच्या अनुभूतीनें व पराक्रमाच्या ईर्षेनें तें प्रस्फुरित झालें असून, दुसरीकडे स्वराज्यांतील सुरक्षिततेच्या व संपन्नतेच्या आनंदानें तें बहरलें आहे. कर्तबगार वीर पुरुषांच्या या काळांत लेखणीवरहि तरवारीचें पाणी

चढून तेजस्वी व प्रेरक साहित्य निर्माण व्हावें, हें साहजिकच होय. एकनाथांनीं रुजविलेल्या अनेक प्रवृत्तींचा आणि वाङमय प्रकारांचा परिपोष होत जाऊन मराठी भाषा आणि साहित्य यांचें वैभव याच कालखंडांत शिगेस पोंचलें. मराठी भाषा राजभाषा झाली; देशभर ग्रंथनिर्मितीची लाट उसळली. विविध ठिकाणची, नाना पंथांची, सर्व जातींची, संत-पंडित, कवि-शाहीर, बखरनवीस, इत्यादि मंडळी विपुल आणि विविध साहित्य निर्माण करूं लागली. त्यामुळें ललितेतर आणि ललित दोन्ही प्रकारची भरगच्च वाङमयनिर्मिति मराठी साहित्याच्या या तिसऱ्या कालखंडांत दृष्टीस पडते. त्यांत मार्मिकतेबरोबर मौलिकता, पांडित्याबरोबर प्रतिभा, सामर्थ्यासह सौंदर्य, उद्बोधासह आनंद, यांचा ठायीं ठायीं प्रत्यय येतो. भावनाविष्कारांत कणखरपणा, कल्पनाविलासांत पल्लेदारपणा, पांडित्य-प्रकर्षांत निश्चितता, विचारांत ओजस्विता हे विशेष या खंडांतील प्रारंभीच्या वाङमयांत तरी आढळतातच. त्या दृष्टीनें पाहतां इ. स. १६५० नंतरच्या अर्धशतकाचें प्रतिनिधित्व रामदास आणि वामन यांच्याकडेच जातें.

शिवकालीन प्रवृत्तींशीं आणि आकांक्षांशीं पूर्णतया समरस झालेले असे कवि म्हणजे रामदास हेच एक होत. रामदासांच्या राज-कारणावर महाराष्ट्रांतील विद्वानांत आजवर बरीच [१]रणें माजलीं आहेत.

रामदास आणि राजकारण

शिवाजी व रामदास यांची प्रथम भेट केव्हां झाली, दोघांमधील संबंध कशा स्वरूपाचा होता, हा वाद इतिहासाच्या दृष्टीनें महत्त्वाचा असला तरी, त्याच्या तपशीलांत फार जाण्याचें वाङमयीन दृष्ट्या येथें कारण नाहीं. रामदासांच्या कवितेपैकीं ' अस्मानी सुलतानी व परचक्रनिरूपण ' या प्रकरणांतील देशस्थितीचें स्पष्ट वर्णन, 'आनंदवनभुवन' या काव्यांत

१ 'समर्थ-चरित्र' व 'रामदास-चरित्र आणि वाङमय'–प्रा. न. र. फाटक.

व्यक्त झालेली स्वराज्याकांक्षा, 'रामवरदायिनी' या स्तोत्रांत शिवाजीच्या उत्कर्षासंबंधीं केलेली प्रार्थना, शिवाजीला उद्देशून लिहिलेला 'सावधानता' हा दासबोधांतील समास व पुढें संभाजीस लिहिलेलें उपदेशपर पत्र, इत्यादि आधारांवरून तत्कालीन राजकीय परिस्थितीविषयीं इतर संतांच्या तुलनेनें रामदास हे अधिक जागरूक होतें; एवढा मुद्दा पटण्यास हरकत नसावी, असें वाटतें. अर्थात् राजकीय बाबतींतील समर्थांच्या कार्याचा वांटा वैचारिक किंवा सांस्कृतिक स्वरूपाचाच होता; प्रत्यक्ष राजकारणाच्या –सैनिकी किंवा मुत्सद्देगिरीच्या-स्वरूपाचा नव्हता, हीहि गोष्ट तितकीच निर्विवाद आहे. धर्मरक्षणार्थ स्वातंत्र्यसंपादन हें ध्येय लोकांपुढें ठेवून स्वत:च्या प्रभावी नेतृत्वानें सत्ताधारी मराठा वर्गाच्या राजकीय आकांक्षांना शिवाजीनें साकार केलें; तर रामदासांच्या दासबोधानें त्या वर्गाच्या आकांक्षांना प्रभावशाली तत्त्वज्ञान मिळवून दिलें. अशा रीतीनें शिवाजी व समर्थ[1] या दोघांचें भिन्न क्षेत्रांतील एकाच स्वरूपाचें कर्तृत्व समकालीनत्वा–मुळें परस्परांच्या ध्येयाला पूरक ठरलें. मात्र बुद्धिपुरस्सरपणें आपापसांत चर्चा किंवा विचारविनिमय करून, योजनापूर्वक असें हें कार्य झालें; असें म्हणणें म्हणजे आजच्या कल्पना त्या कालावर लादणें होय. तसें न करतां आपण एवढेंच म्हणूं शकूं कीं, बदलत्या देशकालपरिस्थितिप्रमाणें रामदासांनीं भागवतधर्माला[2] महाराष्ट्रधर्माचें वळण लावलें. हीच त्यांची राजकारणांतील लोकोत्तर कामगिरी.

---

१ या दोघांची भेट केव्हां झाली याबाबत दोन मतें आहेत. राजवाडे–देव यांच्या मतें इ. स. १६४९, तर भाटे, केळुस्कर, यदुनाथ सरकार इ. स. १६७२ मानतात. हा वाद केवळ दोन सनांतला नाहीं तर, दोन संप्रदायांतला आहे. या वादाचा सारांश: महाराष्ट्र सारस्वत–पुरवणी, पानें ९६६–६८ पहा.

२ या दोन्हींच्या विचारप्रणालींत तत्त्वतःफार फरक आहे, असें एक मत आहे. [भागवतधर्म आणि महाराष्ट्रधर्म' (भा पं. बहिरट)-संतवाणीचा अमृतकलश, पानें ७४–९५] तर कांहींच्या मतें तपशिलांतच काय तो वेगळेपणा आहे. आणि कांहींजण तर महाराष्ट्रधर्माला भागवतधर्माचें विकसित स्वरूप मानतात.

रामदासांनीं (पूर्वाश्रमीचा नारायण) वयाच्या आठव्या वर्षी घर सोडल्यानंतर त्यांचीं बारा वर्षे गोदातीरीं अध्ययन व तपाचरणांत गेलीं. नंतर उत्तर-दक्षिणेकडील तीर्थयात्रेच्या निमित्तानें बारा वर्षे केलेल्या भ्रमंतीमध्यें देशकालपरिस्थितीचें नीट निरीक्षण करून आपल्या जीवितध्येयाची स्पष्ट ओळख रामदासांनीं करून घेतली. इ. स. १६४४ त

रामदासांचें सामाजिक कर्तृत्व

कृष्णातीरीं आल्यावर रामदासांनीं धनुर्धारी रामचंद्र व हनुमान या दैवतांच्या उपासनेचा स्वतंत्र पंथ उभारून महाराष्ट्राला बलोपासनेची दीक्षा दिली. मठस्थापना व शिष्यसंप्रदाय यांच्या द्वारें संघटनेचा पद्धतशीर मार्ग घालून दिला. पारमार्थिक बोधावर लक्ष ठेवूनहि नेटका प्रपंच करण्याची महती पटविली. करंटा दैववाद किंवा निष्क्रीय उदासीनता यांच्या विरुद्ध प्रवृत्तीपर प्रयत्नवादाची शिकवण रामदासांनीं लोकांना दिली. 'व्हावें ब्रम्हांडाहून जाड' किंवा 'उत्कट, भव्यतेंचि घ्यावें' अशा महत्त्वाकांक्षेची आंच त्यांच्या ठिकाणीं उत्पन्न केली. अज्ञान, भोळसटपणा, परधार्जिणेपणा यांचा तिटकारा करण्यास शिकविलें. 'धटासी आणावा धट। उद्धटासि पाहिजे उद्धट' किंवा 'मारितां मारितां मरावें' अशी प्रतिकाराची शिकवण लोकांच्या चित्तांत ठसविली. हीच इतर संतांपेक्षां वैशिष्ट्यपूर्ण नि वेगळी अशी रामदासांची कामगिरी होय.

मठस्थापना व शिष्यसंप्रदाय यांमुळें रामदासांचें कर्तृत्व इतर संतांपेक्षां निराळें असें उठून दिसतें खरें, पण समर्थसंप्रदायाचें तात्त्विक अधिष्ठान लक्षांत घेतां भागवतधर्माचाच वारसा रामदासांनीं पुढें चालविला असें म्हणावें लागतें. प्रपंचपरमार्थाची सांगड, सर्व बाबतींत सावधानता, व साक्षेप म्हणजेच प्रयत्नवाद या 'समर्थांच्या विचारसूत्रांचें मूळ[१] एक-

१ प्रा. गं. बा. सरदार-संतवाङमयाची सामाजिक फलश्रुति.-पानें ४३-८६

नाथांच्या जीवनांत व वाङमयांत सर्वत्र दिसून येतें.' भिन्न काल व भिन्न वृत्ति यांमुळें त्यांच्या आविष्कारांत वेगळेपणा आला आहे इतकेंच. हीच गोष्ट रामदास–तुकाराम या समकालीनांबाबत खरी आहे. वास्तविक दोघांच्या कर्तृत्वाचा काल सामान्यतः मानला जातो तसा एक नाहीं. तुकारामांचें कर्तृत्व शिवपूर्व कालखंडांत होऊन गेलें, तर रामदासांचें कार्य शिवकालांतच झालें आहे. "तुकारामांचें कार्य जेथें संपतें तेथून राम–दासांच्या कार्याला सुरुवात होते," (–पांगारकर) हें विधान कालाच्या तसेंच कार्यस्वरूपाच्या दृष्टीनेंहि खरें आहे. मुसलमान अमदानींत वैश्य-शूद्र हे वर्ण राजकारणाबद्दल उदासीन असत. तेव्हां त्यांचे प्रतिनिधी असलेल्या तुकोबांच्या अभंगांत राजकीय आशा–आकांक्षांचे पडसाद उमटले नाहींत, यांत आश्चर्य नाहीं. उलट रामदास हे उच्च वर्णियांचे–ब्राम्हणक्षत्रियांचे प्रतिनिधि असल्यानें त्यांच्या बोधाचें स्वरूप या वर्णियांच्या आशा–आकांक्षांना प्रेरक व प्रोत्साहक ठरावें हें साहजिकच होय. पण यामुळेंच या वैशिष्टचाबरोबर एक वैगुण्यहि रामदासांच्या दृष्टिकोनांत येणें क्रमप्राप्तच ठरतें. सनातनी परंपरेचा अभिमान व ब्राम्हण वर्णाचा पक्षपात यांमुळें तुकारामांशीं तुलना करतां रामदास हे सामाजिक बाबतींत प्रतिगामी ठरतात. 'ब्राम्हण्य रक्षावें आदरें' 'ब्राम्हण मंडळचा मेळवाव्या,' 'गुरु तो सकळासी ब्राम्हण' 'गुरुत्व आलें नीच याति' या तऱ्हेचे अनेक उद्‌गार त्यांच्या ग्रंथांत सांपडतात. त्यांच्या शिष्यपरिवारांत बहुतेक ब्राम्हण मंडळीच आहेत. त्यांच्या दासबोधाचा वाचकवर्गहि आजतागायत ब्राम्हण–वर्णीयच आढळतो. त्यांच्या ग्रंथरचनेवर विवेकसिंधु, गुरुचरित्र, ग्रंथराज, बालबोध या सांप्रदायिक ग्रंथांचीच जबरदस्त छाप पडली आहे. या सर्व गोष्टी लक्षांत घेतां रामदासांच्या बोधाचा संकुचितपणा अगदीं स्पष्ट होतो. या वैगुण्यामुळेंच एकनाथ–तुकारामांप्रमाणें रामदासांचें वाङमय

बहुजनसमाजाला प्रेरणा देणारें होऊं शकलें नाहीं. तरी पण सामर्थ्य चतुरस्रता, विवेक, चातुर्य, लोकसंग्रह, प्रतिकार, इत्यादि अनेक गुणांची परिणामकारक शिकवण रामदासी वाङ्मयानें उच्च वर्णियांना दिली, ही गोष्ट अमान्य करतां येत नाहीं. सामर्थ्याची उपासना, सामर्थ्याचें तत्त्वज्ञान सामर्थ्याचें पद्धतशीर संघटन यांतच समर्थांच्या वाङ्मयाचें 'समर्थपण' सांठवलें आहे.

रामदासांचें वाङ्मय

रामदासांचें स्फुट व ग्रंथरूप सारेंच वाङ्मय प्रासंगिक, सहजस्फूर्त व प्रभावी आहे. आत्मनिष्ठ काव्य या दृष्टीनें साधकावस्थेंतील **करुणाष्टकांची** रचना उत्कृष्ट ठरेल. अनुताप, वैराग्य, उत्कंठा, तळमळ, उत्कटता, इत्यादि विविध भावनांच्या आविष्कारामुळें शोकपर भावगीतें, असेंच या रचनेला म्हणावें लागेल. रामदासांच्या स्फुट अभंगरचनेंत भावनेचा भाग बराच असला तरी, भाषेच्या घडणोपलीकडे त्यांत रामदासी वैशिष्टय कांहींच नाहीं. नामदेवादि संतकवींसारखीच ती रचना आहे. स्तोत्रें, पदें, आरत्या या स्फुट रचनेंतहि सांकेतिकपणाच आढळून येतो.

आत्मनिष्ठ काव्यरचनेपेक्षां विषयनिष्ठ काव्यरचनेंतच रामदासांचें वेगळेपण स्पष्ट दिसतें. कारण इतर संतकवींच्या मानानें रामदासांची वृत्ति व दृष्टि अधिक बहिर्मुख आहे. त्यांच्या या वस्तुनिष्ठ दृष्टीमुळेंच **'अस्मानी सुलतानी' व 'परचक्रनिरूपण'** यांसारख्या प्रकरणांत तत्कालीन देशस्थितीचें ठसठशीत शद्बचित्र उमटलें आहे. 'सुंदरकांड आणि युद्धकांड' या **दुकांडी रामायणां**तील वीरश्रीच्या भावनेचीं चित्रेंहि परिणामकारक वठलीं आहेत. या वर्णनपर रचनेंतहि सूक्ष्मावलोकन, विस्ताराची आवड व स्पष्टवक्तेपणा हे रामदासी विशेष ठळकपणें दिसून येतात. रामदासांच्या वस्तुनिष्ठतेला ध्येयदृष्टिचा आधार असल्यानें

त्यांची बहुतेक रचना बोधपर झाली आहे. साधुसंतांच्या चमत्कारांवर भाळणाऱ्यांच्या भोळसटपणांवर केलेल्या टीकेमुळें 'जनस्वभाव गोसावी' हें प्रकरण उल्लेखनीय वाटतें; तर '**चौदा ओंवीशतें**' या प्रकरणांत प्रारब्धवादाचें खंडन करून प्रयत्नाची महती सांगितल्यानें रामदासी वैशिष्ट्याचें तें द्योतक ठरतें. बोधपर वाङमयाच्या मालेचा मेरुमणी शोभेल असा **मनोबोध** (मनाचे श्लोक २०५) रामदासांच्या ओज वा, अस्खलित, प्रवाही व स्फूर्तिप्रद रचनेमुळें अत्यंत लोकप्रिय झाला आहे. 'स्वानुभवाचे खडे तात्त्विक बोल' या दृष्टीनें यांतील एकेका श्लोकाचें मोल फार आहे.

समर्थांची वाङमयीन मूर्ति म्हणजे त्यांचा वीस दशकी '**दासबोध**' (ओंव्या ७७५१). त्याची रचना एकटांकी झालेली नाहीं. निरनिराळ्या वेळीं लिहिलेले समास एकत्र करून, दशकांमध्यें विभागून त्यांची बांधणी मागाहून केली असावी. जुन्या दासबोधाचाहि (**एकवीस समासी**) समावेश याच्या पहिल्या सात दशकांत झाला आहे. जुनाट पुरुष, पंचीकरण-योग, मानपंचक, जुना दासबोध, इत्यादि **आध्यात्मिक प्रकरणांत** जुना मायावादी वेदान्तच भरला आहे. भागवतधर्मी नवविधा भक्तीचाच उपदेश त्यांत केला आहे. तरी देखील 'विवेक व प्रयत्न' यांवर जास्त भर आहेच. पुढील दशक मात्र नेहमींच्या वेदान्ती चाकोरीला सोडून लिहिलेले आहेत. मठ, महंत, राजकारण, व्यवहार यांच्या अनुरोधानें लौकिक विषयांसंबंधींचा बोध त्यामध्यें आला आहे. प्रपंचनिष्ठा, व्यवहारधर्म व राजनीति यांना दासबोधाच्या उत्तरार्धांत मानाचें स्थान मिळालें आहे. त्यामुळें "जुन्या दासबोधाची बैठक संताची तर नव्या दासबोधाची (उत्तरार्धाची) महंताची आहे," असें कांहीं अभ्यासकांचें म्हणणें आहे. प्रपंचनिष्ठेची महती व यशस्वी प्रपंचाचें रहस्य या गोष्टी साकल्यानें व आग्रहानें दासबोधाच्या उत्तरार्धांत आल्या आहेत हें खरेंच. परंतु मूळच्या मायावादी वेदान्ताला अगदीं सोडून पुढचा भाग लिहिला गेला आहे, असें बिलकूल नाहीं. परमार्थाची उपेक्षा होऊं न देतां प्रपंच-

सिद्धीला पाठिंबा देण्याची एकनाथी परंपराच रामदासांनीं येथें चालविली आहे. आविष्कारांत मात्र रामदासी वेगळेपणा आहे. पण रामदासांच्या सर्वच रचनेचें तें वैशिष्ट्य आहे.

रामदासांनीं विपुल वाङमयरचना केली असली तरी त्यांची मूळ भूमिका ग्रंथकाराची किंवा कवीची नाहीं, तर प्रचारकाची आहे. संघटनेचें एक साधन म्हणूनच हजारों ओंव्या भरतील इतकें प्रचंड लेखन त्यांनीं केलें. त्यांच्या लेखन-विषयाचा व्याप दांडगा आहे. 'मायाब्रम्हलक्षण' यासारख्या तात्त्विक विषयापासून बाग कशी करावी, इमारत कशी बांधावी, किंवा अक्षर कसें घटवावें, असल्या व्यावहारिक विषयांपर्यंत नानाविध विषय त्यांनीं हाताळले आहेत. मग त्या सर्वांत काव्य कोठून येणार? पण रामदासांची काव्यदृष्टीच मुळीं अगदीं स्वतंत्र आहे तरी पण त्यांच्या सहेतुक वाङमयरचनेंत विचार, व्यवहार भावना या सर्वांना कमी-अधिक मानाची जागा आहेच. दासबोधाचा एकेक समास म्हणजे एक निबंध किंवा प्रचारकाचें एक व्याख्यानच होऊन बसलें आहे. गद्याचें माध्यम त्या काळीं रूढ व लोकप्रिय असतें तर, ओजस्वी भाषेंतील रामदासांचीं प्रवचनेंच निबंधरूपानें आपल्याला उपलब्ध झालीं असतीं. रामदासांच्या ओंवीबद्ध रचनेंतहि गद्याचे आणि वक्तृत्वाचे सारे गुणदोष एकवटले आहेत. संदिग्धता, गुळमुळीतपणा त्यांत औषधालाहि मिळणार नाहीं; उलट पाल्हाळ आणि पुनरुक्ति मात्र सर्वत्र आढळेल. रामदासांच्या गंभीर, करारी व कणखर स्वभावधर्माप्रमाणेंच त्यांच्या एकंदर वाङमयाचें रूप आहे. त्यांच्या वाङमयाची प्रकृति गंभीर आहे. त्यांत प्रसादमाधुर्यादि ललित गुण बिलकूल नाहींत. भावनांच्या उद्रेकापेक्षां अनुभवाचा विचारात्मक परिपाक म्हणजे समर्थांचें वाङमय. त्यांत स्पष्टता, तर्कशुद्धता आणि निश्चयात्मकता हे विचारांचेच गुणधर्म दृष्टीस पडतील. रामदासांच्या ठिकाणीं रसिकता होती; सौंदर्यगुणांचीहि त्यांना स्पष्ट कल्पना होती.

रामदासांच्या रचनेंतील वाङ्मयगुण

परंतु त्यांच्या वाङ्मयानें कल्पना, भावना आणि भाषा यांच्या कोडकौतुका-पेक्षां विचारांच्या सामर्थ्याचीच कदर बाळगलेली दिसते. त्यामुळें त्यांचें काव्य ' मृदु, मंजुळ, कोमल ' यांपेक्षां ' भव्य, अद्‌भुत, विशाल ' या कोटींतच पडतें. शद्बांच्या सौंदर्याकडे किंवा शुद्धतेकडे लक्ष देण्याची त्यांना गरजच वाटत नसे. भाषेशीहि ते बेगुमानपणें वागत. काव्यगुणांप्रमाणेंच व्याकरण किंवा शुद्धलेखन यांची पर्वा न करतां बेधडक नवे शद्ब ते बनवीत. ऱ्हस्व-दीर्घाची ओढाताण, व्याकरण-छंद यांची पायमल्ली, इत्यादि दोष त्यांच्या प्रत्येक ओंवीओंवींत सांपडतील. ' धीर्धरा धीर्धरा तकवा हडबडूं गडबडूं नका । ' यासारख्या खडखडित आणि खडबडित ओंव्यांच्या आधिक्यामुळें अशुद्ध आणि ओबडधोबड, राकट व रानवट अशी भाषा म्हणजे ' रामदासी भाषा ' असा संकेतच होऊन बसला आहे. तरीहि सकस, उत्कट, ओजस्वी आणि भेदक लिहिण्यामुळें रामदासांच्या कित्येक ओंव्यांना सुभाषितांचा[१] दर्जा प्राप्त झाला आहे. त्यावरूनहि भव्यता आणि ठांशीवपणा हे रामदासी वाणीचे खास विशेष प्रत्ययास येतात.

---

१ उदाहरणार्थ :—

' आधीं प्रपंच करावा नेटका । मग घ्यावें परमार्थ विवेका ॥'
' मूर्ख येकदेसी होतो । चतुर सर्वत्र पहातो ॥'
' समजलें आणि वर्तलें । तेचि भाग्य पुरुष जाले ॥'
' जिहीं उदंड कष्ट केले । ते भाग्य भोगून ठेले ॥'
' उदंडाचे उदंड आइकावें । परी तें प्रत्ययें पहावें ॥'
' वेष धरावा बावळा । अंतरीं असाव्या नाना कळा ॥'
' राखावीं बहुतांचीं अंतरें । भाग्य येतें तदनंतरें ॥'
' भक्तिहीन जें कवित्व । तेंचि जाणावें ठोंबें मत ॥'
' दुसऱ्यावरी विसंबला । त्याचा कार्य भाग नासला '
' जे जे कांहीं आपणासी ठावें । ते ते इतरासी शिकवावें ।
शहाणें करून सोडावें । सकळ जन ॥'
' येत्न तो देव जाणावा '

रामदासांच्या शिष्यगणांत मात्र विचार आणि भाषा या दोन्हीं बाबतींत खास रामदासी वैशिष्ट्यानें तळपणारा असा कोणीहि प्रभावी शिष्य[1] दृष्टीस पडत नाहीं. रामदासांच्या समकालीनापैकीं [2]जयरामस्वामी वडगांवकर,

रामदासी संप्रदायाची ग्रंथरचना

[3]रंगनाथस्वामी निगडीकर, [4]केशवस्वामी भागानगरकर, [5]आनंदमूर्ति ब्रम्हनाळकर हे चार साधुपुरुष मिळून रामदासपंचायतन सिद्ध होते. परंतु प्रत्यक्षांत यांचे संप्रदाय अगदीं वेगळें आहेत. वाङ्मय-रचनेंत किंवा दृष्टिकोनांतहि तसें रामदासी वळण नाहीं. बहुतेकांची रचना आख्यानपर व भक्तिपर अशीच असून त्यांचीं उपास्यदैवतेंहि भिन्न आहेत. तेव्हां नाथपंचकाप्रमाणेंच या पंचकालाहि विशेष अर्थ नाहीं.

---

१ याला अपवाद एक दादेगांवच्या देवदासाचा. याची मराठी-हिंदी रचना उपलब्ध आहे. आशय-आविष्कार याबाबत जोरकस रामदासी वळण त्यानें गिरविलेलें दिसतें.

२ इ. स. १५९९-१६७२. शांतलिंगाप्पा या लिंगायत साधूच्या गादीचे अधिपति. कऱ्हाड भागांत शेणोलीजवळ वडगांवला मठ. कृष्णोपासक. **ग्रंथरचना**-सीतास्वयंवर, (इ. स. १६४८) रु. स्वयंवर, (इ. स. १६५४) दशमस्कंध टीका (ओंव्या ९९५९) आध्यात्मिक प्रकरणें, अभंग, पदें इ.

३ इ. स. १६१२-१६८४. आनंदसंप्रदायी; राजविलासी साधुपुरुष. सातारा जिल्ह्यांत निगडीला मठ. रामजन्म, गजेंद्रमोक्ष, सुदामचरित्र, पंचीकरण इ. स्फुट प्रकरणें, पदें, श्लोक, अष्टकें इ. रचना. पदरचनाकार म्हणून प्रसिद्ध.

४ समाधिकाल इ. स. १६८२. हैद्राबाद प्रांतांतील प्रसिद्ध साधुपुरुष.

५ इ. स. १६२८-१६९६. आनंदसंप्रदायी. भूपाळ्या, पदें इ. भिलवडी जवळील ब्रम्हनाळला समाधि व मठ. अनेक राजकारणी पुरुष यांचे शिष्य होतें. पत्रव्यवहारांत राजकीय उल्लेख.

रामदासांची शिष्यशाखा बरीच मोठी असून तिची ग्रंथरचनाहि पुष्कळ आहे. पण तीमध्यें अध्यात्मपरता व पूर्वापार चालत आलेला भक्तिपंथाचा बोध यांवरच सारा भर आहे. प्रचलित विज्ञान, राजकारण, व्यवहारधर्म या खास रामदासी विषयांना कोणीं हात लावलेला दिसत नाहीं. रामदासांविषयींच्या उत्कट गुरुभक्तीमुळेंच त्यांना 'रामदासी' म्हणावयाचें, मात्र महानुभावांच्या चक्रधरभक्तींतून जसें तत्संबंधींचें चरित्रपर वाङमय निर्माण झालें. त्याचप्रमाणें समर्थभक्तांनींहि गुरुचरित्र पाल्हाळानें वर्णिलें आहे. [1]गिरिधरांचा '**समर्थ प्रताप**' व 'श्रीस्वामीदर्शन' आणि [2]भीमस्वामींचें 'भक्तलीलामृत' हीं या दृष्टीनें उल्लेखनीय उदाहरणें होत. आत्मारामहाराज येक्केहाळीकर यांच्या '**दासविश्रामधाम**' (ओंव्या १६३०२) या प्रचंड ग्रंथांत रामदासांच्या चरित्राबरोबर रामदासी वाङमयहि संग्रहित केलें आहे. रामदासी मठ, संप्रदाय, त्यांचे आचार, वगैरेंची तपशीलवार माहिती त्यांत दिली आहे. त्यामुळें 'समग्र रामदास' किंवा 'रामदासी विश्वकोश' असेंच स्वरूप या ग्रंथाला आलें आहे.

रामदासांचे पट्टशिष्य उद्धव, कल्याण यांची कांहींहि ग्रंथरचना नाहीं. रामदासांचे बंधु गंगाधर[3] ऊर्फ ज्येष्ठ यांचे 'भक्तिरहस्य' व 'सुगमोपाय' हे दोन ग्रंथ आहेत. शैव-वैष्णवांच्या व्रतकथा, भक्तचरित्रें व भक्तिमार्गाचा महिमा हाच भाग यांत आला आहे. समर्थांचा विशिष्ट दृष्टिकोन त्यांत कोठेंहि नाहीं. दासबोधानंतर उल्लेखनीय असा ग्रंथ म्हणजे दिनकर

---

१ वेणाबाईंची शिष्या बयाबाई हिचा शिष्य.- इ. स. १६५३-१६२९

२ कल्याणस्वामींच्या ज्येष्ठ बंधूंचा नातू व तंजावर मठाचा संस्थापक. रामदासांचा चरित्रकार म्हणून प्रसिद्ध.

३ रामीरामदास-(इ. स. १६०५-१६७७.) नांवाचे पुष्कळ अभंग आहेत.

गोसाव्यांचा (इ. स. १६२८-१७०३) '**स्वानुभव दिनकर**' (ओंव्या ६७५०). या ग्रंथांत वेदान्त, भक्ति यांच्या बोधाबरोबर आत्मचरित्रहि कवि देतो. शिवाजीनंतरच्या औरंगजेबाच्या आक्रमणाचें यांत वर्णन आलें आहे. चक्रधराप्रमाणें रामदासांच्या शिष्यांत स्त्रियाहि होत्या. त्यांपैकीं मिरजेच्या मठाची महंत **वेणाबाई** (इ. स. १६२७-१६७८.) ही चांगली कवयित्री असून तिचें '**सीतास्वयंवर**' हें ओंवीबद्ध काव्य लग्नसोहाळ्याचें यथासांग व चित्तवेधक वर्णन, आणि सहजरम्य भाषा या दृष्टींनीं उल्लेखनीय आहे. या खेरीज कौल, रामगुहकसंवाद, कांहीं अभंग, पदें इतकी रचना वेणाबाईंची प्रसिद्ध आहे. त्यांच्या रचनेंत स्त्रीस्वभावसहज मार्दव व सहृदयता असून भाषा साधी, घरगुती वळणाची आहे. वेणाबाईंचे प्रशिष्य **गिरिधर** यांनीं चाळिसावर ग्रंथ लिहिले आहेत. त्यांत रामदासांच्या दासबोधाचा भावार्थच 'विवरलेंचि विवरावें' या दृष्टीनें पुन्हा पुन्हा सांगितला आहे. अब्द, मंगल, संकेत, छंदो, सुंदर, इत्यादि अनेक ओंवीबद्ध व श्लोकबद्ध रामायणें गिरिधरांनीं रचिली आहेत. मोरोपंतांच्या अनेकविध मंत्ररामायणांचा हा पूर्वावतारच म्हटला पाहिजे.

अशा प्रकारें रामदासपंथियांची सांप्रदायिक रचना पुष्कळ असली तरी 'सवाई दासबोध' निर्माण करणारा या संप्रदायांत कोणी झाला नाहीं, हें वैगुण्य मान्य केलेंच पाहिजे. रामदासी संघटना व्यक्तिप्रधान विभूतिमाहात्म्यावर उभारली गेल्यानें रामदासांच्या पश्चात् त्या संप्रदायाची प्रेरणा लोप पावली. संघटनेचा स्वतंत्र बाणा नष्ट झाला. रामदासांनंतर एकहि कर्तबगार विभूति या पंथांत निर्माण झाली नाहीं. मठांचे महंत मिरासदार बनले. सरंजामी उत्पन्नाच्या जमिनी संभाळण्यांत, त्यापायीं कोर्टकचेऱ्या करण्यांत, त्यांची हयात खर्च होऊं लागली. फावल्या वेळांत आध्यात्मिक स्वरूपाचा रामोपासनेचा पंथ त्यांनीं चालविला. दिनकर

गोसावी, मेरूस्वामी, हरिहरबुवा टाकळीकर या रामदासी मंडळींनीं भागवतधर्मियांची विठ्ठलोपासनाहि चालविलेली दिसते. संप्रदायांतील एकनिष्ठा, कणखरपणा, पृथगात्मता संपल्याचेंच हें लक्षण होय.

एकनाथांची टीकात्मक व आख्यानपर लेखनाची परंपरा चालविणारे शिवकालांतील अग्रेसर कवि म्हणजे 'यथार्थदीपिका' कार व भागवती प्रकरणांचे कर्ते वामनपंडित हेच होत. त्यांच्यासंबंधीं विश्वसनीय माहिती

वामनपंडित

उपलब्ध नसल्यानें वामन या व्यक्तीसंबंधीं व तिच्या ग्रंथकर्तृत्वाविषयीं अनेक तर्कवितर्क* पसरले आहेत. रामदासांच्या चरित्रकारांनीं वामनपंडितांना रामदासांचे शिष्य ठरविलें असलें तरी, त्यांच्या ग्रंथरचनेवर रामदासी छाप बिलकूल दिसून येत नाहीं. तेव्हां रामदास शिष्य[1] वामन हा कोणी दुसराच असावा. एकीकडे अध्यात्मप्रौढ अशी रचना तर दुसरीकडे शृंगारप्रधान कृष्णकथा या परस्परविरोधी स्वरूपाच्या ग्रंथकर्तृत्वामुळें वामनाच्या अनेकत्वाविषयीं[2]

---

* प्राचीन मराठी कविपंचक,- प्र. २ पहा. (प्रा. पंगु).

१ मनास बोध, हनुमंतस्तव, करुणाष्टक, रामस्तव व रामाचा धांवा हीं वामनपंडितांच्या काव्यसंग्रहांतील प्रकरणें या वामनाचीं असावींत.

२ 'वामन कवि एक कीं अधिक' हा प्रश्न श्री. बा. अ. भिडे यांनीं उपस्थित केला होता. (सरस्वती-मंदिर १९०५) त्यांच्या मतानें १ यथार्थ-दीपिकाकार वामन, २ शांडिल्यगोत्री वामन ३ वासिष्ठ गोत्री वामन ४ शृंगार प्रिय वामन ५ यमक्या वामन असे पांच वामन असावेत. श्री. आजगांवकरांनीं या पांचांतून दोनच भिन्न वामन निश्चित केले आहेत. वासिष्ठगोत्री यथार्थदीपिकाकार शृंगारप्रिय वामन शेष (आडनांव) म्हणजे प्रसिद्ध वामनपंडित होत. आणि शांडिल्यगोत्री लक्ष्मीनृसिंहसुत यमक्या वामन हा दुसरा. कदाचित् हाच रामदासशिष्य वामन असावा. (महाराष्ट्र कविचरित्र भाग १).

टीकाकारांत बरीच चर्चा झाली आहे. पण दोहोंमधील आध्यात्मिक दृष्टिकोनाचा सारखेपणा व भाषासाम्य पाहतां 'यथार्थदीपिका'-कार वामनपंडितांचींच भागवती आख्यानें असावींत अशी खात्री पटतें.

कांहीं आख्यानांच्या शेवटच्या श्लोकांत वामनपंडितांनीं आपली वैयक्तिक माहिती त्रुटित स्वरूपांत दिली आहे. पण त्यांच्या मोठ्या ग्रंथांतून तसा कांहीं उल्लेख मिळत नाहीं. 'निगमसार' या ग्रंथांत मात्र त्यांनीं आपल्या गुरूपदेशाची हकीकत दिली आहे. पातशहाच्या गैरमर्जीमुळें विजापूर सोडून काशीक्षेत्रीं गेल्यावर वामनांनीं बारा वर्षें शास्त्राध्ययनांत घालवून पांडित्य संपादिलें. ठिकठिकाणच्या वादविवादांत अजिंक्यपत्रें मिळवीत ते दक्षिणेंत आले. यावेळीं ते द्वैताभिमानी कर्मठ वैष्णव होते. त्यांनीं तुकाराम-रामदासादि महाराष्ट्रीय संतांच्या भेटी घेतल्या. त्यानंतर आत्मज्ञानाच्या तळमळीनें गुरूचा शोध करीत ते दक्षिणेकडे चालले असतां मलयपर्वतावर सच्चिदानंद[1] नांवाच्या यतींनीं दर्शन देऊन त्यांना भार्गवी वारुणी विद्या पढविली. (इ. स. १६७३ पूर्वीं). तेव्हां अद्वैतबोध होऊन भक्तीचें खरें रहस्य त्यांना उमगलें. पुढें वारणातीरीं शिगांव-कोरेगांव येथें राहून पंडितांनीं आपली बहुतेक सारी ग्रंथरचना केली. महाबळेश्वरच्या वाटेवर गुन्हेघर येथें वामनांनीं इ. स. १६९५ मध्यें समाधि[2] घेतली.

---

१ शृंगेरी पीठाचे त्यावेळचे शंकराचार्य.-'वामन पंडितांचे गुरु कोण?' (रा. म. आठवले) चित्रमयजगत्, मार्च १९३२.

२ सातारा जिल्ह्यांतील शिगांव-कोरेगांव हें वामनपंडितांचें मूळ ठिकाण असावें. त्या गांवीं वामनांचें वृंदावन आहे, तर गुन्हेघर जवळील भूगांवीं त्यांची समाधि आहे. पंडितांचा जन्मकाल इ. स. १६०८ असावा.

'**निगमसार**' (इ. स १६७३) या ग्रंथांत पंडितांना त्यांच्या गुरूनें पढविलेल्या भार्गवी वारुणी विद्येचें विवेचन आलें आहे. या ग्रंथांत तेवढा ग्रंथरचनेचा काल नमूद केला आहे. त्यावरून पंडितांची सारी ग्रंथरचना उत्तरवयांतच झाली असावी असें दिसतें.

वामनपंडितांची ग्रंथरचना

यानंतरच त्यांनीं कर्मतत्त्व, ब्रम्हस्तुति, चित्सुधा श्रुतिसार, इत्यादि **आध्यात्मिक प्रकरणें** लिहिलीं. अनुभूतिलेश, सिद्धान्तविजय, श्रुतिकल्पलता हे त्यांचे **संस्कृत ग्रंथ** याच सुमाराचे असावेत. **समश्लोकी गीता** रचिल्यावर वामनपंडित कृष्णकथेकडे वळले. या सर्व रचनेवरून पंडितांच्या सखोल शास्त्राध्यनाची, वेदान्ती दृष्टिकोनाची आणि तर्कनैपुण्याची कल्पना येतें. '**यथार्थदीपिका**' हा पंडितांचा शेवटचा ग्रंथ याच पठडींतील आहे. गीतेंतील तत्त्वज्ञान यथार्थतेनें सांगण्याच्या अभिनिवेशानें ही टीका त्यांनीं लिहिली. त्यामुळें दैवी अधिष्ठानाची बैठक न घेतां केवळ बुद्धि, तर्क आणि शास्त्राधार यांची कसोटी लावून अर्थनिश्चिति करण्याची–तर्कशुद्ध विवरणाची खटपट वामनपंडितांनीं यामध्यें केली आहे. तसें करीत असतां ज्ञानेश्वर–दासोपंतादि पूर्वटीकाकारांवर त्यांनीं आक्षेप घेतले आहेत. त्यांच्यावर वैयक्तिक टीकाहि केली आहे. (उदा०–जगीं मिरवोनि सिद्धि । आपुल्या टीकेची केली प्रसिद्धि ।). अगदीं तर्ककर्कश पद्धतीनें लिहिलेल्या या टीकेंत काव्यगुणांचा संपूर्ण अभाव आहे. वामनपंडितांची या टीकेंतील भाषा सकस, जोरदार व वकिली थाटाची आहे. तिच्यांत स्पष्टता, सुगमता आहे; पण लालित्य अजिबात नाहीं. या टीकेवरून वामनांचें प्रगाढ पांडित्य, स्वतंत्र प्रज्ञा, निस्पृहता व भाषाप्रभुत्व हे विशेष चांगलेच स्पष्ट होतात.

गीता-समश्लोकी, जगन्नाथपंडितांची गंगालहरी, भर्तृहरीचीं शतकें या संस्कृत ग्रंथांचीं उत्कृष्ट [1]**भाषांतरें** करून पंडितांनीं एक नवा आदर्श घालून दिला असें म्हटलें पाहिजे. त्यांवरून संस्कृत-मराठी दोन्ही भाषांवरील वामनांचें प्रभुत्व व भाषांतर नैपुण्य यांची साक्ष पटते.

या अध्यात्मग्रंथांपेक्षां कृष्णकथापर आख्यानांनींच वामनपंडित लोकप्रिय झाले आहेत. एकनाथांच्या भक्तिप्रवण भागवतरचनेच्या संस्कारानेंच पंडितांचें लक्ष भागवती आख्यानांकडे व रामकथेकडे वळलें असावें. या

वामनांची आख्यान कविता

प्रकारची पुष्कळच रचना* वामनपंडितांची आहे. तीपैकीं अहिल्योद्धार, सीतास्वयंवर, भरतभाव, लोपामुद्रासंवाद हीं रामायणी प्रकरणें आणि कृष्णजन्म, बालक्रीडा, वनसुधा, वेणुसुधा, मृत्तिकाभक्षण, कात्यायनीव्रत, भामाविलास, राधाविलास, राधाभुजंग, रासक्रीडा, कंसवध, हीं भागवती प्रकरणें प्रसिद्ध आहेत. त्यांखेरीज गजेंद्रमोक्ष, वामनचरित्र, शुकरंभासंवाद, दशावतारचरित्र, इत्यादि इतर आख्यानेंहि उल्लेखनीय आहेत.

वामनांच्या या आख्यानकवितेचें अधिष्ठान एकनाथांप्रमाणें अध्यात्म हेंच आहे. केवळ कलाविलासाची दृष्टि येथें नसून आत्मशुद्धीच्या व भगवद्‌भक्तीच्या प्रेरणेनेंच त्यांनीं ही रचना केली आहे. ज्ञाननिष्ठ सगुणोपासक हीच त्यांची भूमिका त्यांतून स्पष्ट होते. लोकरंजन करणाऱ्या काव्यप्रकारांतून अद्वैतभक्तीचा प्रसार करण्याची एकनाथी भूमिकाच

---

१ हें भाषांतरकर्तृत्व वामनशिष्य हरि दीक्षितांचें असावें. (सह्याद्रि, मार्च १९३८-डॉ. मा. गो. देशमुख) (सह्याद्रि, सप्टेंबर १९३८-स. ल. कात्रे, 'मराठी शतकत्रयाचा कर्ता कोण?' प्रश्न अनिर्णीतच.)

* वामनपंडितकृत कवितासंग्रह, भाग १ ते ३. (संपादक-दा. के. ओक).

पंडितांनीं येथें ठेवली आहे. तरी सुद्धां साहित्यशास्त्रीय दृष्टीनें अनेक काव्यगुण वामनांच्या आख्यानरचनेंत अंतर्भूत झाले आहेत. या रचनेंतील रसवत्ता, वर्णनचातुरी आणि नादमाधुर्य यांमुळें सामान्य वाचकावरहि या प्रकरणांची विलक्षण मोहिनी पडते. वामनपंडितांची रचना चमत्कृतिपूर्ण असूनहि भावमधुर आहे. अध्यात्माचें अनुसंधान न सोडतां वामनांची वाणी शृंगार, अद्‌भुत, करुण, वत्सल अशा विविध रसांत रंगते. करुण-वत्सल या रसांत तर पंडितांच्या कवित्वशक्तीचा परमोत्कर्ष पाहावयास सांपडतो. शृंगाराचें मात्र नेहमींच उत्तानपणांत पर्यवसान होतें; तरी शेवटीं वेदान्तांत त्याची परिणति करण्याची सावधगिरी पंडित ठेवतात. वामनांचें वर्णनचातुर्य बहारीचें आहे. स्वभावोक्ति हा त्यांचा आवडता अलंकार आहे. प्रसंगांचीं चित्रें ते हुबेहूब रेखाटतात. त्यांत त्यांचें सूक्ष्म निरीक्षण व व्यापक अनुभव यांचा प्रत्यय येतो. ठराविक यमकानुप्रासांची पुनरुक्ति, ऱ्हस्वदीर्घांच्या ओढाताणीमुळें आलेला भाषेचा अशुद्धपणा, शिष्टअशिष्ट शद्बांची सरमिसळ, शद्बांची विकृत रूपें, अर्थदृष्ट्या दुर्बोध व क्लिष्ट वाक्य रचना, निरर्थक अशा पादपूरक शद्बांची गर्दी, इत्यादि दोष पंडितांच्या रचनेंत पुष्कळच आढळतात. तरी 'सुश्लोक वामनाचा' असें म्हटलें जावें, इतकें भाषाप्रभुत्व व वृत्तवैचित्र्य पंडितांच्या एकंदर रचनेंत दिसून येतें. सारांश, या आख्यानरचनेवरून पंडितांची सहृदयता, रसिकता व रचना-कौशल्य यांची ओळख रसिक मनाला सहज पटते.

या आख्यानपर श्लोकरचनेनें कलापूर्ण काव्यरचनेचा एक नवा संप्रदायच पंडितांनीं निर्माण केला असें म्हटलें पाहिजे. कारण वामनी प्रकरणाच्या गुणविशेषांचें त्यांच्या दोषांसकट अनुकरण करून वामन-शिष्यांनीं वा इतरांनीं अशा धर्तीचीं किती तरी आख्यानें रचिली आहेत. वामनी पद्धतीचें इतकें हुबेहूब अनुकरण या मंडळींनीं केलें आहे कीं,

त्यामुळें वामनाचीं नसलेलीं अशीं कित्येक प्रकरणें वामनपंडितांच्या कविता-संग्रहांत मिसळली गेलीं आहेत. हरि वामन,[1] साम्राज्य वामन,[2] विश्वनाथ वामन,[3] बापू वामन[4] अशा अनेक वामनशिष्यांनीं लोकप्रिय अशा वामनी शैलीचें अनुकरण करून मराठी आख्यानकवितेचें दालन संपन्न केलें आहे.

मराठींतील आख्यानक काव्य

दामोदर पंडित, नरेंद्र व भास्करभट बोरीकर या महानुभावांची रचना सोडल्यास आख्यानकवितेच्या प्रवर्तकाचा मान रुक्मिणीस्वयंवरकर्त्या एकनाथांनाच द्यावा लागतो. केवळ कलागुणांचा उत्कर्ष लक्षांत घेतां आख्यानकवींमध्यें सर्वश्रेष्ठत्वाचें पद मुक्तेश्वरांकडे जातें. विशिष्ट प्रकारच्या श्लोकबद्ध, स्फुट कथारचनेच्या वैपुल्यानें आख्यानकविता लोकप्रिय करण्याचें श्रेय वामनाला मिळतें. अशा रीतीनें एकनाथ, मुक्तेश्वर, वामन हे तिघे आख्यान कवितेचे प्रणेते ठरतात. मात्र या आख्यानकवितेच्या प्रथेचा उत्कर्ष 'पंडित कवि' या अभिधानानें ओळखल्या जाणाऱ्या रघुनाथ, सामराज, नागेश, विठ्ठल, आनंदतनय या शिवकालीन कविमंडळींनींच केला. एकनाथांचें आध्यात्मिक रूपकाचें वैशिष्टय, भक्तिभावाच्या जिव्हाळ्यानें हरिकथा सांगणें हा वामनी विशेष

---

१ भीष्मार्जुनयुद्ध, भीष्मभक्तिभाग्य, जयद्रथवध, विराटपर्व हीं भारती प्रकरणें आणि शतकत्रय, गंगालहरी, गीतार्णवसुधा हीं भाषांतरित प्रकरणें हरि वामनाचीं आहेत.

२ सुदामचरित्र, राजयोग, अनुभूतिलेश, ब्रम्होपदेश या प्रकरणांचा कर्ता साम्राज्य वामन— रु. हरणकर्त्या सामराजापेक्षां निराळा.

३ पाताळखंड, नौकाक्रीडा हीं प्रकरणें विश्वनाथ वामनाचीं.

४ स्थालीपाक, पार्थभाग्य, गोरसविक्रय, रसनास्तुति, नाममाहात्म्य, भक्तिमाहात्म्य या प्रकरणांचें कर्तृत्व बापू वामनाकडे जातें.

किंवा मुक्तेश्वरांची पौराणिक निवेदनपद्धति व आर्ष महाकाव्याचा डौल या गोष्टी वरील कवींच्या रचनेंत दृष्टीस पडत नाहींत. कथाकाव्याची प्रेरणा व कलादृष्टि एवढया दोनच गोष्टी आख्यानकवितेच्या प्रणेत्यां-कडून त्यांनीं घेतल्या; बाकी या पंडित कवींच्या कवितेची घडण अजीबात वेगळी झाली आहे. त्यांनीं मुख्यतः स्वयंवरकथाच लिहिल्या आहेत. पुराणांऐवजीं संस्कृतांतील नैषधादि महाकाव्यांच्या आदर्शानुरूप आपलीं काव्यें सजविण्याचा कमीअधिक यशस्वी प्रयत्न यांतील प्रत्येकानें केला आहे. संस्कृतांतील पंचमहाकाव्याची धाटणी डोळ्यांपुढें ठेवून आणि कलाविलासाच्या दृष्टीला प्राधान्य देऊन रचिलेलें, शृंगार-वीर-करुणादि रसांनीं युक्त असें सगुण, सालंकार आणि वृत्तबद्ध कथाकाव्य म्हणजे शिवकालांतील पंडिती काव्य होय. मात्र हे कवि साहित्यकलाभिज्ञ असले तरी वस्तुतः मोठे पंडित होते, असें समजण्याचें कारण नाहीं. म्हणूनच 'पंडित कवि' या उपाधीपेक्षां आख्यान-कवि किंवा कला-कवि असा त्यांचा उल्लेख करणें, सयुक्तिक वाटतें.

'रुक्मिणीहरण' व 'मुद्‌गलाख्यान' हे काव्यग्रंथ[१] लिहिणारे **सामराज** राजोपाध्ये[२] (इ. स. १६१३-१७००) हे या आख्यानकवींमध्यें वयानें ज्येष्ठ कवि होत. अष्टसर्गात्मक प्रदीर्घ रचना, धीरोदात्त नायक, प्रेमविव्हल

---

१ सामराजाच्या नांवावर कोकशास्त्रापासून भागवत टीकेपर्यंत अनेक ग्रंथ आढळतात. परंतु रुक्मिणीहरण-कर्त्या सामराजाची काव्यकुशलता त्या एकाहि ग्रंथांत आढळत नाहीं. तेव्हां या विविध ग्रंथांचा कर्ता सामराज-शामराज कोणी दुसराच असावा.

२ वि. ल. भावे सामराजाला शाहुकालीन मानतात, पण तो शिवकालीनच ठरतो. सामराज, द्वितियावृत्ति, इ. स. १९४१-(प्रा. पंगु.) महाराष्ट्र सारस्वत-पुरवणी (पान १००९)-(डॉ. तुळपुळे).

नायिका, विप्रलंभ शृंगार, निसर्गवर्णनें, विरहावस्था व तीवरील उपचार, युद्धप्रसंग, शेवटीं लग्नसमारंभ, इत्यादि महाकाव्याचा आशय आपल्या रुक्मिणीहरणांत कवीनें आणला आहे. त्यांवरून संस्कृत महाकाव्याच्या अनुकरणाची प्रवृत्ति व कवीची कलादृष्टि सहज दिसून येते. रुक्मिणीहरणांतील बराचसा भाग संस्कृत काव्याच्या धर्तीवरच कवीनें रचिला आहे. संस्कृतांतील पंचमहाकाव्यें व साहित्यशास्त्र यांच्याशीं त्याचा चांगलाच परिचय दिसतो. प्रजापालनतत्पर अशा भीमकराजाचें वर्णन किंवा रुक्मिणीच्या आईला डोहाळे लागल्याचें वर्णन, कृष्णदर्शनासाठीं लगबगीनें दारा-खिडक्यांशीं येणाऱ्या पौरस्त्रियांची धांदल इत्यादि भाग वाचतांना रघुवंशादि काव्यांची छाप जाणवते. तिसऱ्या सर्गांतील कृष्णनिंदा कुमार-संभवांतील बटूच्या शिवनिंदेची आठवण करून देते. आणि रुक्मिणीच्या रूप-वर्णनावर पार्वतीच्या रूपवर्णनाची छाया पडलेली स्पष्ट दिसते. कृष्णभक्ति, कांहीं प्रसंगवर्णनें व कथेला आध्यात्मिक बैठक देण्याचा प्रयत्न या बाबतींत सामराज एकनाथांचे ऋणी दिसतात. आपल्या पुरोहित पेशाला साजेशी धार्मिक आचारांचीं तपशीलवार वर्णनें कवि करतो. स्वयं-वराच्या तयारीचें वर्णन करतांना वस्त्रें, दागिनें, भांडीं, फळें, पक्वान्नें यांच्या लांबलचक याद्याहि तो देतो. त्यांवरून कवीच्या काळांतील सामाजिक परिस्थितीची स्पष्ट कल्पना चोखंदळ वाचकाला येऊं शकते. त्याचप्रमाणें कवीच्या बहुश्रुततेचाहि त्यावरून प्रत्यय येतो सामराजाचें अवलोकन व्यापक नि सूक्ष्म दिसतें. अनेक तऱ्हेच्या बारीक सारीक उल्लेखांनीं तत्कालीन लोकस्थितीचें, लोकांच्या व्यव-हाराचें सुस्पष्ट चित्र आपल्या काव्यांत तो उभा करितो. त्या दृष्टीनें सुदेव ब्राम्हणाची पत्नी आपल्या गृहस्थितीचें रडगाणें रुक्मिणीजवळ गातें, हा प्रसंग उलेखनीय आहे. तसेंच. देवीच्या दर्शनाला निघालेल्या रुक्मिणीला निरोप देतांना ' नव वधूनें सासरी कसें वागावें ' यासंबंधीं

रुक्मिणीची आई अगदीं बारीक सारीक सूचना देते. (सर्ग ७-१०१ १७२) हा प्रसंग कवीनें स्वतःच्याच कल्पनेनें निर्मिला आहे; पण तें वर्णन इतकें स्वाभाविक नि परिणामकारक उतरलें आहे कीं, तें वाचतां वाचतां आपल्यापुढें प्रेमळ अंतःकरणाची पण विवेकशील नि व्यवहारनिपुण अशी माताच उभी रहाते. 'कुळस्त्रीला बाई पति-विण नसे दैवत दुजें' किंवा 'सासू सुनेला सिकवीत आहे। वर्ते कसी आपण, हें न पाहे' यासारखे उद्गार काढणाऱ्या रुक्मिणीच्या आईच्या रूपानें त्या काळच्या संसारी स्त्रीचा प्रातिनिधिक आदर्शच सामराजानें आपल्यापुढें उभा केला आहे. त्यांतून तत्कालीन कौटुंबिक संबंधाचें चित्रहि आपण पाहूं शकतो.

इतर पंडित कवींच्या तुलनेनें सामराज नुसता व्यवहारज्ञच नव्हे तर, तत्त्वज्ञहि दिसतो. म्हणूनच पहिल्या सर्गांत कृष्ण चरित्र सांगतांना आणि चौथ्या सर्गांत सुदेव ब्राम्हण कृष्णभक्तींत रंगलेला दाखवितांना सगुणभक्तीशीं अद्वैतबोधाची सांगड घालण्यांत तो यशस्वी झाला आहे. कृष्णाची प्रतीक्षा करून श्रांत झालेली रुक्मिणी त्याला उद्देशून प्रार्थना करते; (सर्ग ७) त्या प्रसंगांत तर सामराजानें अध्यात्मबोध आणि भक्तिभाव यांचा उत्कृष्ट मिलाफ केला असून काव्याच्या रसरंगांत तो स्वतःच द्रवून गेला आहे. इतर समकालीन कवींच्या मानानें भक्तिरसांत रंगून जाण्याची वृत्ति सामराजांतच अधिक दिसतें. ती वृत्ति काव्यालाहि पोषक ठरली आहे.

रुक्मिणीहरण काव्यांत शृंगार नि वीर या रसांना चांगला अवसर मिळाला आहे. भक्तीची पार्श्वभूमी सर्वत्र असली तरी शृंगा-राच्या उठावांतहि सामराजाची लेखणी कमी पडत नाहीं. रुक्मिणीची विरहव्याकुळ अवस्था-तीवरील उपचार, इत्यादि वर्णनांत संकेतांचा

भाग पुष्कळच आहे. तसेंच, नरेंद्र वा रघुनाथपंडित यांच्या तुलनेनें काव्यात्मकता वा कल्पकता यांचा वाण येथें बरीच भासते, तरी देखील विप्रलंभ शृंगाराचा परिपोष करण्यांत कवि यशस्वी झाला आहे, यांत शंका नाहीं. विशेषत: उखा-अनिरुद्ध कथेंतील स्वप्नदर्शना-प्रमाणें कृष्णहि रुक्मिणीला स्वप्नांत भेटतो. असा प्रसंग स्वतंत्रपणें योजण्यांत सामराजानें कल्पकता दाखविली असून स्वप्नशृंगाराच्या मदतीनें विप्रलंभाची-विरह भावनेची-उत्कटता त्यानें साधली आहे. एकनाथ, नागेश, विठ्ठल यांच्या मानानें येथेंहि सामराज प्रभावी ठरतो.

सामराजाची भाषा संस्कृतप्रचुर व समासबद्ध असूनहि कुठें दुर्बोध झालेली नाहीं. इतर समकालिनांच्या मानानें सामराजाच्या रचनेंत जुने मराठी शब्द पुष्कळच आढळतात. प्राकृत किंवा ग्रामीण शब्दां-बरोबर फार्शी शब्दहि मधून मधून आहेतच. तसेंच जवळ जवळ नव्वदावर म्हणी आणि पन्नासावर सिद्धान्तवजा (अर्थान्तरन्यासात्मक) वाक्यें रुक्मिणीहरण काव्यांत सांपडतील. संपन्नतेचें वातावरण निर्माण करणाऱ्या राजैश्वर्याच्या वर्णनाबरोबरच भाषेच्या शब्दसंपत्तीचा खजिनाहि या काव्यांत भरपूर आढळतो. म्हणून भाषाभ्यासाच्या दृष्टीनेंहि हें काव्य उपयुक्त ठरेल.

यशवंतराव कोकाटे या सरदारांचे आश्रित व भिंगारचे ग्रामजोशी **नागेशां†** (इ. स. १६१८–१६९३) यांनीं चंद्रावळीवर्णन व सीतास्वयंवर, (अनेक वृत्तात्मक ४१५ श्लोक) रुक्मिणीस्वयंवर, शारदाविनोद, रसमंजिरी, हीं पांच काव्यें लिहिलीं आहेत.

---

† सीतास्वयंवर, प्रस्तावना – (प्रा. पंगु व डॉ. मा. गो देशमुख).

नागेश भिंगारकर चांगले बहुश्रुत होते. संस्कृतांतील पंचमहाकाव्यें व तदनुषंगिक ग्रंथ त्यांनीं मार्मिकपणानें अभ्यासिले असावेत. कारण संस्कृत काव्यांतील वेंचक प्रसंगांचा अनुवाद आपल्या काव्यांत योग्य स्थलीं योजण्याचें कौशल्य त्यांच्या ठिकाणीं दिसून येतें. स्वयंवराला आलेल्या राजांचें सीतेच्या सखीनें केलेलें वर्णन, रंगमंडपांतील राजांच्या शृंगारचेष्टा, रामाला पहाण्यासाठीं घरकाम सोडून धांवत निघालेल्या पौरस्त्रियांची धांदल या सारख्या वर्णनांना रघुवंश वगैरे महाकाव्यांतील तसल्याच वर्णनांचा आधार त्यांनीं घेतला आहे. '**चंद्रावळी**' आख्यान तर नागेशांनीं अग्निपुराणांतून घेतलें आहे. शारदाविनोदांत ते स्वत:ला 'नानाकाव्यकलापचतुर' असें म्हणवून घेतात. काव्यें–नाटकें–पुराणें यांबरोबरच साहित्यशास्त्र, छंद:शास्त्र, कामशास्त्र इत्यादिचाहि नागेशांनीं रसिकतेनें अभ्यास केलेला दिसतो. रामाच्या मिरवणुकींतील चित्रिणी, पद्मिनी, हस्तिनी, शंखिनी या जातीच्या सुंदर स्त्रियांची शास्त्रोक्त लक्षणें विषयांतर पत्करूनहि त्यांनीं सांगितली आहेत. नागेशांचें अंवतीभंवतीच्या समाजाचें निरीक्षण सूक्ष्म नि वेंचक दिसते. तत्कालीन गुरुशिष्य–संबंध, शिष्यांचा बडबडा स्वभाव, गोसाव्याचें बकध्यान, स्त्रीलंपटांची बुवाबाजी, कोंकणस्थांची बुद्धितरलता, ग्रामजोशांची रूढीप्रियता, विवाहविधींतील धर्मकृत्यांवरून भिक्षुकांची भांडणें इत्यादि उल्लेख प्रसंगपरत्वें कवीनें केलें आहेत. त्यामुळें शिवकालीन समाजांतील दोषांवरच कवीनें प्रकाश टाकला आहे. मात्र स्वयंवरासाठीं पाचारण केलेल्या राजांच्या यादींत चव्हाण, मोरे इत्यादि मराठा मंडळींचा उल्लेख करण्यांत व सीतेच्या अलंकार–वर्णनांत मुसलमानकालीन भूषणें, तशीच तत्कालीन वाद्यें, हत्यारें, घोडी यांचा आपल्या वर्णनांत समावेश करण्यांत कविकडून कालविपर्यासाचा दोष घडला आहे.

नागेशांची वर्णनशैलीहि वैशिष्ट्यपूर्ण आहे. स्थलवर्णनापेक्षां व्यक्ति-वर्णनांत ते अधिक कुशल आहेत. सीता, चंद्रावळी वगैरेंच्या रूपवर्णनांत शृंगारप्रिय नागेश अगदीं रमून जातो. मात्र चंद्रावळीच्या वर्णनाचे ८० श्लोक सीतेच्या रूपवर्णनासाठीं जसेंच्या तसें त्यांनीं सीतास्वयंवरांत घेतले आहेत, तर त्या उलट गौतमाश्रमाचें शब्दचित्रच 'हरिवन' (चंद्रावळी) वर्णनांत पुनरावृत्त झालें आहे. स्वतंत्र कल्पनाशक्तीच्या दुर्भिक्षाचाच हा पुरावा असें म्हणावें लागतें. नागेशांमध्यें विनोदबुद्धि आहे आणि ती मोठी कल्पक आहे. स्वतंत्र प्रसंग ती निर्माण करूं शकते. अहिल्योद्धारानंतर सारे ऋषी सुंदर पत्न्या मिळवण्यासाठीं मोठाले दगड डोईवर वागवित रामाकडे आले, हा विनोदी प्रसंग नागेशांनीं गमतिदारपणें वर्णिला आहे. पण विनोदाचें पर्यवसान ग्राम्यतेंत झालें आहे. उदाहरणार्थ, ऋषींच्या कुरूप बायकांचें निष्ठुर आणि बीभत्स वर्णन पाहावें[१]. तसेंच चंद्रावळी काव्यांत कृष्ण-गोपी विलासाचें वर्णन करतांना कवि बराच वाहवला आहे. मुळांत कवित्वाची चमक चांगली असली तरी आविष्कारांत गांवढळपणा व बाष्कळपणा फार आहे. शृंगारा-तिरेक, वर्णनांत बीभत्सपणा, यमकानुप्रासांची फाजील आवड, या गोष्टी सुसंस्कृत अभिरुचीचा अभावच दर्शवितात.

नागेशांनीं आपल्या सीतास्वयंवर काव्यांत परिचित अपरिचित अशी १६ अक्षरवृत्तें वापरलीं आहेत. कुठें कुठें वृत्तांचीं नांवेंहि श्लोकांत आणलीं आहेत. मात्र वृत्तसुखार्थ भाषादोष बरेच पत्करलेत. याबाबत वामनपंडितच

---

१ 'माझ्या घरीं बाइल पाहिली ते। तें पायली अन्न उभ्याच खाते.'
'वाचाट ते चाट महा अचाटी।' 'लंबस्तनी ते मजला न साजे।'
घोरे घरारा; वरपे फरारा। पादे परारा, मुतते झरारा॥
खाते करारा, वपुही खरारा। ते धांगडीचा बहु पैं दरारा॥
'अदंत माझे घरिंचीच पाहे। नांवें मृगाक्षी, परि अंध आहे॥'

नागेशांचे गुरु दिसतात. ' विराजतो–कविराज तो, भारतीला–भार तीला, सज्जनांचे-सज्ज नाचे, हे तुकाई-हेतु काई' यासारखी नागेशांच्या श्लोकांतील सश्लेष यमक बांधणी पाहून कोणालाहि वामनी श्लोकांची सहज आठवण होईल. तसेंच ' नको मना हांव धरूं धनाची। सेवा करी फार रघूत्तमाची ' यासारख्या मनोपदेश करणाऱ्या पंक्ती वाचल्या कीं, नागेशांच्या रचनेवरील रामदासी ठसा स्पष्ट होतो.

विठ्ठल बीडकर* (इ. स. १६२८–९०) हे आपल्या कूटात्मक रचनेमुळें विख्यात आहेत. रुक्मिणीस्वयंवर, सीतास्वयंवर, द्रौपदीवस्त्रहरण, पांचालीस्तवन, बिल्हण–चरित्र, रसमंजरी व विद्वज्जीवन अशीं सात काव्यें यांनीं लिहिलीं आहेत. ही सारी रचना इ. स. १६७४ च्या पुढची म्हणजे कवीच्या उतारवयांतीलच आहे. परिचित–अपरिचित अशीं विविधवृत्तें, निरनिराळे चित्रबंध, चमत्कृतिजनक यमकें, अनुप्रास, श्लेष, इत्यादि शद्बालंकारांची रेलचेल या विशेषांनींच विठ्ठलाची काव्यसृष्टि गजबजली आहे. उत्कट भावना, स्वतंत्र विचार आणि सुंदर कल्पना या तिन्ही बाबतींत व्यापारी पेशाचा विठ्ठल दरिद्री दिसतो. म्हणूनच पंडित कवींच्या मालिकेंत विठ्ठल हा शेवटच्या दर्जाचा कवि ठरला आहे.

आनंदतनय अरणीकर या तंजावर कडील कवीचीं वीस आख्यानें आणि पौराणिक कथांवरील एक हजार पद्यें उपलब्ध आहेत. ही सारी रचना म्हणजे ' हरिदासांची अन्नदात्री कामधेनूच होय ' (भावे); त्यांच्या उपयोगासाठींच लहान लहान, स्वयंपूर्ण, वृत्तबद्ध व श्रुतिमनोहर अशीं आख्यानें आनंदतनयांनीं रचिलीं आहेत. अवघ्या ८३ पद्यांत आनंदतनयांनीं **सीतास्वयंवराचा** कथाभाग आणला असला तरी, विठ्ठल किंवा नागेश

---

* सीतास्वयंवर, प्रस्तावना-(प्रा. पंगु). सह्याद्रि, (मार्च-एप्रिल १९५२).

यांच्या प्रदीर्घ स्वयंवरकथांशीं तुलना करून पाहिलें तर, या कवीचें हें छोटेंसें काव्य सरस ठरेल. सांसारिकांच्या श्रांत मनाला उल्हसित करणारी गोडी व चटकदारपणा आनंदतनयांच्या पद्यरचनेंत विशेष आहे. 'पद' कारांत त्यांचें स्थान बरेंच वरचें ठरेल.

आनंदतनयांचा व्याही तंजावरकर रघुनाथपंडित* 'नलदमयंती स्वयंवर' नामक एकाच [1]आख्यानानें अमर होऊन राहिला आहे. कला-गुणांच्या दृष्टीनें आख्यानकवींत सर्वश्रेष्ठ कवि कोण तर रघुनाथपंडितच.

रघुनाथपंडित

शिवकालीन प्रसिद्ध अशा सात[2] रघुनाथांपैकीं कोणता 'रघुनाथ' नलदमयंतीकर्ता ठरतो, हा अद्यापहि वादाचाच विषय आहे, मात्र हा कवि विद्वान्, सुसंस्कृत, रसिक,

---

* नलदमयंती स्वयंवर, प्रस्तावना—(श्री. अ. का. प्रियोळकर)
प्राचीन मराठी कविपंचक-(प्रा. पंगु), सह्याद्री–जुलै, ऑगस्ट, सप्टें. १९५०

१ या कवीची या शिवाय 'गजेंद्रमोक्ष व रामदासवर्णन' अशी दोन काव्यें आहेत. पण ती रचना काव्यदृष्ट्या महत्वाची नाहीं.

२ रघुनाथ बल्लाळ कोरडे, रघुनाथ गणेश नवहस्त, अनंत देवकीय रघुनाथ, रघुनाथभट चाऊरकर, रघुनाथभट उपाध्ये, रघुनाथ पंडितराव, रघुनाथ नारायण हणमंते असे सात 'रघुनाथ' शिवकालांत होऊन गेले. त्यापैकीं नलोपाख्यान कर्त्याचे गुणविशेष प्रियोळकरांच्या मतें रघुनाथभट उपाध्ये याला लागूं पडतात. आणि तोच शिवाजीच्या अष्टप्रधानांत 'पंडितराव' या पदावरून धर्माधिकारी म्हणून न्यायखात्याचें काम पहात असे. राजा जयसिंगाकडील शिष्टाईला यालाच शिवाजीनें पाठविलें होते. प्रा. पगूंच्या मतानें कर्नाटकच्या जहागिरीचा दिवाण म्हणून तंजावरला दीर्घकाल राहिलेल्या रघुनाथ नारायण हणमंतेकडेच नलदमयंती–स्वयंवराचें कर्तृत्व जातें. कारण काव्यांतर्गत पुराव्यावरून हा कवि चांगला अनुभवी मुत्सद्दि व सेनानी असावा असें दिसते आणि रघुनाथ हणमंते हा तसा होता.

व्यवहारज्ञ आणि राजदरबारांत वावरलेला आहे; याची साक्ष त्याच्या काव्यावरून पटते. 'रामदासवर्णन' या त्याच्या स्फुट रचनेवरून तो 'रामदासशिष्य' असल्याचें दिसून येतें; तर स्वयंवर काव्यांतील पद्यरचनेंत येणाऱ्या 'रामचंद्र' उल्लेखावरून त्याची रामभक्ति कळून येते. नलराजाचें वर्णन, त्याचा पोषाख, फारसी शब्दांची योजना, गड, सुरुंग, इत्यादि लष्करी शब्दांचा उपयोग आणि एकंदर संपन्नतेचें वातावरण या गोष्टींमध्यें शिवकालाचा [1]ठसा स्पष्ट दिसतो. दोनशे चोपन्न श्लोकांच्या खंडकाव्यांत आलेलीं पंधरा पदें, कवि हें काव्य कीर्तनकारांसाठीं लिहित असल्याचा पुरावा देतात.

रघुनाथपंडितांनीं आपलें काव्य नैषधकाव्याच्या आधारें लिहिलें आहे. पण २५४ श्लोकांपैकीं फक्त ६८ श्लोकच अनुवादात्मक आहेत. त्यामुळें काव्य भाषांतरित न ठरता, हर्षाच्या उत्कृष्ट कल्पना मराठींत आणल्याचें श्रेय मात्र कवीला मिळण्यास हरकत नाहीं. मुळांतील १७५० श्लोकांचा भाग २५० श्लोकांत आणण्यामध्यें कवीचें संक्षेपचातुर्य व मार्मिकता दिसते. त्यांतहि 'कठिण समय येतां कोण कामास येतो' किंवा औषध नलगे मजला' या उक्तीच्या वेळचे मुळांत नसलेले असे बहारीचे प्रसंग निर्माण करण्यांत कवीची स्वतंत्र कल्पनाशक्तिहि दृष्टीस पडते. शृंगार व करुण या लौकिक रसांना थारा देणारी नळदमयंतीसारखी मानवी प्रेमकथा निवड-

---

१ प्रियोळकरांच्या मतें रघुनाथपंडितांची काव्यरचना १६८१-८३ या कालांत झाली असावी. तर प्रा. पंगूंच्या मतानें संभाजीच्या कारकीर्दी संबंधीं अप्रत्यक्ष असे उल्लेख या काव्यांत आले आहेत. तेव्हां त्याची रचना संभाजीच्या कारकीर्दीनंतर झाली असावी. प्रा. शेंबवणेकर यांनीं तर संस्कृत प्रचुर भाषेची ढब व एकंदर काव्याचा डौल यांवरून हें काव्य मोरोपंतकालीन असावें असें म्हटले आहे. (सह्याद्री, जुलै १९५०)

ण्यांतहि कवीची लौकिक स्वरूपाची काव्यदृष्टि व मौलिकता स्पष्ट होते. दमयंती, हंस, नल यांचीं स्वभावचित्रें कवीनें उत्कृष्ट रेखाटलीं आहेत. त्यांच्या संवादांतहि कवीनें अभिजात कवित्व व्यक्त केलें आहे. कवीची भाषा संस्कृतप्रचुर व अलंकारमंडित आहे, पण क्लिष्ट नाहीं. कवीची यमकानुप्रासाची हौस अनेकदां प्रत्ययास येते. मात्र इतर पंडितकवींच्या मानानें रघुनाथपंडितांचें अर्थालंकारांवरहि चांगलें लक्ष आहे. उपमा, रूपक, दृष्टांत यांबरोबरच व्यतिरेक, श्लेष, भ्रान्तिमान्, आणि स्वभावोक्ति हे अलंकार कवीचे विशेष आवडते दिसतात. बांधणींतील सुटसुटीतपणा व समप्रमाणता यांमुळें एखाद्या टुमदार बंगलीचा आकर्षकपणा या काव्याला आला आहे. रेंखीव वर्णनें, प्रवाही निवेदन, खटकेबाज संवाद, रंग–रूप–नाद या तिन्ही बाबतींत उठावदार चित्रण, सूचक व संयमपूर्वक भावनाविष्करण इत्यादि विशेषांमुळें काव्याच्या गुणवत्तेंत भरच पडली आहे. पद्यरचना सामासिक शब्दांमुळें क्लिष्ट व दुर्बोध झाली असली, व भावनाविष्काराच्या वेळींहि कल्पनाचमत्कृतीचा मोह कवीला पडत असला, तरीहि रसवत्ता व अलंकारवैभव या दोन्ही बाजूंनीं हें काव्य उत्कृष्ट उतरलें आहे.

कलाकवींची आख्यानकविता ही अशी आहे. कलाविलासाच्या हव्यासासाठीं वा कारागिरीच्या प्रदर्शनासाठींच तिची निर्मिति झाली आहे, पंडितांची काव्यरचना उत्स्फूर्त नाहीं. ती आत्मनिष्ठ नाहीं तर,

पंडिती काव्याचे गुणविशेष

विषयनिष्ठ आहे. महाकाव्यसदृश सलग, प्रदीर्घ अशी कथनपर वा वर्णनपर रचना करणेंच त्यांना मानवतें. उपास्य देवतेच्या चरित्रांतील विवाह, युद्ध आणि संसारक्रीडा यांसारखे लौकिक प्रसंग हेच त्यांच्या कवितेचे विषय होत. त्यामुळें लौकिक रसांना प्राचीन मराठी काव्यांत स्थान मिळालें. निवेदनांत आकर्षकता वा वैचित्र्य येण्यासाठीं या कवींनीं

अक्षरगणवृत्तांचा उपयोग केला; स्थल-काल-व्यक्ति यांची वर्णनें केली; त्यांत समकालीन समाजजीवनाचा ठसा उमटविला. मराठी काव्य त्या योगानें संपन्न झालें.

पंडितकवींच्या कवितेवर परभृतपणाचा किंवा भाषांतरेपणाचा आरोप[1] केला जातो. तो सर्वस्वीं जरी खरा नसला तरी एकीकडे कथाभागाबाबत पुराणांचे तर दुसरीकडे रचनेबाबत पंचमहाकाव्यांचे ते ऋणी आहेत, यांत शंका नाहीं. भावनाविष्कारापेक्षां कल्पना-विलासाला व यमकानुप्रासांच्या शाब्दिक कसरतीला पंडिती काव्यांत मानाची जागा मिळाल्यानें "त्यांच्या रचनेंत खरें काव्यच नाहीं" अशीहि टीका मधून मधून केली जाते. पण ही टीका अतिरंजित आहे. तसेंच, अतिशयोक्ति, कालविपर्यास, शृंगारातिरेक, बीभत्सपणा आणि भाषेची अशुद्धता इत्यादि दोष त्यांच्या रचनेंत असले, तरी देखील वृत्तवैचित्र्य, अलंकारप्राचुर्य, नादमाधुर्य, वर्णनकौशल्य, रचना-सौष्ठव, इत्यादि विशेषांची पंडितकवींनीं जी जोपासना केली, त्यामुळें मराठी भाषेंतील प्राचीन काव्य वस्तुनिष्ठ दृष्टीनें संपन्न झालें, या गोष्टीचें महत्त्व विसरून चालणार नाहीं.

पंडितकवींच्या कथाविषयांत रामकृष्णांच्या विवाहकथांवरच विशेष भर दिसतो. भागवतधर्म व समर्थसंप्रदाय यांच्या प्रभावानुसार कोणी रुक्मिणीस्वयंवर, तर कोणी सीतास्वयंवर लिहिलें आहे. विठ्ठल, नागेश, जयरामस्वामी वडगांवकर यांसारख्यांनीं दोन्ही स्वयंवरकथा लिहिल्या आहेत. या कला-कवींपैकीं सामराज हे कृष्णोपासक तर नागेश, आनंदतनय, रघुनाथ हे रामभक्त दिसतात. तरी पण आचारविचारांच्या दृष्टीनें हे पंडित कवी एखाद्या विशिष्ट संप्रदायाचे होते, असें म्हणतां

१ पंडित कवींवरील आक्षेप-(श्री. धों. वि. देशपांडे), सह्याद्रि, जून १९५०.

येत नाहीं. रामदासांच्या विभूतिमत्त्वामुळें या कालांत समर्थसंप्रदाय विशेष जोमांत होता. त्याचा कांहींसा प्रभाव पंडितकवींवरहि पडणें साहजिकच होतें. तरी पण नाथ, वारकरी, महानुभाव या संप्रदायांचेंहि अस्तित्व पंडिती काव्याच्या या कालांत या ना त्या स्वरूपांत जाणवल्याखेरीज राहात नाहीं.

महाराष्ट्रांतील नाथपंथाचा समग्र व साधार इतिहास अद्याप उपलब्ध नाहीं. **धुंडिसुत मालु नरहरि** याचा '**नवनाथ भक्तिसार**' हा ग्रंथ अगदीं अलीकडचा (इ. स. १८१९ च्या सुमाराचा) असून पुन्हा तो नानाविध चमत्कार-कथांनींच भरलेला असल्यानें ऐतिहासिक दृष्टीनें त्याला कांहीं महत्त्व नाहीं. ज्ञानेश्वरांनंतर नांव घेण्यासारखा या पंथांतील पुरुष म्हणजे सत्यामलनाथ होय. तुकाराम-रामदासांच्या उल्लेखांमुळें सत्यामलनाथांचा 'सिद्धान्तरहस्य' ऊर्फ ललितप्रबंध हा ग्रंथ इ. स. १६७०-८० च्या सुमाराचा ठरतो. या ग्रंथांत आलेलें ज्ञानेश्वरचरित्र व ग्रंथाची अभंगात्मक रचना हीं दोनच वैशिष्टचें या ग्रंथाची सांगता येतील. सत्यामलनाथांनंतर गैबीनाथ-गुप्तनाथ (स्त्रीचें नांव)-उद्बोधनाथ (समाधि इ. स. १६८७). केसरीनाथ अशी ही परंपरा पेशवेकालापर्यंत आलेली दिसते. या साऱ्यांची अभंग, पदें अशी स्फुटरचना आहे. योगमार्गाचे उल्लेख तीमध्यें येतात, हीच नाथपंथाची खूण म्हणावयाची. **केसरीनाथांचा** शिवपार्वतीसंवादात्मक 'सिद्धान्तसार' हा ओंवीबद्ध ग्रंथ (इ. स. १७१६) उपलब्ध आहे. संस्कृतांतील आगम किंवा तंत्र ग्रंथांसारखी याची मांडणी असून पंचसिद्धांचीं नांवें वगैरे नाथसंप्रदायाच्या खुणा त्यामध्यें अगदीं स्पष्ट आहेत. पदरचनाकार म्हणून उत्तर पेशवाईत ख्यातनाम झालेले **शिवदिनकेसरी** हे या केसरीनाथांचेच एक शिष्य होत.

नाथपंथियांची हालहवाल

रामदासांनंतर समर्थसंप्रदाय जसा अगदीं निष्प्रभ झाला, तसें कांहीं लगेच तुकारामांच्या पश्चात् वारकरी संप्रदायाचें झालें नाहीं. तुकाराम भागवतधर्म मंदिराचे कळस झाले तर, त्यांची शिष्या बहिणाबाई त्या कळसावर ध्वजेप्रमाणें फडकली. ('बहेणी फडकती ध्वजा।'). शाहूमहाराज व बाळाजी विश्वनाथ यांना अनुग्रह देणारा अधिकारी सत्पुरुष कचेश्वर[1] ब्रम्हे हा तुकोबांनाच गुरु मानी. संतचरित्रकार म्हणून विख्यात झालेले महिपति ताहराबादकर हे तुकारामानुग्रहितच होते. वारकरी संप्रदायाच्या पंचायतनांत प्रतिष्ठा पावलेले निळोबा पिंपळनेरकर यांना तुकारामांच्या स्वप्नानुग्रहानेंच कवित्वस्फूर्ति झाली व त्यांनीं शेंकडों अभंग लिहिले. या सर्व मंडळींची कवित्वरचना शिवाजी ते शाहू व नंतरचे पेशवे यांच्या कालांतच चालू होती. या कालखंडावरहि तुकोबांच्या अभंगवाणीचा केवढा प्रभाव पडला होता हें यावरून कळून येईल. तुकोबांच्या प्रभावळींतील चौदा टाळकऱ्यांत ब्राम्हण, माळी, सराफ, तेली, वाणी कुलकर्णी अशा विविध पेशाचे लोक दिसतात. तेव्हां महाराष्ट्रांतला सारा बहुजनसमाज प्रत्यक्षाप्रत्यक्षपणें त्यांच्या शिष्यवर्गांत सामील झाला होता, असें म्हणावयास हरकत नाहीं.

वारकरी पंथाचे वारसदार

कवित्वाच्या दृष्टीनें तुकारामांची परंपरा या काळांत चालविणारे म्हणून तुकारामांच्या सोळा प्रमुख शिष्यांपैकीं चौघांचाच उल्लेख आपणाला करतां येईल. **तुकयाबंधु कान्होबा** याचे शें-दीडशें अभंग उपलब्ध आहेत. त्यांपैकीं नाटाचे अभंग, लळित, गौळणी वगैरेंना वारकरी पंथांत विशेष मान्यता आहे. 'पहा हो कलीचें महिमान' या मोठ्या अभंगांत त्यांच्या कालांतील परिस्थितीचें चित्र कान्होबांनीं हुबेहूब वठविलें आहे. तुकोबांच्या

---

१ म. इ. सा. खं. १५-(वि. का राजवाडे) सरस्वती मंदिर द्वैमासिक(८-८)

प्रयाणासंबंधींच्या अभंगांत करुणरसाचा उठाव चांगला झाला आहे. *स्त्री कवयित्रींमध्यें समर्थसंप्रदायांतील वेणाबाईबरोबर मान्यता पावलेल्या **बहिणाबाईंची** भक्तिपर पदरचना प्रांजळ आणि सोज्वळ असून रसाळहि आहे. आत्मनिवेदनपर त्रेपन्न अभंगांत तिनें आपलें आत्मचरित्र सांगून टाकलें आहे. त्यावरून पतिनिष्ठा व गुरुभक्ति ह्या दोहोंच्या योग्य समन्वयानें प्रपंच व परमार्थ दोन्ही साधणारी, अशी ही कर्तबगार स्त्री होऊन गेली, असें दिसून येतें. **कचेश्वर** [1]**ब्रह्मे** यांनींहि १११ ओव्यांमध्यें आपलें आत्मचरित्र सांगितलें आहे. तरुणपणीं अगदीं उनाड व भटक्या असणारा कचेश्वर तुकोबांच्या स्वप्नानुग्रहानें मोठा साधुपुरुष बनला आणि पुढें राजमान्यतेसहि चढला, असें त्याच्या चरित्रावरून समजतें. गजेंद्रमोक्ष व सुदामचरित्र हीं दोन प्रकरणें त्यांनीं लिहिलीं. पंडित कवींच्या कालांतच तीं येतात. तेव्हा त्यांची रचना श्लोकबद्ध म्हणजे अनेक वृत्तात्मक असणें साहजिकच वाटतें. चामर, पंचचामर, सवाई, अश्वधाटी अशा लय-बद्ध वृत्तांतील ही रचना नादमधुर झाली आहे.

तुकारामांच्या पश्चात् वारकरी पंथाची गुढी उंच ठेवणारा अखेरचा संतकवि म्हणून **निळोबा पिंपळनेरकर** याची योग्यता मोठी आहे. निळोबांनीं विरक्तवृत्तीनें कुलकर्णपण सोडून देऊन ईश्वरभक्तीचा छंद धरला. संतवाङ्मयाच्या अध्ययनांतूनच त्यांना कवित्वस्फूर्ति झाली. तुकोबांचा स्वप्नानुग्रह मिळाल्यावर त्यांनीं तुकारामांची कीर्तनपरंपरा व अभंगरचना पुढें चालविली. त्यांचा भजनी संप्रदाय त्यांनीं वाढविला. निळोबांच्या वाणीवर ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, तुकोबांचा गाथा यांचे

---

* महाराष्ट्र संतकवयित्री-(ज. र. आजगांवकर). बहिणाबाईंच्या अभंगांची गाथा-(संपादक-उमरखाने).

१ कचेश्वर-आत्मचरित्र-(पां. न. पटवर्धन), भा. इ. सं. मं. इतिवृत्त १९१३.

दृढ संस्कार दिसून येतात. भागवत सांप्रदायिकांच्या नेहमींच्या विषयांवरच निळोबांचे १३०० अभंग आहेत. श्रीकृष्णाच्या बाळलीला व गौळणी ही त्यांची रचना विशेष लोकप्रिय आहे. सातशें-साठ ओंव्यांमध्यें निळोबांनी चांगदेव-ज्ञानदेवचरित्र वर्णिलें असून सद्‌गुरु तुकारामांच्या स्तुतिपर ३३३ श्लोक त्यांनीं लिहिले आहेत. त्यांची आत्मानुभवी वाणी सरळ आणि सुबोध असून त्यांत उत्कटता पुरेपूर आहे. निळोबांचे शिष्य **मल्लाप्पा वासकर** यांनीं भजनी फडांची प्रथा सुरू केली. ती आजतागायत चालू आहे. वासकरांचा फड, देहूकरांचा फड यांसारख्या अनेक फडांनींच नंतरच्या काळांत वारकरी पंथाची ज्योत तेवत ठेवली.

पंडित कवी ज्या वेळीं आपल्या स्वयंवर-कथा सजवीत होते, त्या काळांतहि वर वर्णन केल्याप्रमाणें नाथ, वारकरी, रामदासी मंडळी सांप्रदायिक स्वरूपाची आध्यात्मिक व भक्तिपर रचना करीतच होती, पण या पंथांचा सामाजिक प्रभाव आणि वैशिष्ट्यपूर्ण वाङमयीन कर्तृत्व हीं दोन्हीहि जवळजवळ संपुष्टांत आलीं होतीं. शाहूराजांच्या कारकीर्दीत नांव घेण्यासारखे कृष्णदयार्णव व श्रीधर हे दोनच मोठे ग्रंथकार होऊन गेले.

आनंदसंप्रदायाचें वाङ्मयीन कार्य

पण ते दोघेहि आनंदसंप्रदायानें निर्माण केले. आनंदसंप्रदायामधील नामांकित अशा चार पांच सिद्ध पुरुषांनीं सतराव्या-अठराव्या शतकांत मराठी वाङमयाच्या दृष्टीनें मोठें कार्य केलें आहे. रंगनाथस्वामी निगडीकर, श्रीधरस्वामी नाझरेकर, कृष्णदयार्णव, शिवरामस्वामी कल्याणीकर एवढ्या व्यक्तींचा नामोल्लेखच त्या दृष्टीनें पुरेसा आहे. ही परंपरा विष्णु-विधि-अत्री-दत्त अशा दैवतांच्या गुरुशिष्य क्रमानें सिद्ध झाली असून त्यापुढें या परंपरेंत सदानंद-अमलानंद-गभीरानंद-ब्रम्हानंद-सहजानंद-पूर्णानंद अशी सत्पुरुषांची मालिका सतराव्या शतकापर्यंत होऊन गेली असें दिसतें. **सहजानंदांची** अडीच हजार ओव्यांची योगवासिष्ठ

टीका (इ. स. १५९२) उपलब्ध झाली असून त्यांनीं ' ज्ञानदीपिका ' व ' अमृतानुभव टीका ' लिहिल्याचेंहि समजतें. **पूर्णानंदानीं** अवधूत गीता टीका (इ. स. १६१०) लिहिली असून शिवाय ' शिवपार्वतीपरिणय ' या पौराणिक कथेचा आध्यात्मिक अर्थ लावणारा ओंवीबद्ध ग्रंथहि त्यांच्या नांवावर आहे. पूर्णानंदांचे एक शिष्य व रंगनाथ निगडीकरांचे जनक व गुरु **निजानंद** यांचीही थोडीफार रचना असल्याचें सांगतात. समर्थकालीन **रंगनाथ स्वामींचा** ' पदसंग्रह ' त्यांच्याच वंशांतील अनंत गणेश निगडीकरांनी इ. स. १९०२ मध्यें प्रसिद्ध[1] केलेला आढळतो. रंगनाथांची रामजन्म, गजेंद्रमोक्ष, गुरुगीता इत्यादि स्फुट प्रकरणें कोणत्याहि दृष्टीनें वैशिष्ट्यपूर्ण नाहींत. त्यांची कीर्तनोपयोगी पदरचना मात्र प्रास्ताविक व बहारीची आहे. ' तो मज आवडतो आवडतो ' ' मज तो मानेना मानेना ' ' मग तूं रामरसायन सेवी ' हीं पदें फार गोड नि लोकप्रिय आहेत. ' बोलणें फोल झालें। डोलणें वांया गेले ' हें समर्पक पालुपद असलेल्या पद्यांत ढोंगी पुरुषाचें वर्णन रंगनाथांनीं चांगलें केलें आहे. त्यांची अष्टकें नि पंचकेंहि उत्कृष्ट आहेत. ' विश्वंभरावाचुन कोण तारी ?' ' त्यांतें मना सोडुनि दूर जाई ' ' तरि मग तितुकेंहि ज्ञान (द्रव्य, सौख्य) तें का जळेना ' ' सत्कर्म राहे तरि दोष नाहीं ' या सारखी पालुपदें असणारी श्लोकबद्ध अष्टकें नि पंचकें नैतिक बोध आणि चित्तवेधक भाषा यांच्या संगमामुळें मोठी परिणामकारक अशी उतरली आहेत.

पूर्णानंदांचा (पूर्वाश्रमीचे नारायण तिमण्णा दीक्षित) मुलगा सदानंद ऊर्फ **शिवरामस्वामी** (इ. स. १६३२–१६७९) मोठा विद्वान असून त्याची ग्रंथरचना पुष्कळ आहे. ती सारी वेदांतपर व भक्तिपर आहे. भागवताच्या एकादशस्कंधावरहि त्यानें टीका लिहिली आहे. हा शिवरामस्वामी

---

१ त्यांच्याच मदतीनें वि. ल. भावे यांनीं ' रंगनाथस्वामीचा कवितासंग्रह ' प्रसिद्ध केला. (इ. स. १९०५)

मुक्तेश्वरांप्रमाणें एकनाथांचा नातूच (मुलीचा मुलगा) लागतो. तसा उल्लेख[१] त्यानें भागवतटीकेंत केला आहे. कृष्णदयार्णवांची गुरुपरंपरा तर गोविंद-स्वानंद-एकनाथ अशा क्रमानें एकनाथांपर्यंत जाऊन भिडते. कृष्णदयार्णवांचे उत्तमश्लोक, सनातन, कौतसुभ व वत्स असे चार शिष्य होते. त्यांची कांहीं स्फुट रचना आहे. गुरूचा 'हरिवरदा' ग्रंथ उत्तम-श्लोकानेंच तीन अध्याय लिहून पुरा केला. त्यावरून त्याची योग्यता स्पष्ट होते. पूर्णानंदांपासून दत्तानंद-ब्रम्हानंद-श्रीधर अशी नाझरेकराची परंपरा आहे. वंशपरंपरा तीच असल्यानें त्याच्या कुळांत 'महाराष्ट्र सारस्वताचा आखाडा' पिढीजाद होता, असें दिसतें. श्रीधराचे पिता व पितामह दोघेहि विद्वान् ग्रंथकार होते. ब्रम्हानंदांचा 'आत्मप्रकाश' (इ. स. १६८१) हा ग्रंथ व पदें, अभंग, अशी रचना आहे. श्रीधराचा एक मुलगा दत्तात्रय यानेंहि आरत्या, पदें या स्वरूपाची अत्यल्प कां होईना पण रचना केलेली दिसते. या सर्व माहितीवरून आनंदसंप्रदायाच्या वाङमयीन कर्तृत्वाची कांहींशी कल्पना येते. परंतु या संप्रदायाला वाङमयेतिहासांत स्थान मिळवून देण्याला कृष्णदयार्णव व श्रीधर हे दोघेच तेवढे प्रामुख्यानें कारणीभूत झाले आहेत.

कृष्णदयार्णव

नाथांच्या बाजूनें निघालेल्या आनंदसंप्रदायाच्या शाखेंतील कृष्ण-दयार्णवांच्या ओंवीरचनेवर व ग्रंथांवर एकनाथांचीच छाप पडली आहे. तन्मयानंदबोध (ओंव्या ३२५), कांहीं अभंग व पदें इत्यादि रचना त्यांनीं केली असली तरी, दशमस्कंधावरील '**हरिवरदा**'* नांवाच्या टीकेमुळेंच कृष्णदयार्णव हे विख्यात आहेत. शिवकालानंतर औरंगजेबाच्या सैन्यानें धुमाकूळ घातल्याच्या काळांत

---

१ 'मायेचा जो पाहतां आजि आजा । तो हा **थेका** जाहला बाप माझा ॥'

* हरिवरदा-(संपादक प्रभु-तेंडोलकर, शके १८१३). पुण्याचे एक प्रकाशक श्री. दयार्णव कोपर्डेकर हे या ग्रंथाचें समग्र प्रकाशन करीत आहेत. त्यापैकीं पहिला भाग नुकताच प्रकाशित झाला आहे.

देशत्याग करावा लागून त्यांना भिक्षावृत्तीवर जीवन कंठावें लागलें. पुढें संसाराचा भार वाहात असतांना रक्तपितीच्या रोगानें शरीर जर्जर झालें. अशा स्थितींतच[1] वयाच्या चौपन्नाव्या वर्षी (इ. स. १७२७) गोविंद गुरूच्या आज्ञेनें दशमावरील टीका लिहिण्यास कृष्णदयार्णवांनीं प्रारंभ केला. त्यामुळें साहजिकच संसारतापानें आणि शरीरव्याधीनें पीडलेल्या या कवीच्या ग्रंथावर खिन्नतेची छाया पसरली आहे. ग्रंथ पुरा होण्याच्या आधींच कवीला मृत्यूनें गाठलें. ग्रंथाच्या ८७ व्या अध्यायांपर्यंत एकूण ४२ हजार ओंव्या लिहिल्यानंतर पैठण येथेंच कृष्णदयार्णवांनीं समाधि[2] घेतली (इ. स. १७४०). त्यांच्या चार शिष्यांपैकीं उत्तमश्लोक या शिष्यानें राहिलेले तीन अध्याय लिहून इ. स. १७४३ त ग्रंथ पुरा केला.

'हरिवरदा' या टीकेवरून कृष्णदयार्णवांची विद्वत्ता व बहुश्रुतता चांगली कळून येते. श्रीधरी टीकेबरोबर इतरहि भागवतटीकांचें सार कवीनें आपल्या ग्रंथांत उतरविलें आहे. काव्यदृष्ट्याहि ग्रंथ सरस आहे. मात्र शृंगाररसाचा थोडा अतिरेक झाला आहे. काव्यकल्पनांच्या मुक्तेश्वरी भराऱ्या यांत आढळत नाहींत. वर्णनें पाल्हाळिक असूनहि चित्तवेधक आहेत. कवीचें करुणगंभीर व्यक्तित्व, कथानिवेदनाची हातोटी आणि भाषेचा गोडवा यांमुळें भागवतावरील अनेक टीकांत या टीकेनें वरचें स्थान पटकाविलें आहे.

---

१ 'परंतु जरेनें शरीर क्षीण । देशकालादि विपरीत चिन्ह ।
संतीं करविलें व्याख्यान । तेहि निर्वाण पावले ॥'

२ पैठणास या गुरुशिष्यांच्या समाध्या आहेत.

कृष्णदयार्णवांपेक्षा त्यांचे समकालीन *श्रीधरस्वामी नाझरेकर[1] (इ. स. १६५८–१७२९) हे अधिक लोकप्रिय ग्रथकार होत. लहानापासून थोरांपर्यंत अठरापगड जातींमध्यें सर्व स्त्रीपुरुषांचा आवडता असा श्रीधरा-

श्रीधर

खेरीज दुसरा ग्रंथकार मिळणार नाहीं. मुक्तेश्वरांची पौराणिक धाटणी डोळ्यांपुढें ठेवून रामायण, भारत, भागवत, इतर पुराणें वगैरे ग्रंथांतील कथांचे संक्षिप्त, सुबोध आणि रसाळ असे ओंवीबद्ध अनुवाद कथाप्रिय अशा वाचकांपुढें श्रीधरांनीं ठेविले. त्यामुळेंच श्रीधरांचे ग्रंथ त्यांच्या हयातींतच गांवोगांवीं पसरले. घरोघरीं त्यांचीं पारायणें होऊं लागलीं. श्रीधरांनीं 'हरिविजय' (इ. स. १७०२), 'रामविजय' (इ. स. १७०३), 'वेदान्तसूर्य' 'पांडवप्रताप' (इ. स. १७१२), 'पंढरिमाहात्म्य' 'व्यंकटेशमाहात्म्य', 'मल्हारीविजय' व 'ज्ञानेश्वर–चरित्र' हे ग्रंथ लिहिले. जैमिनी अश्वमेधाची रचना त्यांची नसावी, असें अभ्यासकांचें मत आहे. यांखेरीज अप्रसिद्ध अशीं लहानमोठीं सुमारें ७५ प्रकरणें त्यांच्या वंशजांकडे आहेत

श्रीधरस्वामींना कर्तृत्वशाली वंशपरंपरा व गुरुपरंपरा लाभली होती. आनंदसंप्रदायाची ही शाखा वाङमयनिर्मितीच्या बाबतींत मोठी संपन्न आहे. श्रीधरांचे पिता व पितामह दोघेहि मोठे तपस्वी आणि विद्वान् ग्रंथकार होते. श्रीधरांनीं स्वतःहि विपुल ग्रंथरचना केली आहे. त्यांच्या प्रसिद्ध ग्रंथांचीच संख्या अर्धा लक्ष भरेल. त्यांचा पुत्र दत्तात्रय याचीहि कांहीं

---

* श्रीधर, चरित्र आणि काव्यविवेचन–(प्रो. चिं. वि. जोशी).

१ मूळ उपनांव खडके, एक पूर्वज विजापूर दरबारीं यांचा घोडदळाचा अधिकारी होता म्हणून घोडके. पुढें नाझर महालाचें देसकुळकर्णपण करूं लागलें म्हणून नाझरेकर. पण पुढें राहाणें पंढरपुरीं. श्रीधराचे ग्रंथलेखन पंढरपूरलाच झाले.

ऱ्यापैकीं अशी स्फुट रचना आहे. रामदासकालीन रंगनाथस्वामी निगडीकर हे श्रीधरांच्याच संप्रदायांतील व चुलत घराण्यांतील प्रसिद्ध पुरुष होत. अशी पूर्वजांची पुण्याई, स्वतःचा निर्मळ आयुष्यक्रम, सच्छील वर्तन, आत्मविश्वासानें व चिकाटीनें केलेलें ग्रंथकर्तृत्व, यांमुळेंहि श्रीधरांच्या लोकप्रियतेंत भर पडली आहे.

भागवत दशमस्कंध, पद्मपुराण, इत्यादि अनेक ग्रंथांतील कृष्णकथा निवडून श्रीधरांनीं पहिल्या प्रथम 'हरिविजय' (ओंव्या ८१२९) तयार केला. रामविजय (ओंव्या९१४७) व शिवलीलामृत (ओंव्या २४६०) यांमध्यें वरील धर्तीवरच श्रीधरांनीं रामकथा व शिवकथा गायिली आहे. 'वेदान्तसूर्य' या त्यांच्या बारा अध्यायी (ओंव्या २४१४) अध्यात्म-ग्रंथाला वरील पौराणिक व वर्णनात्मक ग्रंथांची सर आली नाहीं; तरी श्रीधरांचें पांडित्य व वेदान्ताचा व्यासंग यांची त्यावरून ओळख पटते. श्रीधरांच्या संस्कृत ग्रंथरचनेनें त्यांच्या संस्कृत भाषानैपुण्याची साक्ष मिळते. मध्यंतरी आठ-नऊ वर्षांचा खंड पडल्यावर श्रीधरांनीं महा-भारताच्या प्रमुख भागाचें सार सांगणारा 'पांडवप्रताप' (ओंव्या १३३९७) हा ग्रंथ लिहिला. त्या ग्रंथानें अगोदरच्या व नंतरच्या मराठी महा-भारतांना लोकप्रियतेच्या बाबतींत फार मागें टाकलें. मुक्तेश्वर, मोरोपंत यांच्या भारतांपेक्षां चौसष्ट अध्यायी पांडवप्रतापच आजवर अधिक वाचला गेला आहे. मात्र श्रीधरांत मुक्तेश्वरांची कथानिवेदनचातुरी असली तरी प्रतिभा नाहीं. आपल्या 'पांडवप्रतापा'चे पहिले पस्तीस अध्याय मुक्तेश्वरी भारतावरूनच श्रीधरांनीं सजविले आहेत. मुक्तेश्वरांच्या उत्कृष्ट कल्पना समर्पक शब्द आणि सुंदर वर्णनें श्रीधरांनीं जशींच्या तशीं उचललीं आहेत. त्यांवरून त्यांची रसिकता व मुक्तेश्वरांवरील भक्ति दिसून येतें.

लोकांना परिचित असा कथाभाग, सुबोध आणि सरळ मांडणी, सर्वसामान्यांना मानवणारा नीतिबोध, परिमित वेदान्त, सांसारिक दृष्टान्त आणि फलश्रुतीचें आकर्षण, इतक्या विशेषांनीं श्रीधरांचे ग्रंथ लोकमान्य झाले असावेत, असें दिसतें. अलौकिक कल्पनेचें नैसर्गिक देणें नसल्यानें श्रीधरांत काव्यगुणांचें तसें कांहीं वैशिष्ट्य नाहीं, तरी पण विविध प्रसंगांचीं व भावनांचीं चित्रें ते चांगली रेखाटतात. लोकांच्या अनुभवांतील दृष्टान्तांनीं व रूपकांनीं ते आपला आशय स्पष्ट करतात; त्यामुळें प्रत्येकाच्या अभिरुचीला मानवेल, बुद्धीला झेपेल, मनाला रिझवील असा भाग कोठें ना कोठें तरी या ग्रंथांत आढळतोच. मुक्तेश्वराची कल्पकता किंवा वामन पंडितांची व्युत्पन्नता यांची जोड नसली तरी एकनाथांप्रमाणें वृत्तींतील प्रेमळपणा व वाणींतील सोज्वळता हे विशेष सहजरम्यतेनें श्रीधरी ग्रंथांत प्रकट झाले आहेत. गंगौघाप्रमाणें शांत, संथ व निर्मळ कथाप्रवाह आणि शुद्ध भावमयता यांमुळें भोळ्याभाबड्या लोकांना श्रीधरांचे ग्रंथ नाम-देवांच्या अभंगांप्रमाणेंच अमृतासारखे संजीवक झाले आहेत. भाविकतेच्या पोटीं निर्माण होणारा प्रेमळपणा हा त्यांच्या वृत्तीचा विशेष असल्यानें श्रीधरांच्या वाणींत विलक्षण गोडी उतरली आहे. पण या प्रेमळ वाणींत सत्त्व किंवा कस निर्माण करण्याचें सामर्थ्य नाहीं. संसार-श्रांतांना दुःखें विसरावयाला लावणें हेंच श्रीधरांच्या ग्रंथांचें एकमेव वैशिष्ट्य होय.



—– पेशवेकाल : राजकीय परिस्थिति —

शिवाजीराजांच्या मृत्यूनंतर औरंगजेबी आक्रमणामुळें संभाजी–राजाराम यांच्या कारकीर्दींत मराठेशाहीला जिवावरच्या गंडांतरांतून जावें लागलें. नवसंपादित स्वराज्याच्या रक्षणाचा तो लढा पराक्रमाची शर्थ करून मराठ्यांनीं यशस्वी केला. त्या कामीं ज्या नैतिक बलाचा व जीवनविषयक निष्ठांचा भरभक्कम आधार त्यांना उपयोगी पडला, त्या निष्ठांची जोपासना शहाजी–शिवाजी यांच्या कालांतील संतांनीं व कवींनीं आपल्या तेजस्वी आणि स्फूर्तिदायक वाङमयानें कशी केली होती, हें आपण येथवर पाहिलेंच. औरंगजेबांच्या मृत्यू–नंतर मराठ्यांचा मार्ग निष्कंटक झाला. शाहूराजांच्या (इ. स. १७०८) पहिल्या पेशव्यानें मराठ्यांच्या राज्यविस्ताराचा श्रीगणेशा घालून दिला. बाळाजी विश्वनाथांनीं (इ. स. १७१४--१७२०) दिल्लीच्या बादशहाकडून स्वराज्याच्या सनदा आणल्या व पेशवाईची मुहूर्तमेढ रोंविली. तेव्हां मराठेशाहींतील स्वातंत्र्यरक्षणाचें पर्व समाप्त होऊन मुलूखगिरीचें पर्व सुरू झालें.

राजारामांच्या कारकीर्दीत पराक्रमाला प्रेरक झालेलें वतनाचें आमिषच उत्तर पेशवाईमध्यें सवत्या सुभ्याच्या संकुचित आणि स्वार्थी वृत्तीला कारण झालें. ध्येयदृष्टीचा लोप होतांच क्षुद्र वृत्तींचें प्राबल्य माजलें. वतनदारीचा अभिमान आणि वैयक्तिक सत्तेची अभिलाषा यांच्यामुळें फुटिरपणाच्या वृत्ती वाढीस लागल्या. पहिल्या बाजीरावाच्या पश्चात् जातिवैमनस्य व भाऊबंदकी वाढत जाऊन एकजूट व सहकार्य यांची प्रत्येक ठिकाणीं वाण पडूं लागली. बुद्धिचातुर्याचा व पराक्रमाचा अपव्यय होऊं लागला. कसलीच नीतिमत्ता न उरल्यानें सारा समाज

विस्कळित झाला. धर्मरक्षणाची, लोककल्याणाची प्रेरणाच लुप्त झाल्यानें मराठ्यांच्या मुलूखगिऱ्या केवळ लुटीच्या मोहानें होऊं लागल्या. मराठ्यांचें राज्य उत्तर-दक्षिणेकडे विस्तारत होतें; पण उच्चतर ध्येयवादाच्या अभावीं त्या वाढीमध्यें खरें सत्त्व किंवा सामर्थ्य नव्हतें. उलट मोठ्या व्यक्तींच्या क्षुद्र स्वार्थामुळें आंतून तें पोखरलें जात होतें. सवाई माधवरावांच्या कारकीर्दींतील ऐश्वर्य आणि दरारा ही केवळ सूज होती. रोग्याच्या चेहऱ्यावर दिसणारा मृत्यूपूर्वींचा तो क्षणाचा तजेला होता. कारण इमान, निष्ठा, त्याग, सेवावृत्ति, इत्यादि गुण लुप्त झाल्यानें सांस्कृतिक दृष्ट्या महाराष्ट्र अवमतीच्या कड्यावर उभा होता. म्हणूनच १९ व्या शतकाच्या प्रारंभाला तो पारतंत्र्याच्या गर्तेत कोसळला.

सांस्कृतिकदृष्ट्या अध:पतित होत चाललेल्या समाजाच्या साहित्या-लाहि उतरती कळा लागणें साहजिकच आहे. मागील दोन शतकांच्या वाङ्मयांतील जिव्हाळा व स्फूर्ति या काळांतील वाङ्मयांत नाहीं.

पेशवाईतील वाङ्मयाचें स्वरूप

लोकजागृतीच्या व धर्मप्रसाराच्या प्रेरणेनें साहित्य निर्माण करणारे जुने कवी नि:स्पृह व विरक्त वृत्तीचे संत होते. कोणाचा मिंधेपणा वा लाचारी नसल्यानें त्यांच्या शब्दांना अधिकारवाणीचें स्वरूप प्राप्त झालें हातें. लोकांच्या आचारविचारांना वळण लावण्याची धमक त्यांच्या वाणींत व लेखणींत होती. पेशवाईंतील कवींत सर्व समाजाला वळण लावण्याचें सामर्थ्य असलेला असा कोणी दिसत नाहीं. याचें कारण, उच्चतर मूल्यांपासून प्रत्यक्ष जीवनाची फारकत झाली होती, हेंच होय. वरिष्ठ वर्णियांच्या आर्थिक सुस्थितीचे दुष्परिणाम सर्वत्र अनुभवास येत होते. राजाश्रय मिळतांच चिंचवड, चाफळ, पंढरपूर येथील देवस्थानांना मिरासदारी संस्थानांचें रूप प्राप्त झालें. वारकरी, राम-दासी इत्यादि धर्मपंथांच्या मागील नैतिक प्रेरणा लोप पावली.

धर्मनिष्ठेची जागा अंधश्रद्धा, धर्मभोळेपणा, बाह्य आचार-उपचारांचें बंड, इत्यादींनीं घेतली. धर्मसुधारणेऐवजीं रूढ धर्मप्रसाराच्या भावनेनें त्याच त्याच आध्यात्मिक विचारांचें चर्वितचर्वण हरिदास, पुराणिक, कीर्तनकार व ग्रंथकार करूं लागले. विचारप्रवर्तन नाहीं म्हणतांच वाङमयाचें सामाजिक नेतृत्व गेलें. पंडित आणि कलावंत यांचें अव्वल दर्जाचें स्थान नष्ट होऊन समाजाला रिझविण्याचें काम करणारे एवढाच दर्जा त्यांना शिल्लक राहिला. काव्यशास्त्रविनोद व जातां जातां धर्मसाधना या दृष्टीनेंच पेशवेकालांत कथावाङमयांची निर्मिति होत राहिली. त्यासाठींच कीर्तनकारांचा वर्ग खपत होता; त्याच्याकरितांच मध्वमुनि-अमृतराय-शिवदिनकेसरी इत्यादि कविमंडळी मधुर चालींतील, यमकानुप्रासांनीं युक्त व गेय अशीं पदें रचीत होती. एकीकडे सुविद्य रसिकांच्या रंजनाठीं संस्कृतांतील आदर्शानुरूप आख्यानकविता निर्माण होत होती; तर दुसरीकडे भोळ्या भाविकांसाठीं श्रीधर-महिपतींची लेखणी झिजत होती. आपली व आपल्या चहात्यांची काव्यलालसा तृप्त करण्यासाठीं मोरोपंत व निरंजनमाधव यांसारख्या रचनाप्रभूंची भारती काव्यरचनेचे विविध प्रयोग करण्यांत दंग होती; तर सरदार-दरकदार, सैनिक व खेडूत यांच्या समाधानासाठीं प्रभाकर-रामजोशी वगैरे शाहिरांची रसवंती खुलत होती. अशा रीतीनें प्राचीन मराठी वाङमयेतिहासाच्या तिसऱ्या कालखंडांतील उत्तरार्धांतहि विपुल, विविध आणि चमत्कृतिपूर्ण असें वाङमय निर्माण होतच होतें. पण नवनवोन्मेषशालिनी प्रतिभेचा आणि स्वतंत्र प्रज्ञेचा त्यांत सर्वस्वीं अभाव असल्यानें या साऱ्या वाङमयांत प्रेरकतेची वाण होती. मंत्र नष्ट होतांच तंत्राचा बडेजाव वाढावा हें साहजिकच होतें. म्हणूनच कलेऐवजीं कारागिरी, प्रेरणेऐवजीं परिश्रम, सामर्थ्याऐवजीं संपन्नता, व्यक्तित्वाऐवजीं व्यासंग, प्रतिभेऐवजीं पांडित्य, रसाऐवजीं रीति

(रचना), कल्पनेऐवजी क्लृप्ति आणि भावनेऐवजीं चमत्कृति यांना या काळांत महत्त्व आलें. त्यामुळें या काळांतील निरनिराळे कवी समाजाच्या निरनिराळ्या थरांतच मान्यता पावले. त्यांच्या कवित्वाचा प्रसारहि मर्यादितच झाला. सुखवस्तु लोकांच्या कौतुकाचा विषय किंवा त्यांची रिकामपणची कामगिरी एवढाच अर्थ मोरोपंत-रामजोशी यासारख्यांच्या कवित्वरचनेचा होऊन बसला.

पेशवाईतील 'पद 'कार

मध्वमुनि व अमृतराय ही पेशवेकालांतील गुरुशिष्यांची जोडी आपल्या नादमधुर व खटकेबाज गीतांनीं मराठी साहित्यांत अमर होऊन राहिली आहे. अत्यंत लोकप्रिय अशा पद्यरचनाकारांत [1]**मध्वमुनींचें** स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहे. 'उद्धवा शांतवन कर जाऽ' किंवा 'तूं माझा यजमान, रामा०' आणि 'मनमोहन वाजवि वेणु' किंवा 'कान्ह्या! संभाल रे, संभाल आपुल्या गाई' यांसारखीं त्यांचीं पदें भक्तिरसानें व अवीट माधुर्यानें भरलेलीं आहेत. पेशवाईतील अवनत स्थितीबद्दल मध्वमुनींनीं जागोजाग खेदोद्गार काढले आहेत. तत्कालीन परिस्थितीच्या अभ्यासकाला ते मार्गदर्शक वाटतील. मध्वमुनींचें 'धनेश्वर-चरित्र किंवा चौल राजाची कथा' हें अभंग छंदांतील ९० चरणांचें प्रकरण लौकिक स्वरूपाचें कल्पित आख्यान म्हणून विशेष उल्लेखनीय आहे.

पेशवाईच्या आबादानीच्या काळांत कल्पित कथांवर आधारलेली **स्वतंत्र व चित्तवेधक आख्यानें सजविण्याकडे** कांहीं कवींचें लक्ष वेधलेलें दिसतें. **जगन्नाथाच्या** 'शशिसेना' (५८१ श्लोक) काव्यांत राजकन्या व

---

१ मध्वमुनीश्वरांची कविता -(संपादक— प्र. व्यं. गुब्बी). मूळ नांव त्र्यंबक; नाशिकचे राहणारे; मध्वाचार्यांकडून मध्वमुनि असें नामकरण. इ. स. १७३१ त सेंदूरवाडयास मृत्यु. तेथेंच यांचा मठ आहे.

प्रधानपुत्र यांच्या प्रेम-विवाहाची अद्‍भुतरम्य कथा वर्णिली आहे. **जीवन** कवीच्या 'अनुभवलहरी' या काव्यांत स्वारीवर गेलेल्या सैनिकाच्या पत्नीची विरहव्यथा वर्णिली असून त्यांतून तत्कालीन समाजस्थितीचें दर्शन घडविलें आहे. **विठ्ठल, त्र्यंबक** यांची 'बारामास' व अनाम कवीचें 'सावकार आख्यान' हीं प्रकरणें याच धर्तीचीं आहेत. हीच परंपरा शाहिरांच्या लावणी काव्यानें पुढें चालविली.

अमृतराय[1] (इ. स. १६९८-१७५३) हे मध्वमुनींचे पट्टशिष्य होते. औरंगाबादेस विसामोरो म्हणून कोणी मुत्सद्दी होते. त्यांच्या पदरीं रायजी नोकरीला होते. धन्याची विलासी वृत्ति व कर्कशा अशा पत्नीची कटकट यांमुळें वैतागलेल्या अमृतरायांनीं नोकरी व संसार दोहोंना रामराम ठोकून भिक्षावृत्ति पत्करली. [2]मध्वमुनींनीं त्यांना ईश्वरभजनाकडे वळविलें; तेव्हां त्यांनीं आपल्या अमृतवाणीचा उपयोग सुरस आख्यानें व सुंदर पदें रचण्याकडे केला. ध्रुव, शुक, सुदामा, यांचीं चरित्रें, राम, कृष्ण, राधा, यांचीं वर्णनें, वत्सहरण, रासक्रीडा, कृष्णलीला, चंद्रावळी, दुर्वासयात्रा, द्रौपदीवस्त्रहरण इत्यादि त्यांची आख्यान-रचना उपलब्ध आहे. (काव्यसंग्रह पहा) परंतु पदें, कटाव हीच त्यांची वैशिष्टयपूर्ण रचना होय. कडाका छंदांतील कटाव रचण्यांत आणि सरस, नादपूर्ण, यमकानुप्रासयुक्त अशी लयबद्ध रचना करण्यांत अमृतरायांचा हातखंडा होता. वृत्ताची नक्काई, रचनाचातुरी व भाषेला हवी तशी वळविण्याची करामत, या विशेषांमुळें अमृतरायांची 'कटाव' रचना अत्यंत लोकप्रिय झाली. कीर्तनांत रंग भरण्याच्या कामीं हरिदासांना

---

१ महाराष्ट्र कवि-चरित्र भाग-१ पानें ३५२-३७६.

२ 'अविनाश संदेह हरण' या प्रकरणांत अमृतरायांनीं पुढील गुरुपरंपरा दिली आहे. शृंगेरी मठाच्या सरस्वति संप्रदायांत माधव सरस्वती-विठ्ठल०-अंबिका० -अमृतराय, अशी परंपरा आहे; पण हे अमृतराय कोणी भिन्न असावेत.

कटावांचा फार उपयोग होतो. ‘ कीर्तन सुखार्थ झाला अवतारचि अमृतराय जीवाचा ’ असें मोरोपंतांनीं सन्मणिमालेंत म्हटलें आहे, तें त्यांच्या कटावादि पदरचनेचें–कवित्वाचें योग्य असें वर्णनच होय. अमृतराय स्वतः उत्कृष्ट कीर्तनकार व शीघ्रकवि होते. त्यांमुळें त्यांना धार्मिक व गुणज्ञ अशा धनिकांचा सरदार–सावकार व सत्ताधीश पेशवे इत्यादींचा चांगला पाठिंबा होता. ते जिभेचे तिखट असले तरी काव्यरचना मोठी गोड करीत. ‘ प्राण्या बोलावें बहु गोड, ’ ‘ बाइल पैशाची पशाची । कधीं नव्हे पुरुषाची ॥’ यांसारखीं त्यांचीं अध्यात्म, भक्ति नि व्यवहार यांचा बोध करणारी अनेक पदें लोकांच्या तोंडीं घोळणारी आहेत.

सत्यामलनाथांच्या नाथपरंपरेंतील या सुमारचे सत्पुरुष, केसरीनाथांचें एक शिष्य [1]**शिवदिनकेसरी** (इ. स. १६९८–१७७४) हेहि मराठींतील उत्कृष्ट पदरचनाकार म्हणून विख्यात आहेत. त्यांनीं ‘ विवेकदर्पण,’ ‘ ज्ञानप्रदीप ’ हे सांप्रदायिक ग्रंथ लिहिले असले तरी, ठसकेदार पदांमुळेंच ते अधिक परिचित आहेत. ‘ भाव धरा रे, आपुलासा देव करा रे ! ’ ‘ अजि तुम्हीं ऐका, सखा सहोदर म्हणजे पैका? ’ यांसारख्या लोकप्रिय पदांवरून रचनेच्या दृष्टीनें शिवदिन हे अमृतरायांच्या कुळींतीलच ठरतात. भक्ति–भावाबरोबर शब्दचमत्कृति हा यांच्याहि पदांचा विशेष दिसतो. नाथपरंपरेंतील व्यक्तींवरहि कालवैशिष्ट्याचा झालेला हा परिणाम लक्षणीय आहे. पानपतच्या पराभवानंतरची महाराष्ट्रांतील हालहवाल, पेंढाऱ्यांचा धुमाकूळ वगैरेचें उत्कृष्ट वर्णन शिवदिनकेसरींनीं एका पदांत केलें आहे. त्यांचे शिष्य लक्ष्मणनाथ व महिपतिनाथ यांचीहि पदरचनेबद्दल ख्याति आहे.

---

१ महाराष्ट्र कविचरित्र, भाग ३ रा–(ज. र. आजगांवकर).

महिपतींच्या संतचरित्रामुळें उत्तर पेशवाईंत मराठींतील चरित्र-वाङमयाचाहि प्रकार पदरचनेप्रमाणेंच चांगला परिपुष्ट झालेला दिसतो. महानुभावांचें चरित्रवाङमय सोडल्यास आतांपर्यंतच्या काळांत मराठीमध्यें चरित्रपर अशी विशेष रचना झाली नव्हती.

जुन्या मराठींतील चरित्र वाङ्मय

कांहीं ग्रंथकार ग्रंथारंभीं वा शेवटीं स्वतःची त्रोटक[१] माहिती देत; किंवा इतरांकडून प्रसंग-वशात् तत्संबंधीं उल्लेख होई. [२]संतमालिकांतूनहि संतांची यादी त्यांच्याबद्दलच्या गौरवपर उद्‌गारांसह मिळते इतकेच. क्वचित् संतांच्या चरित्रांतील एखाद्या नवलपूर्ण आख्यायिकेचाहि तींत उल्लेख असतो. कांहीं संतांच्या चरित्रांतील अद्‌भुत घटनांवर वर्णनपर असे अभंग वा पदें रचिलीं गेलीं आहेत. पण सलग अशी चरित्ररचना यापूर्वीं फारच अल्प प्रमाणांत झाली. त्या दृष्टीनें महिंभट्ट सोडल्यास नामदेव हेच मराठींतील पहिले चरित्रकार म्हणावे लागतील. ज्ञानदेवादि भावंडांचें चरित्र सलगपणें असें नामदेवांनींच प्रथम निवेदिलें. त्यानंतर सच्चिदानंदबाबा, सत्यामलनाथ, श्रीधर, इत्यादींची ज्ञानेश्वरचरित्रें आढळतात. नाथांनीं भानुदासांचे, मुक्तेश्वरांनीं नाथांचें, विठ्ठलानें भानुदास व संतसखू यांचीं चरित्रें सांगितलीं आहेत. रामदास-भक्तांनीं तर रामदासांच्या चरित्रपर अशी पुष्कळच माहिती लिहून ठेवली आहे. नामदेव, जनाबाई, कान्होपात्रा तुकाराम, बहिणाबाई, कचेश्वर इत्यादींच्या आत्मनिवेदनपर रचनेमुळें आत्मचरित्रलेखनाचें श्रेयहि त्यांना देतां येईल. पण एवढें खरें कीं, ही सारी मंडळी चरित्रकार म्हणून कांहीं ख्यातनाम नाहींत,

---

१ वामन, विठ्ठल, नागेश या आख्यान कवींनीं स्वतःविषयीं अशीच माहिती पुरविली आहे.

२ एकनाथ, मोरोपंत या मोठ्या कवींप्रमाणें इतरांनींहि संतमालिका लिहिल्या आहेत. अशा पंचवीस संतमालिका उपलब्ध आहेत. त्यांचा हेतू संतांना वंदन करण्याचा—आदरभाव प्रकट करण्याचाच—दिसतो, चरित्र सांगण्याचा नाहीं.

महिपतींपूर्वी नाभाजी, उद्धव चिद्घन, दासो दिगंबर असे कांहीं चरित्रकार होऊन गेले; पण महिपतींशीं तुलना करतां त्यांची कामगिरी विशेष महत्वाची ठरत नाहीं. **नाभाजी**ची **'भक्तमाला'** तर मूळ ग्वाल्हेरी भाषेंतच आहे. त्यावर त्यांच्या शिष्य प्रियादास याची 'भक्तिरसबोधिनी' नामक टीका असून तिच्यावर पुन्हां मार्तंडबुवांचीं 'भक्तिप्रेमामृत' नामक मराठी टीका आहे. या टीकेलाच नाभाजीची 'भक्तमाला' असें मराठींत म्हणतात. या भक्तमालेंत ज्ञानेश्वर–नामदेवांखेरीज बाकी सारे महाराष्ट्रा–बाहेरचे संत आहेत. शिवाय ज्ञानेश्वर–नामदेवांबद्दलची चरित्रपर माहितीहि ऐकीव दंतकथांच्या आधारें लिहिल्यानें तितकीशी बरोबर नाहीं. महिपतींच्या पहिल्याच ग्रंथांत नाभाजीचा उल्लेख आहे, त्यावरून संतचरित्रलेखनाच्या कामीं आरंभीं तरी तो महिपतींना मार्गदर्शक झाला असें म्हणतां येईल. **उद्धवचिद्घनां**ची[1] साकी वृत्तांतील अनेक स्फुट चरित्रें उपलब्ध आहेत. 'बरवीं संतचरित्रें हो। पावन परम पवित्रें हो॥' ही प्रसिद्ध ओळ त्यांच्या प्रत्येक संतचरित्राच्या ध्रुपदाच्या ठिकाणीं आढळते. त्यांचा 'भक्तिकथा–मृतसार' हा ग्रंथ अनुपलब्ध आहे. कदाचित् हीं सुटीं सुटीं चरित्रें मिळूनच तो ग्रंथ होत असावा. **दासो दिगंबर** नांवाच्या कोणा अज्ञात कवीचा 'संतविजय' ग्रंथ मात्र उपलब्ध आहे. त्यांतील संत चरित्रांत नव्या गोष्टी, नव्या आख्यायिका आढळतात. पण चिकित्सक दृष्टीच्या अभावीं त्यांची सत्यता शंकास्पद ठरते. हा ग्रंथहि महिपतींनीं पाहिला असावा. त्यांच्याहि एका ग्रंथाचें नांव 'संतविजय' हेंच आहे.

---

१ या समासांतील चिदघन हें गुरूचें नांव. चैतन्य संप्रदायांच्या एका पर–परेंतील हा कवि दिसतो. यांचें नांव उद्धव कोकीळ. यांचा काळ १६८० चा सुमार. स्फुट चरित्रांबरोबर श्लोकबद्ध अनुभवशतक, सवाई वृत्तांतील गीतार्थमंजरी व दिंडी वृत्तांतील शुकरंभासंवाद हीं प्रकरणें यांच्या नांवावर आहेत. (काव्यसंग्रह पहा.)

महिपतिबुवा ताहराबादकरांनीं (इ. स. १७१५-१७९०) देवपूजेंत सरकारी कामाचा अडथळा येतो म्हणून कुळकर्णीपणाची वृत्ति सोडून देऊन सारें लक्ष विठ्ठलभक्तिकडे पुरविलें. त्यानंतर तुकोबांच्या

संतचरित्रकार महिपति

दृष्टान्तानें आपल्या उतारवयांतच त्यांनीं भक्तिविजय, संतलीलामृत, भक्तलीलामृत व संतविजय (अपूर्ण) असे चार चरित्र ग्रंथ इ. स. १७६२ ते १७८८ या काळांत लिहिलें. यांखेरीज पांडुरंग-माहात्म्य, तुळसी-माहात्म्य, गणेशपुराण, ऋषिपंचमीव्रत, कथासारामृत, इत्यादि इतरहि लहानसान प्रकरणें त्यांनीं रचिलीं आहेत. '**कथासारामृत**' (अ. ३६, ओंव्या ७ हजार) या ग्रंथांत कार्तिक, माघ, वैशाख या महिन्यांचें माहात्म्य वर्णन करण्याच्या मिषानें निरनिराळ्या पुराणांतील अनेक कथा त्यांनीं संकलित केल्या आहेत. त्यांच्या भक्तिरसपूर्ण अशा 'पांडुरंगस्तोत्राच्या' रचनेंत मोरोपंतांच्या 'संशयरत्नमाले'चें बीज आढळून येतें. महिपतिबुवांनीं पांडुरंगाला लिहि-लेल्या पत्रांत सारें आत्मचरित्र निवेदन केलें आहे.

नाभाजी-उद्धवचिद्घन यांचे चरित्रग्रंथ [1]पाहून, त्यांना वाट पुसतच महिपतींनीं आपला '**भक्तिविजय**' (इ. स. १७६२) हा पहिला ग्रंथ लिहिला. नामदेवांच्या तीर्थावळीचाहि त्यांनीं उपयोग केला आहे. एकनाथ-तुकाराम यांच्या वंशजांकडून माहिती मिळविण्याचा प्रयत्न त्यांनीं केला असला तरी, महिपतींची चरित्रलेखनाची दृष्टि भाविकाची आहे, इतिहास-चिकित्सकाची नाहीं. 'आधार टाकोनि आपुलें मतीं। बोलिलों नाहीं सर्वथा ॥' (संतलीलामृत) असें ते म्हणतात. पण त्यांचे सर्वच चरित्रग्रंथ पुराणग्रंथांइतपतच विश्वसनीय आहेत. व्यक्तिचित्रणांतहि त्यांचें असें खास वैशिष्ट्य कांहीं दिसत नाहीं. विभूतिपूजकवृत्तीनेंच सर्व संतांचें माहात्म्य सारख्याच भक्तिभावानें ते वर्णितात. चमत्कारांचें भारूड सांगून त्या त्या व्यक्तीभोंवतीं दैवी वलय त्यांनीं निर्माण केलें आहे. स्थलकालपरिस्थिति वगैरेंच्या माहितीबाबतचा बारकावा महानुभावांच्या चरित्रग्रंथांप्रमाणें

१ 'स्वदेशामाजी निश्चित। प्रख्यात जहाले जे महासंत ॥
त्यांच्या वंशीं सज्ञान महंत। त्यांचे वचनार्थ पाहिले ॥ (भक्तलीलामृत)

महिपतींच्या ग्रंथांत सांपडत नाहीं. **संतलीलामृत** (इ. १७६७) व **भक्तलीलामृत** (इ. स. १७७४) या ग्रंथांत अनेक संतांच्या कथा आल्या आहेत. त्यांत प्रमाणबद्धता कांहीं नाहीं. एका चांगदेव चरित्राला पहिले १० अध्याय दिलें असून शेवटल्या दहा अध्यायांत पन्नास चरित्रें सांगून टाकलीत. त्याच त्याच संतांच्या कथा न कंटाळतां महिपतींनीं पुन्हा पुन्हा वर्णिल्या आहेत. त्यांत निवड वा क्रम कांहीं नाहीं. एकाच संताच्या दोन ठिकाणच्या कथांत सुसंगति वा नाविन्य सांपडेलच असें नाहीं. शेवटल्या '**संतविजय** (इ. स. १७८९) ग्रंथांत (ओंव्या ४०६२८) रामदास व बाबाजी गोसावी या दोघांचींच चरित्रें आलीं असून सव्विसाव्या अध्यायानंतर हा ग्रंथ अपूर्ण राहिला आहे. ईश्वरोपासनेच्या श्रद्धाळू वृत्तीनें संतचरित्र वर्णन करीत असतां सगुण भक्तीचा महिमाहि अनेक ठिकाणीं महिपतींनीं गायिला आहे. भक्तांच्या वृत्तींचीं शद्वचित्रें ते चांगलीं रेखाटतात. त्यांची कथानिवेदनपद्धति व भाषा इतकी सरळ आणि सुगम आहे कीं, परिणामतः ती सपकच वाटते.

[1]तंजावरकडील रामदास संप्रदायी शिरगांव मठाधिपती **भीमस्वामी** यांचा 'भक्तलीलामृत' हा ग्रंथ महिपतींच्या चरित्रग्रंथांनंतरच (इ. स. १७९८) तयार झाला. तो अभंगात्मक असून रामदासांबरोबर इतरहि

१ तंजावरच्या बाजूला समर्थ संप्रदायांतील अनेक मराठी कवी होऊन गेले. भीमस्वामी, मेरूस्वामी हे त्यांपैकीं महत्त्वाचे ग्रंथकार होत. रघुनाथपंडित, आनंदतनय, अनंत, इत्यादि पंडित कवी हे दक्षिणेकडचेच. एकनाथांचे नातू व मुक्तेश्वरांचे मावसबंधु कवि **माधवस्वामी** हे रामदासी परंपरेंतीलच एक प्रख्यात कवि असून त्यांच्यासंबंधींची विस्तृत माहिती नव्यानेंच उपलब्ध झाली आहे. (महाराष्ट्र-सारस्वत-पुरवणी, पानें ९९४-९९९). महाराष्ट्र-सारस्वतकारांनीं 'दक्षिण हिंदुस्थानांतले कवी' असें एक स्वतंत्र प्रकरणच दिलें आहे. तंजावरच्या 'सरस्वती महाल' या ग्रंथालयांत मराठी हस्तलिखितांचा प्रचंड संग्रह आहे. अभ्यासकांच्या दृष्टीनें त्याचें महत्त्व फार आहे.

भागवतधर्मी संतांचीं चरित्रें त्यांत वर्णिलीं आहेत, हेंच त्याचें वैशिष्ट्य. वाङ्मयीन दृष्ट्या ग्रंथाची योग्यता विशेष नाहीं. महिपतींनीं न वर्णिलेल्या संतांच्या चरित्रकथा आपल्या 'भक्तमंजरीं' त देऊन **राजारामप्रासादींनीं** महिपतींचें कार्य पूर्ण केलें (इ.स. १८३४). या ग्रंथांत त्या त्या संतांबद्दल जन्म-मृत्यु शक, परंपरा, समकालीन संत इत्यादि माहिती कटाक्षानें दिलेली आढळते. पण सारीच विश्वसनीय नव्हे. 'भक्तिकथामृत'-कर्ता **नरहरी धुंडिराज माळू** यानें तर सर्वांच्याबद्दल कपोलकल्पितच गोष्टी सांगितल्या आहेत. वस्तुत: चरित्रवाङ्मय या दृष्टीनें या साऱ्यांच्याच लेखनांत तसें कांहीं वैशिष्ट्य दिसत नाहीं. तसेंच त्या त्या संतांच्या चरित्राची रूपरेषा कळण्यापलीकडे पौराणिक पद्धतीच्या या चरित्रकथांना ऐतिहासिक दृष्टीनें कांहीं महत्त्व नाहीं, किंवा त्यांवरून तत्कालीन परिस्थितीचें आकलनहि होत नाहीं. तेव्हां नजिकच्या भूतकाळांतील व्यक्तींसंबंधीं पुराणांच्या धर्तीवर लिहिलेलीं कांहीं आख्यानें हेंच या चरित्रवाङ्मयाचें खरें स्वरूप होय.

निरंजनमाधव

संतचरित्रासारख्या एकाच वाङ्मयप्रकाराला एकनिष्ठेनें वाहून घेणारे महिपतीसारखे कष्टाळू साहित्यिक पेशवाईच्या उत्तरकालांत एकीकडे दृष्टीस पडतात; तर दुसरीकडे जीवनांतील इतर जबाबदाऱ्या पार पाडीत असतां केवळ हौशीसाठीं म्हणून काव्यरचना करणारे पुष्कळ-जण आढळतात. अशांच्या पद्यरचनेंत काव्य असेलच असें नाही. विषयनिवडींत भाविकता वा अनुकरणबुद्धि दिसून येईल; तर रचनेंत चमत्कृतीचा वा कारागिरीचा प्रयत्न आढळेल इतकेंच. परशराम त्र्यंबक प्रतिनिधि, कृष्णराव खटावकर वगैरे मुत्सद्यांनीं मराठींत कांहीं पद्य-रचना केल्याचें सांगतात. पण राजकारणांत वावरणाऱ्यांपैकीं या काळचे प्रसिद्ध कवि निरंजनमाधव (इ.स. १७०३-१७९०) हेच होत. बाजीराव, नानासाहेब पेशवे यांच्या कारकीर्दींत कर्नाटक, तंजावर, श्रीरंगपट्टण, वगैरे

परप्रांतांत पेशव्यांचे वकील म्हणून निरंजनमाधवांनीं अनेक वर्षें कामगिरी बजावली. राजकारणाप्रमाणें आध्यात्मिक बाजूकडेहि त्यांचें लक्ष होतें. आनंदसंप्रदायी लक्ष्मीधर बर्वे व सिद्धेश्वर संप्रदायी बापजी पंडित अशा दोघांचा गुरूपदेश त्यांनीं घेतला होता. '**सांप्रदाय परिमळ**' नांवाच्या आत्मचरित्रपर ग्रंथांत 'बालबोध'-कर्त्या त्र्यंबकराजापासूनची सिद्धेश्वर संप्रदायाची माहिती दिली आहे; पण हा ग्रंथ निरंजनमाधवांचा नसावा असें कांहीं विद्वानांचें[१] मत आहे.

निरंजनमाधवांना राजकारणांतील कार्यव्यापृततेमुळें आपला '**कृष्णानंदसिंधू**' हा पहिला ग्रंथ पूर्ण करावयास तब्बल बारा वर्षें लागलीं. (इ. स. १७३५-१७४७). तेव्हां राजकारणनिवृत्तीनंतरच आपल्या उतारवयांत त्यांनीं पुढील साहित्यनिर्मितीवर आपलें लक्ष केंद्रित केलें. स्तोत्रें, चरित्रें, प्रवासवर्णनें, छंदःशास्त्र, वेदान्त, रामायण, चंपू, इत्यादि विविध प्रकारची विपुल रचना निरंजनमाधवांनीं केली आहे. आपल्या पहिल्या ग्रंथानंतर इ. स. १७५८ मध्यें त्यांनीं 'चिद्बोध रामायण' हा अध्यात्मरामायणावरील टीकाग्रंथ लिहिला. 'रामकृष्णपीयूषस्तोत्र' व '**ज्ञानेश्वरविजय**' हा चरित्रग्रंथ (ओंव्या १०३८) लिहून झाल्यावर छंदःशास्त्रविषयक 'वृत्तमुक्तावली', 'वृत्तवनमाला', 'वृत्तावतंस' असे तीन ग्रंथ त्यांनीं लिहिले. 'बोधप्रदीपिका' व 'अद्वैतामृत' हें शंकराचार्यांच्या ग्रंथावरील **टीकाग्रंथ** गद्यांत आहेत, हेंच त्यांचें वैशिष्ट्य. संस्कृत ग्रंथांच्या धर्तीवर लिहिलेला सप्तसर्गात्मक व गद्यपद्यमिश्रित असा '**सुभद्राचंपू**' (इ. स. १७६८) हा मराठींतील एकमेव चंपूग्रंथ होय. निरंजनमाधवांनीं वेळोवेळीं लिहिलेलीं एकवीस स्तोत्रें मिळून 'स्तोत्रकलाप'

---

१ प्रा. पोतदार, प्रा. पंगु, श्री. सवनीस यांच्या मतें हा ग्रंथ निरंजनदास नांवाच्या शिष्याचा असावा.

हा ग्रंथ होतो. स्तोत्ररचनेंतहि भक्तिभावापेक्षां रचनाचमत्कृतीवरच त्यांचा विशेष भर आहे. 'रामकर्णामृत' या १११ श्लोकांच्या स्तोत्रांत 'श्रीराम जयराम जयजयराम' हा मंत्र आद्याक्षरांनीं साधला आहे. 'प' वर्ग गाळून लिहिलेलें '**निरोष्ठराघव-चरित्र**' हें असेंच एक उल्लेखनीय चित्रकाव्य आहे. या प्रकारच्या काव्यपद्धतीची परिणति याच सुमारच्या मोरोपंतांच्या 'मंत्ररामायणादि' काव्यरचनेंत झालेली दिसते[1].

निरंजनमाधवांचें सारें आयुष्य राजकारणांत गेले; पण त्याचें पडसाद कांहीं त्यांच्या या ग्रंथरचनेंत कोठेंहि आढळत नाहींत. यावरून भौतिक जीवन व वाङमय यांच्यांतील या काळच्या फारकतीची स्पष्ट जाणीव होते. नाहीं म्हणावयाला निरंजनमाधवांनीं आपल्या तीर्थयात्रेची हकीकत एका प्रकरणांत दिली आहे त्यांत तत्कालीन समाजजीवनाचीं वास्तव व उद्बोधक चित्रें पाहावयास मिळतात. निरनिराळ्या क्षेत्रांतील दैवतांचे मौल्यवान् अलंकार, उंची वस्त्रें, त्यांच्या नैवेद्यांतील विविध पक्वान्नें, वगैरेंच्या याद्या आणि धर्माच्या नांवावर उदरंभरण करणाऱ्यांसंबंधीं टीकात्मक उल्लेख निरंजनमाधव देतात. त्यावरून कालाच्या संपन्नतेचा व उच्चवर्णियांच्या सुखासीनतचा प्रत्यय येतो. त्याप्रमाणेंच पेशवेकालांतील तकलुपी व निष्प्राण धर्म-जीवनाची पूर्ण कल्पना येते.

आर्यापति मोरोपंत

निरंजनमाधवांशींच समकालीन असलेले पंडिती परंपरेंतील शेवटचे कवि 'आर्यापति' मोरोपंत पराडकर (इ. स. १७२९-१७८४) हे होत. वयाचीं चोवीस वर्षें पन्हाळ्यास केशवशास्त्री पाध्ये यांच्यापाशीं अध्ययन करण्यांत घालविल्यावर इ. स. १७५३ पासून बारामतीच्या बाबूजी नाईक नामक सावकाराकडे आश्रित म्हणून राहिले, तेव्हांपासूनचा तब्बल ४०-४२ वर्षांचा

१ 'निरंजनमाधव टीकात्मक निबंध'-प्रो. चि. नी. जोशी.

काळ मोरोपंतांनीं पुराणिकाच्या व्यवसायांत व लेखनव्यासंगांत घालविला. त्या प्रदीर्घ कालावधींत विपुल आणि विविध अशी काव्यरचना त्यांनीं केली. त्यांचा प्रकाशित काव्यसंग्रहच साठ हजार भरेल.

मोरोपंत हे निर्वेध आयुष्यक्रम कंठणारे, शांतवृत्तीचे, धर्मनिष्ठ, कुटुंबवत्सल, कर्तव्यदक्ष आणि व्यवहारचतुर असे गृहस्थ होते. ठराविक चाकोरींतूनच त्यांचा जीवनक्रम गेल्यानें त्यांच्या वृत्तींत खळबळ, प्रक्षोभ किंवा झगडा असलें कांहीं नाहीं. त्यामुळें त्यांची कविताहि गंभीर व नेमस्त वृत्तीचीं उतरली आहे. तीवरून त्यांची रसिकता, व्यासंग व भाषाप्रभुत्व यांची साक्ष पटते. पण अलौकिक प्रतिभेचें, उत्कट भावनांचें किंवा भव्य कल्पनांचें दर्शन त्यांच्या काव्यरचनेमध्यें होत नाहीं. तसेंच तत्कालीन राजकीय घडामोडीचा व सामाजिक वातावरणाचा यत्किंचितहि संपर्क त्यांच्या काव्याला लागलेला दिसत नाहीं. याचा अर्थ हाच कीं, विलक्षण धामधुमीच्या काळांत-उत्तर पेशवाईंत–राहूनहि मोरोपंत, निरंजनमाधव यांसारखी मंडळी मनानें रामायण–महाभारताच्या जगांतच वावरत होती. त्यामुळें प्रत्यक्ष जीवन व त्यांची मानसिक कल्पनासृष्टि यांच्यांत फारच तफावत पडलेली दिसून येते. म्हणूनच मोरोपंतांच्या कवितेनें कांहीं गुण–वैशिष्टयांमुळें त्या काळीं व आतांहि प्रतिष्ठा मिळवली असली तरी, ती त्यांच्या कालाची प्रातिनिधिक कविता ठरत नाहीं.

मोरोपंतांची काव्यरचनेची भूमिका अगदीं नम्र आहे. वैयक्तिक आत्मोन्नतीसाठीं भगवच्चरित्राचें गायन करावयाचें, हा त्यांच्या काव्य–रचनेचा मुख्य हेतु (' वाटे चरित्र त्यांचें कांहीं आपण तरावया गावें ॥' –आदिपर्व अ. १–८). त्याबरोबरच इतर संसारी

मोरोपंतची काव्यदृष्टि

स्त्री-पुरुषांना कुटुंबवत्सलांना, देवादिकांच्या कथा ऐकवाव्या त्या दृष्टीनें साऱ्या पुराणांचा पसारा त्यांच्या आवाक्यांत आणून ठेवावा; (स्वल्पांतचि आणितो कथा सारी ॥ '–आदिपर्व अ. १–९).

त्यांना रिझवील अशी सुरस व चमत्कृतिजनक रचना करावी, हेहि पंतांच्या काव्यरचनेचे आनुषंगिक हेतू दिसतात. मोरोपंतांच्या काव्यरचनेंत भिन्न प्रवृत्तींचें मिश्रण दृष्टीस पडतें. ज्ञानेश्वर-एकनाथादि संतकवींच्या संस्कारांमुळें अंगीं बाणलेली नामदेवासारखी भगवत्यशोगानाचीं भाविक व प्रेमळ वृत्ति, पुराणिकाच्या व्यवसायामुळें अंगवळणीं पडलेली श्रीधरांसारखी पौराणिक कथांच्या रंजक व उद्बोधक कथनाची दृष्टी, आणि संस्कृत काव्यनाटकें व साहित्यशास्त्र इत्यादींच्या अभ्यासामुळें लाभलेली मुक्तेश्वरांसारखी काव्यनिर्मितीची कलाबुद्धि, या तिहींचा मिलाफ मोरोपंतांमध्यें झाला आहे. ते भगवद्भक्त आहेत, पुराणिक आहेत, काव्यालंकारविचक्षण आहेत; पण ते संत नव्हेत, पंडित नव्हेत कीं, प्रतिभावंत कवीहि नव्हेत. तिहींपैकीं कोणत्याच प्रवृत्तीचा उत्कर्ष मोरोपंतांत दिसत नाहीं. पण निरनिराळ्या वृत्तीच्या लोकांना त्यांच्या कवितेंतला एकेक विशेष प्रिय होणारा आहे. म्हणूनच परिश्रमपूर्वक केलेल्या प्रचंड ग्रंथनिर्मितीमुळें विशिष्ट वर्गापुरती प्रतिष्ठा मिळविण्याचें व परंपरानिर्मितीचें श्रेय त्यांच्या कवितेला मिळालें आहे.

मोरोपंतांची काव्यसंपदा

मोरोपंतांच्या* अभ्यासकांनीं त्यांच्या प्रचंड ग्रंथरचनेचे चार कालखंड कल्पिले आहेत. वयाच्या बाविसाव्या–तेविसाव्या वर्षी काव्यलेखनाला सुरुवात करून प्रारंभीच्या **पहिल्या दशकांत**(इ. स. १७५२–१७६१) पंतांनीं ब्रम्होत्तरखंड, श्रीकृष्णविजय (पूर्वार्ध), साररामायण व इतर कांहीं किरकोळ रचना केली. त्यावरून या कालांत संस्कृत महाकाव्याच्या अनु–करणाचा हव्यास, पांडित्यप्रदर्शनाचा प्रयत्न व रचनावैचित्र्याची हौस हे विशेष मोरोपंतांमध्यें दिसून येतात. **दुसऱ्या कालखंडांत**

* मोरोपंत चरित्र आणि काव्यविवेचन (श्री. ल. रा. पांगारकर) मयूरकाव्यविवेचन (श्री. ना. बनहट्टी)

(इ.स. १७६२-१७७२) कांहीं श्लोकबद्ध आख्यानें, स्तोत्रें, गीतार्या, आर्या-केकावली व सशयरत्नमाला यांसारखी रचना येते. त्यांतहि वृत्तवैचित्र्य कल्पनाचमत्कृति, यमकानुप्रास यांची करामत आढळतेच. याच काल-खंडांतील निरोष्ठ, संकेत, यांसारख्या मंत्ररामायणांत रचनावैचित्र्याच्या व कारागिरीच्या उर्मीनें अगदीं उच्चांक गांठला. त्याची प्रतिक्रिया म्हणूनच जणू कांहीं त्यानंतर सीतागीत, सावित्रीगीत, रुक्मिणीगीत हीं ओंवीबद्ध स्त्रीगीतें मोरोपंतांनीं याच कालांत लिहिलीं. त्यांमध्यें अकृत्रिम, सुबोध व सरळ रचना आढळते. **तिसरा कालखंड** (इ. स. १७७३-१७८२) हा पंतांच्या काव्यरचनेचा उत्कर्षकाल होय आर्याभारताच्या रचनेमध्यें पंतांच्या काव्यगुणांनीं परिसीमा गांठली आहे. याच काळांत मोरोपंतांनीं मंत्र-भागवत, दशमस्कंध, अमृतमंथन, व वामनचरित्र हीं प्रकरणें लिहिली. शेवटल्या **चौथ्या कालखंडांत** (इ. स. १७८३-१७९३) हरिवंश, संकीर्ण १०८ रामायणें (उपलब्ध फक्त ९०च), काशीयात्रा-प्रकरण, श्लोक-केकावली, स्तोत्रें, संतस्तवनें, इत्यादि रचना झाली. केकावली व काशीयात्रा-प्रकरण यांसारखी मोजकी आत्मनिष्ठ कविता वगळल्यास पंतांची बहुतेक रचना कथावर्णनपर अशीच आहे. ही गोष्ट लक्षांत घेऊनच पंतांच्या कवितेचें मूल्यमापन केलें तर ' पंत हे कवीच नव्हेत ' यासारख्या [1]वादाला अवसरच मिळणार नाहीं.

पंतांच्या सर्व रचनेंत **आर्याभारत** (१७ हजार ओळी) हा मोठा ग्रंथ होय. त्यांच्या काव्यमालेचा तो मेरूमणीच ठरेल. पंतांच्या कवित्व शक्तीचे सारे चांगले गुण या आर्याभारताच्या रचनेंत एकवटले आहेत. 'अमृताहून सरस असा नवा रस मी तुम्हाला पाजीन' असें रसिकांना दिलेलें आश्वासन पंतांनीं पूर्ण केलें आहे. आर्याभारत विविध रसांचा

१ मोरोपंतांची कविता (चिपळूणकरांचीं 'निबंधमाला' पहा)

सागर आहे. त्यांतील मूर्धाभिषिक्त रस मात्र वीररस आहे. त्या दृष्टीनें सारीच युद्धपर्वें सरस ठरतील. 'कर्णपर्व' म्हणजे तर पंतांच्या साऱ्या काव्य-गुणांची ओतीव मूर्तिच होय. कर्ण हा त्यांचा सर्वांत आवडता मानसपुत्रच आहे. त्याचें वीरत्व प्रगट करतांना मूर्तिमंत वीररस पंतांपुढें हात जोडून उभा राहातो. विविध रसांनीं नटलेले प्रसंग आणि संवाद दृश्यस्वरूपांत वाचकांपुढें उभे करण्यांत मोरोपंत सिद्धहस्त आहेत. आटोपशीर कथा-निवेदनावर भर देऊनहि संवाद, भाषणें यांबाबत पंतांनीं चांगलें कौशल्य प्रकट केलें आहे. संभाषणप्रसंगीं पंतांच्या वाणींतील नाटयगुण एकदम प्रकट होतात. म्हणूनच हरिदास-कीर्तनकारांना आख्यान रंगविण्याला पंतांच्या असल्या आर्यांचा फार उपयोग होतो.

'**मंत्रभागवत**' या ग्रंथांत सर्व भागवत ग्रंथाचा केवळ ३५०५ आर्यांत पंतांनीं सुंदर संक्षेप केला आहे. पाल्हाळाचा कंटाळा हा पंतांचा विशेष गुण होय. रसानुकूल भागाचा अनुवाद करावयाचा व रसाला प्रतिकूल वाटणाऱ्या प्रकरणांचा सफाईदारपणें संक्षेप करावयाचा, हें कौशल्य पंतांना फार चांगलें साधलें आहे. 'वाढेल ग्रंथ म्हणुनी आवरितों मी बळेंचि रसनेला।' या धोरणानेंच पंतांनीं भागवताचा येथें संक्षेप केला आहे.

पंतांच्या सर्व रामायणांत '**मंत्ररामायण**' (पद्यसंख्या १९१३) सरस व मोठें आहे. त्यांतील युद्धकाण्ड विशेष उल्लेखनीय होय. मंत्र-रामायणांत तीनशेंबत्तीस नाममंत्र पंतांनीं साधले आहेत, तर संकीर्ण रामायणांत रचनेचे विविध खेळ करून दाखविले आहेत. भाषाप्रभूची ही भाषेची कसरत एवढयाच दृष्टीनें याकडे पाहिल्यास रचनाचमत्कृतीच्या वैचित्र्याबद्दल कोणालाहि अचंबाच वाटेल. यांमध्यें ३१ मंत्रबद्ध, १० चित्रमय, १५ विशिष्टनामक, १५ वृत्तबद्ध, अशीं रामायणें येतात.

"रामभक्तीच्या उमाळयानेंच हीं रामायणें लिहिलीं गेलीं," असें कांहीं पंतभक्तांचें म्हणणें आहे. तर, "शब्दचित्रें रचण्यांत व यंत्रें बांधण्यांत मोरोपंतांनीं कालापव्यय केला," (-डॉ. विल्सन) असे कांहीं टीकाकार म्हणतात. दोघांच्या टीकेंतील तथ्यांश लक्षांत घेऊन आपणांस असें म्हणतां येईल कीं, पंतांना सांगतां येत होतें पण सांगण्यासारखें जवळ उरलें नव्हतें, अशा काळांतील ही रचना आहे. रामचरित्र पंतांचें अत्यंत आवडतें असलें तरी, नैसर्गिक उमाळयानें हीं अनेक रामायणें लिहिलीं गेलीं, असें दिसत नाहीं.

पंतांच्या कवितेचे गुणदोष

पंतांचें काव्य अनेकविध काव्यगुणांचें आगर आहे. संक्षेप-विस्ताराचें योग्य धोरण अवलंबून कथानकाची सुसंगत व परिणामकारक गुंफण करावयाची आणि निवेदनाच्या संथ ओघांत चटकदार भाषणें आणि संवाद गोंवून सर्व तऱ्हेच्या श्रोत्यांचें मन रिझवील, अशी कथा सांगावयाची, हा पंतांच्या कथाकथनचातुर्याचा स्पृहणीय विशेष होय. पुष्कळदां आर्येच्या उत्तरार्धांत मोरोपंत एखादा मार्मिक दृष्टान्त देतात त्यावरून त्यांच्या कल्पनाविलासाची जात कळून येते. त्यांच्या बुद्धिकोशांत कल्पनांचें भांडार असलें तरी, त्या बाबतींत अपूर्वता कांहीं नाहीं. सूक्ष्म, तरल किंवा रम्य कल्पनांचा विलास येथें आढळत नाहीं. उलट त्याच त्याच उपमादृष्टांतांची पुनरावृत्ति व शब्दालंकारांची तीच तीच कंटाळवाणी कसरत पाहावी लागते. त्यावरून कवीची परिश्रमशीलता व व्यासंग हीं दृष्टीस पडलीं तरी, कविप्रतिभेचा दुय्यमपणा चटकन् जाणवतो. पंतांचें भाषाप्रभुत्व असामान्य असलें तरी, त्यांची कविता त्यांनीं म्हटल्याप्रमाणें 'प्राकृतसंस्कृतमिश्रित' अशी कंथाच (घोंगडी) ठरते. सामान्य मराठी वाचकाला मोरोपंती आर्या म्हणूनच क्लिष्ट व दुर्बोध वाटते. मोरोपंतांच्या कवितेंत इतर पंडित

कवींप्रमाणें प्रदीर्घ समास, दूरान्वय, अवघड व अपरिचित संस्कृत शब्द, मराठींत रूढ नसणारे विशिष्ट शब्द नि वाक्यखंड हे दोष आहेतच. शिवाय यमकानुप्रासांची पुनरुक्ति, श्रुतिकटुता, अप्रयोजक उपमा-दृष्टान्त आणि रसहानिकारक शब्द यांची योजना व त्यामुळें होणारी औचित्यहानि, ग्राम्यता, इत्यादि दोष टीकाकारांनीं दाखविले आहेत. पण फार तर दहा-पंधरा हजार ओळींची कविता अशा दोषांनीं डागळलेली सांपडली तरी, चाळीस-पंचेचाळीस हजार कविता निर्दोष व उच्च दर्जाचीच ठरेल, असें पंतभक्तांचें म्हणणें आहे.

पंतांच्या वाङ्मयाचें यश तसें मोठें आहे. विशिष्ट वर्गाचे कां होईना ते अत्यंत लोकप्रिय कवि आहेत. समकालीनांनीं तर त्यांच्या कवितेचा आदर केलाच, पण पुढील १९ व्या शतकावरहि मोरोपंती काव्याची छाप विलक्षण पडली. त्यांच्या काव्यासंबंधीं जितकी चर्चा आजवर झाली, तितकी दुसऱ्या कोणा कवीच्या काव्यावर झाली असेल, असें वाटत नाहीं. मोरोपंतांचें भाषिक व वाङ्मयीन कार्य तसेंच मोठें आहे. ते एक युगप्रवर्तक कथाकवि होऊन गेले. आपल्या आर्यारचनेनें पंतांनीं मराठी भाषेच्या सामर्थ्यांत व ऐश्वर्यांत बहुमोल भर टाकली. त्यांच्या आर्यांमुळेंच अव्वल इंग्रजी अमदानींतहि पुराणांतील कथांचा प्रसार लोकांमध्यें होत राहिला. मराठी भाषेचा लवचिकपणा व अलंकारवैभव दाखवून पंतांनीं संस्कृत पंडितांचें गर्वहरण केलें; मराठी भाषिकांतील न्यूनगंड नाहींसा केला. शब्द, विचार, कल्पना यांबाबतींत समृद्ध अशा आर्या संस्कृत पंडितांनाहि शिरसा-वंद्य मानायला लावून मुकुंदराजांपासून चालत आलेला मराठीचा दावा पंतांनीं यशस्वीपणें निकालांत काढला. शुद्ध आणि संपन्न अशा भाषा-सरणीमुळ मोरोपंतांनींच मराठीला अभियुक्त भाषांच्या पंक्तींत मानाचें स्थान मिळवून दिलें यांत शंका नाहीं.

'मराठ्यांचीं खरीं गाणीं' म्हणून ओळखली जाणारी शाहिरी* कविता पोवाड्यांच्या रूपानें शिवकालांतच प्रथम जन्मास आली यादवकालीन वाङ्मयांत आलेल्या शाहीर गोंधळी, भाट वगैरेंच्या तुरळक उल्लेखांवरून पराक्रमाचे पोवाडे व विलासाचीं वर्णनें ऐकविणारी कविता तत्पूर्वींहि यादवकालीन स्वराज्यकालांत अस्तित्वांत असावी, असें अनुमानावें लागतें. कारण तत्कालीन लौकिक वाङ्मय आज उपलब्ध नाहीं. मुसलमानी अमदानींत मराठ्यांचें स्वतंत्र अस्तित्वच संपुष्टांत आलें; तेव्हां शाहिरी कवितेचीहि निपज बंद पडली असावी. सतराव्या शतकांतील स्वराज्यस्थापनेनें महाराष्ट्राचें वातावरण एकदम बदललें. नव्या भावना, नव्या आकांक्षा, नवा उत्साह यांच्या बहरांत नवीं गाणींहि महाराष्ट्र गाऊं लागला. तलवारींचा खणखणाट, घोड्यांच्या टापा यांच्या आवाजांत, ढोलकीं, संबळ, डफ या देशी वाद्यांच्या साथींत, वीरश्रीच्या कथा गाणारा कवींचा एक नवा वर्गच निर्माण झाला आणि जुन्या मराठींत पोंवाडा† हा नवा वाङ्मयप्रकार अस्तित्वांत आला.

मराठ्यांची शाहिरी कविता

जिजाबाईच्या सांगण्यावरून लिहिलेला अफझुलखानाच्या वधावरचा अगिनदासाचा पोवाडा हा सर्वांत जुना पोवाडा होय (इ. स. १६५९). त्याची रचना सरळ गद्यप्राय पण परिणामकारक आहे. "शूर मर्दाचा पोवाडा, शूर मर्दानें ऐकावा ॥" असें म्हणणाऱ्या तुळशीदासाच्या तानाजीवरील पोवाड्यांत प्रत्यक्ष पाहिलेल्या समरप्रसंगाचें भेदक वर्णन आहे. शिवकालांतील स्फूर्तिदायक प्रसंगावर अनेक पोवाडे झाले असावेत, पण

पोवाडा वाङ्मयाचे विशेष

---

* मराठी शाहीर—(श्री. वर्दे).

† ऐतिहासिक पोवाडे —(य. न. केळकर).

पाठांतरांतून नाहींसे झाल्यानें आपणाला उपलब्ध नाहींत इतकेंच. सुमारें तीनशें पोवाडे आज उपलब्ध आहेत. त्यापैकीं चार शिवकालीन, तीन शाहूकालीन, दीडशें पेशवेकालीन व बाकीचे अव्वल इंग्रजींतील आहेत. शाहिरांची दृष्टि खरीच वस्तुनिष्ठ असल्यानें वर्ण्यविषयांचीं चित्रें त्यांनीं तन्मयतेनें रेखाटलीं आहेत. कवन करणें हीच त्यांची निर्भेळ भूमिका होती. त्यामुळें शब्दयोजना, वृत्तनैपुण्य, कल्पनाविलास, लोकभावना या गोष्टींकडे लक्ष पुरवूनच त्यांनीं रचना केली साहजिकच ती आल्हाददायी व परिणामकारक झाली.

शाहिरांची रचना स्वयंस्फूर्त मात्र नाहीं. कोणाच्या तरी सांगण्या-वरून ते पोवाडे लिहीत व बक्षीस मिळवीत. जिजाईनें सांगितल्यावरून अगिनदासानें 'कडाका गाईला' व 'शेरभर सोन्याचा तोडा मिळविला.' अगिनदास, तुळशीदास, यमाजी हे शिवाजी-बाजी यांचे आश्रितच होते. ("सांगेन मर्दाची ख्यात । बंदा बाजीचा म्हणवितो ॥"). अनंतफंदी हा पेशवेदरबारचा भाटच दिसतो. खर्ड्याच्या लढाईवरील त्याच्या पोवाड्यांत नानाफडणविसांची अवास्तव स्तुति आहे. 'माधवनिधन-काव्य' हें तर दुसऱ्या बाजीरावाच्या सांगण्यावरूनच फंदीनें लिहिलें आहे. गंगू हैबती, होनाजी, प्रभाकर या शाहिरांना सवाई माधवराव, दुसरा बाजीराव यांनीं वेळोवेळीं इनामें दिलेलीं दिसतात. त्याखेरीज मराठेशाहींतील इतरहि सरदारांचा त्यांना आश्रय असे. त्या सरदार-दरकदारांच्या निवासस्थानांचीं पोवाड्यांतील अतिशयोक्त वर्णनें हा भाटगिरीचाच भाग म्हणावयाचा. पेशवाई गेल्याबद्दल हळहळणाऱ्या शाहिरांनीं इंग्रजी राजवटीबद्दल कौतुकाचे व गौरवाचेहि उद्गार काढले आहेत. आपल्या रंगाच्या पोवाड्यानें सवाई माधवरावाचा दरबार गाजविणाऱ्या प्रभाकरानें पुढें मुंबईंतील नाना

शंकरशेट, पेस्तमजी वगैरे शेटसावकारांवरहि पोवाडे रचिले. थोडक्यांत, शाहिरांची सारी रचना अशी परप्रेरित आहे. त्यांची जात रजपुतांच्या भाटाप्रमाणें सांगणाऱ्याच्या इच्छेप्रमाणें कवन करण्याची; पण अशाहि कवितेंत त्यांचा कलाविलास प्रकट झाला, ही गोष्ट अमान्य करतां येत नाहीं.

स्वयंस्फूर्ततेच्या अभावीं आत्मनिष्ठ काव्याचे विशेष शाहिरी कवितेंत दिसत नसले तरी, समकालीनांच्या भावनांशीं समरस होऊन शाहीर आपला वर्ण्यविषय मांडीत असल्यानें तत्कालीन मराठी जीवनाचें चित्र हुबेहूब त्यांत उमटलें आहे. मराठ्यांच्या लौकिक जीवनांतील उत्कर्षापकर्षांशीं व तज्जन्य सुखदुःखांच्या भावनांशीं शाहीर तादात्म्य पावलेले दिसतात. खडर्याच्या लढाईंतील विजयाचें उन्मादानें वर्णन करणारानें पानिपतच्या अपयशाबद्दल अगोदर अश्रू ढाळले आहेतच. अस्तंगत पेशवाईसंबंधीं लिहितांना गतवैभवाच्या आठवणीनें व अव्वल इंग्रजींतील हलाखीनें ऊर भरून येऊन त्याची प्रतिभा विवळत असतांना दिसते; तर इंग्रजी अमदानीवरील पोवाड्यांत दुःखाची, वैतागाची, भयचकितपणाची व कौतुकाची अशी संमिश्र भावना दृष्टीस पडते. इंग्रजी राजवटीच्या नवेपणानें तत्कालीन लोकांप्रमाणेंच सगनभाऊ, परशुराम, प्रभाकर हे दिपून[1] गेलेले दिसतात. याचा अर्थ एकच कीं, शाहिरांच्या या कवितेंत लोकांच्या त्या त्या वेळच्या भावनांची प्रामाणिक प्रतिक्रिया अगदीं स्पष्टपणें प्रतिबिंबित झाली आहे.

---

१ इंग्रजी राजवटींतील कडक शिस्त, टापटीप, कामाचा उरक, न्यायाचा-कडकपणा व यंत्रकलेचे चमत्कार पाहून तत्कालीन समाज भयचकित होऊन गेला. शाहिरांच्या वाणीनेंहि पुढील शब्दांत हें आश्चर्य प्रकट केलें आहे.

'कला कुशल हिकमती जाणती, मातीचे करतिल सोनें'
'दहा हस्तिशीं काम ढळेना एक माणूस हलवी त्याशीं'
'बाच्छाई न् मऱ्हाटे राजें होउन गेले अमाप
अवघ्याहून कल्पना अधिक बसविली छाप'

म्हणूनच वि. का. राजवाड्यांसारखे इतिहासशास्त्रज्ञ अस्सल साधनांत बखरींपेक्षां पोवाड्यांना वरचा दर्जा देतात. चिटणीस किंवा कारकून पेशाच्या बखरकारांपेक्षां शाहीर हे तत्कालीन लोकजीवनांशीं अधिक समरस झाले होते. त्यामुळेंच त्यांना आपल्या कवनांत तत्कालीन समाजजीवनाचें चित्र यथातथ्य रेखाटतां आलें. 'मराठ्यांच्या सामुदायिक जीवनाचें चित्र' या अर्थानेंच शाहिरी कवितेची ऐतिहासिकता प्रमाणभूत मानावयाची. ऐतिहासिक घटनांच्या तपशीलवार माहितीचें सत्यत्व या दृष्टीनें शाहिरी कवितेकडे पाहणें अयोग्य ठरेल. राजकीय इतिहासाच्या अभ्यासकापेक्षां तत्कालीन समाजजीवनाच्या अभ्यासकालाच मराठा समाज व मराठा मन समजून घेण्याच्या दृष्टीनें शाहिरी वाङमय जास्त उपयोगी आहे.

पोवाड्याची रचनापद्धती गोंधळ्यांच्या कथानिवेदनपद्धतीसारखी आहे. आरंभीं साऱ्या देवतांना आवाहन, नमन व मग मुख्य कथा सांगणें ही रीति दोघांची सारखीच दिसते. गोंधळी पौराणिक कथा सांगतो, तर शाहीर ऐतिहासिक प्रसंग, व्यक्ति यांची कथा वर्णन करतो. गोंधळी आपल्या कल्पनेची व तात्कालिक स्फूर्तीनें सुचलेल्या विनोदाची फोडणी देऊन आपली कथा रंजक करूं पाहतो; तर, शाहीरहि श्रोत्यांच्या कला-प्रमाणें प्रासंगिक स्फूर्तीनें भाकडकथा, गांवगप्पा, विनोद यांचा रंग ऐतिहासिक वर्णनांत भरून श्रोत्यांना खुलवूं पाहातो, तपशिलाबाबत सत्याचा विपर्यास, काल्पनिकाची जोड, अतिशयोक्ति इत्यादि दोषांमुळें पोवाड्यांना निर्भेळ ऐतिहासिक कवितेचें महत्त्व देतां येत नाहीं. पोवाड्यांतील वर्णनें पौराणिक थाटाचींच असतात. सहाजिकच अति-रंजितपणाची हौस व विभूतिपूजेचा अतिरेक हे दोष त्यांमध्ये हटकून येतातच. तरी पण एकच एक प्रसंग वा व्यक्ति यावरील आपलें लक्ष यत्किंचितहि ढळूं न देण्याचें अनुसंधान संभाळून भडक प्रसंग उत्कटपणें, धांवत्या रचनेंत आणि तुटक तुटक पण तडफदार भाषेंत शाहीर

जेव्हां वर्णन करूं लागतात, तेव्हां श्रोत्यांचें देहभान हरपून ते पोवाड्यांतील वर्ण्यविषयाशीं अगदीं समरस होऊन जातात आणि शेवटीं शाहिराच्या रचनाकौशल्याबद्दल श्रोतेच त्याचे पोवाडे गाऊं लागतात.

मराठी राज्याचें साम्राज्य होतांच पराक्रमाबरोबर वैभवहि वाढत गेलें. तेव्हां शिवकालांतील साधा, सरळ व गद्यसदृश जोरदार पोवाडा मागें पडला आणि रावबाजीच्या रंगेल कारकीर्दींत नखरेल लावणी मान्यतेस चढली. मराठा सैनिकांच्या वीरश्रीबरोबर त्यांच्या शृंगारलालसेचीं चित्रें रंगविणारा हा नवा वाङमय–प्रकार निर्माण झाला. विलास भोगणारांबरोबर त्यांची लज्जत वर्णन करणारे निघावेत, हें साहजिकच होय.

लावणी वाङ्मयाचें स्वरूप

या लावणी वाङमयाला परंपरा नाहीं, हा समज चुकीचा आहे. संतांच्या शृंगारपूर्ण गौळणी, विरहिणी यांतील भावनेचें स्वरूप लावणींतील वर्ण्यभावनेशीं जुळणारें आहे. पंडित कवींचीं राधाकृष्णविलासांचीं आख्यानें, पदें, यांचा तोंडावळा लावणी वाङमयासारखाच आहे. रामजोशी, प्रभाकर, होनाजी, इत्यादि लावणीकारांनीं राधाकृष्णप्रेम व गोपगोपींचे विलास या विषयावरच पुष्कळ लावण्या लिहिल्या आहेत. पंडित–कवींपैकीं नागेशानें लिहिलेल्या ‘चंद्रावळ’ सारखीच अनंतफंदीची ‘चंद्रावळ’ ही लावणी आहे. एक श्लोकबद्ध आहे तर, दुसरीची रचना लावणीवजा आहे इतकेंच. दोघांच्याहि चंद्रावळचा विषय कृष्णगोपीप्रेम हा असला तरी, मानवी शृंगाराचें भडक वर्णनच तींत आहे. परशुरामाच्या लावण्यांत राधाकृष्णविलासवर्णनाबरोबर त्या प्रसंगाचा अध्यात्मपर अर्थ लावण्याचा पंडिती प्रयत्नहि दिसून येतो. प्रभाकराच्या वीस–पंचवीस लावण्यांचा नायक बाजीराव आहे. त्याचे विलास वर्णन करतांना प्रभाकरानें बाजीरावालाच कृष्ण बनविलें आहे. सामान्य व्यक्तीचें प्रेम व शृंगार

उघडपणें वर्णावयाचा, हा नवेपणा शाहिरांनीं आपल्या रचनेंत आणला असला तरी पंडिती काव्याच्या जातकुळींतीलच ही लावणी कविता आहे, असें म्हणावें लागतें.

ऐहिक ऐश्वर्याच्या भरभराटीबरोबर लौकिक भावनांच्या समाराधनाची प्रवृत्ति वाङमयांत निर्माण होऊं लागली. या प्रवृत्तीनेंच प्रारंभीं पौराणिक आख्यानांच्या व पदांच्या रूपानें हरिदास-कीर्तनकारांबरोबर शहरांतील देवमंदिरांच्या सभामंडपांत प्रतिष्ठित आणि सुखवस्तु शेटसावकार,—सरदारदरकदार यांच्यापुढें आपल्या कलाविलासाला सुरुवात केली. तेथून तिनें पुणें दरबारच्या व पुण्यांतील धनाढ्यांच्या दिवाणखान्यांत प्रवेश केला. मोरोपंत, अमृतराय, अनंतफंदी रामजोशी हे हरिदास-कीर्तनकार या प्रवृत्तीचे पोशिंदे ठरले. अनंतफंदी, रामजोशी हे कीर्तनकार होते, तसेंच लावणीकारहि होते, हे सर्वश्रुत आहे. पौराणिक प्रसंग आणि दैवी व्यक्ति यांच्या बुरख्यांतून सभ्यतेच्या, प्रतिष्ठेच्या मर्यादा सभाळून प्रतिष्ठितांपुढें प्रकट होणारी लौकिक भावनांच्या समाराधनाची प्रवृत्तीच, शाहिरांच्या समवेत शहरवस्तींतील उघडचा जागेंत अठरापगड जातींच्या आणि अनेक पेशांच्या लोकांपुढें पोवाडे आणि लावण्या यांच्या वेषांत उभी राहिली. या दृष्टीनें पाहतां शाहिरी काव्य म्हणजे उत्तरकालीन पंडिती काव्याची दुसरी बाजूच होय.

शृंगार, वीर, करुण या लौकिक रसांचा अवलंब, राधाकृष्ण या पौराणिक व्यक्तींच्या विलासादि लौकिक आचारांचीं वर्णनें, शृंगारप्रधान काव्यांतहि अध्यात्माचा धागा आणि बाह्यांग सजविण्याकडे लक्ष अशा अनेक गोष्टींत पंडिती व शाहिरी काव्य यांचें साम्य दिसून येतें. ‘शाहीर कवींचा तुरा’ असे कविराय रामजोशी हे

चांगले व्युत्पन्न पंडित होते. तसेंच, अमृतराय, अनंतफंदी यांची कटाव, फटका इत्यादि रचना लावणीकार कवींच्या उपदेशपर वा वैराग्यपर लावण्यांना जुळती अशीच आहे. यावरून पंडिती व शाहिरी काव्य यांच्यांतील सहोदर संबंध सहज लक्षांत येईल. रावबाजीच्या सांगण्यावरून होनाजीनें लावणीला रागदारीची जोड देतांच तमाशांच्या फडांतील लावणी कलावंतिणीच्या बैठकींत शिरली. तेथें प्रतिष्ठित पंडितांनींच तिचें कोडकौतुक केलें. पुढें १९ व्या शतकाच्या शेवटच्या पंचविशींत हीच लावणी किर्लोस्करी नाटकांतील संगीताची जन्मदात्री ठरली व तत्कालीन सुशिक्षितांच्या–आधुनिक पंडितांच्या–गौरवाची स्वामिनी झाली. लावणीची एकंदर कुलपरंपरा अशी आहे.

राम जोशी* हे शाहिरांतील पंडित कविच होत. त्यांच्या शृंगारिक लावण्यांतील नायक व विलासवर्णनें संस्कृत वाङमयांतील वळणाची आहेत. त्यांची भाषाहि संस्कृतप्रचुर, प्रौढ, अलंकारिक व सांकेतिक कविकल्पनांनीं नटलेली आहे. त्यांच्या शृंगारवर्णनांत सभ्यताहि अधिक आहे. तरी रासक्रीडेच्या वर्णनांत रावबाजीच्या विलासांचेंच चित्र ते रेखाटतात; हा कालमाहात्म्याचाच परिणाम म्हणावयाचा. ‘कोण्या ही सुभगाची मदनमंजरी’ आणि ‘सुंदरा मनामधि भरली’ यांसारख्या लावण्यांतून राम जोशांची कल्पकता, रसिकता व भाषा–प्रभुत्व यांचा पदोपदीं प्रत्यय येतो. राधा व तिची सखी यांच्या रामजोशीरचित संवादांतील छेकापन्हुतीची बहार इतरत्र पाहावयास मिळणार नाहीं. त्यामुळें ‘अशी रचाया दुजी कुणाची माय व्यालि भूवरीं’ हा राम जोशींचा आत्मविश्वास सार्थच ठरतो. ‘भला जन्म हा तुला लाधला,’ ‘नर जन्मामधिं नरा करुनि घे नर नारायण

---

* राम जोशीकृत लावण्या-(शं. तु. शाळिग्राम).

गडी, ' यांसारख्या त्यांच्या उपदेशपर लावण्यांनीं लावणीला शिष्ट-मान्यता मिळवून दिली. म्हणून हरिदास–कीर्तनकारांबरोबर देवळाच्या आवारांत ती जाऊं शकली. राम जोशांची कविता बहुतेक लावणी-छंदांतच आहे तरी ब्राम्हणी राज्य (पेशवाई), दुष्काळ, पेंढाऱ्यांची लुटालूट, होळकरांचा पुण्यांतील दंगा, यात्रचे त्यांचे पोवाडेहि यथातथ्य वर्णन आणि वीर, करुण या रसांची यथोचित निष्पत्ति यांमुळें परिणामकारक उतरले आहेत.

प्रभाकराच्या† लावण्या इतरांच्या मानानें अधिक भडक स्वरूपाच्या आहेत. पतिपत्नीच्या नात्याची चौकट असलेलीं विलासवर्णनेंहि उत्तान, अश्लील नि उन्मादक आहेत. रसिकांना काय पाहिजे हें ओळखून त्याप्रमाणें रचना करणारा हा कवि आहे. शृंगारिक शरीरचेष्टांचीं व मनोविकारांचीं सूक्ष्म वर्णनें ढंगदार शब्दांनीं करण्यांत त्याचा हातखंडा आहे. या पोटार्थी वृत्तीच्या प्रेरणेनेंच त्यानें पोवाडे रचिले आहेत. सवाई माधवरावाच्या कारकीर्दीवरील त्याचा ' रंगाचा पोवाडा ' प्रसिद्ध आहे. माधवरावाच्या मृत्यूवरील पोवाडाहि हृदयद्रावक उतरला आहे. रावबाजीच्या विलास-वर्णनांतहि प्रभाकर रंगून गेला आहे. इतकेंच नव्हे, पण नाना शंकरशेट, प्रिंगलसाहेब, विकाजी, पेस्तमजी शेट यांच्यावरील पोवाड्यांतहि प्रभा-कराची वर्णनशक्ति चांगली दिसून येते. रचनाकार या अर्थानें प्रभाकर खराखुरा कवि आहे.

सगनभाऊ§ जातीनें मुसलमान असला तरी पेशवाई, मराठा वीर, महाराष्ट्रीय संत, हिंदु दैवतें व धर्मक्षेत्रें यांच्याबद्दल त्याच्या ठिकाणीं खरेंखुरें प्रेम दिसतें. खडकीच्या लढाईनंतर बाजीराव पळून गेल्यावर

---

† प्रभाकरकृत पोवाडे व लावण्या–(शं. न. जोशी)

§ सगनभाऊकृत लावण्या व पोवाडे–(गो. गो. अधिकारी)

पुण्यांतील लोकांची कशी केंविलवाणी स्थिति झाली, याचें परिणामकारक शब्दचित्र त्यानें रेखाटलें आहे. पानिपतच्या प्रसंगावरील त्याचा पोवाडा करुणोत्कट रसनिर्मितीमुळें उल्लेखनीय वाटतो. मात्र माहितीच्या दृष्टीनें त्यामध्यें भरपूर चुका आहेत. सगनभाऊच्या लावण्यांतील शृंगारांत नाजुकपणा व संयम अधिक आहे. एकनिष्ठा, पातिव्रत्य, धर्मश्रद्धा यांबाबतचे हिंदुसंस्कार त्यांमध्यें स्पष्ट दिसून येतात.

सगनभाऊशीं कलगीतुऱ्याचे सामने करणारा **होनाजी* बाळा** 'घन:शाम सुंदरा श्रीधरा अरुणोदय झाला' या भूपाळीनें सर्वपरिचित आहे. या भूपाळींतील प्रसन्नता, सात्त्विकता व श्रद्धामयता या विशेषांनींच होनाजी शाहिराची सारी कविता संपन्न आहे. होनाजीच्या पांच पोवाड्यां-पैकीं तीन बाजीरावावरच आहेत. प्रभाकराप्रमाणेंच याचा रंगाचा पोवाडा ढंगदार आहे. पेशवाई गेल्यानंतरच्या अध:पाताचें त्यानें रेखाटलेलें चित्र हृदयद्रावक आहे. बाजीरावावरील लावण्यांत होनाजीनें त्याचे रंगढंग यथेच्छपणें रंगविले आहेत. होनाजीच्या शृंगारवर्णनांत कांहीं ठिकाणीं बीभत्सपणा आढळला तरी, आंतरिक प्रीति व सामाजिक नीति यांची कदर इतरांपेक्षां त्याच्या ठिकाणीं अधिक आहे.

या लावणीवाङ्मयांत महाराष्ट्रियांची उत्कट प्रपंचलालसा व पौरुषपूर्ण भोगेच्छा हीं व्यक्त झालीं आहेत. स्त्री-पुरुषांतील शृंगार-विलासाच्या उत्तान वर्णनानेंच लावणीवाङ्मयाचा बराच भाग भरलेला आहे. पेशवाईच्या अखेरी अखेरी पराक्रम संपुष्टांत आला, वैभवहि चाललें; पण त्या पोटीं निर्माण झालेले रंगढंग मात्र चालूच राहिले. त्यामुळें कित्येक लावण्यांतून पौरुषशून्य व स्त्रीलंपट अशा सैनिकांचीं चित्रें अक्कडबाज शाहिरांनीं ढंगदारपणें काढलेलीं दिसून येतात. त्यांतील कांहीं अश्लील भाग वगळल्यास शाहिरी लावणी सहजसुंदर व शालीन स्त्रीसारखी मर्यादशीलच आहे.

* होनाजीबाळाकृत लावण्या-(शं. तु. शाळिग्राम).

शृंगारिक लावण्यांबरोबर शाहिरांनीं देवतांच्या स्तुतिपर, पौराणिक व वैराग्याचा उपदेश करणाऱ्या भक्तिपर लावण्याहि लिहिल्या आहेत. त्यांमध्यें महाराष्ट्रियांची निःसंग व त्यागशील वृत्ति व्यक्त झाली आहे. वैराग्यपर लावण्यांत वैषयिक सुखाबद्दलची जुगुप्सा संतांइतक्याच हिरीरीनें शाहिरांनीं प्रकट केली आहे. लावण्यांतील शृंगारभावनेइतकीच त्यांची पारमार्थिक शिकवण परिणामकारक उतरली आहे. 'सुंदरी मूर्ति मदनाची, अमृतवदनाची, मदनकदनाची, विखारी धार,' या स्त्रीवर्णनाइतकीच 'हटातटानें पटा रंगवुनि जटा धरिशि तूं शिरीं। मठाची उठाठेव कां करी॥' ही दांभिकतेचा निषेध करणारी राम जोशींची वाणी प्रभावी नाहीं असें कोण म्हणेल? †**अनंत फंदीनें** खर्ड्यांची लढाई, यशवंतराव होळकर, दुसरे बाजीराव यांच्यावर लिहिलेले पोवाडे उत्कृष्ट असले, तरी 'स्नेहासाठीं पदरमोड कर, पण जामिन कोणा राहुं नको' अशा व्यावहारिक उपदेशपर फटक्यांनींच फंदी अधिक प्रसिद्ध आहे. ***परशराम** या शाहिरानें तर पौराणिक व तात्त्विक स्वरूपाच्या लावण्याच विशेष लिहिल्या आहेत. त्यांमध्यें रूपकाच्या द्वारा वेदान्ताचा सूर स्पष्टपणें ऐकूं येतो. सगनभाऊ हा मुसलमान शाहीरहि हिंदूंच्या देवदेवतांवर, रामायण-महाभारतांतील कथांवर लावण्या लिहितो 'ब्रम्हमाया' इत्यादि वेदान्ती कल्पना योजतो. प्रभाकराच्याहि कित्येक लावण्या देवादिकांवर आहेत. मात्र त्यांत आध्यात्मिक वा वैराग्यपर असा भाग विशेष नाहीं. 'लक्ष्मी गर्वें निंदा बोलुनि झिडकारित पार्वती।' असा प्रारंभ असलेला लक्ष्मी-पार्वती संवादाचा प्रभाकरकृत 'फटका' मोठा गमतीचा आहे. अर्थात् त्यांतहि वेदान्तापेक्षां कवीची पौराणिक कल्पकताच नजरेंत भरण्यासारखी आहे.

---

† अनंत फंदीकृत कविता-(शं. तु. शाळिग्राम).

* परशराम कवीच्या लावण्या-(शं. तु. शाळिग्राम).

पौराणिक कथा, वेदान्तविचार किंवा नीत्युपदेश यांपेक्षां समाजस्थितीचें वास्तवदर्शन या दृष्टीनें लावणीवाङमय अधिक महत्त्वाचें आहे. मूठभर वरिष्ठ वर्णीयांच्या आचारविचारांपुरतेच शाहिरी वाङमय मर्यादित नाहीं. राम जोशी–प्रभाकर–फंदी हे ब्राम्हण, तर होनाजी गवळी, सगनभाऊ मुसलमान, मोतीलाल मारवाडी, परशराम शिंपी, येसू तेली, महादु सुतार अशा प्रकारें शाहिरांमध्यें सर्व जातींच्या, सर्व पेशांच्या लोकांचा समावेश झालेला दिसतो. शाहिरी वाङमयाचा प्रसारहि गोंधळी, भराडी, बहुरूपे यांनीं गांवोगांव सर्व थरांतील लोकांमध्यें त्या काळीं केला. म्हणूनच शाहिरी वाङमयाला प्रातिनिधक म्हणावयाचें. तत्कालीन लोकांच्या धार्मिक समजुती, सामाजिक चालीरीती, लोकांचे श्रद्धाविषय, त्यांच्या वृत्ति–प्रवृत्ति, आशा–अभिलाषा स्त्रीपुरुषसंबंधांविषयींच्या त्यांच्या कल्पना, पतिसुख, अपत्यप्रीति, सासर–माहेर–संबंध, सावत्रपणा, भाऊबंदकी यासबंधींच्या स्त्री वर्गाच्या भावना इत्यादि गोष्टींचें स्पष्ट प्रतिबिंब लावण्यांमध्यें पडलें आहे. त्यामुळें लावणी हे महाराष्ट्रसमाजाचें खरेंखुरें जिवंत चित्र झालें आहे. कांहीं[1] टीकाकारांच्या मतें " लावणींत रंगविलेलें जीवन फक्त तत्कालीन शहरांतलेंच आहे. " खेडुतांच्या भावना, शेतीव्यवसायांतील प्रसंग, तत्संबंधींच्या कल्पना, निदानपक्षीं त्यावर आधारलेले उपमा–दृष्टांतादि अलंकार यांचा आढळ लावणी वाङमयांत होत नाहीं. म्हणून आज आपण ज्या कवितेला ग्रामीण किंवा जानपद कविता म्हणतो तशी ती नाहीं, या अर्थानें त्या टीकाकारांचें विधान खरें आहे. तरी पण आजच्या शहरी जीवनाच्या कल्पनांतून तत्कालीन शहरांचा विचार करणें योग्य नाहीं. राजधानीच्या गांवीं जमा होणारा

१ ' मऱ्हाठी लावणी ' (मौज प्रकाशन) प्रा. धोंड. –(प्रस्तावना पहा)

सैनिक वर्ग मूळचा खेड्यांतील, व शेतकी पेशाचाच असल्यानें त्याचें चित्र हेंच त्या कालाचें प्रातिनिधिक ठरते. शिवाय परशुरामासारखा शहरी-दरबारी वातावरणापासून दूर राहणारा शाहीरहि जीं दृश्यें रेखाटतो, ती तत्कालीन मराठा शेतकरी व सैनिक यांच्या जीवनाचीं प्रातिनिधिक चित्रेंच म्हटलीं पाहिजेत. त्याच्या लावण्यांत नाशिक बाजूच्या गांवढ्या जीवनाचें प्रतिबिंब पडलें आहे. सामान्य जनतेच्या जीवन-चित्राबरोबर पेशवाई व अव्वल इंग्रजींतील राजकीय परिस्थितीचेंहि स्पष्ट व निर्भीड चित्र त्यानें रेखाटलें आहे. तेव्हां सरदार नि सैनिक यांच्यांत लोकप्रिय झालेली लावणी कविता ही त्या काळची प्रातिनिधिक कविता होय. हें मान्य होण्यास अडचण पडूं नये.

पोवाडा किंवा लावणी यांवर पौराणिक रचनेची छाया आहेच. शाहिरी कवितेंतहि जुन्या वाङमयाच्या व्यासंगाचें प्रतिबिंब पडलें आहे. तरी पण जुनी चौकट झिडकारून त्यांनीं आपल्या भावना, कल्पना, विचार यांचा आविष्कार नव्या प्रकारानें केला; हेंच शाहिरांचें वैशिष्ट्य. सद्‌भिरुचीचें शिष्टसंकेत झुगारल्यामुळें पंडिती काव्याप्रमाणें सांकेतिक-तेच्या कृत्रिमतेनें त्यांचें काव्य जखडलें गेलेलें नाहीं. जीवनानुभूतीशीं अधिक इमानदारी राखून शाहीर काव्य करीत असल्यानें त्यामध्यें त्यांची अशी कांहीं खास वैशिष्ट्यें निर्माण झालीं आहेत. त्यांच्या उफाळलेल्या भावनांच्या आविष्कारांत असंस्कृतपणा असला तरी तो सकस व निकोप आहे. त्यांच्या कल्पनांत नवेपणा आहे. अनिर्बंधपणामुळें त्यांच्या लावणीरचनेंत उत्तानता व अश्लीलता असली तरी त्या अनिर्बंधपणानेंच काव्य सतेज उतरलें आहे; निर्जीव झालें नाहीं. त्यांच्या स्वाभाविक रानदांडगेपणांतच जिवंतपणा आहे. जीवनानुभूतींतून स्फुरलेल्या प्रतिमा व कल्पना यांचा उपयोग शाहिरांनीं केल्यामुळें त्यांच्या आविष्कारांत नव्हाळी

व सहजता आली. वर्णनांतील वास्तवता व नाविन्य, दृष्टिकोनांतील भेदकता व स्वातंत्र्य, आणि वाणींतील ठसकेबाजपणा व अस्सल मराठी वाणा या वैशिष्टयांनीं शाहिरांची कविता त्या काळीं व आजहि लोकप्रिय झाली तर नवल नाहीं.

प्राचीन मराठी साहित्य प्राधान्यानें पद्यमय आहे. पाठान्तरसुलभता व पावित्र्यभावनेचा परिपोष यासाठीं बहुतेक सर्व धर्मपंथियांनीं पद्याचाच अंगीकार केला. महानुभावांच्या चरित्रपर व सूत्रात्मक वाङमयाचा तेवढा याला अपवाद दिसतो; पण महानुभावांच्या आधीं देखील व्यावहारिक स्वरूपाचें गद्य लिहिलें जात होतेच. ज्योतिष, वैद्यक, जारणमारणादि प्रयोग, इत्यादिसंबंधींचीं चोपडी, किंवा पंचतंत्र, सिंहासनबत्तिशी यांसारख्या नीतिकथा–चातुर्यकथा या प्रकारचें साहित्य त्या काळीं गद्यांत लिहिलें जात असावें; पण तें कालाच्या पोटांत गडप झालें आहे. शिलालेखांतील गद्यप्राय ओळी, जमाखर्चाच्या पद्धती (मेस्तकें), लेखनकल्पतरु यांसारख्या हेमाडपंतो रचनेमुळें प्राचीन गद्याचे [1]आचार्य म्हणून हेमाद्रि पंडितांना संबोधावें लागेल. त्यानंतर महिंमभट्ट, केशवराजसूरी, पंडित भीष्माचार्य, वगैरे महानुभावीय ग्रंथकार एकनाथपूर्वकालांतील गद्यलेखक म्हणून दृष्टिपथांत येतात. त्यांच्या लीळाचरित्र-सूत्रपाठ–पंचवार्तिकादि गद्य वाङमयावरून तेराव्या–चौदाव्या शतकांतील गद्याची–बालबोध भाषेची ओळख होते. एकनाथांच्या कालांत स्वत: एकनाथांनीं ‘ अर्जदास्त ’ सारखी एक-दोन प्रकरणें फारसीप्रचुर गद्यांत लिहिलीं आहेत. त्यावरून भर मुसलमानी अमदानींत मराठीची गळचेपी कशी झाली असेल, याची कल्पना येते. फादर स्टीफन्सच्या ख्रिस्तपुराणाच्या प्रस्तावनेसारखे कांहीं

प्राचीन मराठी गद्य

---

१ ‘स्वराज्यांतील गद्य ’–(मराठी गद्याचा इंग्रजी अवतार) द. वा. पोतदार.

तुरळक नमुने सतराव्या शतकांतील कोंकणी बोलीची ओळख करून देतात. पण राजकीय व व्यावहारिक क्षेत्रांतील सारें वातावरण फारशीमय झाल्यानें मराठी गद्यरचनेला त्या काळीं अवसरच उरला नव्हता. सतराव्या शतकाच्या उत्तरार्धांत स्वराज्य स्थापना होऊन मराठीला जेव्हां राजभाषेचें स्वरूप प्राप्त झालें, तेव्हां तरवारबहाद्दरांचे पराक्रम वर्णन करण्यासाठीं कलमबहाद्दरांची लेखणी कुरुकुरु लागली. इतिहासकथनाच्या गरजेंतून मराठी गद्य वाङमयाची निर्मिती झाली. मराठेशाहीच्या प्रारंभापासून तों पेशवाईच्या अस्तापर्यंत राजकीय वातावरणांत वावरणाऱ्या चिटणीस, कारकून वगैरे मंडळींनीं मुसलमानांचे तवारिखा, शाहनामे, फेरिस्ते, वगैरे इतिहाससाधनांचे कित्ते पुढें ठेवूनच मराठी बखरी लिहिल्या असें दिसतें. अरबी भाषेंतील 'खबर' या शब्दावरून 'बखर' हा शब्द तयार झाला असावा.

मराठींतील बखर वाङ्मय

'**बखर**' वाङमयासंबंधीं विचार करतांना शालिवाहन, सिंघणादि यादव, हेमाडपंत, बिंबस्थान यांच्या बखरींचा उल्लेख केला जातो. तालिकोटच्या लढाईसंबंधींची राक्षसतागडीची बखरहि प्राचीन म्हणून प्रसिद्ध आहे. यावरून बखरलेखनाचा प्रघात पुरातन कालापासून चालत होता, असें अनुमान निघतें. पण महाराष्ट्राचें स्वातंत्र्य नष्ट झाल्यावर इतिहास लिहून ठेवण्याची ही प्रथाहि जी खंडित झाली, तिचा पुन्हा उदय शिवकालांतच झाला. म्हणून 'बखर' वाङमयाची परंपरा तेथूनच सुरू झाली, असें म्हटलें पाहिजे. त्यानंतरच्या काळांत मराठ्यांच्या इतिहासांतील निरनिराळ्या प्रसंगांवर दोनअडीचशें बखरी लिहिल्या गेल्या.

या बखरींचे तीन वर्ग पडतात. समकालीन बखरनविसांनीं प्रत्यक्ष पाहिलेल्या–ऐकलेल्या घटनांवर आधारलेल्या बखरी हा पहिला वर्ग. यामध्यें कृष्णाजी अनंत सभासदांनीं लिहिलेली शिवछत्रपतींची व

कृष्णाजी शामरावांची ' भाऊसाहेबांची बखर ' यासारख्या बखरी येतात. स्मृतीवर हवाला ठेवून दंतकथा, आख्यायिका यांनीं सजविलेल्या बखरी हा दुसरा वर्ग. त्यांत सोवनीकृत पेशव्यांची बखर, दाभाड्यांची हकीकत इत्यादि बखरी येतात. जुने ग्रंथ, टिपणें, ऐतिहासिक कागदपत्र यांचा उपयोग करून लिहिलेल्या बखरींच्या तिसऱ्या वर्गात सप्तप्रकरणात्मक शिवचरित्र, रामदासस्वामींची बखर वगैरेंचा समावेश होतो.

सभासदी बखरींत शिवरायाच्या समकालीनानें काढलेलें त्यांचें शब्दचित्र पाहावयास मिळतें. **कृष्णाजी अनंत सभासद** यांची या काळांतील कर्त्या, राजनीतिनिपुण पुरुषांत गणना होते. त्यांच्या भाषेंत लालित्य नाहीं; पण मुरब्बी मुत्सद्याला साजेसा शब्दांचा मोजकेपणा व मार्मिकपणा आहे. समग्र बखर त्रोटक असली तरी उत्तरार्ध विस्तृत व मांडणीच्या दृष्टीनें बांधेसूद आहे. मोजक्या व जोरकस शब्दांत लिहिलेलें हें शिवचरित्र म्हणजे मराठी गद्य वाङमयाचा अमोलिक अलंकारच होय. **खंडोबल्लाळ चिटणिसांची** ' शिवछत्रपति-दिग्विजय ' (इ. स. १७१८) ही बखर साद्यन्त व सविस्तर असली तरी तिच्यांत मागाहून कांहीं माहिती घुसडली गेल्यामुळें ती तितकी विश्वसनीय ठरत नाहीं. तिची भाषा प्रौढ, ठांस व बंदिस्त आहे. त्यांचे चिरंजीव **गोविंद चिटणीस** यांच्या शिवाजी-शाहू यांचेवरील बखरी वाङमयीन दृष्ट्या विशेष उल्लेखनीय नाहींत. राजनीतीविषयीं विवेचन करणारें याच काळांतील **रामचंद्रपंत अमात्य (बावडेकर)** यांचें **' आज्ञापत्र**[१] **'** (१७१६) यांतील सुबोध,

१ या आज्ञापत्राची रचना इ. स. १७१६ मध्यें झाली. त्याचा कर्ता कोण ? हा वादाचा विषय आहे. सामान्यतः रामचंद्रपंत आमात्य हा याचा कर्ता मानला जातो. पण प्रा. कोलते यांच्या मतें कोल्हापूरच्या शंभू छत्रपतीचा पंतप्रधान नीलकंठ मोरेश्वर पिंगळे हा या प्रकरणाचा कर्ता असावा. आज्ञापत्र—(वीणा प्रकाशन, नागपूर) प्रस्तावना पहा.

सूत्रबद्ध व गोळीबंद वाक्यरचनेनें विलक्षण प्रभावी उतरलें आहे. राजा, प्रधान यांचीं कर्तव्यें, फौज, आरमार, शस्त्रास्त्रें, गड-किल्ले यांची व्यवस्था व सावकार, व्यापारी, वतनदार, नोकर यांच्याशीं वागण्याचें धोरण वगैरेंसंबंधीं शिवाजी महाराजांच्या राज्यनीतीचें विवेचन आज्ञांच्या रूपांत या प्रकरणांत पहावयास मिळतें. खंडोबल्लाळांचा पुतण्या रघुनाथ यादव उर्फ **चित्रगुप्त** हा चांगला बखरकार आहे. शिवाजीवरील बखरींतील त्याचें लिहिणें भारदस्त, अलंकारिक व चटकदार आहे. माहितीच्या दृष्टीनें मात्र सभासदी बखरीचाच त्यानें विस्तार केला आहे. आयुष्याच्या उत्तरार्धांत यानें गोपिकाबाईच्या आज्ञेवरून 'पानिपतची बखर' (इ.स. १७६२) लिहिली. वीर व करुण रसांनीं ओथंबलेली ही बखर म्हणजे एक गद्य पोवाडाच आहे. रघुनाथ यादवाची कथनशैली कांहींशी पौराणिक थाटाची असून भाषेला सजविण्याचा बुद्धिपुरस्सर प्रयत्न त्यानें केला आहे. सर्व बखरीमध्यें वाङमयीन दृष्टचा सरस व उत्कृष्ट अशी बखर म्हणजे **कृष्णाजी शामरावांची** 'भाऊसाहेबांची बखर' होय. त्यांची निवेदनशैली अस्खलित व वाङमयात्मक गुणांनीं युक्त असल्यानें ही बखर मनोज्ञ नि रसाळ अशी उतरली आहे. त्यांच्या वर्णनशैलींत विलक्षण ओज असून शब्दचित्ररेखाटनाचे सारे गुण त्यांच्या ठिकाणीं एकवटले आहेत. पानपतचा पळ, दत्ताजी शिंद्याच्या वधानंतरची त्याच्या कुटुंबाची वाताहत, शुक्रतालची लढाई, इत्यादि प्रसंगींचीं वर्णनें वाचनीय आहेत. प्रसंगांच्या हुबेहूब चित्रणाबरोबर राजकीय पुरुषांच्या स्वभावांतील बारीकसारीक छटा संवादांतून व्यक्त करण्याचें यांचें कौशल्यहि अप्रतीम आहे. पल्लेदार वाक्यरचना, संस्कृत व फारसी भाषांचा संस्कार, म्हणींचा उपयोग, पौराणिक उल्लेख, उपमा-दृष्टान्त-रूपक आणि उपरोध-विनोद यांची योजना, यांसारखे भाषाविशेष लक्षांत घेतां शैलीच्या दृष्टीनें इतर कोठलीहि बखर हिच्याशीं बरोबरी करणार नाहीं. **नाना फडणविसांच्या** अपूर्ण

आत्मचरित्रांत माधवरावांस पेशवेपद मिळेपर्यंतचा (इ. स. १७४२–६१) वृत्तांत आला आहे. निःसंकोचपणें केलेलें आत्मकथन या दृष्टीनें त्याचें महत्त्व विशेष आहे. भाषा प्रौढ व संस्कृतप्रचुर आहे. तीवरून पेशवाईतील ब्राम्हणी बोलीचें वळण स्पष्ट होतें. **हनुमंतस्वामींची बखर** (इ. स. १७९३) म्हणजे श्रेष्ठांच्या नातवाच्या टिपणावरून तयार केलेलें रामदासांचें चरित्रच. शिवाजी व रामदास यांचीं स्वभाववैशिष्ट्यें बखरकारानें चांगलीं वर्णिलीं आहेत. हनुमंतस्वामींची कथनपद्धति विशद व प्रेमळ आहे. गद्यांतील हें महत्त्वाचें संतचरित्र होय. तंजावरच्या बृहदीश्वर देवालयांतील प्रचंड शिलालेख म्हणजे एक बखरच आहे. इ. स. १८३० च्या सुमारास सरफोजी राजांनीं मराठेशाहीची समग्र हकीकत त्यावर खोदविली आहे. तंजावरी मराठीचा नमुना या दृष्टीनें हा लेख लक्षणीय ठरेल. सातारच्या प्रतापसिंहमहाराजांचा चिटणीस **मल्हार रामराव** यानें इ. स. १८१० च्या सुमारास सप्तप्रकरणात्मक शिवचरित्र, मराठ्यांची बखर व इतर पांचहि छत्रपतींचीं चरित्रें अशी दांडगी ग्रंथरचना केली. चिटणिसी दप्तराचा उपयोग केल्यानें त्यांचे हे बखरग्रंथ ऐतिहासिक दृष्ट्याहि मोलाचे झाले आहेत. इतिहासशास्त्राच्या जन्मापूर्वीचा मराठींतील पहिलाच व पद्धतशीरपणें लिहिला गेलेला इतिहासग्रंथ म्हणजे मल्हार रामरावांची 'मराठ्यांची बखर' होय. ग्रँट डफसारख्यानें आपल्या इतिहासलेखनाच्या कामीं मल्हार रामरावांचें साहाय्य घेतलें होतें. त्यावरून या क्षेत्रांतील त्यांची योग्यता व अधिकार हीं स्पष्ट होतात. व्यक्तीचें व कालाचें चित्र वाचकांपुढें उभें करण्याचें सामर्थ्य त्यांच्या झोकदार, प्रौढ व ओजस्वी भाषेंत आहे. आज्ञापत्राच्या धर्तीचें 'राजनीति' या नांवाचें यांचें एक प्रकरणहि उल्लेखनीय आहे. **कृष्णाजी विनायक सोवनी** (इ. स. १७८४–१८५४) यांची 'पेशव्यांची बखर' १९ व्या शतकाच्या पूर्वार्धांतच लिहिली गेली आहे. पेशवाईचा साग्र वृत्तांत यांत

आला आहे. ती माहिती ऐकीव असली तरी सरळ आणि सुबोध निवेदन-पद्धतीनें वाचनीय झाली आहे. इ. स. १८८२ मध्यें पटवर्धन सरदारांचा वृत्तांत जिच्यांत नमूद केला आहे, अशी '**हरिवंशाची बखर**' बाळकृष्ण हरिहर पटवर्धन यांनीं तयार केली. याच धर्तीवर अनेक सरदार, जहागिरदार, इनामदार यांनीं आपापल्या घराण्यांच्या कैफीयती (कुलवृत्तांत) सादर करणाऱ्या अनेक बखरी इनामकमिशनपुढील साक्षीसाठीं लिहवून घेतल्या. त्या अगदीं अर्वाचीन असून सहेतुकपणें सजविल्या असल्यानें ऐतिहासिक सत्याच्या दृष्टीनें त्यांना विशेष महत्व नाहीं. भाषादृष्ट्याहि त्या १९ व्या शतकांतील म्हणजे अगदीं अलीकडीलच आहेत.

ऐतिहासिक दृष्टीनें विचार करतां कोणत्याहि बखरीची योग्यता विशेष नाहीं. स्थलकालव्यक्ति यांचा विपर्यास, असंबद्ध वा परस्परविरोधी आणि संदिग्ध लिहिणें, पदरच्या कल्पित कथा आणि पौराणिक वंशावळी घुसडलेल्या इत्यादि दोषांमुळें ऐतिहासिक घटनांच्या स्थूल सत्यापलीकडे बखरींना अधिक विश्वसनीय मानतां येत नाहीं. ("बखरी अस्सल प्रमाण नाहींत"—राजवाडे[1]) बखरकारांची भूमिकाच मुळांत इतिहासचिकित्सकाची नाहीं.

बखर गद्याचें स्वरूप

इतिहासाची लेखनपद्धति किंवा इतिहासशास्त्र यांची त्यांना कल्पनाहि नव्हती, त्यांच्यापुढें राजतरंगिणी, विक्रमांकचरित, यांसारखे प्राचीन इतिहासग्रंथ व अठरा पुराणें हे आदर्श होते. त्याप्रमाणें कल्पित गोष्टींचा मालमसाला घालून आपली हकीकत रसाळ करण्याचा त्यांनीं प्रयत्न केला आहे. पुराणांच्या धर्तीवर अगदीं युधिष्ठिरापासून राजांची वंशावळ ते देऊं लागतात, त्यावरून त्यांच्या इतिहासविषयक ज्ञानाची मर्यादा लक्षांत येते. पण इतिहास लिहिण्याच्या भावनेनें त्यांनीं आपल्या बखरी लिहिलेल्याच

१ राजवाडे यांच्या ऐतिहासिक प्रस्तावना, खंड ४ (पानें २९७-९८).

नाहींत. सवाई माधवरावाला शिक्षण देण्यासाठीं नाना फडणविसांनीं बाळाजी गणेशाकडून पेशवाईची बखर (इ. स. १७८२) लिहवून घेतली. तर गोपिकाबाईंनीं सवाईमाधवरावाकरितांच 'दिनचर्या' प्रकरण लिहिलें. 'नारायण-व्यवहारशिक्षा' हें प्रकरणहि कालानुरूप आवश्यक वाटलेल्या नीतिगुणांच्या उपदेशासाठीं लिहून घेतलेलें दिसतें. अशा प्रकारें बखर-कारांचें लेखन तसें स्वयंस्फूर्त नसून परप्रेरित आहे. महाराष्ट्राच्या वैभव-कालांत खुद्द छत्रपति, पेशवे व इतर मराठे सरदार यांच्या पदरीं बखरनवीस असत. आपल्या धन्याच्या आज्ञेवरून ते विवक्षित युद्धप्रसंग, विवक्षित व्यक्तींचें कर्तृत्व किंवा घराण्यांचे इतिहास यांच्यासंबंधींच्या हकीकती (उपलब्ध ऐतिहासिक माहिती, कागदपत्रें, टिपणें, आणि दंतकथा-आख्यायिका, यांच्या आधारें) लिहून काढीत. बहुतांशीं त्या हकीकती संबंधीं माणसाच्या गुणवर्णनपरच असत; अर्थात् त्यांमधून निर्दोष, शास्त्रशुद्ध व समतोल ऐतिहासिक विवेचनाची अपेक्षा करणेंच अप्रस्तुत होईल. मात्र त्यांमध्यें तत्कालीन महाराष्ट्राचें हृद्‌गत व आकांक्षा यांचें स्पष्ट प्रतिबिंब पडलेलें दिसून येते. त्यामुळें या बखरी म्हणजे मराठ्यांच्या अस्तंगत सौभाग्याचे स्मृतिदीपच होत[२].

बखरकारांजवळ ऐतिहासिक दृष्टि नव्हती; त्याचप्रमाणें वाङ्मयीन दृष्टीचाहि संपूर्ण अभाव होता. शिवाय वाङ्मयनिर्मितीची कुवतहि त्यांच्या ठिकाणीं नव्हती. प्राचीन पद्यवाङ्मयाला जसे उच्च दर्जाचे प्रतिभासंपन्न लोक लाभले, तसें गद्याच्या बाबतींत झालें नाहीं. सारे बखरकार बहुधा कारकुनी पेशाचें असल्यानें पांडित्य, चिकित्सा, भाषाप्रभुत्व, लेखनकौशल्य या सर्वच बाबतींत ते दरिद्री होते. अवलोकन, अनुभव, अध्ययन या

२ 'प्रमुख बखरकारांची मुलाखत' (ले.-भालचंद्र), मनोरंजन, पुष्प. १६ वें (१९११)—पानें-२०९-२२१.

दृष्टीनें त्यांची पुंजी अगदीं बेताची होती. म्हणूनच लेखकाच्या मगदुराप्रमाणें निरनिराळ्या बखरींत कमीअधिक साहित्यगुण आढळतात. बखरकारांपुढें लेखनाचे उच्च आदर्श जसे नव्हते, त्याचप्रमाणें त्यांची स्वतंत्र परंपराहि नव्हती कीं, त्यांचा असा मोठा सुबुद्ध वाचकवर्गहि तेव्हां नव्हता. अक्षर घटविण्याच्या दृष्टीनें मुलांना बखरींच्या नकला करण्यास सांगावयाचें, यापलीकडे जुन्या काळीं वाङमय किंवा इतिहास दोन्ही दृष्टींनीं बखरींची कोणी विशेष दखल घेतली असें दिसत नाहीं. त्यामुळें बखरवाङमयाच्या बाबतींत क्रम, विकास, परंपरा, प्रसार कांहीं दिसतच नाहीं. म्हणून तर बखरी व बखरकार हे अवघ्या ५०–६० वर्षांनंतर संशोधनाचे विषय होऊन बसले. एकोणिसाव्या शतकाच्या पहिल्या पंचविशींत मल्हार रामराव चिटणीस (मृत्यु १८२३) जिवंत होतें. पण त्यांची कोणाला विशेष माहिती नव्हती. इ. स. १८७८ मध्यें 'काव्येतिहाससंग्रह' मासिक निघाल्यापासून ऐतिहासिक जिज्ञासेनें व वाङमयीन अपेक्षेनें बखरींचें संशोधन, संपादन, प्रकाशन सुरू झालें. हें कांहीं असलें तरी सभासद, चित्रगुप्त, कृष्णाजी शामराव, मल्हार रामराव यांच्या अल्पस्वल्प प्रयत्नांमुळें मराठी भाषेंतील गद्य वाङमयाची उणीव अंशतः तरी भरून निघाली. तसेंच त्यांच्या लहान लहान, तुटक तुटक पण अर्थपूर्ण आणि जोरकस, प्रौढ व परिणामकारक भाषेनें मराठी गद्याचें अंगभूत सामर्थ्य प्रगट केलें, हें निःसंशय.

भाषा व इतिहास या दोन्ही दृष्टींनीं बखरींपेक्षा ऐतिहासिक पत्रव्यवहार जास्त महत्त्वाचा आहे. गेल्या साठसत्तर वर्षांत अनेक संशोधकांच्या परिश्रमानें तीसचाळीस हजारांवर पत्रें प्रकाशित झालीं असून अप्रसिद्ध पण उपलब्ध असा ऐतिहासिक पत्रव्यवहार अगदीं पर्वतप्राय असा पडला आहे. या कागदपत्रांनीं महाराष्ट्राचें अंतरंग स्पष्ट करून दाखविलें, ही गोष्ट अगदीं निर्विवाद. मराठेशाहींतील कित्येक सरदार, मुत्सद्दी स्वतः पत्रलेखनांत

मराठींतील ऐतिहासिक पत्रव्यहार

वाकबगार होतेच, पण बहुतेकांच्या पदरीं जलद व मार्मिक लिहिणारे, हुषार, कल्पक, व्यवहारचतुर व प्रसंगावधानी पत्रलेखक असत. मुत्सद्दी बाण्याची भाषा त्यांच्या अगदीं अंगवळणीं पडून गेली होती. म्हणून त्यांच्या लेखनांत सावधगिरी, समतोलपणा, मनुष्यस्वभावाचें ज्ञान, लोकव्यवहाराचें सूक्ष्म अवलोकन, इत्यादि गुण प्रामुख्यानें आढळतात. आपल्या धन्याच्या मनांतला अभिप्राय असंदिग्ध व जोरदार शब्दांत सफाईनें व्यक्त करण्यांत त्यांचा हातखंडा होता. प्रसंग पडेल त्याप्रमाणें आज्ञा, उपदेश, आर्जव, मनधरणी, प्रलोभन, तडजोड, निषेध, धमकावणी इत्यादि भाव व्यक्त करण्यांत त्यांची लेखणी तरबेज होती. शिवाजीचें फौजेच्या अधिकाऱ्यांस[१] पत्र, शिवाजीचें व्यंकोजीस[२] पत्र, 'पळयाचे पारिपत्य करा, असा आदेश देणारें पहिल्या बाजीरावाचें[३] पत्र, होळकर-शिंदे यांच्या भांडणांत मध्यस्थी करतांना शिंदे यांची कानउघाडणी करणारें नानासाहेब पेशव्यांचें[४] पत्र, निजाम दरबारचे वकील गोविंदराव काळे[५] यांचें नाना फडणविसास पत्र, इत्यादि अनेक पत्रें वाङमयदृष्टचा उत्कृष्ट म्हणून दाखवितां येण्यासारखीं आहेत. या पत्रांपैकीं कांहीं पत्रांत लढाईचीं वा दरबारांतील महत्त्वाच्या प्रसंगांचीं तपशीलवार वर्णनें आढळतात. राजकीय व्यवहाराशीं संलग्न नसलेल्या सामाजिक, धार्मिक, नैतिक, व्यावहारिक अशा अनेक विषयांवरहि या पत्रलेखकांनीं आपले विचार मांडले आहेत. यशस्वी लढचांचीं स्फूर्तिदायक वर्णनें, अनपेक्षित पराभवांचें हृदयद्रावक वृत्तांत, प्रवासांतील बऱ्याईट अनुभवांचें यथातथ्य निवेदन, इत्यादि अनेक गोष्टी या पत्रव्यवहारांत

---

१ मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें, खंड ८–पृ. २३.

२ पत्रसारसंग्रह, भाग २, पत्र–२३३२.

३ महाराष्ट्राचा पत्ररूप इतिहास–पृष्ठें १४२–१४३.

४ मराठी रिसायत, मध्यविभाग, भाग २ रा.–पृष्ठें–७२–७३.

५ महाराष्ट्राचा पत्ररूप इतिहास–पृष्ठें २५९–२६१.

समाविष्ट झाल्या आहेत. त्यामुळें सर्वच दृष्टीनें हीं पत्रें मनोरंजक व उद्‌बोधक वाटतात. नाना प्रकारचे मायनें, शब्दप्रयोग, म्हणी, वाक्प्रचार, सुभाषितें, इत्यादींचा विपुल संग्रह यांमध्यें आहे. पत्रांचीं भाषा साधी, निरलंकृत, स्पष्ट व मार्मिक आहे. संस्कृत व फारसी दोन्ही भाषांचा सढळ हातानें उपयोग केला आहे. तरी पण, वाङमयीन दृष्टीनें मुद्दाम भाषा सजविण्याचा कोणीं प्रयत्न केल्याचें दिसत नाहीं.

अशा प्रकारें बखरी व पत्रव्यवहार यांतील गद्यानें राजकीय व्यवहार एवढेंच कार्यक्षेत्र व्यापलेलें दिसून येतें. त्यामुळें प्राचीन मराठी गद्याची वाढ एकांगी झाली. व्यापाराची अभिवृद्धि किंवा विज्ञानाची ओळख या दोन कार्यक्षेत्रांकडे मराठ्यांचें लक्षच नसल्यामुळें मध्ययुगीन कालांत मराठी गद्याचा सर्वांगीण विकास होऊं शकला नाहीं. एवढें खरें कीं, या पत्रव्यवहारांत तत्कालीन महाराष्ट्राचें अंत:करण ज्वलंत स्वरूपांत प्रकट झालें आहे. म्हणून ऐतिहासिक पत्रव्यवहार हा महाराष्ट्राच्या इतिहासाचा अमोलिक ठेवा आहे. मात्र स्वराज्याच्या दीडशें वर्षांत जो विपुल पत्रव्यवहार झाला, तो एकोणिसाव्या शतकांतील अखेरच्या[१] दशकापर्यंत जेथल्या तेथें दप्तरांतच धूळ खात पडल्यानें अव्वल इंग्रजींतील गद्याला त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं, ही खेदाची गोष्ट होय.

---

१ ग्रँट डफच्या बखरीवरील नीलकंठ जनार्दन कीर्तने यांची टीका व ‘ इतिहास ’ विषयावरील चिपळूणकरांचा निबंध यांच्यामुळें राष्ट्रीय दृष्टीनें ऐतिहासिक वाङमयाचें संशोधन करण्याच्या प्रयत्नांना चालना मिळाली. प्रथम पोवाडे, बखरी यांचें संशोधन-प्रकाशन झालें. त्यानंतर ऐतिहासिक पत्रव्यवहाराकडे राजवाडे, वासुदेवशास्त्री खरे, पारसनीस इत्यादि संशोधकांचें लक्ष गेलें. १८९० नंतरच पत्रव्यवहारांचे खंड प्रसिद्ध होऊं लागले.

— आंग्लपूर्वकालीन वाङ्मयाचा समारोप —

आंग्लपूर्वकालांतील मराठी वाङ्मयाचें विहंगम दर्शन या ठिकाणीं संपलें. या समग्र वाङ्मयेतिहासाचे स्वाभाविकपणेंच तीन कालखंड पडले आहेत. पहिल्या इ. स. १०५० ते १३५० या मुसलमानी आक्रमणापूर्वीच्या कालखंडांत नाथ, महानुभाव व वारकरी या संप्रदायांचा धर्मप्रचार व त्यांची पंथनिष्ठ वाङ्मयनिर्मिति यांमुळें **सांस्कृतिक प्रबोधनाची पहिली लाट** महाराष्ट्रांत उसळली. तिनें प्रादेशिक व भाषिक एकत्वाची जाणीव महाराष्ट्रांत प्रथमच निर्माण केली. धार्मिक जीवनांत समतेची व लोकसंग्रहाची, सामाजिक व्यवहारांत भूतदयेची व औदार्याची, आणि वाङ्मयीन प्रांतांत सहानुभूतीची नि आत्माविष्काराची नवी जीवनदृष्टि या पहिल्या प्रबोधनानें महाराष्ट्राला दिली. याच जीवनदृष्टीच्या प्रकाशांत त्यानंतरचीं चारशें पांचशें वर्षं एकनाथ, तुकाराम, रामदास या धर्मसुधारकांनीं व मुक्तेश्वर, वामन, मोरोपंत, इत्यादि ग्रंथकारांनीं प्रगतीची वाटचाल केली.

नामदेवांच्या समाधीनंतर धर्मसुधारणेची व वाङ्मयनिर्मितीची ही पहिली लाट ओसरली. परधर्मीय राजवटींत प्रगतीचा प्रवाह कांहीं काळ स्थगित झाला. परंतु सुमारे दीडशें वर्षांनीं महाराष्ट्राच्या राजकीय परिस्थितींत पालट होऊन महाराष्ट्रीयांच्या कर्तृत्वाला अनुकूल काळ येऊं लागतांच पुनरुत्थानाचे नवे वारे वाहूं लागले आणि भाषाभिवृद्धीची व **साहित्यसंवर्धनाची दुसरी लाट** पुन्हां जोरानें उसळली. तेव्हां परधर्मीय आक्रमणाच्या काळांत वैदिक धर्मांतील आचारविचार टिकवून धरण्याच्या दृष्टीनें दत्तसंप्रदायानें ब्राम्हणवर्गांत जागृति घडवून आणली; आणि मराठींत गुरुचरित्रादि ग्रंथांची रचना करून ब्राम्हणांच्या सत्व-भावनेची व धर्मनिष्ठेची जोपासना केली. दत्तसंप्रदायाशीं गुरुपरंपरेनें

संबंधित असलेल्या एकनाथांनीं त्या पंथांतील स्वत्वरक्षणाच्या प्रेरणेला व्यापक स्वरूप येण्यासाठीं, जुन्या ज्ञानेश्वरपरंपरेचा पाठिंबा घेऊन भागवत-धर्मांतील उदारतेची व समताभावाची जोड दिली. एकनाथांच्या पावलांवर पाऊल ठेवून मुक्तेश्वर-तुकाराम-रामदासादि समाजशिक्षकांनीं समता, औदार्य आणि सहानुभूति या आध्यात्मिक गुणधर्मांना नीतिविचारांचें सामाजिक अधिष्ठान मिळवून दिलें, आणि आत्माविष्काराच्या सहज-प्रवृत्तीला वस्तुनिष्ठ दृष्टीची जोड देऊन वाङमय निर्मितीचें वळण बदलून टाकलें.

विचाराचें अधिष्ठान आणि वस्तुनिष्ठ दृष्टीची जोड यांमुळें वाङमयाचें क्षेत्र विस्तारलें. त्याचा पसारा वाढला-प्रकार वाढले. वैपुल्याबरोबर वैविध्यानेंहि मराठी वाङमयाचा वृक्ष फुलून गेला. पहिल्या कालखंडांतील आत्मनिष्ठ, स्वयंस्फूर्त व भावनात्मक अशा एकमार्गी वाङमयवृक्षाला अनेक शाखोपशाखा फुटल्या आणि वाङमयकृतींच्या फुलांफळांनीं त्या बहरून गेल्या. पांडित्यपूर्ण टीकावाङमयाच्या शाखेंत दासोपंत, शिवकल्याण, रमावल्लभदास, शामाराध्य, रंगनाथ मोगरेकर इत्यादींच्या व्यासंगपूर्ण आणि विस्तृत ग्रंथांनीं अमोलिक भर टाकली; तर, प्रदीर्घ कथाग्रंथाची शाखा बहिरा पिसा जातवेद, विष्णुदास नामा, कृष्णदास मुद्‌गल, कृष्णयाज्ञवल्की, व मुक्तेश्वर यांनीं संपन्न करून सोडली. पुढील कालखंडांत उत्कर्षाप्रत पोंचलेल्या आख्यानकवितेच्या शाखेला मुक्तेश्वर, शामाराध्य, लोलिंबराज यांच्या स्फुट रचनेनें सुफलित केलें; तर, मागील कालखंडांतील भावकवितेची-अभंगरचनेची-परंपरा तुका-रामांच्या अभंगवाणीनें परमोत्कर्षास नेली. या कालखंडांतील दासोपंत, एकनाथ, रमावल्लभदास यांसारख्यांच्या स्फुट पदरचनेंत आत्मनिष्ठ वृत्तीचा विलास, तर भारुडांसारख्या जानपदकवितेंत बहिर्मुख वृत्तीचा विकास अनुभवितां येतो. याप्रमाणें प्रत्येक शाखेंत विपुल वाङमय निर्माण

होऊं लागताच, त्यांतून त्या त्या प्रकाराचें रचनातंत्र निर्माण व्हावें, हें स्वाभाविकच होय. म्हणून जुन्या मराठी वाङ्मयांतील बहुतेक साऱ्या वाङ्मयप्रकारांचें व त्यांच्या तंत्राचें उगमस्थान या कालखंडांतच सांपडतें.

या वाङ्मयप्रकारांमुळें पहिल्या कालखंडांतील मराठी वाङ्मयाची एकरूपता जाऊन या कालखंडांत तें बहुविध रूपानें लोकांपुढें आलें; त्यामुळें व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाचा कामगिरी पार पाडण्यास तें समर्थ ठरलें. पांडित्यपूर्ण टीकाग्रंथांनीं बुद्धीला खाद्य पुरविलें; तर, अभंगासारख्या आत्मनिष्ठ कवितेनें अंतःकरणाची भूक भागविली. ललितकथांनीं रसिकवृत्तीचें पोषण केलें तर, रामायणादि काव्यांतील जीवनादर्शांनीं नीतिगुणांचें संगोपन केलें तसेंच, दैनंदिन जीवनाशीं संबंधित असलेल्या भारुडें, गौळणी, पदें या गेयताप्रधान कवितेनें अगदीं खालच्या पातळींतील लोकांपर्यंत उन्नत स्वरूपाच्या धर्मविचाराचें लोण नेऊन पोंचविलें. अशा रीतीनें अंतर्मुखतेबरोबर बहिर्मुख दृष्टि, अद्भुत-रम्यतेच्या जोडीला वास्तव वातावरण आणि आध्यात्मिक जीवनादर्शांना मिळालेली सामाजिक नीतीची जोड, या वैशिष्टयांनीं या काळांतील वाङ्मयाला पहिल्या कालखंडांतील वाङ्मयापेक्षां वेगळेपणा प्राप्त झाला. या वैशिष्टयांचा परिणाम या काळांतील ग्रंथकारांच्या भाषाशैली-वरहि झाला आहे. टीका, कथाग्रंथ, आख्यानें व स्फुटरचना यांच्या तंत्रविशिष्ट सारखेपणांतहि त्या त्या ग्रंथकर्त्याची वेगळी शैली स्पष्ट जाणवते. मागील कालखंडांतील आत्मनिष्ठ रचनेंत व्यापक आत्माविष्कारा-पलीकडे सुस्पष्ट असें व्यक्तित्वदर्शन होत नाहीं. त्या कालांतील वाङ्मयांतर्गत व्यक्तित्वाभोंवतीं अंधुकतेचें, अद्भुतरम्यतेचें धुकें पसरल्यानें अस्फुट व विरल अशी व्यक्ति त्यांतून दृग्गोचर होते. उलट या कालखंडाच्या वाङ्मयांतील व्यक्ति प्रस्फुट, सघन व संपन्न स्वरूपांत आपल्यापुढें उभी राहते. याचें

एक कारण असें कीं, भावना, कल्पना, यांच्या गुणधर्मांबरोबर विचाराचे गुणविशेषहि या कालांतील भाषेंत निर्माण झाले आहेत. म्हणूनच या कालांतील ग्रंथकारांची भाषा अधिक प्रौढ, प्रगल्भ, परिपक्व, जोमदार आणि सकस आहे.

इ. स. १६५० ते १८४० हा तिसरा प्रदीर्घ कालखंड म्हणजे वाङमयप्रकारांच्या विकासाचा, तंत्राच्या परिपूर्णतेचा कालखंड होय. पंडिती टीकापद्धतीचा जुन्या मराठींतील परमोत्कर्ष म्हणजे वामनपंडितांची 'यथार्थदीपिका,' तर व्यावहारिक दृष्टीच्या नीत्युपदेशाचें परिणत स्वरूप म्हणजे रामदासांचा 'दासबोध' हा ग्रंथराज. आख्यानकवींच्या कलाविलासाचा उच्चांक म्हणजे रघुनाथ पंडितांचें 'दमयंती-स्वयंवर' तर, प्रदीर्घ कथाग्रंथांच्या परंपरेचा अखेरचा मानबिंदु म्हणजे मोरोपंती 'भारत'च. कथानिवेदनाची माधुरी श्रीधरांच्या ग्रंथांत सांठविली आहे तर, भाविकतेची गोडी मध्वमुनि-अमृतराय यांच्या 'पदांत' उतरली आहे. भाषेची करामत आणि रचनेची कारागिरी पाहावयाची झाल्यास मोरोपंती रामायणें, अमृतरायी कटाव किंवा शाहिरांचे सवाल-जबाब यांच्याकडेच रसिकानें वळावें. भाषासामर्थ्याच्या प्रतीतीसाठीं समर्थांचें वाङमय उघडावें. शाहिरांच्या वाणींत भाषाविलास पाहावा; तर भाषाप्रभुत्वासाठीं मोरोपंती भारताचीं पारायणें करावींत. अशी या कालखंडांतील वाङमयाची महती सांगतां येईल. मात्र आशयाच्या किंवा जीवनविषयक दृष्टिकोनाच्या बाबतींत या मंडळींनीं एक पाऊलहि पुढें टाकलेलें दिसत नाहीं. रामदास, वामन, मोरोपंत, रामजोशी यांपैकीं कोणीहि घ्या. त्यांचा वैचारिक पिंड पहिल्या दोन कालखंडांतील ग्रंथकारांपेक्षां बिलकुल वेगळा नाहीं. एकाच जीवनविषयक दृष्टिकोनांतील कोठल्या अंगांवर जोर द्यावयाचा व त्याचा आविष्कार कसा करावयाचा एवढ्यापुरतेंच कांहींसें वेगळेंपण त्यांच्यांत आढळेल. परंतु मूळ दृष्टिकोनांत कांहींच फरक नसल्यानें काव्याचे विषय व धाटणी, त्यांतील विचार आणि कल्पना यांमध्यें 'तोचतोचपणा' आढळून येतो.

सर्वच जुन्या मराठी वाङमयाची ही स्थिति आहे. भागवतधर्मातील परंपरागत जीवनमूल्यांभोंवतींच आमचे सारे ग्रंथकार रुंजी घालीत आहेत. भास्कर–दामोदर, ज्ञानेश्वर–नामदेव, एकनाथ–तुकाराम, रामदास-रघुनाथ श्रीधर–महिपति, मोरोपंत–रामजोशी या सगळ्यांची जीवनदृष्टि एकच आहे. प्रकृतिभेदानुरूप शैली, भाषा किंवा वृत्तयोजना यांत जरासा वेगळेपणा आढळतो इतकेंच. बाकी सगळे एकाच रंगणांत आपल्या प्रतिभेचा व प्रज्ञेचा विलास करून दाखवीत आहेत. 'ओंवी, अभंग, श्लोक, कटाव आणि आर्या' या शब्दांतच जुन्या मराठी वाङमयांतील वेगवेगळेपणा वर्णन करावा लागतो. एरवीं एकाच आध्यात्मिक विचाराचें सूत्र साऱ्या वाङमयाच्या अंतरंगांत गोंवलें गेलें आहे. त्यामुळेंच तंत्रदृष्ट्या–देखील विशेषशी नवी भर जुन्या मराठी साहित्यांत पडली नाहीं.

आशयाच्या दृष्टीनें ज्ञानेशांनीं जो नवेपणा आणला, त्या अंतरंगाच्या नवेपणाला एक नवें बाह्यांग नामदेवांच्या अभंगानें मिळवून दिलें. नामदेवांपासून तुकारामांपर्यंत अभंग हा वाङमयप्रकार सर्व बाजूंनीं परिपुष्ट होत गेला. पण मूळच्या नव्या आशयाकडे दुर्लक्ष होत गेल्याच्या काळांत म्हणजे तिसऱ्या कालखंडांत अभंगाचा वाङमयप्रकारहि मागें पडला. आख्यानकवींनीं अक्षरगणवृत्तात्मक श्लोकरचना सुरू केली ती संस्कृतच्या अनुकरणानेंच. म्हणून मराठी साहित्याचा असा तो स्वतंत्र प्रकार ठरत नाहीं. शिवाय श्लोकरचनेचा विकासहि मर्यादित प्रमाणांत झालेला दिसतो. याचा अर्थ हाच कीं, मराठीच्या स्वभावधर्मांत श्लोकरचनेचें तंत्र तसें रुजलें नाहीं. मराठेशाहीच्या उत्कर्षकालांत बहरास आलेल्या शाहिरी कवितेनें प्रारंभीं प्रारंभीं तरी जीवनाचा नवा आशय व्यक्त केला. त्यासाठीं पोवाडे–लावण्यांचें नवें तंत्रहि निर्माण झालें. अभंगांनंतर पोवाडे–लावण्या हीच मराठ्यांची स्वतंत्र कविता होय. पण या 'लावणी' तंत्राला विशेष प्रतिष्ठा अशी लाभली नाहीं. शिवाय पुढें जेव्हां त्यांनीं आपल्या वैराग्यपर लावण्यांतून आध्यात्मिक वेदान्त म्हणजे जुनाच आशय सांगावयाला सुरुवात केली, तेव्हां त्यांच्या नव्या तंत्राचें स्वतंत्र अस्तित्वहि संपुष्टांत आलें.

जुन्या मराठी साहित्यांत गद्याची परंपरा निर्माण होऊं शकली नाहीं. भौतिक दृष्टीनें वा तर्कनिष्ठ पद्धतीनें जीवनाचा विचार आम्ही करीत नव्हतों तोंपर्यंत, म्हणजे इंग्रजी अमदानी सुरू होईतों, गद्यवाङमयनिर्मितीला अनुकूल असें वातावरणच महाराष्ट्रांत नव्हतें. आमचें बहुतेक सारें प्राचीन वाङमय पद्यमय आहे. पारलौकिकाचा विचार करणारें आहे. धार्मिक पंथांच्या प्रचार-प्रसाराच्या अनुषंगानें निर्माण होत गेलें आहे. त्यामुळें एकाच प्रकारचें आणि ठराविक साचाचें असें तें बनलें आहे. त्यांत वैपुल्य असलें तरी विविधता नाहीं. लौकिक विषयांना त्यांत विशेष स्थान नाहीं. नवे नवे वाङमयप्रकार नाहींत. ठराविक चाकोरीबाहेर पडण्याची धडपड नाहीं. विचारांत, भावनाविष्कारांत, कल्पनाविलासांत, शब्दयोजनेंत सर्वत्र एकच प्रकार आढळतो. याचें मुख्य कारण हें कीं, इंग्रजी होईपर्यंत आमचें सारें जीवितच अगदीं एकसुरी व एकप्रवाही असें चाललें होतें. आध्यात्मिक मूल्यमापनाखेरीज दुसऱ्या जीवनमूल्यांची आम्हांला ओळख नव्हती. पारलौकिकाच्या तजविजीखेरीज दुसऱ्या निःश्रेयसाची-ध्येयाची आम्हांला जाणीव नव्हती. धार्मिक आचार-विचारांखेरीज दुसऱ्या प्रकारच्या आचार-विचारांची आमच्या जीवनविषयक दृष्टीला विशेष मातब्बरी नव्हती. त्यामुळें धार्मिक, पारलौकिक, आध्यात्मिक भाषेखेरीज दुसरी भाषाच आम्ही बोलूं शकत नव्हतों. त्याच त्याच गीताटीका, तींच तींच रामायण-भारत-भागवत यांतील आख्यानें आणि तोच तोच भक्तिमार्गाचा उपदेश यांच्या रंगणांतून बाहेर पडण्याची इच्छाच आमच्या प्रतिभावानांना झाली नाहीं. म्हणून तर, मोरोपंतांसारखा भाषाप्रभु १०८ रामायणांच्या आवर्तनांतच पुरुषार्थसिद्धीचें समाधान मानीत असलेला दिसून येतो. इंग्रजी अमदानीपर्यंत महाराष्ट्रांत कसलीच वैचारिक क्रांति वा मूलगामी बदल घडून आला नाहीं. त्याचा वाङमयीन परिणाम म्हणजे जुन्या मराठी साहित्यांतील एकांगीपणा व नवनिर्मितीचा अभाव हाच होय.

अर्वाचीन युगाकडे —

पेशव्यांप्रमाणें भारतांतील साऱ्याच मध्ययुगीन राज्यकर्त्यांना हिंदी समाजाच्या अन्तःस्थ दुर्बलतेमुळें इंग्रजांसारख्या प्रबल शक्तीच्या नि प्रगत विचाराच्या शत्रूपुढें सारखी हार खावी लागली. तेव्हां त्या सर्वांनीं आपापलीं राज्यशासनाचीं सूत्रें त्या परद्वीपस्थांच्या हवालीं करून पारतंत्र्याचें अपमानित जिणें मुकाटपणें स्वीकारलें. अर्थात् हा केवळ इंग्रजांच्या शस्त्रसामर्थ्याचा चमत्कार नव्हता; तर त्यांच्या शास्त्रज्ञानाचा प्रभाव होता. 'वस्तुतः मराठे हे शस्त्रजित नव्हेत तर, ते शास्त्रजित ठरले.' ह्या विधानाचा अर्थ हाच कीं, ब्रिटिशांच्या भौतिक शास्त्रांच्या अर्वाचीन ज्ञानापुढें एतद्देशियांच्या सर्वश्रेष्ठ अशा अध्यात्मविद्येचे वा पौराणिक शास्त्रज्ञानाचें कांहीं चालूं शकलें नाहीं.

मात्र इंग्रजांच्या ज्या भौतिक विद्यांमुळें राजकीय क्षेत्रांत आम्हांला हार खावी लागली, त्या विद्या आत्मसात् करण्याकडेच महाराष्ट्राच्या नव्या पिढीचें लक्ष खेचलें गेलें. कारण राजकीय क्रांतीच्या पाठोपाठ यांत्रिक मालाच्या रूपांत औद्योगिक क्रांतीचें पदार्पण आमच्या देशांत झालें; अन् त्यामुळें आमच्या जीवनाची आर्थिक बैठकच सारी बदलून गेली. वहातुकीचीं नि छपाईचीं यंत्रें इकडे येतांच आमच्या जीवनव्यवहारांत अन् जीवनदृष्टींत अंतर्बाह्य पालट घडून आला. अव्वल इंग्रजीच्या काळांत अवघ्या दहा पंधरा वर्षांत आमच्या भोंवतालची सर्वच सृष्टि पालटली, त्यासरशी आमची दृष्टि पालटणें आम्हांला अगत्याचें वाटूं लागलें.

इंग्रजांनीं स्वार्थी हेतूनें येथें पाश्चात्य शिक्षण देण्याला सुरुवात केली असली तरी बदलत्या काळाच्या गरजेनुसार आमचें शिक्षण बदलण्याची आवश्यकता आम्हांलाहि पटली आणि नव्या शिक्षणाचा

स्वीकार नि पुरस्कार उत्साहानें अन् हिरीरीनें आम्ही करूं लागलों. शिक्षण बदलतांच वाङमयाचें स्वरूपहि पालटलें. वेदविद्ये ऐवजीं यंत्रविद्या शिकणें भाग पडतांच, भारत-भागवत-रामायण या ग्रंथांच्या पद्यात्मक अनुवादांपेक्षां भूगोल, इतिहास, गणित या विषयांची गद्य भाषांतरेंच आमच्या बदलत्या जीवनाशीं सुसंगत ठरली. त्यामुळें हळूहळू गद्याचे साम्राज्य सर्वत्र पसरत गेलें. प्राचीनकाळच्या पद्याला केवळ काव्याचा असा लहानसा प्रदेश तोडून देण्यांत आला अन् त्याच प्रदेशांत श्रद्धा, भाव, कल्पना यांची हकालपट्टी केली जाऊन संशय, तर्क नि विचार यांना सर्वत्र प्रतिष्ठा लाभली. पारलौकिकाचें ध्येय मागें पडून लौकिक क्षेत्रांतील अभ्युदयाचीं स्वप्नें नवी पिढी पाहूं लागली-रंगवूं लागली. या शतकाच्या उत्तरार्धांत ब्रिटनचा इतिहास अभ्यासल्यानें व्यक्तिवाद, राष्ट्रवाद, लोकशाही इत्यादि नव्या निष्ठांशीं आमची जानपछान होत गेली; तर इंग्रजी वाङमयाच्या परिचयानें व अध्ययनानें वाङमयाच्या अनेकविध प्रकारांशीं अन् आविष्काराच्या विविध पद्धतींशीं, आमची ओळख दृढ होत गेली. त्यामुळें मध्ययुगीन कालांतील पेशवाई अखेरपर्यंतच्या मराठी वाङमयाचें एकसुरी व एकप्रवाही स्वरूप नाहींसें होत जाऊन बदलत्या जीवनाच्या आधारानें विकसित होत गेलेल्या अर्वाचीन मराठी वाङमयाचें स्वरूपहि बहुरंगी व बहुढंगी होत गेले. पण त्याचा विचार ' अर्वाचीन मराठी वाङमयाच्या स्वरूप-दर्शना-'चे वेळींच करणें सयुक्तिक होईल.

ज्ञानेशांची अमृतवाणी

संपादक : प्रा. ह. श्री. शेणोलीकर

स्कूल अँड कॉलेज् बुक स्टॉल, कोल्हापूर.

उर्मिला

[निवडक कवितांचा संग्रह]

साय-साखर

[बालगीतांचा संग्रह]

कवि : कृ. ब. निकुम्ब.

स्वाती प्रकाशन, वसंतविहार बुकडेपो,
गणपतगल्ली, बेळगांव.